# अनुक्रमणिका


**4**
अध्यक्षीय- जयंत पाटील
पक्षाचे काम करणाराच खरा कार्यकर्ता!

**5**
प्रबंध संपादकीय- दिलीप वळसे पाटील
दसऱ्यानिमित्त लुटा, विचारांचे सोने

**6**
संपादकीय- डॉ. सुधीर भोंगळे
पीएफआयबद्दल आताच जाग का?

**10**
राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अधिवेशन,भाषणे...
१) शरद पवार-१०, २) प्रफुल पटेल-१८

**26**
राष्ट्रवादीची केंद्र सरकारविरोधात श्वेतपत्रिका
बढाईखोर सरकारचे वस्त्रहरण!
अमृत महोत्सवी वर्षातील भारत

**32**
राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अधिवेशन,भाषणे...
१) छगन भुजबळ-३२
२) सुप्रिया सुळे- ३४
३) डॉ. अमोल कोल्हे-३८

**41**
राष्ट्रीय कार्यकारिणी बैठकीचा वृत्तांत
राष्ट्रीय अधिवेशनात झालेली नेत्यांची भाषणे-४२

**46**
पक्षाच्या सरचिटणीसांचा अहवाल-२०१८ ते २०२१
- पीतांबरन मास्टर

**50**
अर्थव्यवस्था आणि रुपया घसरण थांबणार कशी?
- अनंत बागाईतकर

**58**
अजित पवार जळगाव जिल्हा दौरा वृत्तांत
बनवाबनवी करणाऱ्या सरकारचे
'गद्दार'म्हटलं की धाबे दणाणतात
- अजित पवार

**68**
भाजपचे स्वप्नरंजन आणि कटूवास्तव
- व्यंकटेश केसरी

**72**
गुजरातचे ६३१ मच्छीमार पाकिस्तानच्या
तुरुंगात, सत्ताधाऱ्यांचं दुर्लक्ष
- जतीन देसाई

**76**
न्याय आणि निकाल
- सुरज चव्हाण


**78**
फ.मुं. शिंदे अमृतमहोत्सव सत्कार समारंभ,भाषणे
१) शरद पवार,
२) प्रा. विश्वास वसेकर-८२, ३) फ.मुं. शिंदे-८३

**86**
कवी ना.धो. महानोर वाढदिवस समारंभ,भाषणे
१) डॉ. भालचंद्र नेमाडे-८६, २) अशोक जैन- ८८

**89**
महाराष्ट्राचे समाजशिक्षक- प्रा. गं.बा. सरदार
-डॉ. गणेश राऊत

**94**
घंटाकर्ण- कानोकानी (राजकीय किस्से)

**102**
शेवटचे पान-
मौन राखणं एवढंच हाती!
-हेमन्त टकले


राष्ट्रवादी
स्वाभिमानी आपला राष्ट्रवादी विचार!!

**संचालक**
**हेमन्त टकले**
**प्रबंध संपादक**
**दिलीप वळसे पाटील**
**संपादक**
**डॉ. सुधीर भोंगळे**
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी प्रबंध संपादक, संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.

**संपादकीय पत्रव्यवहार**
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरेडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट,
मुंबई-४०० ०३८
०२२-३५३४७४००/०१
**कला निर्देशन**
धनंजय सस्तकर
**मांडणी**
दिलीप रोडे

**वर्गणीचे दर-**
**वार्षिक रु. ५००/-**
**वर्गणीचा धनादेश**
**'हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.'**
या नावाने काढावा.
**www.ncp.org.in**
यावर मासिक उपलब्ध
**फोटो**
प्रशांत चव्हाण

**मुद्रक, प्रकाशक**
**हेमन्त प्रभाकर टकले** यांनी
**'हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.'**
च्या वतीने मीडिया आर ॲण्ड डी.,
१३, अमृत मधुरा, प्लॉट नं. ३, सेक्टर-३,आरएससी-२८, चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०००६७ येथे
छापून ७८, रेशमभवन, ६ वा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई-४०००२०
येथून अंक प्रकाशित केले.

अध्यक्षीय



# पक्षाचे काम करणाराच खरा कार्यकर्ता!

लवकरच आपल्याला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना सामोरे जावे लागणार आहे. यामध्ये काही महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समित्या आणि ग्रामपंचायत निवडणुकांचा समावेश आहे. या सर्व निवडणुकांमध्ये सर्वाधिक जागी आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते निवडून येऊन आपला पक्ष राज्यात प्रथम क्रमांकाचा ठरला पाहिजे या दृष्टीने तातडीने प्रयत्न सुरू करणे अगत्याचे व महत्त्वाचे आहे. म्हणूनच नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात पक्षाने शिर्डी येथे महत्त्वाच्या कार्यकर्त्यांचे दोन दिवसांचे राज्यस्तरीय शिबीर ठेवले आहे. या शिबीराला मार्गदर्शन करण्यासाठी पक्षाचे आठव्यांदा राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून एकमताने निवड झालेले व आपले प्रमुख आधारस्तंभ व ज्येष्ठ मार्गदर्शक मा. श्री. शरद पवार साहेब उपस्थित राहणार आहेत. पवार साहेबांचे मार्गदर्शन ही कार्यकर्त्यांच्या दृष्टीने मोठी भाग्याची गोष्ट आहे. देशातील बहुतेक सर्व पक्षांचे आणि विशेषतः विरोधी पक्ष व त्यांचे नेते अनेक विषय व प्रश्नांवर पवार साहेबांचे मार्गदर्शन घेत असतात; त्यासाठी उत्सुक असतात आणि प्रसार माध्यमांचे प्रतिनिधीही एखाद्या गोष्टीकडे साहेब कशा पद्धतीने व दृष्टीकोनातून पाहतात व कशी मार्मिक टिप्पणी करतात हे ऐकण्यासाठी आसुसलेले असतात. याचा अनुभव अनेक वर्षांपासून आपण सर्वजण घेत आलो आहोत. अर्थात यामागे त्यांची मोठी कष्ट, मेहनत, बांधिलकी, आपुलकी, अभ्यास, निरीक्षण, चिंतन-मनन आणि प्रदीर्घ अनुभवाची शिदोरी आहे. या सर्व गुणांच्या आधारे ते गेली ५५ वर्षे राजकारणात व समाजजीवनात आपले स्थान मजबुतीने टिकवून आहेत.

प्रश्न कितीही जटील व गुंतागुंतीचा असो, तो चटकन चुटकीसरशी सोडवण्याची क्षमता व कुशलता मा. साहेबांमध्ये असल्यामुळे देशातील सर्व विरोधी पक्षाच्या नेत्यांनी त्यांचे नेतृत्व साहेबांनीच करावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला व पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांना सत्तेवरून खाली खेचण्यासाठी सर्व विरोधकांची एकजूट करून मोट बांधण्याचे काम पवार साहेब करीत आहेत. या लोकसभा निवडणुकांची नांदी म्हणून आपण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे पाहिले पाहिजे. वाढलेली प्रचंड महागाई, डिझेल-पेट्रोलचे गगनाला भिडलेले भाव, घरगुती वापराच्या गॅस सिलेंडरच्या किंमती सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेलेल्या, उज्वला गॅसचा उडलेला फज्जा व त्यामुळे महिलांना पुन्हा चुलीचा घ्यावा लागलेला आसरा, वाढती बेरोजगारी, जीएसटी कराच्या माध्यमातून सरकारने सर्वसामान्य गोरगरीबांची चालविलेली लूट व त्यामुळे अशक्य झालेले जगणे, लॉकडाऊन व कोरोनामुळे कोट्यावधी लोकांच्या गेलेल्या नोकऱ्या व उघड्यावर आलेले संसार, पूर-अतिवृष्टी यासारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे उध्वस्त झालेला शेतकरी व शेतमाल आणि शेतजमिनींचे झालेले प्रचंड नुकसान व त्या प्रमाणात न मिळालेली नुकसानभरपाई यामुळे प्रत्येक क्षेत्रातला माणूस सरकारवर नाराज आहे, संतप्त झालेला आहे. तो सरकारला निवडणुकीच्या माध्यमातून धडा शिकविण्याच्या मनःस्थितीत आहे. या परिस्थितीत खचलेल्या व मनोबल दुर्बल झालेल्या जनतेला मदतीचा भरभक्कम हात देऊन सहकार्य करण्याची जबाबदारी आपली आहे. या संकटकाळात जर आपण त्यांना मदत करू शकलो तर ते त्याची जाण ठेवून निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला निश्चित मतदान करून विजयासाठी हातभार लावतील.

महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर असताना त्याने राज्यातील जनतेच्या कल्याणाचे व विकासाचे अनेक निर्णय घेतले होते. परंतु मा. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सत्तेवर आलेल्या सरकारने ते रद्द करून टाकले आहेत. त्यामुळे राज्याचे व जनतेचेही मोठे नुकसान होणार आहे. हे सरकार पाडण्यासाठी भाजपने व विशेषतः या पक्षातील केंद्रीय नेतृत्त्वाने खूप पुढाकार घेतला होता हे आता लपून राहिलेले नाही. भाजपची सत्ता मिळविण्याची हाव व लालसा प्रचंड असून जिथे लोक सत्ता देणार नाहीत तिथले आमदार खरेदी करून, कायदा व लोकशाहीचे संकेत यांना धाब्यावर बसवून आणि ईडी, सीबीआय, प्राप्तिकर विभाग, पोलिस व अन्य सरकारी यंत्रणांचा वापर करून धाकधपटशा दाखवून व अटकेची भिती समोर करून आमदारांना पक्षांतर करावयास भाग पाडले जात आहे हे महाराष्ट्रातच नव्हे तर मध्यप्रदेश, गोवा, अरूणाचल या राज्यातही आपल्याला पहावयास मिळाले आहे. लोकनियुक्त सरकारे पाडून जबरदस्तीने सत्ता मिळविण्याच्या भाजपच्या हव्यासाला जनता नुसती कंटाळली नसून संतप्त झालेली आहे. तिच्या मनात भाजपच्या नेत्यांबद्दल प्रचंड राग व उद्वेग आहे. तो या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमधून प्रकट होणार आहे. अशा वेळी आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी सत्य व भाजपचे कारनामे जनतेसमोर जाऊन जाहीरपणाने सांगितले पाहिजेत. त्यांचा डंका पिटवला पाहिजे. या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा आपल्या परिसराच्या व भागाच्या विकासाशी अत्यंत जवळचा संबंध असतो. त्यामुळे बहुसंख्य कार्यकर्ते या निवडणुका लढविण्यासाठी इच्छुक असतात. पण पदे थोडीच असतात. त्यामुळे सगळ्यांना उमेदवारी देता येणार नाही. पण पक्ष ज्यांना उमेदवारी देईल त्याचे काम कार्यकर्त्यांनी प्रामाणिकपणे केले पाहिजे. जो असे काम करेल तोच खरा कार्यकर्ता आहे.

प्रबंध संपादकीय



# दसऱ्यानिमित्त लुटा, विचारांचे सोने

भारतीय परंपरेत व संस्कृतीत दसरा या सणाला विशेष महत्व आहे. साडेतीन मुहूर्तातला हा एक मुहूर्त. या दिवशी नवीन वस्तु खरेदी करण्याकडे लोकांचा विशेष कल असतो. सोने बाजारासाठी तर हा सोन्याचाच दिवस. पण आज देशातली राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि भूराजनैतिक परिस्थिती पाहिल्यानंतर खरे सोने लुटण्याऐवजी आता तातडीने विचारांचे सोने लुटून देशातली लोकशाही, स्वातंत्र्य, समता, बंधुता, सर्वधर्मसमभाव, सार्वभौमता व धर्मनिरपेक्षता या मूल्यांचे व त्याच बरोबर राष्ट्राची अखंडता आणि एकात्मता यांचे जतन व जोपासना करण्याची किती आवश्यकता आहे हे ठळकपणाने अधोरेखीत झाल्याशिवाय राहात नाही. कोणताही सूज्ञ, सुजाण व देशावर अतोनात प्रेम करून राष्ट्रभक्तीचे पोवाडे गाणारा माणूस माझ्या या विचारांशी सहमत झाल्याशिवाय राहणार नाही. कारण देश टिकला, मजबुतीने उभा राहिला, विकास व प्रगतीच्या मार्गावर चालत राहिला तर तुमच्या-आमच्या जगण्याला व स्वप्नांना नवीन अर्थ प्राप्त होऊ शकणार आहे. पण तसे वातावरण व निर्मळ आकाश आज तरी देशात पाहायला मिळत नाही. संशय आणि अविश्वासाचे ढग इतके पसरलेले आहेत की त्यामुळे जागोजागी हिंसेचे, दंगलीचे, संघर्षाचे, अशांततेचे डोंब उभे राहताहेत. २०१४ पासून आणि विशेषतः जात्यंध व धर्मांध सरकार देशात सत्तेवर आल्यापासून हे गढूळ वातावरण निर्माण होऊन ते दिवसेंदिवस अधिकच प्रदूषित होऊ लागले आहे. फॅसिस्ट, हुकूमशाहीचा विचार देशभर जोमाने व जोराने पसरला आहे. त्यामुळे प्रत्येकजण भयभीत व कोंडलेल्या, दबलेल्या स्थितीत आहे. ही कोंडी फोडण्यासाठी विचारांचे सोने दसऱ्याला लुटणे हा आपल्यापुढे एक पर्याय आहे. कारण आपण नेहमी म्हणतो. विचारांशी लढाई विचारानेच केली पाहिजे. पण विद्यमान सत्ताधाऱ्यांचे वागणे हे विचारांना व कायदा आणि लोकशाहीला धाब्यावर बसवून दडपशाही व मनमानी पद्धतीने कारभार करण्याचे आहे. त्यामुळे विरोधी पक्षाची राज्ये व सरकारे सर्व तऱ्हेचे मार्ग योजून पाडली जात आहेत हे आपण सारेजण रोज उघड्या डोळ्यांनी पाहतो आहोत. फॅसिस्ट सुरूवातीला निवडणुकीच्या मार्गाने सत्तेवर येतात. त्यासाठी खोटीनाटी प्रचंड आश्वासने व भूलथापा मारून जनतेशी जुमलेबाजी करतात. सत्ता एकदा पदरात पडली की मग ती हातातून जाऊ नये यासाठी विरोधकांना धाकदपटशा, भिती दाखविणे, जेलमध्ये घालण्याच्या व चौकश्या लावण्याच्या धमक्या देणे, संपत्तीवर जप्ती आणणे, घरातल्या व नात्यातल्या लोकांना वेगवेगळ्या मार्गाने छळणे व त्यासाठी ईडी, सीबीआय, प्राप्तीकर विभाग, गुप्तचर पोलिस व अन्य सरकारी यंत्रणा आणि नोकरशाहीचा वापर करणे यांसारखे अनेक मार्ग वापरले जात असल्याचे आपण रोज अनुभवित आहोत. पक्षांतर करून तो आपल्या पक्षात आला तर ठीक नाही तर त्याला गुन्हेगार, भ्रष्टाचारी ठरवून तुरूंगात घालण्याचा उद्योग हे फॅसिस्ट करतच असतात. याबाबत संसदेत किंवा विधानसभेत कितीही भाषणे कुणीही केली तरी त्याचा फारसा उपयोग होत नाही. कारण फॅसिस्ट लोक विरोधकांना सतत दाबण्याचा प्रयत्न करतात. त्यांना बोलण्याचा मोकळा श्वासही घेऊ देत नाहीत. विरोधकांची मुस्कटदाबी हा त्यांच्या अत्यंत आवडीचा कार्यक्रम असतो. न्याय संस्थेलाही ते धाक दाखवून प्रसंगी मोहाचे दर्शन घडवून कह्यात ठेवण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्यातही एखादा न्यायाधीश जर खरोखरच रामशास्त्री बाण्याने वागला तर त्याची काय अवस्था होते हे जस्टीस लोया प्रकरणावरुन आपल्या लक्षात येऊ शकेल. आज न्यायसंस्था देखील भयभीत व दबावाखाली आहे की काय असा संशय जनतेच्या मनात आहे. त्यामुळे आता न्याय तरी कुणाकडे मागावा असा प्रश्न जनताजनार्दन विचारीत आहे. मानवजातीच्या इतिहासात लोकशाहीचा काळ फार थोडा आहे. सगळा काळ कोणत्या ना कोणत्यातरी प्रकारच्या हुकुमशहांचाच आहे. लष्करी हुकुमशाह्या, धर्मगुरूंच्या हुकुमशाह्या, राजेशाह्या- हे सगळे हुकुमशाहीचेच प्रकार आहेत. त्याप्रमाणेच फॅसिझम हाही हुकूमशाहीचाच प्रकार आहे, पण उरलेल्या हुकुमशाह्या जनतेच्या पाठिंब्यावर अस्तित्वात येत नाहीत; जनतेच्या पाठिंब्याची त्यांनी गरजही नसते. फॅसिझम ही वेगळ्या प्रकारची हुकुमशाही आहे. ह्या हुकुमशाहीला जनतेतील एका मोठ्या गटाचाच सक्रिय पाठिंबा असतो. हजारो शिस्तबद्ध, कृतिप्रवण कार्यकर्ते ह्यांच्या ताकदीवर फॅसिझम उभा राहत असतो. जसा मोदी आणि भाजप यांचा फॅसिझम राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांच्या ताकदीवर उभा आहे. हे स्वयंसेवक ध्येयवादी आणि निष्ठावंत असतात. प्राण देण्यास आणि घेण्यास हे अनुयायी तयार असतात. अशा हजारो निष्ठावंत कार्यतत्पर कार्यकर्त्यांची फळी उभी करणे ह्यात फॅसिझमचे यश असते. ते भाजपला संघामुळे प्राप्त झाले आहे. हे आपल्याला कधीही विसरता येणार नाही.



संपादकीय



# पीएफआयबद्दल आताच जाग का?

'पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया'वर अखेर बंदी घालण्यात आली. केरळ सरकारने त्यांच्यावर न्यायालयाच्या परवानगीने २०१२ मध्येच बंदी घातलेली होती. मुस्लिमांबाबत विशेष कटाक्ष असलेली आणि त्यांच्या प्रत्येक हालचालींवर सक्त नजर असलेली राजवट २०१४ मध्ये सत्तेत आल्यानंतर या संघटनेवर बंदी घालण्यासाठी आठ वर्षे का लागली हा अनुत्तरित प्रश्न आहे. आधी बंदी न घालण्याचे आणि आताच बंदी घालण्याचा अर्थ 'राजकीय सोय' असा लावायचा काय असाही प्रश्न उपस्थित झाल्याखेरीज रहात नाही. राष्ट्रीय तपास संस्था उर्फ नॅशनल इन्व्हेस्टिगेशन एजन्सी उर्फ 'एनआयए'ने नुकतेच एक देशव्यापी छापासत्र केले. हे छापासत्र हप्त्याहप्त्याने चालू राहणार आहे. 'पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया' म्हणजेच 'पीएफआय' ही संघटना आणि त्यांची राजकीय शाखा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'एसडीपी- आय' म्हणजेच 'सोशल डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया' यांच्या निरनिराळ्या राज्यांमधील कार्यालयांवर हे छापे एकाचदिवशी व एकाच वेळी टाकण्यात आले. या संघटनेच्या प्रमुख अशा १०६ नेत्यांना पहिल्या दिवशी पकडण्यात आले. नंतरच्या छापासत्रात २७०जणांना पकडण्यात आले. महाराष्ट्र, गुजरात, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, आसाम, दिल्ली, केरळ, कर्नाटक, तेलंगणा, तमीळनाडू या राज्यांमध्ये प्रामुख्याने ही कारवाई करण्यात आली. अटक केलेल्यांमध्ये पीएफआयचे प्रमुख किंवा अध्यक्ष ओएमए सलाम, उपाध्यक्ष ईएम अब्दुल रहिमान, राष्ट्रीय सचिव व्हीपी नजरुद्दिन एलामरान, केरळ प्रदेश अध्यक्ष सीपी महंमद बशीर, राष्ट्रीय परिषदेचे सदस्य प्रा. पी. कोया आणि एसडीपीआयचे संस्थापक अध्यक्ष ई अबुबकर यांचा समावेश आहे. प्राथमिक माहितीनुसार या संघटनेचे नेते व कार्यकर्ते हे दहशतवाद आणि दहशतवादी कारवाया, लोकांना कट्टरपंथीय करण्यासाठी तसेच त्यांना शस्त्रास्त्र वापराचे प्रशिक्षण देणे त्यासाठी शिबिरे घेणे, तसेच दहशतवादी कारवायांसाठी पैसा पुरविण्याचे प्रमुख आरोप या संघटनेविरुध्द आहेत. हे छापे देशव्यापी अशा अर्थाने की पार ईशान्य भारतातील मणिपूरमध्ये, पश्चिमेकडील गोव्यासारखे राज्य, राजस्थान, बिहार अशा रीतीने हे छापे टाकण्यात आले. या छाप्यांची योजना गुप्तपणे आखण्यात आली होती. आदल्या रात्री उशीरापर्यंत केंद्रीय गृहमंत्री, केंद्रीय गृहसचिव, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार, गुप्तचर विभाग प्रमुख तसेच एनआयए आणि अन्य केंद्रीय सुरक्षा दलांचे प्रमुख यांची खलबते झाली. सकाळी चार वाजता एकाच वेळी या सर्व राज्यांमध्ये छापे टाकण्याचा निर्णय करण्यात आला. मात्र छाप्यांमध्ये धक्कातंत्राचा परिणामकारक वापर करण्यासाठी ही वेळ अर्धातास अलीकडे आणण्यात आली. त्यानुसार पहाटे चार ऐवजी साडेतीन वाजताच हे देशव्यापी छापासत्र करण्यात आले. या छाप्यांमध्ये शस्त्रास्त्रे, स्फोटके, आक्षेपार्ह व चिथावणीखोर पत्रके असा मुद्देमाल सापडल्याचे सांगण्यात आले. रोकडही मोठ्या प्रमाणात सापडल्याची माहिती तपास संस्थांनी दिली.

मोठ्या प्रमाणात डिजिटल उपकरणेही या छाप्यात सापडली. थोडक्यात ही संघटना मोठमोठे उत्पात घडविण्याच्या कारवाया आखत असल्याचे या छाप्यातून समोर आलेल्या साधनसामग्री व माहितीवरुन लक्षात आले. यालाच एक नवी माहिती जोडण्यात आली की पंतप्रधानांच्या एका आगामी बिहार दौऱ्याच्या वेळी घातपात करण्याची योजना या संघटनेने आखल्याचे निदर्शनास आले आहे. सारांशाने एवढेच म्हणावे लागेल की २००६ मध्ये स्थापन झालेल्या या संघटनेने विविध राज्यांमध्ये व विशेषतः केरळ व कर्नाटकात सांप्रदायिक हिंसेचे प्रकार घडवले. केरळमध्येच ही संघटना स्थापन झाल्याने तेथे तर या संघटनेने उच्छाद मांडला होता. मार्क्सवादी व रा.स्व.संघाच्या कार्यकर्त्यांच्या असंख्य हत्या त्यांनी केल्याची भरपूर माहिती प्रकाशित आहे. त्यामुळेच केरळ सरकारने या संघटनेवर बंदीची मागणी केली होती व अखेर २०१२ मध्ये केरळ उच्च न्यायालयाने त्यास मान्यता दिली. त्यामुळे केरळमध्ये या संघटनेवर २०१२ पासूनच बंदी होती. केंद्रीय राजवट आणि राज्यकर्त्यांना त्यासाठी आणखी दहा वर्षे लागली.

पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया म्हणजे 'पीएफआय'ची स्थापना २००६ मध्ये झाली. मुख्य उद्दिष्ट हे आक्रमक व कट्टर हिंदुत्वाच्या शक्तींचा मुकाबला हे निश्चित करण्यात आले होते. कर्नाटकातील कर्नाटक फोरम फॉर डिग्निटि, नॅशनल डेव्हलपमेंट फोरम(केरळ) आणि मनिथा नीथी पसराई(तमीळनाडू) या तीन

संघटनांच्या विलीनीकरणातून पीएफआयची स्थापना करण्यात आली. यानंतरच्या काळात सिटिझन्स फोरम(गोवा), कम्युनिटि सोशल अॅंड एज्युकेशनल सोसायटी (राजस्थान), नागरिक अधिकार सुरक्षा समिती (पश्चिम बंगाल), लिलॉंग सोशल फोरम (मणिपूर), असोसिएशन ऑफ सोशल जस्टिस(आंध्र प्रदेश) या संघटनांचे पीएफआय मध्ये विलीनीकरण झाले. या संघटनेच्या स्थापनेपूर्वीच 'सिमि' - 'स्टुडंट्स इस्लामिक मुव्हमेंट ऑफ इंडिया' या संघटनेवर बंदी घालण्यात आली होती.

प्रमुख नेत्यांना व कार्यकर्त्यांना अटक झालेली असली तरी मोठ्या प्रमाणात या संघटनेबरोबर कोणत्या ना कोणत्या स्वरुपात काम करणारी मंडळी मोकळीच होती. त्यामुळे हे सर्व कार्यकर्ते व सहानुभूतीदारांना पीएफआयमध्ये स्थान मिळाले. सिमि संघटनेचा थेट 'इंडियन मुजाहिदिन' या दहशतवादी कारवाया करणाऱ्या संघटनेशी संबंध होता. इंडियन मुजाहिदिनचे थेट अल् कायदा, इस्लामिक स्टेट, लष्करे तय्यबा, जैश इ मुहम्मद यासारख्या आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनांशीही संबंध होते. या संघटनांसाठी त्यांनी थोडीफार 'भरती' देखील केल्याची माहिती उजेडात आली होती. परंतु बंदी घातलेल्या या संघटनांचे मोकळे कार्यकर्ते या संघटनेला मिळाले व त्यातूनच ती वेगाने फोफावली. नंतरच्या काळात या संघटनांनी तालिबानबरोबर देखील संपर्क प्रस्थापित केल्याची माहिती सांगण्यात येते. ही माहिती देण्याचे कारण एवढेच की भारतविरोधी कारवाया हेच या संघटनेचे मुख्य उद्दिष्ट राहिले. त्याचप्रमाणे मुस्लिम समाजाने स्वतःची वेगळी ओळख-परिचय व स्थान आग्रहपूर्वक प्रस्थापित करण्याच्या उद्दिष्टावर संघटनेचा विशेष कटाक्ष राहिला. यासाठी मुस्लिम समाजातील ज्या घटकांची माथी या दिशेने भडकविणे शक्य आहे त्यांना संघटित करण्यावर या मंडळींचा भर राहिला. या संघटनेत सामील झालेल्या विविध संघटनांची नावे वर दिलेली आहेत. विकास, प्रगतीचे उद्दिष्ट जवळपास प्रत्येक संघटनेच्या नावातूनच स्पष्ट होते.

नॅशनल डेव्हलपमेंट फोरम, कर्नाटक फोरम फॉर डिग्निटि वगैरे वगैरे. त्यामुळेच अशी नावे धारण करणाऱ्या या संघटनांनी आक्रमक आणि अतिरेकी मार्गाकडे झुकलेल्या संघटनेकडे आकर्षित व्हावे याचा अभ्यासच करण्याची गरज आहे.

यामध्ये शिक्षण क्षेत्रातील प्राध्यापक स्तरावरची मंडळी देखील आहेत. म्हणूनच एकदम अशा या समूळ किंवा अमूलाग्र परिवर्तनवादी संघटनेत ते सामील कसे झाले हा प्रश्न आहे. अर्थात एकेकाळी नक्षलवादी चळवळीकडेही मोठमोठे विद्वान, प्राध्यापक, वकील, साहित्यिक आकर्षित झाले होते हे विसरुन चालणार नाही. त्यामुळेच या संघटनेच्या उदयाच्या कारणांचाही शोध घेणे आवश्यक असेल. पीएफआयने ज्याप्रमाणे एसडीपीआय या राजकीय पक्षाच्या स्थापना केली. 'नॅशनल वुइमेन्स फ्रंट' ही महिला आघाडी आणि विद्यार्थी व युवकांसाठी 'कॅंपस् फ्रंट ऑफ इंडिया'ची स्थापना केलेली आहे. त्याचप्रमाणे पीएफआय ही संघटना समाजोपयोगी काही कार्यातही असल्याचे सांगण्यात येते.

ही संघटना चर्चेत येण्याचे आणि फोफावण्याच्या कारणांचा शोधही महत्वाचा आहे. या संघटनेवर पाच वर्षांसाठी बंदी घालणे ही मलमपट्टी झाली. मुळातून या समस्येचे आकलन करुन त्यावर उपाय करण्याची वेळ आली आहे. याचे कारण हिंदू व मुस्लिम समाजातील अनियंत्रित आणि सतत चालणारा संघर्ष अखेर देशाची एकता व एकात्मता तसेच स्थैर्य व समतोल नष्ट करणारा ठरेल. त्या परिस्थितीपासून वेळेवर सावरण्याची आवश्यकता व त्वरा किंवा तांतडी निर्माण झाली आहे. त्यादृष्टीने मुस्लिम समाजातील काही धुरीणांनी पुढाकार घेतलेला आहे. त्याला विरोध न करता स्वागत केले पाहिजे.

यासंदर्भात ज्या काही तज्ञ व अभ्यासकांबरोबर चर्चा झाली त्यामध्ये काही सैध्दांतिक मुद्दे त्यांनी मांडले. भारतातील मुस्लिम व बिगर मुस्लिम संघर्षाला धर्मावर आधारित फाळणीची पार्श्वभूमि आहे. साधारणपणे असे मानले गेले की सधन व समृध्द आणि



त्याचबरोबर उच्चविद्याविभूषितांच्या बहुतांश वर्गाने पाकिस्तानात जाणे पसंत केले. त्यामुळे भारतात मागे राहिलेल्या आणि विविध कारणांनी पाकिस्तानला जाऊ न शकलेल्या मुस्लिमांची अवस्था ही काहीशी दिशाहीन तसेच नेतृत्वहीन झाली. अर्थात नेतृत्वाचा पूर्ण अभाव होता अशी गोष्ट नव्हती. मौलाना अबुल कलम आझाद किंवा तत्सम अनेक नेत्यांनी मुस्लिम समाजाला दिशा देण्यासाठी काम केले. हळूहळू मुस्लिम समाजाने भारताला स्वीकारले असे मानले तरी १९६५च्या भारत-पाकिस्तान युध्दापर्यंत हा समाज दोलायमान राहिला. परंतु पाकिस्तानातील सामाजिक व आर्थिक समस्यांच्या कहाण्या त्यांच्यापर्यंत पोहोचू लागलेल्या होत्या. त्याचप्रमाणे तेथील लष्करशहांच्या हुकुमशाही राजवटींमुळे पाकिस्तानची राजकीय-सामाजिक-आर्थिक अशी तिहेरी घसरण कशी आहे याची माहितीही त्यांना मिळत गेली. १९७१च्या बांगला देशाच्या मुक्तिलढ्याने भारतातील मुस्लिम समाजात एक वेगळीच जाणीव व जागृति झाली.

मुस्लिम म्हणजे केवळ धर्माधारित समाज नव्हे हे त्यांना बांगला देशातील मुक्तिलढ्याने शिकविले. भाषिक आणि सांस्कृतिक अस्मिता ही धर्माच्या पुढे जाणारी असते हे बांगला देश मुक्तिलढ्याने सिध्द केले. या तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार १९७१ नंतर खऱ्या अर्थाने भारतातील मुस्लिम समाजाने मुख्य प्रवाहात पूर्णत्वाने सामील होण्याची भूमिका घेतली. या प्रक्रियेत मुस्लिमांनी बिगर-मुस्लिम, मध्यममार्गी नेतृत्वही स्वीकारले. मात्र कालांतराने मुस्लिम समाजाचा व्होटबँक म्हणून वापर केला जात असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्याबाहेर येण्याऐवजी वेळोवेळच्या मुस्लिम नेतृत्वाने तडजोडवादी राजकारण करुन मुस्लिम समाजाला वेगवेगळ्या राजकीय पक्षांच्या दावणीला बांधण्याचे काम केले. यामध्ये मुस्लिमांची एकगठ्ठा मते मिळविण्यासाठी अनुनयाचे राजकारण सुरु झाले आणि त्यातून निर्माण झालेली अहमहिका किंवा स्पर्धा याची एक विपरीत प्रतिक्रिया बहुसंख्यक समाजात होऊ लागली. मुस्लिमांना झुकते माप देण्याचे प्रकार केले जातात, मतांसाठी त्यांचा अनुनय केला जातो अशी धारणा बहुसंख्यक समाजात दृढ होऊ लागली. ती आणखी भडकविण्याचे प्रयत्न हिंदुत्ववादी पक्ष व संघटनांनी पध्दतशीर प्रयत्न नव्हेच तर मोहिमा केल्या. अयोध्या व राममंदिराचा मुद्दा हा याचाच परिपाक होता. या सर्व वादांमध्ये मध्यममार्गी पक्षांनी समतोल भूमिका न घेता कधी बहुसंख्यक अनुकूल तर कधी अल्पसंख्यक अनुकूल भूमिका घेतल्या. अशा धरसोडीमुळे मुस्लिम समाजाचा या राजकीय पक्षांवरील विश्वास उडणे अपरिहार्य होते आणि केवळ राजकीय तडजोड म्हणून ते काही पक्षांना साथ देऊ लागले. त्यांचे राजकीय, आर्थिक, सामाजिक समानतेचे मुद्दे व समस्या चिघळत गेल्या. बाबरी मशीद उद्ध्वस्त होणे, देशाच्या विविध भागात झालेले सांप्रदायिक दंगे व त्यातून दहशतवादाच्या समस्येने धारण केलेले उग्र स्वरुप यातून मुस्लिम समाजाची परात्मता(एलिअनेशन) वाढत गेली. जागतिक पातळीवर तयार झालेल्या दहशतवादाच्या महाभयानक समस्येचा थेट संबंध मुस्लिमांशी जोडण्याचे प्रकार सुरु झाले. मुस्लिमांबद्दलची वाढती साशंकता हा याचाच भाग होता. या वातावरणाचा पुरेपूर फायदा बहुसंख्यक वर्चस्ववादाचा पुरस्कार करणाऱ्या पक्ष व संघटनांनी घेतला. मुस्लिमांच्या विरोधातील प्रतीके त्यांनी शोधून त्याआधारे मुस्लिमविरोध सार्वत्रिक पसरविण्याचे काम त्यांनी केले. अयोध्येनंतर काशी, मथुरा हे मुद्दे सतत पेटवत ठेवले. काश्मीरची समस्या काश्मिरी अस्मितेची नसून पाकिस्तान व इस्लाम आणि त्यांच्याशी निगडित दहशतवादाशी असल्याचा यशस्वी प्रचार या मंडळींनी केला. बाबरी मशीद उद्ध्वस्त झाल्यानंतरच या देशाची आणखी एकदा मानसिक फाळणी झाली होती. ती वाढवत नेण्याचे काम विशिष्ट नेत्यांनी व पक्ष-संघटनांनी केले. या सर्वाची प्रतिक्रिया होणे हे स्वाभाविकच होते. यातूनच स्वतःची अस्मिता, ओळख आक्रमक पध्दतीने मांडण्याचे प्रकार सुरु झाले.

यामध्ये बहुसंख्यक व अल्पसंख्यक अशी स्पर्धा सुरु झाली ती चालूच राहिली. या परिस्थितीचा गैरफायदा घेणारे घटक समाजात असतातच. मुस्लिम समाजातील काही मंडळींनी देखील आक्रमकतेचा आधार घेण्यास प्रारंभ केला. पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया हा या सर्व परिस्थितीतून निर्माण झालेला आविष्कार आहे. त्यामुळेच केवळ पाच वर्षांसाठी त्यावर बंदी घालणे ही केवळ मलमपट्टी आहे. मूळ रोगावर इलाज करणे नाही. पंजाबमध्ये खलिस्तानी चळवळ पसरलेली असताना एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने फार चांगला मुद्दा सांगितला होता. जेव्हा एखादी चळवळ किंवा आंदोलन हे राजकीय स्वरुपाचे असते तेव्हा ते फोफावू देण्याऐवजी त्यामध्ये उपस्थित प्रश्नांच्या सोडवणुकीने आटोक्यात आणायचे असते. परंतु त्यावेळी राजकीय तोडगा न काढता ते दडपण्याचे प्रकार केले जातात आणि ते उग्र होत जाते व हाताबाहेरही जाते. सध्या हेच प्रकार सुरु आहेत.

या पार्श्वभूमीवरच अलीकडेच हिंदू-मुस्लिमांमधील गैरसमज, आकस दूर करण्याच्या प्रामाणिक हेतुने काही मुस्लिम धुरीणांनी पुढाकार घेतला. ही सर्व मंडळी कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित नाहीत किंवा कोणताही राजकीय हेतु मनात न ठेवताच त्यांनी हा पुढाकार घेतला आहे. माजी निवडणूक आयुक्त एसवाय कुरेशी, निवृत्त सेनाधिकारी व अलिगढ विश्वविद्यालयाचे कुलगुरु जमीरुद्दुन शाह, दिल्लीचे माजी नायब राज्यपाल व शिक्षणतज्ञ नजीब जंग, उद्योगपति सईद शेरवानी, लोकदलाचे नेते शाहीद सिद्दिकि यांनी रा.स्व.संघाचे प्रमुख सरसंघचालक मोहन भागवत यांची भेट घेतली. यारुन मुस्लिम समाजात आणि इतर धर्मनिरपेक्ष वर्तुळात वादंग किंवा मतमतांतरे होणे अपेक्षित होते. यानंतर मोहन भागवतांनी अखिल भारतीय इमाम संघटना(ऑल

इंडिया इमाम ऑर्गनायझेशन – एआयआयओ) प्रमुख उमर इल्यासी यांची भेट घेऊन ते देखील या दोन समाजातील सौहार्दवाढीस अनुकूल असल्याचे सूचित केले. उमर इल्यासी यांनी मोहन भागवत हे राष्ट्रपिता आहेत असे म्हटल्याने ते त्यांनी वक्रोक्तीने म्हटले की चापलूसी करण्यासाठी म्हटले हे कळण्यास मार्ग नाही. परंतु इल्यासी यांचे मुस्लिम समाजातील स्थान फार मोठे आहे असे मानले जात नाही. किंबहुना त्यांचे आणि सत्तापक्षाचे संबंध मधुर असल्याचेच सांगितले जाते. त्यामुळे भागवतांनी त्यांना भेटणे ही काही फार मोठी क्रांतिकारक बाब मानता येणार नाही. त्यामुळेच यासंदर्भात करण्यात आलेल्या विविध निवेदनांचा सारांश काढायचा झाल्यास जे समान मुद्दे पुढे आले ते विचारात घ्यावे लागतील. मुस्लिम समाजात खरोखर् व्यापक पाठिंबा असणाऱ्या ज्या संस्था व संघटना आहेत त्यांच्याशी सरसंघचालकांनी संपर्क करण्याची अपेक्षा यानिमित्ताने व्यक्त करण्यात आली.



केवळ सदिच्छा भेटी आणि एकमेकांचे गुणगान करण्याने मुस्लिम समाजाचे खरे व वास्तव प्रश्न व समस्या सुटणार नाहीत अशी परखड प्रतिक्रिया देखील व्यक्त करण्यात आली आहे. ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड, जमियत उलेमा इ हिंद किंवा जमात ए इस्लामी या मुस्लिम समाजातील मान्यताप्राप्त संस्था व संघटना आहेत. मुस्लिम समाजावर त्यांचा प्रभाव आहे. त्यांच्या प्रतिनिधींना भागवत का भेटले नाहीत असा सवाल केला जात आहे. भागवतांनी कधीही या संघटनांशी संपर्क केलेला नाही अशी तक्रारमुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य कासीम रसूल इल्यास यांनी केली आहे. इतरही मुस्लिम संघटनांच्या प्रतिनिधींनी काहीसा उद्वेग व्यक्त करताना गेल्या आठ वर्षात ज्या प्रकारे मुस्लिमांविरुध्द पध्दतशीर व योजनाबध्द रीतीने अपप्रचार केला जात आहे, मुस्लिम समाजाच्या विरोधात खुलेआम हत्याकांडाच्या घोषणा केल्या जात आहेत, मुस्लिम महिलांवर बलात्कार करण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत, हिजाबचा वाद, मशीदींचे नवनवे वाद उकरुन काढण्याचे प्रकार, गोरक्षणाच्या नावाखाली हत्या केल्या गेल्या त्यावेळी भागवत किंवा अन्य कुणाही भाजप किंवा संघाच्या नेत्याने या मोकाट लोकांना आवरण्याचा प्रयत्न केला नाही असे सांगितले. त्यामुळे केवळ एका मशिदीला भागवतांनी आपण होऊन भेट देणे याने मुस्लिमांचे प्रश्न व समस्या सुटणार नाहीत. थोडक्यात मोठ्या प्रमाणात दुखावला गेलेला मुस्लिम समाज आता या नुसत्या प्रतीकात्मक व वरवरच्या देखाव्यांवर समाधानी किंवा संतुष्ट नाही. त्यांना नुसतीच गोडगोड आश्वासने नको आहेत तर ठोस, भरीव कृति हवी आहे ज्यामुळे ते आश्वस्त होतील. अलीकडेच काही मुस्लिम तरुणांबरोबर संवाद साधताना त्यांनी बिगरमुस्लिम आणि मुस्लिमांबद्दल कळवळ्याने बोलणारे राजकीय पक्ष आणि त्यांचे नेते यांच्याबद्दलही तीव्र नाराजी व्यक्त केली. पत्रकार असलेल्या एका तरुणाने तर सरळसरळ म्हटले की मोदींच्या विरोधात लढण्यासाठी आम्ही आमचा वापर होऊ देणार नाही. मोदींशी कसे 'डील' करायचे किंवा त्यांना कसे हाताळायचे व मुकाबला कसा करायचा याचा निर्णय सर्वस्वी आमचा असेल आणि त्यात आम्ही तथाकथित धर्मनिरपेक्ष राजकीय पक्ष व त्यांच्या नेत्यांनाही बरोबर घेऊ इच्छित नाही. त्यांनी ठरवावे आमच्याबरोबर यायचे की नाही. यावरुन मुस्लिम समाजातील भावनाप्रवाहाची चुणुक मिळते. मुस्लिम समाजाला न्याय हवा आहे. त्यांच्या विरोधात रोज उठून नवनवीन कुभांड रचली जात आहेत त्याचा त्यांना उबग येत चाललाय. त्यांच्या सहनशीलतेची परीक्षा पाहिली जात आहे. त्यामुळे हे 'परीक्षसत्र' थांबेल तो सुदिन म्हणावा लागेल.

पीएफआयवर बंदी घातली ठीक झाले. त्यातही त्यांनी स्थापन केलेल्या राजकीय पक्षावर म्हणजे एसडीपीआयला वगळण्यात आले हा एक चांगला निर्णय मानावा लागेल. परंतु पीएफआयवरील बंदी हा वरवरचा उपाय आहे. खरा उपाय हा मुस्लिम समाजाला सामाजिक न्याय म्हणजेच समानतेची वागणूक, समान संधींची उपलब्धता आणि भेदभावरहित वागणूक हा आहे. मुस्लिम समाजात गरीबी मोठ्या प्रमाणात आहे. त्यांना केवळ सामाजिकच नव्हे तर आर्थिक न्याय मिळणेही अत्यावश्यक आहे. तसेच बहुसंख्यक वर्चस्ववादी आक्रमकताही रोखण्याची वेळ आली आहे. गेल्या पंधरा–सोळा वर्षातच कट्टरपंथी विचाराने प्रेरित संघटना का निर्माण होतात याचे आत्मपरीक्षणही बहुसंख्यक समाजाला करावे लागेल व तरच या समस्येचे निराकरण निर्णायक व समाधानकारक पध्दतीने होऊ शकणार आहे. त्यासाठी दोन्ही समाजातील धुरीणांनी एकत्र येणे व सतत संवादप्रक्रिया चालू ठेवणे हाच उपाय आहे. अन्यथा पीएफआय सारख्या संघटना निर्माण होत राहतील आणि फोफावत राहतील. हा न संपणारा खेळ ठरेल!



# मूल्यांच्या रक्षणासाठी सर्वस्व देण्याची तयारी हा राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांचा धर्म

## शरद पवार यांचे उद्गार



# धर्माच्या आधारे भाजपकडून तरुणांची दिशाभूल

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ८ वे राष्ट्रीय अधिवेशन ११ सप्टेंबर २०२२ रोजी नवी दिल्ली येथील तालकटोरा स्टेडियमवर संपन्न झाले. त्यावेळी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी केलेले हे अध्यक्षीय भाषण. याच अधिवेशनात त्यांची पुन्हा पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून फेरनिवड झाली.**



सहकारी मित्रांनो, गेली दोन वर्षे देशामध्ये कोरोनाचे संकट होते त्यामुळे आपले वार्षिक अधिवेशन आपण घेऊ शकलो नाही. या संकटकाळी आपणापैकी अनेक जणांनी संकटग्रस्त नागरीकांना वैद्यकीय मदत करण्यामध्ये पुढाकार घेतला होता.

आता कोरोनाचे संकट कमी झाले आहे आणि आपणा सर्वांना भेटता आले. या वर्षाच्या आपल्या अधिवेशनाचे वैशिष्ट्य हे आहे की, या अधिवेशनात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ कार्यकर्त्यांबरोबर राष्ट्रवादी युवक काँग्रेस व राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस यांच्याही प्रतिनिधींची उपस्थिती आहे. मी आपणा सर्वांचे अंतःकरणपुर्वक स्वागत करतो.

छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षि शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने व विचाराने चालणारा आपला पक्ष आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची बीजे देशात रुजली आणि एक पुरोगामी राष्ट्रीय पक्ष म्हणून आपली संपुर्ण भारतात ओळख निर्माण झाली आहे. याचा तुम्हा-आम्हाला अभिमान आहे. दिल्लीच्या तख्तापुढे झुकायचे नसते असा स्वाभिमानी बाणा शिवछत्रपतींनी दिल्लीच्या तख्तापुढे दाखवला होता. त्यावेळी हे तख्त आग्रा येथे असले तरी तो इशारा दिल्लीधिपती मुघलांना होता. आपण आज दिल्लीतील तालकटोरा ह्या अशाच ऐतिहासिक मैदानावर उपस्थित आहोत. आपणास कल्पना नसेल की ह्याच मैदानावर १७३७ साली पहिल्या बाजीरावाच्या नेतृत्वाखालील मराठा सैन्याने आपला तळ ठोकून दिल्लीच्या तख्ताला आव्हान दिले होते. आज राष्ट्रीय अधिवेशन दिल्लीत ठाण मांडून बसलेल्या निरंकुश सत्ताधिशांना पुन्हा एकदा आव्हान देण्यासाठी भरवले आहे.

यंदाचे वर्ष भारतीय स्वातंत्र्याच्या पंच्याहत्तरीचे वर्ष आहे. या पंचाहत्तर वर्षात काही संकटे, राजकीय चढउतार देशाने पाहिले पण हे सर्व असताना आपल्या आजूबाजूच्या श्रीलंका, पाकिस्तान, बांग्लादेश इत्यादी देशांमध्ये कधी हुकूमशाही तर कधी धर्मवाद अशी स्थिती आपण पाहिली. या स्थितीमुळे या देशांमध्ये संसदीय लोकशाही वर झालेले आघात तसेच लष्करी राजवट आपण पाहिली. या सर्व पार्श्वभुमीवर महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, सुभाषचंद्र बोस, मौलाना आझाद यांच्या विचाराने प्रभावित झालेले देशबांधव आणि असंख्य स्वातंत्र्यसैनिक - क्रांतीकारक यांनी केलेल्या अतुलनीय त्यागाने, संघर्षाने स्वतंत्र झालेल्या भारताची 'संसदीय लोकशाहीवर विश्वास ठेवणारा' देश म्हणून जगभरात ओळख झाली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशावर संकटे आली परंतू डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले संविधान व देशातील नागरीकांच्या मनातील स्वातंत्र्य व संसदीय लोकशाही विषयक भावना यामुळे आपण एकसंघ व लोकशाहीवादी राष्ट्र असल्याचा जगाला परिचय करून दिला.

गेल्या ७५ वर्षात देशाचे चित्र बदलले आहे. तरीही काही घटकांकडे, त्यांच्या प्रश्नांकडे आपणास गांभिर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. आपल्या देशातील जवळपास ५६ टक्के लोकसंख्या कृषि क्षेत्रात असून संपुर्ण देशाची अन्न समस्या



**अधिवेशनाचे उद्घाटन शरद पवार यांनी दीपप्रज्वलनाने केले तेव्हा शेजारी प्रफुल पटेल, छगन भुजबळ, पितांबरन मास्टर, सुनील तटकरे, सिराज मेहंदी, सोनिया दुहन, धीरज शर्मा**




**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदी शरद पवार यांची आठव्यांदा फेरनिवड झाल्याबद्दल त्यांचा अधिवेशनात हार घालून सत्कार करण्यात आला. तेव्हा शेजारी सोनिया दुहन, प्रफुल पटेल व सुनील तटकरे.**

सोडवण्यात शेतकऱ्यांचे प्रचंड योगदान आहे.आज भारत अन्नधान्याबद्दल देशाची गरज भागवतोय त्याचबरोबर जगातील अनेक देशांची गरज भागवतो. याचा आपणास अभिमान आहे. परंतू आजही आपण शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्यांचे वृत्त नित्याने वाचतो. गेल्या वर्षी शेतकऱ्यांना विश्वासात न घेता संसदेमध्ये घाईघाईने केलेल्या तीन कायद्यांविरूद्ध दिल्लीच्या सीमेवर काही महिने चाललेले शांततापुर्ण आंदोलन जगाने पाहिले. आज देशावर भाजपाचे राज्य आहे. या राज्यकर्त्यानी शेतकरी वर्गाकडे आस्थेने पहिले नाही. त्यांच्या रास्त समस्याकडे लक्ष दिले नाही, निरपराध शेतकरी चिरडले. त्यामुळे आजही शेतकरी वर्गात अस्वस्थता आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष देशातील शेती आणि शेतकरी वर्गाच्या हिताची जपणुक करणारा पक्ष आहे. त्यासाठी आपण सर्वांनी शेतकरी वर्गाला न्याय देण्यासाठी सतत जागृत राहून वेळप्रसंगी संघर्षाची तयारी ठेवली पाहिजे.

देशाचे ऐक्य अबाधित व विकास गतीमान ठेवण्याची आज गरज आहे. जात, धर्म यावर आधारीत भूमिका घेऊन, समाजा-समाजामध्ये कटूता निर्माण करून धार्मिक बाबींबर आपली राजकीय शक्ती वाढवण्याचे काम काही जातीयवादी संघटना करीत आहेत. याची जबरदस्त किंमत सगळ्यांना द्यावी लागत असून यामध्ये प्रामुख्याने अल्पसंख्यांक, दलित,

आदिवासी आणि महिला वर्ग यांचा समावेश होतो. अल्पसंख्यांक, दलित, आदिवासी संसदेमध्ये निवडून आल्यानंतर आम्ही भारतीय संविधान व सर्व धर्मीयांबद्दल आदर याची शपथ घेतो मात्र नंतर हिंदूत्व, मंदिर, मस्जिदशी संबंधित वादग्रस्त भूमिका घेऊन देशातील उपेक्षित व अल्पसंख्यांक समाजाच्या मनात कायम भितीचे वातावरण तयार करण्याचे काम जातीयवादी पक्ष करतात. समाजात फोफावू पाहणारी जात्यांध प्रवृत्ती व त्यामार्फत केला जाणारा विषारी प्रचार देशाच्या ऐक्याच्या दृष्टीने मोठा घातक आहे.

राष्ट्रवादी पक्षाचा कार्यकर्ता म्हणून आपण सर्वांनी एक राहून या जातीयवादी शक्तींशी मुकाबला करण्याची तयारी ठेवून देशाचे समाजाचे ऐक्य अबाधित ठेवले पाहिजे. भारतीय स्वातंत्र्याची पंच्याहत्तरी साजरी करत असताना देशाच्या

स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, त्यातून मिळालेले स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, धर्मातीतता, सामाजिक व आर्थिक न्याय या मुल्यांचे अखंड रक्षण करण्यासाठी सर्वस्व देण्याची तयारी हाच राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्त्यांचा धर्म ही भावना मजबूत केली पाहिजे.

जेव्हा आपण राष्ट्राच्या प्रगतीचा विचार करतो त्यावेळी विविध वर्गाचा विचार करताना समाजात ५० टक्के लोकसंख्या असणाऱ्या स्त्री वर्गाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. स्वातंत्र्याची ७५ वर्षे झाली असताना भारतीय संविधानाने दिलेले अधिकार नाकारणारी स्त्रीदास्य शोषणवादी प्रवृत्ती बदलली पाहिजे. कुटूंबात निर्णय घेण्याचा अधिकार न देण्याने स्त्री वर्गाची होणारी पिछेहाट आजही समाजात दिसते

१८४८ साली महात्मा फुले व सावित्रीबाई फुल्यांनी मुलींना शिक्षणाचे दरवाजे उघडले. तरीही आज प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये सवर्ण मुलींच्या तुलनेत त्यांचे प्रमाण कमी आहे. ते प्रमाण दलित ७२-टक्के, आदिवासी-६२ टक्के, मुस्लीम-५९ टक्के, इतर मागासवर्गीय-७९ टक्के असे आहे. तर सवर्ण मुलींचे प्रमाण ९४.५० टक्के आहे. म्हणून या संदर्भात आपण समाजात जागृती करत मुलींना समान संधी व त्यांच्या अधिकारासाठी सतत प्रयत्नशील असले पाहिजे.

देशात कधी नव्हे इतका महागाईचा आगडोंब उसळला आहे. पेट्रोल, डिझेल, गॅस, अन्नधान्य यांच्या किंमती गगनाला भिडल्या आहेत. त्यात वाढत्या करांच्या बोजाखाली सामान्य माणूस आणखी भरडला जात आहे. भारतीय रुपयाची डॉलरच्या तुलनेत अभुतपूर्व घसरण झाली आहे. यामुळे




अखंड भारताच्या नकाशावर शरद पवार यांचे चित्र असलेली प्रतिमा पवार साहेबांना भेट

आयातखर्च वाढून केवळ ५ वस्तूंच्या किंमतींवरच नाही तर एकूण अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम होऊ शकतो.

सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या

सोनिया दुहन व धीरज शर्मा हे पुष्पगुच्छ देऊन शरद पवार यांचे स्वागत करताना, शेजारी प्रफुल पटेल, दिलीप वळसे पाटील आणि सुनील तटकरे








देताना सोनिया दुहन, प्रफुल पटेल, धीरज शर्मा, सुनील तटकरे व इतर मान्यवर.

अंदाजानुसार, भारताचे दरडोई उत्पन्न आता रु. ९१,४८१ आहे, जे २०१८-१९ पेक्षा कमी आहे. २००४-१४ च्या युपीए सरकारच्या राजवटीत दरडोई उत्पन्न १५०.२% ने वाढले आणि २०१४-२०२१ पर्यंत ते फक्त ४४.९% इतकेच वाढले, आपल्या देशाने इंग्लंडला पराभूत केले आणि ५ वी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनली या कल्पनेने भाजप नेते आनंद व्यक्त करत आहेत पण याची किती किंमत मोजावी लागेल हे त्यांना माहीत नाही. इंग्लंडचा दरडोई जीडीपी ६.८ कोटी लोकांसह ४७,००० डॉलर इतका आहे आणि १४० कोटी लोकांसह आपला केवळ २५०० डॉलर इतकाच आहे.

२०१४ मध्ये रू.४१० ला असणारा स्वयंपाकाचा गॅस सिलेंडर आजमितीस रू.१००० चा आकडा पार करून गेला आहे. पेट्रोल-डिझेलच्या दरांनी शंभरी पार केली आहे. त्याचा परिणाम सगळ्याच वस्तूंच्या बाजारभावावर झाला आहे. वाहतूक, पर्यटन व्यवसाय कोलमडले आहेत.

डबघाईला आलेल्या आर्थिक व्यवस्थेचा परिणाम थेट शेती, उद्योग- व्यवसायांवर होत असून त्यामुळे उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला असून तरूण पिढीचा रोजगार बुडाला आहे. भारतीय अर्थव्यवस्था देखरेख संस्था (सेंटर फॉर मॉनिटरींग

इंडियन इकोनॉमी (CMIE) च्या मागील महिन्यातील अहवालात बेरोजगारीचा दर ८.३ टक्क्याच्या वर रोजगार पोचला असून ह्यावर्षी भारतात तरूणांनी २० लक्ष रोजगार गमावल्याचे म्हटले आहे.

आणि दुसरीकडे खर्च विभागाच्या ताज्या उपलब्ध (२०१९-२०) वार्षिक अहवालानुसार, १ मार्च २०२० पर्यंत ४०.७८ लाख मंजूर पदांपैकी अंदाजे २१.७५% जागा रिक्त होत्या. त्या भरण्याऐवजी हे सरकार कायमस्वरूपी नोकऱ्यांचे कंत्राटी नोकऱ्यांमध्ये रूपांतर करत आहेत. २०२० मध्ये केंद्रीय

राष्ट्रवादी काँग्रेसच्या हरियानातील नवीन झेंड्याचे शरद पवार उद्घाटन करताना, शेजारी पितांबरन मास्टर, प्रफुल पटेल, धीरज शर्मा, सोनिया दुहन व इतर मान्यवर.



क्षेत्रात १३.२४ लाख कंत्राटी कर्मचारी होते जे २०२१ मध्ये वाढून २४.३० लाख झाले.

पदवीधर बेरोजगारीचा दर १७ टक्क्याच्या पार पोचला असून आजमितीस भारतातील प्रत्येक सहावा पदवीधर हा बेरोजगार आहे. सध्याचे केंद्रसरकार बेरोजगारांच्या हाताला काम देण्याऐवजी त्यांची माथी भडकवण्यावर भर देत आहे. कार्ल मार्क्स यांनी धर्म ही अफूची गोळी आहे असे म्हटले आहे. तिच्या गुंगीत तरूण पिढीला अडकवून दिशाभूल करण्याची भाजपा सरकारची नेहमीची खेळी आहे. त्यापासून सावध राहिले पाहिजे.

ओलांडून सतत तयार होत असलेल्या MEA बद्दल वेळोवेळी सांगितले आहे.

२. एप्रिल २०२० मध्ये, भारतीय सैन्याला पेट्रोलिंग पॉइंट्स क्रमांक ९, १०, ११, १२, १२, १३, १४, १५, १७, १७A मध्ये प्रवेश नाकारण्यात आला. लष्कराच्या विविध स्तरावरील चर्चेमुळे आपण चीनकडून काही क्षेत्रे परत मिळवली. पण तरीही डेपसांग मैदाने आणि डेमचोकवर चिनी लोकांचे नियंत्रण आहे जे एप्रिल २०२० पूर्वी आपले सैन्य गस्त घालत असत आणि आता ते क्षेत्र सोडण्यास नाखूष आहेत, हा सध्याच्या स्टँडऑफचा भाग आहे हे मान्य करण्यास त्यांनी

**अधिवेशनस्थळी भरविण्यात आलेल्या शरद पवार यांच्या जीवन कार्यावरील छायाचित्र प्रदर्शनाचे धीरज शर्मा व सोनिया दुहन फीत कापून उद्घाटन करताना**



आपल्या देशाची सुरक्षा, विशेषतः आपल्या सीमांचे रक्षण हा देखील गंभीर प्रश्न बनला आहे.

उदाहरणार्थः

१. २०२० पासून, चीनने त्यांच्या सिमेचा विस्तार केला आहे; LAC वर लडाखच्या विवादित प्रदेशात पायाभूत सुविधांची उभारणी आणि लष्करी प्रश्न निर्माण झाले आहेत. अगदी अमेरिकन आणि ऑस्ट्रेलियन राजदूतांनी देखील, उपग्रह प्रतिमांद्वारे चीनच्या धोक्याबद्दल आणि एलएसी

नकार दिला.

३. संरक्षण आस्थापनेतील एका सूत्राने कबूल केले की चीनशी अलीकडील सकारात्मक वाटाघाटीनंतरही आपण एप्रिल २०२० पूर्वीचा दर्जा मिळवू शकलो नाही. जेव्हा पंतप्रधान २०२० च्या एप्रिल संघर्षानंतर म्हणाले की ना कोई वहाँ हमारी सीमा में घुस आया है, ना ही कोई घुसा हुआ है, ना ही हमारी कोई पोस्ट किसी दुसरे के कब्जे में हैं. आपल्या पंतप्रधानांनी या काळात देशाची दिशाभूल केल्याचे

अलिकडील अहवालात नमूद करण्यात आले आहे.

४. गेल्या वर्षी जानेवारीमध्ये, उपग्रहांव्दारे टिपण्यात आलेले फोटो दशवितात की चीनने भारतीय हद्दीत संपूर्ण गाव बांधले आहे. या सरकारने ते स्पष्टपणे नाकारले. परंतु या गेल्या महिन्यात, अरुणाचल प्रदेशातील अंजाव जिल्ह्यातील स्थानिकांनी व्हिडिओ रेकॉर्ड केले ज्यामध्ये दाखवले आहे की चायनीज पीपल्स रिपब्लिक आर्मी (PLA)चे काही लोक यंत्रसामग्रीसह भारताच्या हद्दीत, छगलगाम जिल्ह्यातील हदिगरा-डेल्टा-६ जवळ बांधकाम कामात गुंतलेली आहेत.

५. अरुणाचल प्रदेशात चीनच्या उभारणीचा मुकाबला करण्यासाठी आपल्याकडे मूलभूत सुविधाही नाहीत.

६. अलीकडेच चीनचे गुप्तहेर जहाज ठयुआन वांग ५ठ श्रीलंकेच्या हंबनटोटा बंदरात दाखल झाले. हे आपल्या परराष्ट्र धोरणाचे अपयश आहे. हे सरकार आपल्या जवळच्या शेजारी आणि मित्र राष्ट्रांचा विश्वास जिंकण्यातही अपयशी ठरले

या घटनांवरून हे सरकार देशाच्या सीमांचे रक्षण करण्यात पूर्णपणे अपयशी ठरत आहे.

आजच्या सभेला तरूण-तरूणींचा मोठा प्रतिसाद लाभला आहे. मी सर्वांना आवाहन करतो की, महागाई-बेरोजगारी सारख्या गंभीर प्रश्नांवर लक्ष केंद्रीत करून व सरकारच्या नाकर्तेपणा विरूद्ध व्यापक आवाज उठवून आपल्या तरूणाईची ताकद सरकारला दाखवून द्यावी.

राजकीय पक्ष म्हणजे संघटनात्मक शक्ती बलवान करणे यावर लक्ष देऊन कार्य करणाऱ्यांनी फळी उभारणे हे आव्हान असते. राष्ट्रवादी काँग्रेस हा तारूण्यातील पक्ष आहे. नवी पिढी घेऊन संघटनात्मक बळ वाढवणे हे आपणासर्वांसमोर आव्हान आहे. त्यासाठी प्राधान्याने प्रयत्नशील राहावे लागेल. हे करत असताना आज देश पातळीवर सत्ता असणाऱ्यांशी संघर्षही करावा लागेल.त्यांच्याकडून शासकीय यंत्रणांचा गैरवापर, चौकशी करण्याचे अधिकार असलेल्या यंत्रणेचा गैरवापर व पैसा-पदे यांची प्रलोभणे दाखवून लोकशाही मार्गाने सत्तेत बसलेल्या सरकार पाडण्याचे काम सुरू आहे. तरी नाउमेद न होता आपण संघर्षाची तयारी ठेवणे आवश्यक आहे. त्यासाठी आपण तयार राहू या. जयहिंद !

■■■

शरद पवार यांच्या जीवन कार्यावरील छायाचित्रांचे प्रदर्शन अजित पवार पाहताना, शेजारी प्रशांत जगताप



नवी दिल्ली येथे १० आणि ११ सप्टेंबर रोजी झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आठव्या राष्ट्रीय अधिवेशनात पक्षाचे नेते प्रफुल पटेल यांनी मांडलेला व कार्यकर्त्यांनी एकमताने संमत केलेला राजकीय, सामाजिक व आर्थिक विषयावरील ठराव.

# लोकांसाठी काम करत राहण्याचा राष्ट्रवादीचा संकल्प

## प्रफुल पटेल यांचे उद्गार



भारताला एक प्रगतशील, धर्मनिरपेक्ष, सर्वसमावेशक सरकारची आवश्यकता आहे, जे ना केवळ १३५ कोटी भारतीयांच्या हिताची काळजी घेईल, तर सर्व घटकांना, मग ते शेतकरी असतील, मजूर, आदिवासी, दलित, मागासवर्ग, युवा, महिला असतील आणि दूरवरच्या भागात राहणाऱ्या लोकांनाही आपण आपल्या महान देशाच्या प्रगतीत भागीदार आहोत असे वाटेल. आपल्या देशालाही दूरदर्शी विचारांची आवश्यकता आहे, जे याला उच्च पातळीवर घेऊन जातील आणि प्रत्यक्षात आपल्याला एक विकसित देश बनवतील. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांत आपल्या सर्वांना हे लक्ष्य प्राप्त करण्यासाठी स्वत:ला वचनबद्ध करावे लागेल आणि त्याचबरोबर आपल्या लोकशाहीला मजबूत करावे लागेल. कारण, भारतासाठी एक मजबूत संघराज्य बनून राहण्याचा हीच एकमेव पद्धत आहे.

१० जून १९९९ला राष्ट्रवादीच्या स्थापनेपासून आपले अध्यक्ष आणि आपल्या देशाचे सन्माननीय नेते शरद पवार यांनी सातत्याने राष्ट्रवादीच्या धोरणांना एक दिशा आणि आकार दिला आहे. जेणेकरून आपण आपल्या देशाच्या संस्थापकांद्वारा दिल्या गेलेल्या निश्चित आदर्श आणि धर्मनिरपेक्ष मूल्यांचे पालन करू.

ही मोठी अभिमानाची बाब आहे, की शरद पवार यांना आधुनिक भारताचे सर्वात मोठ्या शेतकरी नेत्यांपैकी एक म्हणून संबोधले जाते. त्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून आपल्या कार्यकाळा दरम्यान राज्याला कृषी विकास, उत्पादन आणि नवनिर्माणाच्या बाबतीत आघाडीवर घेऊन गेले आहेत. अशाच प्रकारे २००४ ते २०१४ दरम्यान भारताचे कृषी मंत्री म्हणून त्यांनी ना केवळ धान्याच्या उत्पादनात, तर डेअरी, तेलबिया, मत्स्यपालन, फुलांच्या शेतीत शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले आहे. भारत ना केवळ आत्मनिर्भर बनला आहे, तर जगातील दुधाचा सर्वात मोठा उत्पादक आणि तांदूळ, गहू, कापूस, साखर, फळे तसेच भाज्या आदींचा दुसरा सर्वात मोठा उत्पादकही बनला आहे.

एनडीए सरकार २०१४मध्ये मोठ्या बहुमताने सत्तेत आली आणि नंतर २०१९मध्ये त्यांनी मोठ्या जनमतासह विजय संपादन केला. त्यांनी भारताच्या लोकांना एक उत्कृष्ट जीवन आणि भविष्याचे आश्वासन दिले होते. समाजातील प्रत्येक घटकाला वाटले, की दिलेल्या आश्वासनांमुळे त्यांचे जीवन बदलून जाईल, उत्कृष्ट बनेल. स्वातंत्र्यानंतर मागील ६५




वर्षांत काहीच साध्य झालेले नाही आणि ते आपल्या देशातील लोकांना सातत्याने सांगितले गेले.

## कृषी :

शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमत (एमएसपी) देण्याचे आश्वासन दिले गेले होते, जे खर्च आणि उत्पन्नासाठी ५० टक्के दाखवते. खरोखरच असे झाले आहे? सध्याच्या केंद्र सरकारने शेतकरी वर्गाच्या विरोधानंतरही संसदेच्या दोन्ही सभागृहांत २०२०मध्ये कृषी विधेयक मंजूर केले. हे नवीन कृषी कायदे पहिल्या दिवसापासूनच चुकीचे होते आणि शेतकऱ्यांनी हे मान्य करण्यास नकार दिला. यावरून शेतकऱ्यांद्वारा क्रांतिकारी आंदोलन आणि विरोध झाला. या आंदोलनात अनेक लोकांचे जीव गेले आणि अखेर डिसेंबर २०२१मध्ये सरकारला हे कायदे रद्द करावे लागले.

केंद्र सरकारला तीन कृषी कायदे मागे घेण्यासाठी तयार करण्याच्या ९ महिन्यांनंतर शेतकरी पुन्हा विरोध करत आहेत आणि ते अन्य अनेक गोष्टींशिवाय किमान आधारभूत किंमतीच्या कायदेशीर हमीची मागणी करत आहेत. ज्याठिकाणी शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला अतिशय कमी किंमत मिळत आहे, त्याच्यावेळी दुसऱ्या बाजूला ग्राहकांना बाजारातील कृषी मालाच्या महागड्या दराचे चटके बसत आहेत. हे निश्चितपणे असे दर्शविते, की आपली खरेदी, साठवणूक आणि वितरण प्रणालीत गंभीर त्रुटी आहेत आणि मध्यस्थच खरा फायदा कमवत आहेत.

## महागाई

आपल्या देशात महागाई नेहमीच सर्वोच्च पातळीवर असते. दरम्यान, यामध्ये चढ-उतार होत असतो आणि यामध्ये चढ-उतार होण्यामुळे ती आपल्या अर्थव्यवस्थेवर मोठ्या प्रमाणावर परिणाम करते. रॉयटर्सच्या मते, भारतातील महागाई कमीत कमी उर्वरित २०२२साठी केंद्रीय बँकेच्या सहिष्णुता बँडच्या उच्च पातळीपेक्षा वर राहील, जी आधीच्या तुलनेत अधिक दीर्घ असेल, ज्यामुळे आगामी महिन्यांत व्याज दरातील वाढ अनिवार्य असेल. एकीकडे हे सगळे होत असताना, डॉलरच्या तुलनेत आपला रूपया कमकुवत बनत चालला आहे.

या सर्व परिस्थितीमुळे २०२४-२५पर्यंत भारताला ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था आणि जागतिक महासत्ता बनवण्याची घोषणा एक अशक्यप्राय स्वप्न वाटत आहे. पेट्रोल, डिझेल आणि स्वयंपाकाच्या गॅसच्या किंमती गगनाला पोहोचल्या आहेत आणि ज्याकडे लक्ष देणे योग्य ठरेल, ते हे आहे, की यूपीए सरकारच्या काळाच्या तुलनेत जागतिक पातळीवर कच्च्या तेलाच्या किंमती अतिशय कमी आहेत, तरीही इंधनाच्या किंमती त्या वेळच्या तुलनेत अधिक आहेत. याकडेही लक्ष देण्याची आवश्यकता आहे, की १ मार्च २०१४ला दिल्लीत एका स्वयंपाकाच्या गॅस सिलिंडरची (१४.२ कि.ग्रॅ.) किंमत ४१० रूपये होती. आता एका घरगुती सिलिंडरने १ हजार रूपयांचा टप्पा पार केला आहे, जो प्रति सिलिंडर गेल्या आठ वर्षांत १४४ टक्क्यांनी अधिकची वाढ आहे.

ऑक्टोबर २०२१पासून मार्च २०२२पर्यंत घरगुती स्वयंपाकाच्या गॅस सिलिंडरच्या दरात कोणताही बदल झाला नाही. मात्र, पाच राज्यांतील विधानसभा निवडणुका संपल्यानंतर दरांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. त्यामुळे महत्त्वपूर्ण गोष्ट अशी, की ज्यावेळी निवडणूक असते, सरकार किंमती वाढवित नाही आणि निवडणूक संपल्यानंतर पुन्हा किंमती वाढतात. दरांमधील ही वाढ सर्वसामान्य लोकांच्या खिशाला चटका देत आहे आणि हे सर्व आपल्या देशात अर्थव्यवस्थेच्या पडझडीस कारणीभूत ठरत आहे.

सरकारची लोकविरोधी वृत्ती पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे, ज्यावेळी रशिया आणि यूक्रेन दरम्यानच्या युद्धामुळे कच्च्या तेलाच्या किंमतीत वाढ झाली आणि आपल्या सरकारने सर्वसामान्य लोकांना सबसिडी देण्याऐवजी इंधनाच्या दरात आणखी वाढ केली. यूपीए सरकारच्या काळात इंधनाच्या दरांना विरोध करणारा भाजप आता मौन बाळगून आहे आणि केवळ ही वाढ योग्य ठरविण्याच्या पद्धतींवर काम करत आहे.

## जीएसटी

ज्यावेळी यूपीए सरकारच्या काळात जीएसटी तयार केले जात होते, त्यावेळी भाजप बदल्याच्या भावनेतून याचा विरोध करत होता आणि ते याला विरोध करण्यासाठी रस्त्यांवर उतरले होते. मात्र, सत्तेत आल्यानंतर भाजपने जीएसटी आणण्याचा निर्णय घेतला आणि अखेर त्यांनी २०१७मध्ये हा कर लागू केला आणि सांगितले, की हा ईमानदार आणि ईमानदारीचा उत्सव आहे. मग अनेक वर्षे त्यांनी याला विरोध का केला? जीएसटी अशावेळी सादर करण्यात आले होते, ज्यावेळी लोक नोटाबंदीनंतरही उभारण्याचा प्रयत्न करत होते.




हा कर घाईघाईने लागू करण्यात आला होता आणि याची योजना चांगल्या पद्धतीने बनवली गेली नव्हती. जीएसटी दरांना प्रमाणित केले गेले नव्हते आणि तो बदलत राहिला. याने व्यापारी आणि ग्राहक अशा दोघांनाही संभ्रमात टाकले.

या अनियोजित करामुळे सर्वसामान्यांवर बोजा पडत आहे आणि सरकारही हा कर लावण्याबरोबर खेळ करत आहे. उदाहरणासाठी, पॅक आणि लेबल असलेल्या खाद्यपदार्थांवर अलिकडेच हा कर लावला जाणे. हा कर सर्वसामान्य लोकांसाठी एक आश्चर्याच्या रूपात आला. कारण, याने त्यांच्या वैयक्तिक बजेटवर अतिरिक्त बोजा टाकला. यावर सरकारला केवळ विरोधी पक्षांच्याच विरोधाचा सामना करावा लागला नाही, तर वरूण गांधींसारख्या आपल्याच नेत्यांच्याही विरोधाचा सामना करावा लागला. त्यांनी ट्विट केले होते, की विक्रमी बेरोजगारी दरम्यान आणण्यात आलेला हा निर्णय मध्यमवर्गीय कुटुंबे, विशेषत: भाड्याच्या घरासाठी संघर्ष करत असलेल्या युवकांवर अधिक आर्थिक ओझे टाकेल. आपण त्यांना अशा काळात नुकसान पोहोचवत आहोत, ज्यावेळी त्यांना दिलाशाची गरज होती.

आधी पॅकबंद केलेले आणि लेबल असलेल्या खाद्यपदार्थांवर जीएसटी लावण्यावर कठोर टीका झाल्यानंतर सरकारला यावर काम करावे लागले आणि कमी वजनाच्या किंवा २५ किलोग्रॅम पॅकेजमध्ये पुरवठा केल्या जाणाऱ्या प्री-पॅकेज्ड मालावर शुल्क लाऊन करनिश्चितीचे मानदंड बदलावे लागले.

एक महत्त्वपूर्ण मुद्दा, ज्यावर याठिकाणी प्रकाश टाकला गेला पाहिजे, तो हा आहे, की ज्यावेळी महाविकास आघाडी सरकार महाराष्ट्र राज्यात सत्तेवर होती, त्यावेळी केंद्र राज्यांना

जीएसटीची नुकसानभरपाई देण्यात उशिर करत होते. महाराष्ट्राने केंद्राला सर्वाधिक जीएसटी योगदान दिले. मात्र, तरीही हे भाजपच्या नेतृत्वाखालील सरकार नव्हते. त्यामुळे केंद्राने याकडे लक्ष दिले नाही.

## बेरोजगारी

बेरोजगारी हा एक मोठा मुद्दा आहे. आपल्या देशाने गेल्या ४५ वर्षांत सर्वाधिक बेरोजगारी दर नोंदवला होता. या समस्येचे नुकसान प्रत्येक वर्गातील लोक भोगत आहे आणि त्यापेकी सर्वात महत्त्वपूर्ण शिक्षित युवक आहेत. करण्यात आलेल्या मोठ मोठ्या दाव्यांनंतरही सरकार रोजगार देण्यात अपयशी ठरले आहे आणि याचे एक उदाहरण आहे, भारताने




गेल्या आठ वर्षांत कायमस्वरूपी सरकारी नोकऱ्यांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांपैकी केवळ ०.३ टक्के उमेदवारांची भरती केली आहे, जी जगात सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेत बेरोजगारीच्या संकटाला समोर आणते.

सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी प्रायव्हेट लिमिटेड या खासगी संशोधन संस्थेच्या डेटानुसार समजते, की यावर्षी जूनमध्ये बेरोजगारी वाढून ७.८ टक्के झाली, जी गेल्या महिन्यात ७.१ टक्के होती. त्याच महिन्यात २० ते २४ वयोगटात बेरोजगारी ४३.७ टक्के होती. आपल्या देशात बेरोजगारीची स्थिती काय आहे याचे योग्य चित्र केवळ आकडेच सांगत नाहीत. नोटाबंदी आणि जीएसटीनंतर श्रमिकांच्या एका मोठ्या वर्गाने संघटित क्षेत्रात आपल्या नोकऱ्या गमावल्या आहेत. सर्व सरकारी नोकऱ्या, म्हणजेच केंद्र, राज्य सरकार, सार्वजनिक क्षेत्राचे उपक्रम, सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये नवीन रोजगारावर जवळजवळ बंदी आहे.

दुसऱ्या बाजूला सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या खासगीकरणावर भर दिला जात आहे. त्याचा परिणाम म्हणजे एससी, एसटी आणि ओबीसी वर्ग नोकऱ्यांपासून वंचित राहत आहे. रोजगार देण्यात आलेले अपयश झाकण्यासाठी सरकार विविध कारणे शोधत आहे आणि त्यातील एक पद्धत म्हणजे सैन्य सशस्त्र दल अग्निवीर योजना सुरू करणे होती. याला केवळ सर्वसामान्य लोकांनीच नाही, तर माजी सैनिकांनीही मोठा विरोध केला.

## कोविड

कोविड महामारी जगभरात मोठी आपत्ती घेऊन आली आणि आपणही त्याचे बळी ठरलो. कोरोना विषाणूमुळे लोकांचे जीव गेले आणि केंद्र सरकारद्वारा घाईघाईने लावण्यात आलेल्या अनियोजित लॉकडाउनने भारतीयांच्या जखमांवर मीठ चोळले गेले. प्रवाशांना पायी आपल्या घरी परत जातानाची दृश्ये अजूनही आपल्या स्मरणात आहेत. भूक, नोकरी गमावणे आणि मृत्यू हे सरकारद्वारा घेण्यात आलेल्या वाईट निर्णयांचे दु:खद परिणाम होते. त्यानंतर उत्तर प्रदेश आणि त्याच्या आसपासच्या नद्यांमध्ये तरंगत्या मृतदेहांचे चित्र समोर आले, जी त्यावेळच्या कोविडच्या स्थितीबद्दलची उदासिनता आणि वाईट व्यवस्थापन समोर आणत होते.

केंद्र सरकार महामारीचा सामना करण्यासाठी चांगल्या प्रकारे तयार नव्हते आणि त्यामुळे त्यांना पुरेसा ऑक्सिजन,



लसीकरण, उपचार आदीं सोयीसुविधा उपलब्ध करून देता आल्या नाहीत. कोविडच्या पहिल्या लाटेने आपल्या देशाच्या लोकांना आणि सरकारलाही गुडघे टेकायला लावले. या महामारीने सरकारला अनेक मुद्द्यांवर असहाय्य बनवले. दुसऱ्या लाटेतही परिस्थिती फारशी वेगळी नव्हती. भारत आणि जगभरातील विशेषतज्ज्ञांच्या इशाऱ्यानंतरही सरकार तयार नव्हते. पहिल्या लाटेत विविध समस्यांचा अनुभव घेतल्यानंतर त्यांनी दुसऱ्या लाटेसाठी आणखी सुसज्ज राहायला

हवे होते. पहिल्या लाटेनंतर लॉकडाउनचा निर्णय मागे घेण्यामध्ये सरकारने दाखवलेली शिथिलता या महामारीच्या दुसऱ्या लाटेच्या सुरूवातीसाठी जबाबदार धरण्यात आली होती, जी पहिल्याच्या तुलनेत अधिक होती तसेच याने देश आणि देशातील लोकांना आर्थिक, भावनात्मक तसेच आरोग्याच्यादृष्टीने आणखी मागे नेऊन ठेवले.

## सांप्रदायिक

दूरचित्रवाहिनी आणि वृत्तपत्रांवर दररोज विविध समुदायाच्या नेत्यांद्वारा करण्यात आलेल्या सांप्रदायिक हिंसा आणि द्वेषपूर्ण भाषणांचे अनेक भयानक दृश्य पाहायला मिळत आहे. ही सर्वाधिक चिंताजनक बाब आहे आणि भारताच्या स्वातंत्र्याच्या ७५ वर्षात आपण घडाळ्याला मागील दिशेने वळवत आहोत. गृह मंत्रालयाने लोकसभेत आकडेवारी सादर करताना सांगितले, की देशात २०१६पासून २०२०पर्यंत



पाच वर्षाच्या काळात सांप्रदायिक किंवा धार्मिक दंगलीचे ३,३९९ प्रकरणे होती. या काळात दंगलीची झळ एकूण २.७६ लाखाहून अधिक लोकांना पोहोचली. आपल्या देशात पाहायला मिळालेली दंगलींची ही माहिती केंद्रीय राज्य मंत्री नित्यानंद राय यांनी ऑगस्टमध्ये सभागृहात दिली होती. स्पष्टपणे उल्लेख केला गेला पाहिजे आणि लक्ष दिले गेले पाहिजे, की सांप्रदायिक हिंसाचार आणि दंगलींची ही प्रकरणे प्रामुख्याने भाजपचे सरकार असलेल्या राज्यातील असल्याचे सांगितले गेले आहे आणि एका विशिष्ट समुदायाच्या उद्देशाने आहेत. आपण एक धर्मनिरपेक्ष देश आहोत आणि भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारने आपल्या संविधानाचा हा महत्त्वपूर्ण पैलू कायम ठेवला पाहिजे.

आपल्या सर्वांना हे लक्षात ठेवावे लागेल, की महात्मा गांधी यांनी आपल्याला धर्म, जात, पंथ आणि भाषांनी विभागलेल्या देशाला एकजूट करून स्वातंत्र्याच्या दिशेने पुढे नेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या सर्व विषमतेपासून दूर करून जगातील सर्वश्रेष्ठ संविधानांपैकी एक दिली आणि प्रत्येक भारतीयाला आपल्या देशात अभिमान आणि सन्मानासह जगण्याचा अधिकार दिला. हे आपण १९५०मध्ये मिळवले होते, जे संघराज्य अमेरिकेसारख्या काही सर्वात जुन्या लोकशाहीपेक्षा खूप आधी होती, जी मार्टिन ल्यूथर किंगच्या नेतृत्वाखाली १९६०पर्यंत समानतेची लढाई लढत होती.

## महिला सक्षमीकरण

आपल्या अध्यक्षांनी नेहमीच महिला सक्षमीकरणाला पाठिंबा दिला आहे. त्यांनी महिलांना सशस्त्र दलांत अधिकृतपणे समाविष्ट करण्याचा आश्चर्यकारक निर्णय घेतला आणि स्थानिक स्वराज संस्थांमध्ये महिलांसाठी ५० टक्के आरक्षणाचे समर्थन केले. ते संसदेतही याचे समर्थन




करतात. आपणा सर्वांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून त्यांच्या कार्यकाळात महिलांना सक्षम बनविण्यासाठी त्यांच्याद्वारा घेतल्या गेलेल्या धोरणात्मक निर्णयांची माहिती आहे.

अलिकडेच गुजरात सरकारद्वारा बिल्किस बानो बलात्कार आणि तिच्या मुलीच्या हत्या प्रकरणात ११ दोषींना सोडून देण्याच्या घटनेने आपल्या देशाच्या लोकशाहीवरील विश्वासाला धक्का दिला आहे. ७६व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून देशाला संबोधित करताना लोकांना महिलांचा सन्मान करण्याचे आणि त्यांची प्रतिष्ठा कायम राखण्याच्या दृष्टिकोनातून संकल्प करण्याचे आवाहन केले होते. मात्र, त्याच दिवशी या दोषींना मुक्त केले गेले, ज्यामुळे पीडिता व्याकूळ झाली आणि तिला पूर्णपणे धक्का बसला. आपल्याला महिलांच्या दुर्दशेविरूद्ध लढण्याचा आणि त्यांची प्रतिष्ठा वाचविण्याचा संकल्प केला पाहिजे.

## आंतरराष्ट्रीय प्रकरणे

भारत आणि चीन दरम्यान सुरू असलेला मुद्दा काहीसा असा आहे, जो आपल्या सरकारने अतिशय गांभीर्याने घेण्याची गरज आहे. दोन्ही देशांमधील संबंध नेहमीच चांगले राहिलेले



नाहीत आणि एप्रिल-मे २०२०मध्ये फिंगर भाग, गलवान व्हॅली, हॉट स्प्रिंग्स आणि कोंगरूंग नालासह अनेक भागात चीनी सैन्याद्वारा करण्यात आलेल्या उल्लंघनानंतर तसेच कारवायांनंतर यामध्ये आणखी कटुता आली आहे. त्याचवर्षी जूनमध्ये गलवान खोऱ्यात चीनी सैनिकांबरोबर हिंसक चकमकीनंतर परिस्थिती आणखी बिघडली. परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांच्याकडून अलिकडे चीनविरूद्ध काही कठोर वक्तव्ये केली जात आहेत. मात्र, एनडीए सरकार अशी विधाने करत असते आणि नंतर त्यांच्याबरोबर मैत्री रणनीतिमध्ये गुंतते. चीन सातत्याने आपल्याला धोका देत आहे आणि आपल्या सीमा कराराची अवहेलना करत आहेत. गलवान मुद्दा त्यांचा गोपनीय हेतू सिद्ध करतो आणि ही भारतासाठी एक न सुटणारी समस्या बनून राहिली आहे.

डॉ. जयशंकर यांनी म्हटले आहे, की संबंध दोन्ही बाजूंनी असतात. एक स्थायी नाते एकतर्फी असू शकत नाही. आम्हाला यामध्ये परस्पर सन्मान आणि परस्पर संवेदनशीलतेची गरज आहे. आता हे काही गूढ नाही, की आपण अतिशय कठीण काळातून जात आहोत. हे विधान मजबूत वाटते. मात्र, असे वाटते, की चीन आपल्याकडे लक्ष देत नाही आणि केवळ आपण एक देश म्हणून आपल्या शेजाऱ्यांचा आदर करत आहे आणि संवेदनशील आहोत. ते त्यांच्याबाजूने असंवेदनशील होत आहेत आणि आपल्या चांगुलपणाचा फायदा उठवत आहेत. जोपर्यंत ते आपल्या भागात रेषा ओढत आहेत, आपण चीनवर ज्ञानाच्या उदयाची प्रतीक्षा करू शकत नाही. आता वेळ आली आहे, की आपण त्यांच्या डोळ्यात डोळे घालून पाहण्याची आणि शत्रूचा मित्र बनणे बंद केले पाहिजे. आपला कायमचा शत्रू पाकिस्तान अंतर्गत भांडणे आणि राजनैतिक उलथापालथ अनुभवत आहे. अशाच प्रकारची स्थिती श्रीलंका आणि आपल्या शेजारील अनेक देशांमध्ये आहे. भारताला या परिस्थिती हाताळण्यासाठी टाईट रोप डिप्लोमसी करावी लागेल. यूक्रेनबरोबर रशियाचा संघर्ष आणि पश्चिमी जगतद्वारा त्यांच्यावर लावण्यात आलेल्या प्रतिबंधांमुळे आपला विश्वासार्ह मित्र आणि सहकारी रशिया चौकशीच्या फेऱ्यात अडकला आहे. भारतासाठी अमेरिका, फ्रान्स, जपान, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, जर्मनी आणि प्रमुख विकसित देशांबरोबर उत्कृष्ट संबंध ठेवणे अनिवार्य आहे, जेणेकरून आर्थिकदृष्ट्या फायदा होईल आणि त्याचबरोबर चीनवर सातत्याने सैन्य आणि आर्थिक दबाव टाकला जाऊ शकेल.

## राजकीय प्रकरणे

राष्ट्रवादी पक्षाने महाराष्ट्रात महाविकास आघाडी सरकार बनविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला, जो राज्याच्या विकासासाठी जलदगतीने पुढे जात होता. आपण पाहिले आहे, की कसे सरकारला अस्थिर करण्यासाठी प्रेरित केले गेले आणि त्याचबरोबर त्या शक्तींद्वारा निष्ठा बदलण्यासाठी दबावाखाली आमदारांना मजबूर केले गेले. अशाच पद्धतीने आपण यापूर्वी मध्य प्रदेश आणि कर्नाटकातील प्रकरणे पाहिली



आहेत. दिल्लीत सध्या आप सरकारबरोबर जे होत आहे, तोही संघवादावर हल्ला आहे. बिहारमध्ये जे झाले, ते असे दर्शविते, की जुने पारंपरिक मित्र आणि भागीदारांनी किती निराश केले आहे.

## आपण संकल्प करूया...

राष्ट्रवादी पक्ष भारतातील लोकांच्या जीवनाच्या सर्व पैलूंवर काम करून आणि त्याचे समर्थन करून त्यांच्या जीवनात बदल घडवून आणण्याचा संकल्प करत आहे. राष्ट्रवादी पक्ष केंद्र सरकारवर आपल्या देशातील लोकांना, विशेषत: युवकांसाठी रोजगार निर्माण करण्याचा दबाव आणेल, संपुष्टात आणण्याच्या दिशेने काम करणे सुनिश्चित करूया, जो त्यांचा अधिकार आहे. शेतकरी समुदायाला लाभ याला नेहमीच आमचे प्राधान्य असेल.

आम्ही सरकारला वेळोवेळी स्वयंपाकाच्या गॅससारख्या वस्तूंवर लोकांना सबसिडी देण्यासाठी सांगण्याचा संकल्प घेतो, जो सर्वसामान्यांवर मोठ्या प्रमाणात आर्थिक दबाव टाकत आहे आणि हेसुद्धा सुनिश्चित करतो, की सरकारने कच्च्या तेलाच्या जागतिक दरांतील बदलानुसार इंधनाच्या किंमती नियंत्रित कराव्यात. सरकारने इंधनाच्या किंमती कमी केल्या पाहिजेत. कारण, याचा नेहमीच व्यापक परिणाम होतो आणि यातील वाढत्या दरांमुळे अर्थव्यवस्थेत किंमती वाढतात आणि याठिकाणी शेवटी सर्वसामान्य लोक पीडित होतात.



जे आपले भविष्य आहे. आपण नेहमीच शेतकरी आणि कृषी क्षेत्राच्या प्रगतीसाठी सक्रीय राहिलो आहे, ज्याचे प्रमाण आपले अध्यक्ष श्री. शरद पवारजी यांच्या कार्यकाळा दरम्यान केंद्रीय कॅबिनेट कृषी मंत्रीच्या रूपात आहे. त्यांनी हे सुनिश्चित केले, की शेतकऱ्यांच्या बँकेत कर्जाचे पैसे जमा झाले. ७२ हजार कोटी रूपये एकाचवेळी खात्यात टाकले गेले आणि त्याचा परिणाम असा झाला, की कृषी क्षेत्रात विक्रमी उत्पादन झाले आणि देशाची अर्थव्यवस्था स्थिर करण्यामध्ये मोठी मदत झाली. आपण यापुढेही सत्तेच्या कॉरिडोरमध्ये शेतकऱ्यांचा आवाज ऐकला जावा आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रकार

राष्ट्रवादी पक्ष नेहमीच धर्मनिरपेक्षतेवर विश्वास ठेवत आला आहे आणि आपले संविधान याच्यावरच भर देते. आपल्या समाजात आणि विशेषत: सांप्रदायिक आधारावर कोणत्याही प्रकारच्या हिंसाचाराला कोणतीही जागा नाही. आम्ही हे सुनिश्चित करण्याचा संकल्प घेतो, की आपल्या समाज आणि देशात कोणताही धार्मिक किंवा सांप्रदायिक द्वेष किंवा हिंसाचार होऊ नये आणि आम्ही आपल्या देशात प्रत्येक वेळी सांप्रदायिक सद्भाव आणि एकतेचा संदेश पसरवू. आम्ही महिलांची प्रतिष्ठा कायम राखण्याचा आणि त्यांना सक्षम बनविण्यासाठी लढण्याचा संकल्प घेतो.

महाराष्ट्रात महाविकास आघाडी सरकारचा एक भाग म्हणून राष्ट्रवादीने कोविड महामारी दरम्यान राज्यातील लोकांची देखभाल करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. संपूर्ण भारतात आमचे कार्यकर्ते सक्रीय होते आणि त्या सर्वांसाठी तो कार्यरत होता, ज्यांना मदतीची गरज होती. आम्ही लोकांसाठी केवळ या बाबतीतच नाही, तर लोकांना सर्व वैद्यकीय सोयीसुविधा मिळवून देण्यासाठी काम करत राहू, ज्यावेळी आणि कोठेही त्यांना आमची आवश्यकता असेल.

संसद, राज्य विधानसभा, विधान परिषदा, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, महापालिकांमध्ये आपल्या पक्षाचे निवडून आलेले प्रतिनिधी लढत राहतील आणि सरकारला आरसा दाखवत राहतील. ते लोकांचे आवाज होतील आणि सुनिश्चित करतील, की त्यांचा आवाज ऐकला जावा आणि समस्यांवर तोडगा काढला जावा.



एक महत्त्वपूर्ण बाब, ज्यावर याठिकाणी प्रकाश टाकण्याची आवश्यकता आहे आणि आपल्याला हे सुनिश्चित केले पाहिजे, की समान विचारधारा असणाऱ्या लोकांना आणि पक्षांना, एक समान धर्मनिरपेक्षवाल्या लोकांना एकजूट केले पाहिजे आणि भाजप तसेच त्यांच्या सहयोगी पक्षांविरूद्ध लढण्यासाठी एकत्र आले पाहिजे. श्री. शरद पवार यांनी या पक्षांना एकत्र आणण्यासाठी एनडीए सरकारचा सामना करण्यासाठी एक संयुक्त मोर्चा बनविण्यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. आपल्याला या संकल्पाला मजबूत केले पाहिजे आणि विरोधी पक्षांच्या एकजुटीच्या लक्ष्याच्या दिशेने काम केले पाहिजे आणि हे सुनिश्चित केले पाहिजे, की आपण हे यशस्वीपणे साध्य करू शकू.

आमच्यावरही विविध शक्तींचा दबाव आला आहे. मात्र, आम्ही एक पक्ष म्हणून एकत्र उभे आहोत आणि आमच्यापैकी काही लोक शरण गेल्यानंतरही या परिस्थितीचा सामना करत आहोत. आम्ही ही लढाई सोडणार नाही. कारण आम्हाला माहित आहे, की अखेर सत्याचाच विजय होईल.

आपण देशात वाढत जनाधारासह एक राष्ट्रीय पक्ष आहोत, आपल्याला संपूर्ण भारतात आपल्या पाऊलखुणा उमटविण्याचा संकल्प केला पाहिजे आणि संसदेत तसेच प्रत्येक राज्याच्या विधानसभेत जास्तीत जास्त निवडलेल्या सदस्यांच्या रूपात आपल्या उपस्थितीची जाणीव करून देण्याच्या दिशेने काम करण्याचा संकल्प केला पाहिजे. यामुळे आपल्याला लोकांची चांगली सेवा करण्यामध्ये मदत मिळेल. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने विस्तारित कार्य समितीच्या आपल्या बैठकीत भारतातील लोकांसाठी काम करत राहण्याचा संकल्प केला आहे. शेवटी महात्मा गांधींच्या शब्दांत, खुद वो बदलाव बनिए जो आप दुनिया में देखना चाहते आहे.

■■■

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे २०१४ साली सत्तेवर आल्यापासून 'अच्छे दिन' येणार असल्याचे स्वप्न विकत आहेत. तथापि, लवकरच २०१७ साली त्याचे विस्मरण झाले आणि 'नवीन भारत २०२२' हे नवे स्वप्न आपल्या मनावर बिंबविण्यात आले आणि लवकरच आपण 'अच्छे दिन' चे स्वप्न विसरून गेलो आणि २०१९ साली रालोआ सरकारने पुन्हा एकदा 'फाईव्ह ट्रिलीयन २०२४' चे स्वप्न दाखविले. आत्ता आपण त्याच्या जवळपासही कोठे नाही. फक्त एकट्या जावडेकर यांनी 'इस्रो'च्या
(भारतीय अवकाश संशोधन संस्था) 'गगनयान' प्रकल्पाचा संदर्भ दिला होता. पुढील यादीत सर्वच आश्वासनांचा समावेश नाही. फक्त महत्त्वाच्या प्रकल्पांचा उल्लेख केला आहे व देश स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत असताना या प्रकल्पांची सध्याची स्थिती कशी आहे, हे नमूद करण्यात आले आहे. या यादीचे संकलन विविध स्रोतांद्वारे केले आहे तथापि, महत्त्वाची माहिती 'नीती आयोगाच्या 'स्ट्रॅटेजी फॉर न्यू इंडिया ॲट ७५' या दस्तावेजावरून घेण्यात आलेली आहे:-

**१)२०२२पर्यंत प्रत्येक ग्राम पंचायतीला ब्रॉडबॅण्ड, इंटरनेटने जोडले जाईल. हे काम २०१८पर्यंत पूर्ण होईल, अशी अपेक्षा होती.**

२०२२ ची स्थिती : देशातील सर्व ग्राम पंचायतींना व खेडेगावांना हायस्पीड इंटरनेट व ब्रॉडबॅण्ड सुविधा पुरविण्यासाठी 'भारत नेट' प्रकल्पांतर्गत २०१९ पर्यंत अडीच लाख ग्राम पंचायतींना ब्रॉडबॅण्डसाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा पुरविल्या जातील. मात्र, २०२२ मध्ये केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितले की, हा प्रकल्प २०२५ पर्यंत पूर्ण होईल.

**२) २०२२पर्यंत शंभर टक्के डिजीटल साक्षरतेची ग्वाही.**

**२०२२ ची स्थिती :** 'एनएफएचएसएस'ने (२०१९-२१) सर्वेक्षण केलेल्या आकडेवारीनुसार, फक्त ३३.३ टक्के महिला आणि ५७ टक्के पुरुष इंटरनेटचा वापर करतात. डिजीटल वापरात स्त्री-पुरुष यांच्यात मोठी तफावत आहे.

३)२०२२पर्यंत प्रत्येक भारतीयांना स्वच्छतागृह असेल.



**२०२२ ची स्थिती :** 'एनएफएचएसएस'ने दिलेल्या आकडेवारीनुसार, बिहार, झारखंड, ओरिसा यासारखी राज्ये आणि केंद्र शासीत लडाख भागात स्वच्छतागृहांची कमतरता आहे. वरील भागात अनुक्रमे ५०.६ टक्के, ४३ टक्के, ४० टक्के आणि ५८ टक्के इतकी स्वच्छतागृहांची सुविधा आहे. एकाही राज्यात स्वच्छतागृहांची १०० टक्के सुविधा उपलब्ध नाही. 'एनएफएचएसएस'नुसार, सुधारित स्वच्छतागृहाच्या व्याख्येनुसार, मैला वाहून जाण्यासाठी फ्लश ते सेप्टिक टँक

व तेथून ड्रेनेज पाईप लाईन या पद्धतीचा अवलंब केला जातो.

**४) २०२२पर्यंत प्रत्येक भारतीयास घर असेल.**

२०२२ ची स्थिती : नीती आयोगाने निर्धारित केलेल्या उद्दिष्टानुसार २०२२पर्यंत प्रत्येक भारतीय कुटुंबास स्वच्छतागृह व नळ पाणी पुरवठ्यासह २४ तास विद्युत पुरवठा असलेले पक्के घर मिळेल. आयोगाने पुढे म्हटले आहे की, ग्रामीण भागात २.९५ कोटी घरे आणि शहरी भागात १.२ कोटी घरे शहरी भागात बांधण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. नीती आयोगानुसार, सुमारे ७६.६८ लाख घरे ग्रामीण भागात डिसेंबर २०१९ पर्यंत बांधून होतील. डिसेंबर २०२२ पर्यंत २.९५ पैकी १.६६ कोटी घरे ग्रामीण भागात म्हणजे, उद्दिष्टांपैकी निम्मी घरे म्हणजेच, ५५.८८ लाख घरे मे २०२२ पर्यंत बांधून तयार होतील.

**५) २०२२पर्यंत प्रत्येक भारतीयास नळाने पाणी पुरवठा होईल.**

२०२२ ची स्थिती : ही अंतिम मुदत सरकारने कोणतेही आढेवेढे न घेता २०२४ पर्यंत वाढविली. केंद्रीय मंत्रालयाच्या फलकानुसार,१० जून २०२२ पर्यंत देशभरातील सुमारे ९.६५ कोटी घरे(५०.३८ डक्के)नळ पाणीपुरवठ्याने जोडली जातील. ऑगस्ट २०२२ पर्यंत १० कोटी घरे नळपाणी पुरवठ्याने जोडण्यात आली असून त्यापैकी गेल्या ३ वर्षांत ७ कोटी घरांना नळाने पाणी पुरवठा होऊ लागला आहे.

**६) २०१७** पर्यंत रखडलेले सर्व प्रलंबित पायाभूत सुविधांचे प्रकल्प, त्यापैकी काही प्रकल्प एकेक दशकांपासून

# बढाईखोर सरकारचे वस्त्रहरण !

## अमृत महोत्सवी वर्षातील भारत

**पंतप्रधान नरेंद्र मोदी हे २०१४ साली सत्तेवर आल्यापासून 'अच्छे दिन'चे स्वप्न विकत आहेत. लवकरच त्याचे विस्मरण झाले व 'नवीन भारत २०२२' हे स्वप्न दाखविले व तेही स्वप्न विसरून गेलो. २०१९ साली सरकारने पुन्हा एकदा 'फाईव्ह ट्रिलीयन . २०२४' चे स्वप्न दाखविले. देश स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत असताना या आश्वासनांची पोलखोल करणारी श्वेतपत्रिका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या १० सप्टेंबर २०२२ रोजी नवी दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत प्रसिद्ध करण्यात आली. या श्वेतपत्रिकेतील मजकूर संक्षिप्त स्वरुपात येथे देत आहोत.**

रेंगाळलेले आहेत, असे सर्व प्रकल्प २०२२ अखेर पूर्ण केले जातील.

२०२२ ची स्थिती : एकूण १,५६५ प्रकल्पांपैकी ४२१ पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांचा खर्च आता जवळजवळ ४.७३ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त झाला असल्याचे 'एमओएसपीआय'च्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. एकूण प्रकल्पांचा मूळ खर्च रु.२१,८६,५४२ इतका होता. हे प्रकल्प पूर्ण होईपर्यंतचा अंदाजे खर्च मंत्रालयाने रु.२६,५९,९१४ कोटी पर्यंत जाईल, असे म्हटले आहे. या प्रकल्पांवर फेब्रुवारी २०२२ पर्यंत रु.१३,२६,५६९ कोटी इतका झाला आहे. म्हणजे, अंदाजे खर्चाच्या ४९.८७ टक्के होय.

**७) २०१७-२०१८पर्यंत खाण क्षेत्रातील वाढीचा वेग ३ टक्के होता;** तो २०१८-२०२३ पर्यंत १४ टक्क्यांवर नेणे. म्हणजे, सरासरी वाढ ८.५ टक्के अपेक्षित आहे. भारताचे कोळसा बाजारपेठेतील २०१४ असलेल्या ३२.४४अब्ज डॉलर भांडवलात २०२१ पर्यंत १२.०४ अब्ज डॉलरपर्यंत घसरण झाली आहे. २०२०पर्यंत कोळशाचे उत्पादन १.५ अब्ज झाले होते. त्यात पुढे अनेक पटीने वाढ झाली. १४-१५ ते २०-२१ या आर्थिक वर्षात कोळसा खाणीतील उत्पन्न ८२५९.०८ कोटी रुपये इतके झाले. हे केवळ दिलेल्या आश्वसनांपैकी २ टक्के इतके अल्प आहे.

**८)उच्च शिक्षणातील एकूण नोंदणीचे प्रमाण १६-१७ वर्षात २५ टक्के होते,** त्यात २२-२३ पर्यंत २७ टक्के इतकी वाढ होईल. उच्च शिक्षणातील एकूण नोंदणीचे प्रमाण १९-२० मध्ये ७.१ टक्के होते.

**९)हाताने मैला नेण्याचे निर्मूलन**

सरकारने प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार, हाताने मैला नेण्याच्या पद्धतीमुळे एकाही व्यक्तीच्या मृत्यूची नोंद झालेली



नाही. या उलट, खाजगी संस्थेने केलेल्या अहवालानुसार, हे काम करताना गेल्या पाच वर्षांत १२५ जणांचा अपघाती मृत्यू झाल्याचे म्हटले आहे. तथापि, २०२२ च्या अर्थसंकल्पात या व्यवसायातील लोकांच्या पुनर्वसनासाठी फक्त ७० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. गतवर्षी केलेल्या तरतुदीपेक्षा ही तरतूद ३० टक्क्यांनी कमी आहे.

**१०)२०२२पर्यंत प्रत्येक भारतीयास २४ तास विद्युत पुरवठा**

मे २०२२ मध्ये प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार, कोळसा पुरवठ्यातील टंचाईमुळे मागणीनुसार, विद्युत पुरवठा करता आला नाही. वीज निर्मिती व वितरणच्या अहवालानुसार, विजेच्या वापराबाबत फक्त ६६ टक्के ग्राहकांचे समाधान करणे शक्य झाले. औष्णिक ऊर्जा प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या कोळशाच्या साठ्यापेक्षा २५ टक्के साठा कमी पडला.









**११)२०२२पर्यंत भारत कुपोषणमुक्त होईल.**

'एनएफएचएस'ने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, ६ ते २१ या वयोगटातील ८९ टक्के मुलांना किमान पौष्टिक आहार मिळत नाही आणि प्रत्येक ३ मुलांपैकी एक मुलगा कुपोषित असतो. जागतिक भूक निर्देशांकानुसार, भारताचा क्रमांक १३५ देशांमध्ये १०१ वा लागतो. त्यातही बांगलादेश, पाकिस्तान, नेपाळ या शेजारी देशांच्या पाठिमागे भारताचा क्रमांक लागतो.

आणखी एक 'डब्ल्यूसीडी' (महिला व बालविकास)च्या अहवालानुसार, भारतातील ३३ लाखांहून अधिक मुले कुपोषित आहेत. तसेच, ५ वर्षाखालील ३५ टक्के मुलांची वाढ खुंटली गेली आहे.

**१२)प्रत्येक घराला एलपीजी सिलिंडर(स्वयंपाकाचा गॅस सिलिंडर) असेल.**

प्रधानमंत्री उज्ज्वला गॅस योजनेच्या अंमलबजावणीबरोबर ग्रामीण भागात सिलिंडरचे वितरण करण्यात आलेले आहे. मात्र, त्यापैकी ९० लाख रिकामे झालेले सिलिंडर पुन्हा कधीच भरले गेलेले नाहीत. फक्त १ कोटी सिलिंडर पुन्हा भरले गेले आहेत, अशी माहिती 'माहितीच्या अधिकारात चौकशी केली असता मिळाली. गॅस सिलिंडरच्या वाढत्या किंमती हे त्याचे कारण आहे.

**१३)भारतीय रेल्वे सुरक्षा दर्जा इतका उत्तम असेल की, रेल्वे अपघातात कोणीही मृत्युमुखी पडणार नाही.**

'एनसीआरबी'च्या अहवालानुसार, २०२० मध्ये तेरा हजारांहून अधिक अपघातात सुमारे बारा हजार प्रवाशी मृत्युमुखी पडले. म्हणजे, रेल्वे अपघातात दररोज सरासरी ३२ प्रवासी प्राणास मुकले.

**१४)२०२२पर्यंत एकदा वापरल्या जाणाऱ्या प्लॅस्टिकवर बंदी घातली जाईल.**

देशात एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लॅस्टीकमुळे समस्या निर्माण होत आहेत. प्लॅस्टिकला सक्षम पर्याय उपलब्ध नसल्याने प्लॅस्टिक उत्पादकांनी अशा प्रकारच्या बंदीला तीव्र विरोध केला आहे. तथापि, अधिक स्तराच्या, जाडीच्या प्लॅस्टिकला या बंदीतून वगळण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. दिल्ली पर्यावरण मंडळाने म्हटले आहे की, केंद्र सरकारने अशी बंदी घालण्यापूर्वी एखादी बैठकही घेतली नाही.

**१५)२०२२-२३ पर्यंत तेल व गॅसच्या आयातीत १० टक्के कपात करणार.**

जगात तेल आयात करणाऱ्या देशांमध्ये भारत हा तिसऱ्या क्रमांकाचा देश आहे. मार्च २०२२ मध्ये कच्च्या तेलाच्या आयातीत ५.४ टक्के तर, संपूर्ण आर्थिक वर्षात ८ टक्के वाढ मागील वर्षाच्या याच कालावधीच्या तुलनेत झालेली आहे, असे पेट्रोलियम प्लॅनिंग अँड ॲनॅलिसीसी सेलने म्हटले आहे. त्यांनी २०२१-२२ या आर्थिक वर्षात ११९.२ अब्ज







डॉलर किंमतीचे ११२.२ अब्ज टन कच्च्या तेलाची आयात केली आहे. मागील आर्थिक वर्षापेक्षा या वेळची तेलाची आयात जास्त(२०२.९ दशलक्ष टन)असून तेल आयातीवरील खर्चातही ९२ टक्के वाढ झाली आहे.

**१६) भारताच्या वनक्षेत्रात अत्यल्प वाढ**

'आयएसएफआर'(भारताच्या वनस्थितीचा अहवाल)ने प्रसिद्ध केलेल्या २०२१च्या अहवालानुसार, भारताचे एकूण वनक्षेत्र ७१३.७८९ चौरस किलोमीटर असून त्यात १,५४० चौ. कि. मी. इतकी अत्यल्प वाढ झाली आहे. एकूण भौगोलिक क्षेत्राच्या हे केवळ ७१ टक्के क्षेत्र आहे. अहवालात नमूद केल्याप्रमाणे प्रत्यक्ष उद्दिष्टापेक्षा हे क्षेत्र ११ टक्क्यांहून अधिक कमी आहे.

सर्व्हेक्षणातून असे दिसून येते की, आपल्या देशातील घनदाट जंगलाचे महत्त्वाचे क्षेत्र आता राहिले नाही. वनक्षेत्रात वाढ झाल्याचे जे म्हटले जाते, त्यात प्रामुख्याने खुल्या क्षेत्राचा समावेश आहे. थोडक्यात, आकडेवारी काहीही असली तरी आपले वनक्षेत्र हे हळुहळू कमी होऊ लागले आहे. ज्याला घनदाट जंगल म्हटले जाते ते केवळ ३.०४ टक्के आहे. त्यात केवळ ५०१ चौ. कि.मी. ने वाढ झाली आहे.

**१७) मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन २०२२ अखेर पूर्ण होईल.**

'नॅशनल हाय-स्पीड रेल कॉर्पोरेशन लि. (एनएचएसआरसीएल) ने म्हटले आहे की, मुंबई-अहमदाबाद




हाय-स्पीड रेल्वे प्रकल्प फेब्रुवारी २०२२ पर्यंत पूर्ण होईल. प्रकल्पाचे फक्त १७ टक्के काम पूर्ण झाले असून केंद्र सरकारचा महत्त्वाकांक्षी बुलेट ट्रेन प्रकल्प पूर्ण होण्याची २०२३ची अंतिम मुदत गाठू शकणार नाही. जून २०२२ मध्ये रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी नव्याने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अहमदाबाद-मुंबई बुलेट ट्रेन २०२६ मध्ये पूर्ण होईल, अशी अपेक्षा आहे.

**१८)२०२२पर्यंत भारताची एकूण पुनर्विजनिर्मितीची क्षमता १७५ जीडब्ल्यू(ग्रॉस वॅट) असेल.**

२०१५ साली पॅरिस शिखर परिषदेत भारताने पुनर्विजनिर्मिती स्रोतांद्वारे ५० टक्के ऊर्जा निर्मितीचे व त्यासाठी ४५० एकूण वॅट् क्षमतेचे ऊर्जा प्रकल्प २०३० पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. परंतु, सरकारी आकडेवारीनुसार, सौरऊर्जा व पवनऊर्जा मिळून ६५.६ एकूण वॅट ऊर्जा ग्रीडमध्ये २०१५-१६ आर्थिक वर्षाच्या प्रारंभापर्यंत जमा झाली. तरीही सौर ऊर्जेचे २०३० पर्यंत ३०० एकूण वॅटचे उद्दिष्ट गाठण्यात खूपच ऊर्जा कमी पडत आहे. पवनऊर्जा क्षेत्रापुढे यापेक्षाही जास्त समस्या आहेत. पुनर्विजनिर्मिती उपकरणांवरील जीएसटीमध्ये ५ टक्क्यांवरून १२ टक्क्यांपर्यंत वाढ केल्याने एकूण जीएसटीत १३.८ टक्क्यांपर्यंत वाढ झाली असल्याने त्याचा परिणाम प्रकल्पांवर झाला आहे.

**१९) भारतातील कोणत्याही शाळेतील विद्यार्थी इयत्ता दहावी पूर्ण करण्यापूर्वी घरी बसणार नाही. एकही शाळाबाह्य विद्यार्थी नसेल.**

'यूडीआयएसइ'(युनिफाईड डिस्ट्रीक्ट इन्फर्मेशन सिस्टीम फॉर एज्युकेशन प्लस)ने प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार, माध्यमिक शाळा सोडणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण १४.४ टक्के आहे. केंद्रीय मंत्री धर्मेन्द्र प्रधान यांनी सांगितले की, सुमारे १५ कोटी मुले शाळाबाह्य असून ती शिक्षणापासून वंचित आहेत.

**२०) भारतमाला फेज-१ ने २०२१-२२ या वर्षात २४ हजार ८०० कि. मी. रस्ते बंदरांना जोडण्याचे उद्दिष्ट ठेवले असून त्यात किनारपट्टीवरील २ हजार कि. मी. रस्त्यांचा**




**समावेश आहे.**

महामार्गावरील संसदीय समितीने राज्यसभेत सादर केलेल्या अहवालानुसार, आत्तापर्यंत उद्दिष्टांपैकी फक्त एक पंचमांश रस्ते तयार करण्याचे काम पूर्ण झाले आहे आणि किनारपट्टीचे रस्ते जवळजवळ शंभर टक्के खर्च पूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत. याचा अर्थ 'बीएमपी-१ चा एकूण खर्च १०६३० अब्जपेक्षा जास्त होऊ शकतो. पहिल्या टप्प्यातील काम आर्थिक वर्ष २०२७ अखेर पूर्ण होईल.

**२१) २०२२-२३ पर्यंत राष्ट्रीय महामार्गाची लांबी**



**दुप्पट म्हणजे दोन लाख किलोमीटर होईल. सध्याची लांबी १.२२ लाख कि.मी. आहे.**

मार्च २०२२ अखेर रस्ते वाहतूक मंत्र्यांनी १,४१,१९० कि.मी. लांबीचा राष्ट्रीय महामार्ग पूर्ण केला आहे. २०२४-२५ या वर्षाखेरपर्यंत २ लाख कि.मी. लांबीचा राष्ट्रीय महामार्ग पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे, अशी माहिती व्यापार व उद्योग मंत्रालयाने दिली. याचा अर्थ २० हजार कि.मी. पेक्षा कमी लांबीचा महामार्ग आत्तापर्यंत पूर्ण झाला आहे.

**२२) २०२२ अखेर शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होणार.**

२८ फेब्रुवारी २०१६ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर केले की, देश ७५ वा स्वातंत्र्यदिन साजरा करीत असेल तेव्हा या देशातील शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होईल, परंतु, २०२० मध्ये केंद्रीय कृषी मंत्री नरेंद्र सिंग तोमर यांनी २०२१-२२ च्या अर्थसंकल्पावर बोलताना सांगितले की, उद्दिष्ट गाठण्याचे आमचे लक्ष्य आहे. शासकीय एफडीआयच्या अहवालानुसार शेतकऱ्यांचे मासिक उत्पन्न रु.८,०९५/- असून ते २०२२ पर्यंत दुप्पट होईल. चलनफुगवट्याचा विचार करता ही रक्कम १०,२१८ होईल. ही रक्कम रु.२१,१४६ च्या जवळपासही कोठे नाही. असे असले तरी कृषी उत्यादनात मात्र २६५.०५ दशलक्ष टनावरून(२०१३-१४)३०५.४३ दशलक्ष टनापर्यंत(२०२०-२१) वाढ झाली आहे.




**२३)२०२२ पर्यंत देशातील प्रदूषणाची पातळी ५० च्या खाली येईल.**

मार्च २०२२मध्ये 'वर्ल्ड एअर क्वालिटीच्या अहवालात म्हटले आहे की, जगातील ५० प्रदूषित शहरांच्या यादीत भारतातील ३५ शहरांचा समावेश आहे. ११७ देशांतील ६,४७५ शहरांच्या आकडेवारीवर वरील निष्कर्ष काढण्यात आला आहे.

**२४) २०२२ पर्यंत देशातील 'जीडीपी' वाढीचा वेग ९ ते १० टक्के राहील.**

रिझर्व बँकेने २०२२-२३ या वर्षाचे प्रसिद्ध केलेल्या मॉनेटरी पॉलिसी' निवेदनात म्हटले आहे की, २०२२-२३ या आर्थिक वर्षात 'जीडीपी' वाढीचा वेग ७.१ टक्के निर्देशित केला आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने त्यांच्या 'वर्ल्ड इकॉनॉमिक आऊट लुक'मध्ये म्हटले आहे की, २०२२ साठी जीडीपी वाढीचा वेग ८.२ टक्के निर्देशित केला आहे. आशियाई विकास बँक व रिझर्व बँक रिसर्चने २०२२-२३ या आर्थिक वर्षात जीडीपी वाढीचा वेग ७.५ टक्के निर्देशित केला आहे.

**२५) दरवर्षी २ कोटी रोजगार निर्माण केला जाईल व दर वर्षी त्या दिल्या जातील.**

जून २०२२ पर्यंत केंद्र सरकारने फक्त दहा लाख रिक्त जागा दीड वर्षात भरल्या? सरकारने दिलेल्या आश्वासनाप्रमाणे आत्तापर्यंत ६ कोटी जागा भरायला हव्या होत्या. मात्र, २०२४ पर्यंत दहा लाख नोकऱ्या दिल्या तातील.

■■■

# इतिहास संपविण्याचा प्रयत्न होतोय

**छगन भुजबळ**




देशात काय चाललंय हे तर तुम्ही सर्वजण जाणता. आता काही म्हणायचं असेल तर तुम्ही तर ऐकत आहात आणि तेही ऐकत आहेत. जसं काही बोलले गेले तर ईडीची बिडी लागली. देशभरात एक भीतीचे वातावरण आहे. बोलायचं तर काय बोलायचं. सर्व लोक त्रासात आहेत. रोज कुठे ना कुठे याच्यावर छापा, त्याच्यावर छापा, छापेच छापे आहेत. काय सांगितलं होतं त्यांनी, की प्रत्येकाला पंधरा लाख देऊ, बेरोजगारांना प्रत्येक वर्षी नोकरी देऊ, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होईल, सर्वांना घर मिळेल, सर्वांना वीज मिळेल, सर्वांना हे मिळेल, ते मिळेल. सर्व काही मिळाले. किती शांतता आहे देशात. जयजयकार होतोय. सर्व काही मिळाले. कोठे गेले हे सर्व. ही खरी गोष्ट आहे, की बाबा पाच वर्षांत फार काही करता आलं नाही. पुन्हा पाच वर्षे मिळाली, तर थोडे तरी काम व्हावे. पण आपण जे होते तेही गमावून बसलो आहे. आता तर आम्हाला कोणतेही अच्छे दिन नको आहेत हे सांगण्याची वेळ आली आहे. जसे होते तेच दिवस परत दिले तर चांगलं होईल.

महागाई वाढतेय. सर्व सीमारेषा पार करत आहे. आमच्या अर्थमंत्री भगिनी आहेत निर्मलाताई सीतारामनजी, त्यांनी तीन वर्षांपूर्वी कार्पोरेट टॅक्सचा रेट कमी केला. एवढा कमी केला, की एका वर्षात दीड लाख कोटी रूपये आपल्या तिजोरीत कमी यायला लागले. गेल्या काही सहा-सात वर्षांमध्ये ११ लाख कोटी रूपये श्रीमंतांचे ते माफ करून टाकले. एक किस्सा आहे. एका शिक्षकाने विद्यार्थ्याला विचारले, की भारत छोडो आंदोलनात कोणी कोणी भाग घेतला. विद्यार्थ्याने सांगितले, की विजय मल्ल्या, ललित मोदी आणि अशीच काही नावे घेतली. हे सर्व भारत छोडो. आता करायचं तर काय करायचं. आता अर्थव्यवस्था बुडायला लागली तर जीएसटीचे शस्त्र त्यांच्या हातात होते. कधीच झाले नाही. पण धान्यावर जीएसटी, डाळीवर, तेलावर, खाण्याच्या सर्व गोष्टींवर जीएसटी. एवढेच नाही, विद्यार्थ्यांना लिहिण्यासाठी आवश्यक पेन्सिलवरही जीएसटी आणि पेन्सिलने लिहिलेले जे खोडले जाते, त्या रबरवरही जीएसटी. कोणी हॉस्पिटलमध्ये असेल तर त्याच्यावरही जीएसटी. अद्याप मृत्यूवर तरी जीएसटी लावलेला नाही. त्यामुळे कोणती भीती नाही. नाही नाही, अंत्यसंस्कारासाठी लागणाऱ्या साहित्यावरही जीएसटी. विद्यार्थ्यांचे तर असे झाले आहे, की हम स्कूल चले साथ साथ, जीएसटी का बोझा सर पे लिए.

आपण काय करत आहोत. जेव्हा निवडणूक येईल, तेव्हा कुठल्या तरी गोष्टींची भुरळ आपल्यावर पडते. मतदान करतो. नेहमी धर्माच्या गोष्टी करतो. महागाईची चर्चा आपण विसरून जातो. मी पवार साहेब आणि तुम्हाला सर्वांना एवढेच सांगू इच्छितो, की बहुत रंजीश है यहाँ के लोगों के दरम्याँ, मुनासिब है हर शक्स को प्यार चाहिये, बहुत उँची हैं यहाँ मजहबों की, धर्मो की दिवारें, इसे गिराने के लिए एक ताका

हथियार चाहिये और पवार साहब उस हथियार को बनाने के लिए आप का नेतृत्व चाहिये. जशा निवडणुका येतील संघर्ष, भांडणे सुरू. हिंदु-मुसलमान, मंदिर-मशिद. अरे आम्हाला मंदिर नकोय, मशिद नकोय, भुकेल्या पोटाला भाकरी हवी आहे. ये तो शुक्र है की परिंदो को पता नहीं उनका मजहब क्या हैं, नहीं तो आसमाँ से भी खून की बारिश होती. जिथे कुठे जाईल तिथं एकच गोष्ट सांगतील. दुसरे काही सांगणार नाहीत. कोणताही आरोप लावतील आणि तेही चुकीचे. हा भ्रष्ट आहे, तो भ्रष्ट आहे. येथून तिथे जा, लाँड्री चालू आहे. सर्वांची धुलाई करून स्वच्छ केले जाते. सर्वांच्यावर काही ना काही शिक्के मारले आहेत, भ्रष्टाचाराचे.

मी तुम्हाला सांगू इच्छितो, जीवनात स्तुती कमी आणि आरोप जास्त आहेत, वय आहे चार दिवसांचे, पण परीक्षा खूप आहेत. पण या परीक्षा आम्ही पास करू इच्छितो. कोणत्याही परिस्थितीत. ही महागाई, एकमेकांविरूद्धची भांडणं, ही ईडी, ही आयटी, बरंच काय काय आहे. लोक भीतीमुळे गप्प बसले आहेत. याविरूद्ध कुणी विडा उचलायचा. एका व्यक्तीकडे सर्वांचे लक्ष आहे, की याठिकाणी काहीतरी मार्ग आहे. ज्याठिकाणी सर्व लोक ऐकतील, आणि एकजुटीसह पुन्हा स्वातंत्र्याची दुसरी लढाई आम्हाला लढू द्या. आत्ताच स्वातंत्र्याचा ७५वा अमृतमहोत्सव झाला. हे चांगलं आहे, की घरोघरी तिरंगा फडकला. पण बाकीची लोकं कुठे गेली. त्यांचा इतिहास कुठं गेला. कोठे गेले पंडित जवाहरलाल नेहरू, लाला लजतपराय, भगतसिंग. कोठे गेले हे सर्व लोक. एकाचेही नाव नाही. मोतीलाल नेहरूंनी आपले सर्व घरदार स्वातंत्र्यासाठी दिलं. पंडित जवाहरलाल यांनी सर्व संपत्ती सोडून नऊ वर्षे सातत्याने तुरूंगवास भोगला. इंदिरा गांधींनी बलिदान दिले, राजीव गांधींनी बलिदान दिले. पण कुणी काहीच केले नाही अशा थाटात जे काही केले ते यांनीच केले बस्स्! इतिहास संपवण्याचा प्रयत्न होत आहे. आपल्याला इतिहासाची उजळणी करावी लागेल. इतिहासात जे लढले, त्यांच्या मार्गावर आपल्याला चालावे लागेल, त्यांच्या विचारांवर आपल्याला चालावे लागेल.

मी एवढेच म्हणेन, की सर्व लोकांनी एकत्र येत, सर्वांना बरोबर घेऊन चालावे लागेल. कारण हे स्वातंत्र्य मिळाले आहे ते सगळ्यांसाठी आहे. कोणा एका घटकासाठी नाही. त्यामुळे स्वातंत्र्याची फळे तळागाळापर्यंत गेली पाहिजेत. शिक्षण प्रत्येकाला मिळाले पाहिजे. प्रत्येकाला घर मिळाले पाहिजे, प्रत्येकाला रोजगार मिळाला पाहिजे, रोटी प्रत्येकाला मिळाली पाहिजे. हे नाही, की आमचे लोक जगात सर्वात श्रीमंत झाले, आपली इकॉनॉमी लंडनपेक्षा मोठी झाली. काय गोष्टी करताय. कोणी एखादा जगात श्रीमंत झाला, तर आपली इकॉनॉमी वाढली. लंडनमध्ये प्रत्येकाला पगार काय आहे, राहणीमान काय आहे, घरदार काय आहे. येथे तर राहण्यासाठी घर नाहीये. लोक म्हणतात, की आम्ही तिरंगा लावतो, पण घरावर तिरंगा लावायचा आहे तर आम्हाला घर तरी द्या. त्यानंतर तिरंगा फडकावू ना. याठिकाणी घराचा पत्ता नाही आणि सांगतायंत, की तिरंगा फडकवा. त्यामुळे आपण सर्वांनी एकजूट होऊन लढत आहोत. आपल्यासाठी आनंदाची गोष्ट आहे, की पवार साहेबांसारखे नेतृत्व आपल्याला मिळाले आहे. या नेतृत्वाकडे आज संपूर्ण देश पाहात आहे. आपण सर्वांनी त्यांच्या पाठीमागे उभे राहूया.

धन्यवाद!



मोतीलाल नेहरू यांच्या समवेत त्यांचे कुटुंबिय जवाहरलाल

# राष्ट्रवादीला एक ठोस कार्यक्रमाची गरज

## सुप्रिया सुळे यांचे विचार

प्रफुल्लभाई म्हणाले ते खरे आहे, की आपला पक्ष निश्चितच छोटा आहे. पण देशाच्या राजकारणात एक अतिशय मोठा पक्ष आहे आणि याचे उदाहरण, आत्ता मी आणि फैजल चर्चा करत होतो, की पक्षाचा जन्म २३ वर्षांपूर्वी झाला. २३ वर्षात पहिली दहा वर्षे हा पक्ष केंद्रातील सत्तेत राहिली आणि महाराष्ट्रात २३ वर्षांत आधी पंधरा आणि नंतर अडीच वर्षे अशी साडे सतरा वर्षे हा पक्ष सत्तेत राहिला आहे. मला नाही वाटत, की कोणाचा स्ट्राईक रेट एवढा चांगला असेल. केरळ, गोवा आणि मेघालयमध्येही सत्तेत राहिली. तर आपल्या पक्षाचा स्ट्राईक रेट नेहमीच सत्तेत राहण्याचा आहे. थोडासा कुठे गोंधळ झाला, की कार्यकर्त्यांमध्ये निराशा येते. पण जेव्हा थोडेसे अपयश पाहतो, त्यावेळी यशाची किंमत अधिक वाटते. जास्त गोड वाटते.

तुम्हाला अजूनही २०१९ची निवडणूक लक्षात असेल. सर्वजण म्हणत होते, की राष्ट्रवादी पक्ष संपला आहे आणि सर्वाधिक दहा ते ११ खासदार महाराष्ट्रातून देत होतो. संजयभाऊ तुम्ही कसे लढलात आम्हाला माहितीही नाही. आम्ही तर तुमची गणनाही केली नव्हती. पण तुम्ही आमदार बनला आणि नंतर मंत्रीही बनला. डबल लॉटरी लागली. १९मध्ये जी परिस्थिती होती, त्याच्यापेक्षा वेगळी आज आहे. १९मध्ये लोक पक्ष संपला असे म्हणत होते. आज २२मध्ये जर कुठल्या पक्षाकडे देश, महाराष्ट्र आणि प्रत्येक खासदारही जो संसदेत पाहत आहे, त्या पक्षाचे नाव राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आहे. तुम्हाला ऐकून चांगले वाटेल, की लोकसभेत ५४५ खासदार आहेत आणि राज्यसभेत २८०. २८०पैकी फक्त चार राष्ट्रवादी काँग्रेसचे आहेत आणि ५४५मध्ये पाच राष्ट्रवादी काँग्रेसचे आहेत. पण जर तुम्ही संसदेतील कामगिरीचा डेटा पाहिला, तर २८०पैकी पहिल्या पाच टॉपरमधील दोन राष्ट्रवादीचे आहेत, एक वंदनाताई आणि दुसऱ्या फौजियाताई आणि ५४५पैकी पहिल्या पाचमध्ये तीन टॉपर आहेत, त्यातील दोन म्हणजे एक अमोल कोल्हे आणि फैजल हे पहिल्यांदा खासदार बनले आहेत. तर एवढ्या मोठ्या ८०० खासदारांमधील आघाडीच्या दहा खासदारांची कामगिरी पाहिली तर, ना आमची कोणती मोठी संघटना आहे, शाळा आहे, ना कुणी रोज नोट्स देणारा आहे. मात्र आमचे जे विचार आहेत, आणि जे आमचे नेतृत्व सांगते, ते पुढे घेऊन जाण्याचे काम जर कामगिरीनुसार, डेटानुसार सर्वात मोठा पक्ष, परिणामकारक पक्ष संसदेत आहे, आणि ज्यांची संख्या अतिशय कमी आहे तो राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आहे. मला वाटते, की आपल्यासाठी ही मोठी गोष्ट आहे. आज मी कोल्हेजी, फैजलभाई, वंदनाजी, फौजियाजी यांचे स्वागत केले पाहिजे. पहिल्यांदा



खासदार बनल्यानंतरही त्यांनी संसदेत अतिशय चांगली कामगिरी बजावली आहे. चांगले खासदार बनायचे असेल तर वंदनाजी आणि फौजियाजी यांच्यासारखे बना असे भाजपही सांगत असतो.

तर सध्याची परिस्थिती खूपच वेगळी बनत चालली आहे. एका वेगळ्या वातावरणात आपण राजकारण करत आहोत. मी ज्या कारणासाठी राजकारणात आले, मला ईडी काय आहे हेसुद्धा माहित नव्हते. निश्चितच संघर्ष होता, लढाई होती, पण ती विचारांची होती. संविधानची लढाई होती आणि आज आहे. यासाठी आपण सर्वात आधी, विशेषत: मी युवा विद्यार्थ्यांना सांगेन, की तुम्ही सर्वांनी राज्यघटना वाचली पाहिजे. मी केरळ सरकार आणि पी. सी. चाको यांची आभारी आहे, कारण राज्यघटनेचा सर्वात चांगला कार्यक्रम कोणी आयोजित केला असेल तर आमच्या केरळ सरकारने केला आहे. कोट्टायम जिल्हा राज्यघटनेमध्ये शंभर टक्के साक्षर आहे आणि केरळ सरकारमध्ये राष्ट्रवादीचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे ही आपल्यासाठी खरोखरच गौरवाची बाब आहे. आम्हीसुद्धा निर्धार केला आहे, की देशातला राज्यघटनेत साक्षर असेल




असा दुसरा जिल्हा तो अमोल, माझा पुणे जिल्हा असेल. यासंदर्भात माझी दादांशीही चर्चा झाली आहे आणि यासाठी आम्ही पूर्णवेळ काम करू. कारण राज्यघटनेनुसारच देश पुढे जाईल.

संविधानाला कोण विचारतंय. नड्डाजींविषयी बोलायचे आहे. नड्डाजींनी काय सांगितलं, की प्रादेशिक पक्ष संपायला हवेत. देशात एक देश एक पक्ष आहे. मला नड्डाजींना सांगायचंय, की तुम्ही संविधान विसरला आहात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार ऐकवायचे आहेत. आंबेडकरजींनी असे म्हटले आहे, की विरोधकांचा आदर केला जात नाही, त्याठिकाणी लोकशाही नाही. लोकशाही आणि देशाच्या संरक्षणासाठी अनेक पक्षांची आवश्यकता आहे. मला वाटतं, की या सर्व गोष्टी आपल्याला लोकांना सांगाव्या लागतील.

राष्ट्रवादी कोणत्या मार्गाने चालतो, तर राज्यघटनेनुसार चालतो. देश कसा चालला पाहिजे, कोणा एकाच्या मनमानीवर देश चालणार नाही. देश राज्यघटनेनुसार चालेल आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची लढाई ही राज्यघटनेसाठीच

स्वामी विवेकानंद यांनी वसुधैव कुटुम्बकम असे म्हटले होते आणि या देशाचा प्रत्येक पंतप्रधान संयुक्त राष्ट्रसंघात गेल्यानंतर हे शब्द उच्चारून येतो. पण ते देशात राबविण्याची गरज आहे. संयुक्त राष्ट्रसंघात सर्वजण एकच आहेत असे म्हणतात आणि येथे आल्यानंतर ज्याप्रकारे बोलले जाते, ही आमच्या विचार करण्याची बाब आहे आणि याविरूद्ध आवाज उठवण्याची गरज आहे. बिल्किस बानोचे प्रकरण घडले तेव्हा या देशात पहिले आंदोलन कोणी केले असेल, ते विद्याताईंनी मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने केले. सर्वजण म्हणत होते, की


याचे पुढे काय होईल. अनेकांना प्रकरणही माहित नव्हते. मात्र ज्या पद्धतीने विद्याताई आणि संपूर्ण महाराष्ट्राची टीम, प्रथम रूपालीताई त्याठिकाणी पोहोचल्या होत्या, सर्व आमच्या महाराष्ट्रातील ज्या महिला आहेत, त्या सर्वांनी बिल्किस बानो प्रकरणावर आंदोलन केले आणि त्यानंतर ज्यावेळी पवार साहेब बोलले त्यावेळी देशभरात चर्चा व्हायला लागली.

मला वाटतं, की राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर आज जबाबदारी अधिक आहे. लोक आपल्याकडेच पाहत आहेत.

## अजित पवारांसाठी टाळ्यांचा वर्षाव

**याठिकाणी व्यासपीठावर अजित पवारजी बसले आहेत. मी त्यांचे अलिकडचेच एक उदाहरण देते. सीएजीच्या रिपोर्टमध्ये म्हटले आहे, की या देशात कोविडच्या काळात सर्वात चांगले फिस्कल मॅनेजमेंट अर्थात पैशाचे व्यवस्थापन जर कोणत्या सरकारने केले असेल तर ते महाविकास आघाडी सरकारने केले आणि या सरकारमध्ये ड्रायव्हरच्या सीटवर म्हणजे अर्थ खाते अजित पवारजी सांभाळत होते. म्हणूनच राष्ट्रवादी पक्ष महान का आहे हे यावरूनच लक्षात येईल.**

**सौ. सुप्रिया सुळे यांनी श्री. अजित पवार यांच्या कार्याचा गौरव करताना काढलेल्या वरील उद्‌गारांमुळे उपस्थितांनी टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला आणि अजित पवार 'आगे बढो हम तुम्हारे साथ है, अजित पवार झिंदाबाद' अशा घोषणांचा पाऊस पाडला. जवळपास पाच मिनिटे टाळ्यांचा कडकडाट चालू असल्यामुळे सौ. सुप्रिया सुळे यांना आपले भाषण तात्पुरते थांबवावे लागले.**



मी तीन-चार उदाहरणे गव्हर्नन्सची देऊ इच्छिते. आपला पक्ष का वेगळा आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात नवीन लोक का सहभागी झाले. हा प्रश्न मी स्वत:ला विचारते. मग ते विद्यार्थी असतील, युवक असतील. या पक्षात असे काय वेगळे आहे. हा पक्ष सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावणारा पक्ष आहे. मी तुम्हाला दोन-तीन उदाहरणे देते. याठिकाणी व्यासपीठावर अजित पवारजी बसले आहेत. मी त्यांचे अलिकडचेच एक उदाहरण देते. सीएजीच्या रिपोर्टमध्ये म्हटले आहे, की या देशात कोविडच्या काळात सर्वात चांगले फिस्कल मॅनेजमेंट अर्थात पैशाचे व्यवस्थापन जर कोणत्या सरकारने केले असेल तर ते महाविकास आघाडी सरकारने केले आणि या सरकारमध्ये ड्रायव्हरच्या सीटवर म्हणजे अर्थ खाते अजित पवारजी सांभाळत होते. म्हणूनच राष्ट्रवादी पक्ष महान का आहे हे यावरूनच लक्षात येईल.

दुसरी गोष्ट तुम्हाला सांगते, याठिकाणी आणखी एक नेते बसले आहेत, ज्यांचे नाव राजेश टोपे आहे. या देशात कोविडच्या काळात सर्वात चांगले आरोग्य मंत्री कोण असतील, तर हे मी म्हणत नाही, केंद्र सरकारचा डेटा सांगतो, की राजेश टोपे राहिले आहेत. अशा अडचणीच्या काळात राष्ट्रवादीने बजावलेली कामगिरी लक्षात घेतली पाहिजे. मी दिल्लीत वर्तमानपत्र वाचताना मला खूप चांगले वाटायचे, प्रत्येक वर्तमानपत्रात पहिल्या पानावर कोविडची बातमी असायची आणि त्यामध्ये कोट देशाच्या मंत्र्यांचा नाही, तर राजेश टोपे यांचा असायचा. मला सांगू वाटत नाही. पण केंद्रातील जे मंत्री आहेत, त्यांच्याशी माझे चांगले संबंध आहेत. या काळात त्यांची बदली झाली आणि राजेशजींचे प्रमोशन झाले. ही एक मोठी गोष्ट सर्वांनी लक्षात ठेवली पाहिजे.

अशी खूप चांगली कामं पक्षाने केली आहेत. पण मी सर्व नेतेमंडळींना सांगू इच्छिते, की तुम्ही पक्षाला एक कार्यक्रम द्या. याची खूप आवश्यकता आहे. मी जयंत पाटीलजी यांची खूप आभारी आहे, सर्वात चांगला कार्यक्रम जो जयंत पाटीलजी यांनी दिला होता, की एक तास राष्ट्रवादीबरोबर. महिन्याच्या पहिल्या शनिवारी केवळ एक तास पक्ष मागत आहे आणि हा कार्यक्रम ज्यावेळी मी मतदारसंघात सुरू केला, मला समजलं की पक्षात एवढी गुणवत्ता आहे, छोटे छोट कार्यकर्ते जे मेहनत करतात, जो झेंडा घेऊन फिरतो, जो संघर्ष करतो, त्यांना न्याय देण्यासाठी एखादा चांगला कार्यक्रम असेल तर तो एक तास राष्ट्रवादीचा आहे. त्यामुळे मी पवार साहेब आणि प्रफुल्लभाईंना विनंती करेन, की हा जो महाराष्ट्राचा कार्यक्रम आहे तो देशाचा व्हावा. आजनंतर राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रत्येक नेता एक तास आपल्या कार्यकर्त्यांशी बोलेल, त्याचे सुख-दु:ख

जाणून घेईल, पक्षाविषयी चर्चा करेल, देशात आणि राज्यात काय चाललंय याविषयी चर्चा करेल आणि मग पुढील नियोजन होईल. कारण संघटनाबांधणी ही खूप आवश्यक आहे.

जेव्हा आपण सत्तेत असतो, तेव्हा संघटनाकडे कोणाची लक्ष असत नाही. पण आता दीड-दोन वर्षे आपल्यासाठी अतिशय महत्त्वाचे आहेत. आता महाराष्ट्रात तर जो लढतोय तो २०२४ची तयारी करतोय. पण राष्ट्रवादी काँग्रेस महाराष्ट्रात २०२४ची लढाई नाही लढत, तर पक्ष पहिल्यांदा कार्यकर्त्यासाठी लढेल. जिल्हा परिषद, नगरपालिका, महापालिकांची लढाई

चर्चा करा, पण त्यापूर्वी स्वत: ती वाचा. त्यानंतर इतरांशी बोला. आपली विचारधारा काय आहे. आपण कोणाच्या विरोधात नाहीये. आपण सर्वांना बरोबर घेऊन जात आहोत. तुम्ही संसदेत आमचे सर्वांचे रेकॉर्ड पाहा. आम्ही कुणीही वेलमध्येही जात नाही. मध्यभागी जाऊन कोणाशी भांडण करत नाही आणि हे तर माननीय प्रधानमंत्रीजींनी सांगितलं आहे, की देशात दोनच पक्ष आहेत, जे कधी वेलमध्ये जात नाहीत. त्यामध्ये एक ओडिशाचा पक्ष आहे बीजू जनता दल आणि एक पवार साहेबांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष. आमची एक संस्कृती

**हरियानातील शेतकऱ्यांच्या वतीने लाकडी नांगर शरद पवार यांना भेट देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.**



पहिली लढेल आणि त्यानंतर लोकसभेची तयारी करेल. सध्या जो कोणी येतोय तो बारामतीला जातोय. तिथं सर्वांचं स्वागत आहे. बारामती पाहण्यासारखी आहेच. पर्यटनासाठी लोक दुबईला जातात. पण दिल्लीचे लोक बारामतीला येत आहेत. मला याचा खूप आनंद होतो. बारामतीला सर्वांनी यावं, चांगली गोष्ट आहे. त्यांना लोकसभेची तयारी करू द्या. त्यासाठी अजून दीड दोन वर्षे आहेत. पण आज महाराष्ट्रातला प्रत्येक कार्यकर्ता, ज्याला लढण्याची इच्छा आहे, त्याच्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे हे राष्ट्रीय अधिवेशन आहे.

तर माझी सर्वांना विनंती आहे, की आज एक चांगला विचार घेऊन येथून आपण जावं. संविधानाविषयी लोकांशी

आहे. आम्ही कधीही कोणाशी वैयक्तिक लढत बसत नाही. आमची लढाई विचारांची आहे. त्यामुळे प्रत्येक कार्यकर्त्यावर अधिक जबाबदारी आहे. प्रत्येक गोष्टीची माहिती घेतली पाहिजे. राष्ट्रवादी पक्षाचे एक मासिक प्रसिद्ध होते. कार्यकर्त्यांची वैचारिक जडणघडण करण्यासाठी ते काढले होते. तेसुद्धा वाचत जा आणि एक चांगला, जबाबदार कार्यकर्ता म्हणून स्वत:ला घडवा. आज याठिकाणी जे नेते बसले आहेत, ते सर्व मोठे झाले आहेत, ते त्यांनी घेतलेल्या मेहनतीमुळे. राष्ट्रवादीचा प्रत्येक नेता आणि कार्यकर्ता संविधानानुसार चालतो आणि यापुढेही संविधानानुसारच चालेल.

■■■

आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन नवी दिल्लीत होत आहे आणि याचे आयोजन केल्याबद्दल राष्ट्रवादी युवकचे राष्ट्रीय अध्यक्ष धीरजभाई शर्मा आणि विद्यार्थीच्या अध्यक्षा सोनिया दुहान या दोघांचे अतिशय अभिनंदन करेन. कारण हे अधिवेशन महत्त्वपूर्ण आहे. अधिवेशनाची वेळ अतिशय महत्त्वपूर्ण आहे. आपण सगळेजण जाणतोच, की देश स्वातंत्र्याचे ७५वे वर्ष साजरा करत आहे आणि सरकारी भाषेनुसार आपण अमृतकाळात प्रवेश केला आहे. या अमृत काळात प्रवेश करण्याचा जेवढा आनंद झाला पाहिजे, तेवढीच जबाबदारीची जाणीवही झाली पाहिजे. आज जबाबदारी, अमृत महोत्सवापासून शताब्दी महोत्सवापर्यंत देशाला घेऊन जाण्याची जबाबदारी, देशाला जागतिक महासत्ता बनविण्याची जबाबदारी आणि ही जबाबदारी जेवढी सत्तेच्या दिशेने पुढे जात असतो, त्यावेळी न्यायपालिका आणि प्रशासनावर दबाव येणे स्वाभाविक आहे. अशा परिस्थितीत शासन आणि मीडियाची जबाबदारी वाढते. पण आज देशात पाहिले तर शासन दिवसेंदिवस प्रतिकवादी बनत चालले आहे आणि मीडिया प्रतिक्रियावादी. मग तुम्ही विचाराल, की अशा परिस्थितीत आवाज का उठविला जात नाही याविरूद्ध. मला वाटतं, की शोले चित्रपटातील एक डायलॉग सर्वांना माहित असेल. दूर किसी गांव मे अगर बच्चा रोता है, तो माँ उसे कहती है, की बेटा सो जा नहीं तो गब्बर आ जायेगा। आज देशात कोणताही विरोधी पक्षाचा नेता किंवा मीडिया एखाद्या मुद्यावर आवाज उठवायचा प्रयत्न करत असेल, तर याठिकाणी आई काहीच बोलत नाही, आपोआप कानात आवाज घुमायला लागतो, की भाई गप्प बस, नाहीतर ईडी किंवा सीबीआयची



## दिवसेंदिवस शासन प्रतिकवादी तर मीडिया प्रतिक्रियावादी

वयस्करांच्या अनुभवावर आधारित मार्गदर्शनावर अवलंबून आहे, तेवढीच युवकांच्या संविधानप्रति ठोस निष्ठा आणि श्रद्धा तसेच निरंतर देशप्रेमावर आहे. या जबाबदारीच्या मार्गावर चालताना इतिहासाचा अभ्यास, वर्तमानाचे आकलन आणि भविष्याचे चिंतन करावे लागेल.

पाहायला गेलं तर आज देशाची स्थिती काय आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही, ज्यावर प्रत्येक भारतीयाला गर्व आहे, त्या लोकशाहीची आज काय स्थिती आहे. लोकशाहीचे चार स्तंभ मानले जातात. शासन, प्रशासन, न्यायपालिका आणि मीडिया. पण जेव्हा कधी देश निरंकुश रेड येईल.

गंमतीचा भाग सोडून द्या. पण देशातील आजचे वास्तव हे आहे, की देशातील पायाभूत समस्यांवरून लक्ष विचलित करून देशातील जनतेचे लक्ष काही मोजक्या प्रतिकांवर केंद्रीत करण्याचा सातत्याने प्रयत्न केला जात आहे. तुम्ही आम्हाला घर घर तिरंगा लावायला सांगा किंवा तुम्ही राजपथचे कर्तव्यपथ करा. एक भारतीय असण्याच्या नात्याने आम्हालाही या गोष्टीचा अभिमान आहे. मात्र त्याचबरोबर त्याच तिरंग्याप्रति कर्तव्यपथवर चालताना तुम्हाला या देशाच्या जनतेला उत्तर द्यावे लागेल, की देशात आज बेरोजगारीचा प्रश्न एवढा मोठ्या

खासदार अमोल कोल्हे

# हिंदुत्वाचा अर्थ देशवासियांना सांगण्याची आवश्यकता

प्रमाणात का आहे. का आज प्रत्येक सहा भारतीयांच्या मागे एक भारतीय बेरोजगार आहे. का आज देशात महागाई गगनाला भिडली आहे. २०१४मध्ये सरकारला 'बस हुई महंगाई की मार, अब की बार मोदी सरकार' असे म्हणत निवडून दिले होते, पण १४पासून २२पर्यंत पेट्रोलचे दर शंभरच्या पुढे गेले आहेत, गॅस सिलिंडर ४१०वरून हजार रूपयांवर गेले आहेत. खाद्य तेल ८० रूपयांवरून १८० रूपये झाले आहे. त्यामुळे सरकारला याचे उत्तर द्यावे लागेल, की देशवासियांचे कंबरडे मोडणाऱ्या या महागाईवर तुम्ही काय करत आहात.

तुम्ही युवकांना आश्वासन दिले होते, की वर्षाला २ कोटी रोजगार येतील. शेतकऱ्यांना आश्वासन दिले होते, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होईल. काय झाले या आश्वासनांचे. आज महाराष्ट्रात शेतकऱ्यांना दहा रूपये किलोने कांदा विकावा लागत आहे, त्याचा लागवडीचा खर्चच १८ ते २० रूपये किलो आहे. आम्ही सातत्याने सरकारकडे मागणी करत आहोत, की निर्यात बंदी हटविली जावी. पण सरकारच्या कानावर शेतकऱ्यांचा आवाज काही पोहोचत नाही. या सर्व मूळ समस्यांकडे पाठ फिरवून वेगळ्याच गोष्टीची चर्चा आज देशात होत आहे आणि ते आहे हिंदुत्व. प्रत्येकाला आपल्या धर्माचा अभिमान असणे स्वाभाविक आहे आणि का असू नये. हो, मी हिंदू आहे आणि हिंदुत्वापासून मी दूर का जाऊ. पण त्याच्या बरोबरीने हिंदुत्व काय आहे, हिंदुत्वाची परिभाषा काय आहे, हिंदुत्वाचा अर्थ काय आहे हेसुद्धा देशवासियांना सांगण्याची आवश्यकता आहे. कारण सर्वधर्म सहिष्णुताची जीवनशैली हिंदुत्व आहे. संत ज्ञानेश्वर माऊलींचा जो जे वांछिल ते तो लाहो हे तत्त्वज्ञान हिंदुत्व आहे. जगद्गुरू तुकाराम महाराजांचे भले तर देऊ कासेची लंगोटी, नाठाळाच्या माथी हाणू काठी ही शिकवण हिंदुत्व आहे. स्वामी विवेकानंद यांनी शिकागोच्या सर्वधर्म परिषदेत केलेले भाषण हिंदुत्वाची व्याख्या स्पष्ट करते आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे हिंदुत्व, माता आणि मातृभूमीसाठी सर्वोच्च त्यागासाठी आम्हाला प्रेरित करते.

पण, धर्माच्या नावाखाली जर असामाजिक तत्त्वांना चालना दिली जात असेल, मग तो कोणताही धर्म असो, तो हिंदू असेल, इस्लाम असेल, शिख असेल किंवा इसाई असेल, आम्हाला याचा जोरदारपणे विरोध करावा लागेल, आपल्याला पुढे जाऊन पाहावे लागेल, की धर्माच्या आधी राष्ट्राला प्राधान्य दिले जावे. धर्माच्या नावावर द्वेषाचे राजकारण करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला आपल्याला विचारावे लागेल, की देशातील युवकांच्या हाती तुम्ही दगड आणि तलवार देऊ इच्छिता की रोटी आणि रोजगार. ही गोष्ट अतिशय गांभीर्याने घ्यावी लागेल. कारण जर आम्हाला आमच्या देशाला जागतिक महासत्ता बनवायचे असेल, तर आर्थिक विकास हा एकमेव पर्याय आहे. आजच्या जागतिकीकरणाच्या काळात विशेषत: युवकांनी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे, की आजच्या जागतिकीकरणाच्या काळात तलवारी आणि बंदुकींच्या जोरावर नाही, तर कृषी, पायाभूत सुविधा, औद्योगिक विकास आणि प्रत्येक घटकाच्या आर्थिक विकासामुळेच देश जागतिक महासत्ता बनू शकतो.

आपल्या देशाची अर्थव्यवस्था सध्या १ ट्रिलियनच्या आसपास जाऊन पोहोचली आहे आणि जो देश अरूणाचल प्रदेशपासून खाली श्रीलंकेच्या जवळ असलेल्या हम्बोटा बंदरापर्यंत तिन्ही बाजूंनी घेरून आपल्याला लाल डोळे दाखवत आहे, त्या चीनची इकॉनॉमी १२ ट्रिलियन आहे. पण ज्यावेळी देशभक्तीचा मुद्दा पुढे येतो त्यावेळी पाकिस्तानचे उदाहरण दिले जाते. हो, आपण पाकिस्तानला १९६५ आणि १९७१ तसेच कारगिलच्या युद्धात धूळ चारली आहे, आणि भविष्यातही त्यांना चिरडण्याची क्षमता आम्ही ठेवतो. पण भविष्यातील खरा धोका चीनपासून आहे. त्यामुळे आपल्याला द्वेषाचा मार्ग सोडून सातत्यपूर्ण विकासाच्या मार्गावर चालावे लागेल. कारण कोणताही अशांत किंवा युद्धजन्य देश निरंतर विकासाची प्रक्रिया चालवू शकत नाही. जर विकास झाला नाही, तर रोजगार मिळणार नाही, रोजगार नाही मिळाला तर देश मागास राहील आणि कोणत्याही खऱ्या देशभक्ताला आपला देश पिछाडीवर पडत असल्याचे सहन होणार नाही. त्यामुळे



विचार करावा लागेल, युवकांच्या हाती धर्माच्या नावावर तलवार द्यायची आहे की त्याच युवकाच्या हाती देशहिताच्या नावावर रोजगार द्यायचा आहे.

अशा परिस्थितीत देशासाठी एक मार्गदर्शक आहे छत्रपती शिवाजी महाराजांचे तत्त्व. ते छत्रपती शिवाजी महाराज, ज्यांनी या भारतवर्षात एक उदाहरण समोर ठेवले होते, की राजसत्ता कधीही धर्मसत्तेच्या आधीन राहिली नाही पाहिजे. तर राजसत्ता आणि धर्मसत्ता दोन्हींनी खांद्याशी खांदा मिळवून लोकांच्या कल्याणासाठी काम केले पाहिजे. अशा परिस्थितींमध्ये आम्हाला मार्गदर्शक आहे, महात्मा जोतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राजर्षि शाहू महाराजांचे विचार. महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजची स्थापना केली. जातीव्यवस्था नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आई-बहिणींसाठी शिक्षणाची दरवाजे उघडले. राजर्षि शाहू महाराजांनी समताधिष्ठित मूल्य या देशाला दिले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेवटच्या रांगेतील शेवटच्या व्यक्तीला आपल्या अधिकारांसाठी जागृत केले. देशाला संविधान दिले. आमच्या पिढीने महात्मा फुले, राजर्षि शाहू महाराजांना पाहिलेले नाही, पण जेव्हा कधी सूर्यास्त होतो, तेव्हा एक जळणारी मशाल ही आशा जीवंत ठेवते, की हो, प्रकाशाने अंधारावर विजय मिळवला जाऊ शकतो. आम्ही या महापुरूषांना नाही पाहिले. पण त्यांच्या विचारांवर चालणारी, यांच्या आदर्शावर चालणाऱ्या एक मशालीला हिंदुस्थानच्या राजकारणामध्ये ५५ वर्षांपासून पाहिले आहे आणि ती मशाल आहे, आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब. या मशालीच्या उजेडात आपल्याला पुढे जावे लागेल.

मित्रांनो, रस्ता कठीण आहे, पण अशक्य नाही. आज ज्या भाजपच्या ताकदीविषयी चढाओढीने बोलले जाते, त्या भाजपची स्थापना १९८०ला झाली होती. १९८४मध्ये त्या पक्षाचे केवळ दोन खासदार होते आणि ३९ वर्षांनंतर २०१९मध्ये त्या पक्षाचे ३०३ खासदार झाले. त्यांच्या नेत्यांचा आपल्या कन्फर्ट झोनमधून बाहेर पडून केलेला प्रवास, संघटन म्हणून घेतलेली मेहनत याचे योगदान यामध्ये निश्चितच असेल. पण सांगण्याचा उद्देश हा आहे, की ३९ वर्षांनंतर ते ताकद बनण्याचा विचार करत आहेत. आत्ता तर राष्ट्रवादी स्थापन होऊन केवळ २२ वर्षे झाली आहेत, अजूनही देश आमच्याकडे अपेक्षेच्या नजरेने पाहात आहे. फक्त आवश्यकता आहे केवळ आपल्या कन्फर्ट झोनमधून बाहेर पडण्याची. आवश्यकता आहे फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारधारेला देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचविण्याची. कारण आमच्या मुठ्ठीत अनुभवाचे आकाश आहे, आमच्या पंखांमध्ये जीव आहे. फक्त उड्डाण भरण्याचा अवकाश आहे. त्यामुळे देशातील युवक आणि राष्ट्रवादी पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांना एवढेच सांगेन, 'उडाण भरो तो ऐसी भरो, की असमान भी देखता रहें. गिरना भी है तो ऐसे गिरो, की कोशिश भी प्रसंसा करें। लडना है तो ऐसे लडो, की जीत भी अभिवादन करें, और जीना हैं तो ऐसे जीयो, की राष्ट्र आपपर गौरव करें।' शेवटी एवढेच सांगेन, 'देशभक्तीपर किसी का स्टॅम्प नहीं होना चाहिये, देशभक्ती किसी की जागिर नहीं होनी चाहिये, हर वो शख्स जो इस मिट्टी को अपनी माता मानता हैं, जो दिलोजानसे अपने देशपर प्यार करता हैं, जो अपनी आंखो में अपने देश को बलशाली बनाने का सपना रखता हैं, वो हर शख्स देशभक्त हैं। त्यामुळे माझी इच्छा आहे, की माझ्याबरोबर तुम्ही देशाचा जयजयकार करावा. 'भारत माता की जय! छत्रपती शिवाजी महाराज की जय!!'

■■■

# राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय कार्यसमिती बैठकीचा वृत्तांत




# शरद पवार यांची आठव्यांदा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या विस्तारीत राष्ट्रीय कार्यसमितीची बैठक १० सप्टेंबर, २०२२ रोजी नवी दिल्ली येथील कॉन्स्टिट्यूशन क्लबमध्ये पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीतच श्री. शरद पवार यांची पुढील तीन वर्षांकरिता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून पुन्हा निवड करण्यात आली. पक्षाचे इतर सर्व पदाधिकारी नेमण्याचा अधिकारही या बैठकीत श्री. शरद पवार यांच्याकडे देण्याचा ठराव एकमताने संमत करण्यात आला.

बैठकीच्या प्रारंभी केलेल्या प्रास्ताविकात श्री. शरद पवार यांनी देशातील महिलांवरील वाढत्या अन्याय-अत्याचाराबद्दल चिंता व्यक्त करून पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या दुटप्पी व ढोंगी भूमिकेकडे आवर्जून लक्ष वेधले. १५ ऑगस्ट रोजी लाल किल्ल्यावरून भाषण करताना प्रधानमंत्री महिलांच्या सन्मानाच्या गोष्टी करतात आणि दोनच दिवसांनी त्यांच्या गुजरात राज्यातील सरकार बिल्कीस बानो यांच्यावर अत्याचार करणाऱ्या व त्यांच्या परिवाराची हत्या करण्यात सहभागी असलेल्या चार नराधमांना शिक्षा कमी करून सोडून देतात. इतकेच नव्हे तर त्यांचा सत्कार करून भाजपचे लोक मिठाई वाटतात ही अत्यंत शरमेची व लाजिरवाणी गोष्ट असून अशा प्रसंगी प्रखर भूमिका घेऊन राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी उभे राहिले पाहिजे असे आवर्जून सांगितले.

पक्षाचे सरचिटणीस पितांबरन मास्टर यांनी मागील पाच वर्षांचा अहवाल बैठकीत मांडला. त्याला उपस्थितांनी मान्यता दिली. बैठकीच्या सुरूवातीला निधन झालेल्या माजी खासदार डी.पी. त्रिपाठी, जी.पी. सारथी, अमरेंद्र शरण, लोक नरेंद्रन, भारत भालके, शंकरराव कोल्हे, सुधाकर परिचारक, विलासराव शिंदे, गफार मलिक, कृष्णकांत कुदळे, सेवादलाचे अध्यक्ष दीपक मानकर, श्रीमती ज्योती कलानी, के. के. राजन, मधुकांत यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. पक्षाचे राष्ट्रीय खजिनदार वाय.पी. त्रिवेदी यांनी हिशेब सादर केला. खासदार प्रफुल पटेल यांनी राजकीय, सामाजिक व आर्थिक ठरावांचे वाचन करून बेरोजगारी, महागाई, पेट्रोल व डिझेलच्या सतत वाढत जाणाऱ्या किंमती हे देशापुढील सध्याचे अत्यंत ज्वलंत व महत्त्वाचे प्रश्न असून त्यांच्या सोडवणुकीकडे केंद्र सरकार जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आणून दिले.



सिराज मेहंदी यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अल्पसंख्याक विभागाचे राष्ट्रीय अध्यक्षपद देण्यात आले असून त्यांच्या नेमणुकीचे पत्र शरद पवार देताना, शेजारी पक्षाचे अन्य पदाधिकारी.

मोदी सरकार सत्तेवर आल्यापासून देशात ३३९९ जातीय व धार्मिक दंगली घडून व घडवून आणण्यात आल्या असून जाती-धर्माच्या नावावर समाजात विद्वेष पसरविण्याचे काम चालू आहे, असा आरोपही त्यांनी केला.

यावेळी झालेली भाषणे थोडक्यात पुढीलप्रमाणे -



**१) श्री. पी. सी. चाको-** लोकसभेत महिला आरक्षण बील मांडण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने करावी. या बीलासाठी सरकारला राष्ट्रवादीने पाठिंबा द्यावा आणि लोकसभेत ५० टक्के आरक्षण महिलांना द्यावे. केरळमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना ५० टक्के आरक्षण मा. शरद पवार साहेबांच्या धोरणामुळे मिळाले असून आता विधानसभा व लोकसभेतही ते मिळावे.



**२) श्री. सिराज मेहंदी (राष्ट्रीय अध्यक्ष, अल्पसंख्यांक राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सेल) -** केंद्र सरकारकडून व ज्या राज्यात भाजपची सत्ता आहे तेथील राज्य सरकारांकडून मुस्लिम समाजाला मोठ्या प्रमाणावर जाणीवपूर्वक त्रास देण्यात येत आहे. उत्तर प्रदेशातील योगी सरकारने तर मदरसे बंद करण्याची मोहीमच उघडली आहे. अगोदरच मुस्लिम समाजात शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. मदरसे बंद झाले तर गोरगरिबांची मुले शिक्षणावाचून वंचित राहतील. तेव्हा याविरुद्ध राष्ट्रवादीने आवाज उठविण्याची गरज आहे. शीख, ख्रिश्चन, जैन, बौद्ध, पारशी धर्मिय लोकांचाही अल्पसंख्यांकांमध्ये समावेश होतो. खोटे-नाटे आरोप करून मदरसे बंद करताहेत. याला वेळीच आळा घातला पाहिजे.



**३) श्री. ब्रिजमोहन श्रीवास्तव (मध्यप्रदेश राष्ट्रवादीचे माजी अध्यक्ष व पक्ष प्रवक्ते) -** डीझॅस्टर मॅनेजमेंट ॲक्टमध्ये तातडीने बदल करण्याची आवश्यकता आहे. कोरोनाचे संकट व लॉकडाऊन यामुळे बऱ्याच लोकांच्या नोकऱ्या गेल्या असून त्यांच्यावर बेकारीची कुऱ्हाड कोसळली आहे. शिवाय लॉकडाऊनमुळे लोकांची बचत संपली असून ती २३ टक्क्यांवरून १०.६ टक्क्यांवर आली आहे. त्यामुळे नैसर्गिक कारणांमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने वाढीव दराने आर्थिक मदत करण्याची मागणी राष्ट्रवादीने सरकारकडे लावून धरावी.



**४) महंमद फजल (खासदार, लक्षद्वीप) -** उच्चार व व्यक्तीस्वातंत्र्याची मोदी सरकारने गळचेपी चालविली असून प्रसिद्धी माध्यमे व पत्रकारांवरही बरीच बंधने आणून त्यांच्या स्वातंत्र्यावर घाला घातला आहे. पत्रकारांना संसदेत वार्तांकनासाठी येण्यावरही बंधने आणण्यात आली असून त्यांना सेंट्रल हॉलमध्ये प्रवेश बंद करण्यात आला आहे. आपल्या विरोधी बातम्या देणाऱ्या पत्रकारांना नोकरीवरून काढण्यासाठी मालकांना मोदी

सरकारकडून दमदाटी केली जात आहे व धमक्या आणि भीती दाखविली जात आहे. जनतेचा खुलेपणाने बोलण्याचा हक्क व अधिकार हिरावून घेतला जात असून अनेकांना निरनिराळे आरोप करून सोशल मिडीयाच्या नावाखाली अटक केली जात आहे. याविरुद्ध राष्ट्रवादीने तीव्र आंदोलन करावे.




**५) खासदार फौजिया खान (राष्ट्रीय अध्यक्ष, महिला राष्ट्रवादी काँग्रेस) –** पक्षांतरबंदी कायद्याचा सध्या मोठ्या प्रमाणावर गैरवापर चालू असून न्यायालये मूकपणाने त्याकडे पाहात आहेत व कोणतीही ठोस भूमिका न घेता बोटचेपेपणाचे धोरण स्वीकारत आहेत. त्यामुळे सर्वसामान्य जनतेचा न्यायसंस्थेवरील विश्वासही आता ढळू लागला आहे. कायद्याचे राज्य सध्या देशात अस्तित्वात राहिलेले नसून केंद्र सरकारची मनमानी चालू आहे. एक प्रकारची हुकूमशाही जणू देशात अवतरली असून पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी जागतिक तापमान वाढ व बदलते हवामान यामुळे पर्यावरणाचे संतुलन पूर्णपणे बिघडले असून जनतेला असंख्य प्रश्नांचा सामना करावा लागतो आहे. पण या पर्यावरण संतुलनाबाबत केंद्र सरकार संपूर्ण उदासीन आहे. प्रदूषण कमी करून जनतेला चांगले आरोग्य पुरविण्यासाठी ज्या ज्या गोष्टी करणे आवश्यक आहे त्या करायचे सोडून केंद्र सरकार धार्मिक वाद कसा उफाळून येईल व समाजासमाजात कशी तेढ व संघर्ष वाढेल याकडेच लक्ष देत आहे. त्यामुळे देशाची एकात्मता, अखंडता व शांतता धोक्यात आली आहे.



**६) हेमन्त टकले (खजिनदार, महाराष्ट्र राष्ट्रवादी काँग्रेस) –** सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रावरही केंद्र सरकारचे अतिक्रमण वाढू लागले असून खरा इतिहास बदलून खोटा इतिहास लिहिण्याचे व शिकविण्याचे काम मोदी सरकारने व भाजपच्या निरनिराळ्या राज्यातील सरकारांनी सुरू केले आहे. २०१४ नंतर जाणीवपूर्वक ही इतिहास पुर्नलेखनाची मोहीम राबविली जात असून गांधी-नेहरू घराण्याची वारंवार मोदींबरोबर तुलना केली जात आहे. वास्तविक ही तुलना अत्यंत चुकीची व अयोग्य असून महात्मा गांधी, पंडीत नेहरू व गांधी कुटुंबाने देशासाठी जो त्याग व बलिदान केलेले आहे कसे काम भाजपच्या नेत्यांनी व मोदींनी देखील केलेले नाही. त्यामुळे त्यांना ७० वर्षात काँग्रेसने काय केले हा प्रश्न विचारण्याचा देखील हक्क नाही.



**७) खासदार डॉ. अमोल कोल्हे –** भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी ५ सप्टेंबरला देशभर शिक्षकदिन साजरा केला जातो. वास्तविक भारतात शिक्षणाची पहिली मुहूर्तमेढ थोर क्रांतीकारक महात्मा ज्योतीबा फुले यांनी रोवली आणि त्यांच्या पत्नी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा काढून स्त्री शिक्षणाचा प्रारंभ केला. तेव्हा या दोघांच्या नावाने शिक्षकदिन साजरा केला जावा.



**८) राणा रणवीरसिंग –** बिहारमधील शेतकऱ्यांचे मागील १७-१८ वर्षांपासून कर्ज माफ झालेले नाही. त्यांची स्थिती अत्यंत हालाखीची आहे. तेव्हा त्यांना पूर्णपणे कर्जमाफी देऊन नवीन कर्ज उपलब्ध करून द्यावे व शेतीमाल उत्पादनाच्या मूळ प्रवाहात आणण्यास मदत करावी.



**९) धीरज शर्मा (राष्ट्रीय अध्यक्ष, राष्ट्रवादी युवक काँग्रेस) –** शेतकरी आंदोलनाने केंद्र सरकारचे थोबाड फोडले आहे. शेतकऱ्यांनी आंदोलनासाठी जी एकजूट दाखविली व संघटितपणे आपल्या ताकदीचे दर्शन घडविले ते उल्लेखनीय व अभिनंदनीय अशा प्रकारचे आहे. यापुढील काळात हरियानातील युवक व शेतकऱ्यांना संघटित करून त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी लढे उभे केले जातील. युवकांना दोन कोटी नोकऱ्या दरवर्षी देण्याचे मोदी सरकारने दिलेले आश्वासन केव्हाच धुळीस मिळाले आहे. देशात बेरोजगारी मोठ्या प्रमाणावर निर्माण झाली असून ती दिवसेंदिवस वाढतच आहे. त्यामुळे राष्ट्रव्यापी युवक आंदोलन देशभर उभे केले जाऊन युवकांच्या मनात सरकारविरुद्ध जो प्रचंड असंतोष आहे त्याला वाचा फोडली जाईल.

बैठकीमध्ये श्यामला रवींद्रन (तेलंगणा), झारखंडचे आमदार कमलेशकुमार सिंग, मणिपूरचे सोनाम दोबोय सिंग, गुजरातचे माजी अध्यक्ष जयंत पटेल, मेघालयाचे अध्यक्ष संगमा, नरेंद्र वर्मा यांची भाषणे झाली. सोनिया दुहान यांनी आभार मानले.

तालकटोरा स्टेडीयमवर खुले अधिवेशन –

११ सप्टेंबर रोजी नवी दिल्लीतील तालकटोरा स्टेडीयमवर पक्षाचे खुले अधिवेशन झाले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे दिल्लीचे प्रदेशाध्यक्ष डॉ. योगानंद शास्त्री यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सम्राट अकबराने आपल्या आईसाठी रामायणातील प्रसंगांची पेंटीग्ज बनविली आणि सोन्याची नाणी तयार करून त्यावर राम आणि सीता यांची चित्रे छापली. हिंदूसाठी बऱ्याच गोष्टी अकबराने केल्या याचे भान पंतप्रधान मोदी व भाजपने ठेवले पाहिजे, असे आवर्जून डॉ. शास्त्री म्हणाले. सभेत सुरूवातीला पितांबरन मास्टर, वाय.पी. त्रिवेदी यांची भाषणे झाली. महाराष्ट्राचे राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आपल्या भाषणातून वाढती महागाई, विविध यंत्रणांचा होत असलेला गैरवापर, विरोधी पक्षांची सरकारे पाडण्यासाठी मोदी सरकारने कायदा धाब्यावर बसवून उचललेली पाऊले व केलेला सौदाबाजार यावर झोड उठवून महिन्यातून एक तास प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या गावात बसून पक्षासाठी द्यावा असे सांगितले.



प्रसिद्ध गीतकार जनाब मंजीर भूपाली यांनी काही गीते सादर केली.


**१) उम्र तेरी खुदा दराज करे**
**तुझपे हिंदुस्थान नाज करे**
**२) झूठ वो बोले तो सच्चाई नजर आती है**
**उसके जुल्मों में मसीहाई नजर आती है**
**जबसे गुंजे हे यहाँ अच्छे दिनों के नज्मे**
**हर तरफ शहर में महँगाई नजर आती है**

■■■



# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आठवे राष्ट्रीय अधिवेशन (१० व ११ सप्टेंबर २०२२)

# सरचिटणीसांचा अहवाल :२०१८-२०२१



टी. पी. पीताम्बरन मास्टर

प्रिय सहकारी मित्रांनो!,

पक्षाच्या ८ व्या राष्ट्रीय अधिवेशनासाठी दिल्ली येथे उपस्थित असलेल्या आपणा सर्वांचे, पक्षाच्या राष्ट्रीय समितीचे सदस्य, राष्ट्रीय प्रतिनिधी, आमचे हितचिंतक या सर्वांचे स्वागत करण्याचा बहुमान आम्हाला मिळत आहे. अजूनही कोविडचे वातावरण निवळले नसतानाही हे अधिवेशन यशस्वी करण्यसाठी जोखीम पत्करून देशाच्या कानाकोपऱ्यातून प्रवास करून दिल्लीत आल्याबद्दल आम्ही आपले अभिनंदन करीत आहोत. काल, १० सप्टेंबर २०२२ रोजी, सायंकाळी ५ वाजता पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयात राज्यांच्या व केंद्रशासीत प्रदेशातील पक्षाध्यक्षांसह पक्षाच्या विस्तारित कार्यकारिणीची बैठक झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी पक्षाध्यक्ष शरद पवार होते. माननीय अध्यक्षांचे भाषण, सरचिटणीसांचा अहवाल, २०१८, २०१९, २०२० आणि २०२१ या वर्षांचा ऑडिट रिपोर्ट व लेखापालांचा अहवाल व काही ठराव पक्षाच्या राष्ट्रीय अधिवेशनात ठेवण्यापूर्वी या बैठकीत सादर करण्यात आला व त्यावर चर्चा होऊन त्यास मंजुरी देण्यात आली. या बैठकीत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व कार्यकारिणी सदस्यांची निवड करण्याचा कार्यकम मंजूर करण्यात आला.

आपण दर तीन वर्षांनी पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन आयोजित करीत असतो. तसे पाहता आपण २०२१ मध्येच पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन आयोजित करायला हवे होते. तथापि, देशभरातील कोव्हिड संसर्ग परिस्थितीमुळे गेल्या तीन वर्षांत आपण सदस्य नोंदणी अभियान राबवू शकलो नाही. आपण हे अभियान जुलै २०२२ मध्ये पूर्ण करू शकलो. त्यामुळे या वेळी आपण राष्ट्रीय अधिवेशन चार वर्षांनी आयोजित करीत आहोत. पक्ष संघटनेने गेल्या चार वर्षांत केलेल्या कार्याचा व विविध प्रश्न सोडविण्यासाठी केलेल्या कार्यात संक्षिप्त अहवाल सादर करताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

पक्षाचे सातवे राष्ट्रीय अधिवेशन दिल्ली येथे २८ व २९ ऑगस्ट २०१८ रोजी आयोजित केले होते. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष माननीय श्री. शरद पवार हांनी अधिवेशनाचे अध्यक्षपद भूषविले होते.

राष्ट्रीय पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य, विविध आघाड्यांचे संघटनांचे अध्यक्ष आदींच्या नावांची यादी पुढे दिली आहे:-

## 'राष्ट्रवादी'च्या राष्ट्रीय अध्यक्षांची निवडणूक

२७ ऑगस्ट २०२२ च्या अधिसूचनेनुसार, देशाच्या विविध राज्यातील पक्षाच्या राष्ट्रीय प्रतिनिधींनी उमेदवारी अर्ज सादर केले. त्या सर्व अर्जांमध्ये राष्ट्रीय नेतृत्वासाठी फक्त श्री. शरद पवार यांच्याच नावाचा प्रस्ताव होता. ७ सप्टेंबर २०२२, दुपारी ३ पर्यंत, म्हणजे, उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या तारखेपर्यंत श्री. शरद पवार यांच्याखेरीज अन्य कोणीही उमेदवार रिंगणात नसल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी श्री. शरद पवार यांची एकमताने निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले.

## भारताचे राष्ट्रपती, उपराष्ट्रपतीची निवडणूक

भारताचे सन्माननीय राष्ट्रपतीची १८ जुलै २०२२ व सन्माननीय उपराष्ट्रपतीची निवडणूक ६ ऑगस्ट २०२२ रोजी झाली. दोन्ही पदांच्या निवडणुका लढविण्याचा निर्णय श्री. शरद पवार यांच्या उपस्थितीत विरोधी पक्षांच्या बैठकीत घेण्यात आला. ते मोठ्या फरकाने दोन्ही निवडणुका जिंकतील हे अगदी स्पष्ट होते. परंतु, रालोआ सरकारच्याविरोधात देशातील सर्व लोकशाहीवादी, धर्मनिरपेक्ष, समाजवादी शक्तींचे ऐक्य अधिक मजबूत करण्यासाठी ही निवडणूक लढविण्याचा निर्णय घेण्यात आला. राष्ट्रपती पदासाठी माजी मंत्री यशवंत सिन्हा हे विरोधी पक्षांचे उमेदवार होते व त्यांना ३५.९७ टक्के मते मिळाली, तर, उपराष्ट्रपती पदासाठी भारतातील संयुक्त विरोधी पक्षांचे उमेदवार काँग्रेसच्या नेत्या, माजी मंत्री व राज्यपाल श्रीमती मार्गारेट अल्वा होत्या.

## पक्षाचे कार्य

राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांच्या बैठका आवश्यकतेनुसार घेण्यात आल्या. त्यात देशाची राजकीय परिस्थिती व आर्थिक

व्यवहारांवर संघटनात्मक विषयांवर चर्चा करण्यात आली आणि सरकारच्या जनविरोधी कृतीच्या विरोधात आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला. कोविड परिस्थितीमुळे गेल्या दोन वर्षांत महत्त्वाच्या प्रश्नांवर ऑनलाईन बैठका घेण्यात आल्या.

## कार्यकारिणीच्या बैठका

या कालावधीत कार्यकारिणीच्या सहा आणि विस्तारित कार्यकारिणीच्या दोन बैठका झाल्या.

## सर्वसाधारण निरीक्षण–

२०१९ साली दुसऱ्यांदा बहुमताने केंद्रात सत्तेवर आल्यानंतर मोदी सरकारने देशात आपला हिंदुत्वाचा कार्यक्रम राबविण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत.

आर्थिक आघाडीवर सरकार बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या इशाऱ्यावर काम करीत आहे. त्याचे योग्य प्रतिबिंब तीन कृषी कायदे व चार कामगार कायदे मंजूर करून त्याची अंमलबजावणी करण्याच्या धोरणातून दिसून येते.

नफ्यात असणाऱ्या एअर इंडियासारख्या सार्वजनिक क्षेत्रातील अत्यंत प्रतिष्ठीत कंपन्या आल्या भावात विकून टाकल्या. कोळसा क्षेत्रासारख्या राष्ट्रीय उत्पन्नाचा स्रोत असलेल्या कंपन्या, बॉक्साईट आदि विकून टाकल्या. आपली रेल्वे आणि रेल्वे स्थानके तसेच, आपल्या नद्या, खाणी या केवळ राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचा निचरा करतात, असे नसून बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या विळख्यात देशाला सोडत आहेत आणि हे देशाच्या घटनेतील सामाजिक न्यायाला धरून नाही.

बिहारचे मुख्यमंत्री नीतिशकुमार यांनी 'रालोआ'तून बाहेर पडून लोकशाहीवादी विरोधी आघाडीत सहभागी होण्याचा जो निर्णय घेतला, तो २०२४च्या सार्वत्रिक निवडणुकीत जातीयवादी शक्तीला आव्हान देण्याची योजना आखणाऱ्या विरोधी पक्षांचे नीतिधैर्य उंचावणारे आहे. या घडामोडीमुळे बिहारमध्ये कमळ फुलविण्याच्या भाजपच्या आकांक्षावर पाणी पडले आहे.

आपला देश अमेरिकी सरकारच्या जवळ जाऊ पाहात आहे, ही अतिशय चिंतेची बाब आहे. या उलट शेजारी राष्ट्रांपासून अलिप्त राहात आहे. व त्यांना आपल्या शत्रू राष्ट्रांच्या जवळ जाऊ देत आहोत. परिणामी, भविष्यात आपल्याला समस्या भेडसावू शकतात. कोविड परिस्थितीमुळे तसेच, त्यापूर्वी नोटाबंदीमुळे लोकांना ज्या दु:खांशी, संकटाशी सामना करावा लागतोय, त्याकडे भाजप सरकार लक्षपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. या परिस्थितीमुळे आलेली आर्थिक मंदी, त्यामुळे लाखो कामगारांना बेकारीचे चटके सहन करावे लागले. अन्नधान्य व जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीत झालेली अभूतपूर्व वाढ, वाढती बेरोजगारी, पेट्रोल, डिझेल, गॅसच्या किंमतीत सातत्याने होणारी वाढ, यामुळे सर्वसामान्यांचे जगणे मुश्कील झालेले आहे. पण, सरकारला त्याची पर्वा दिसून येत नाही. जातीपातीच्या आधारे लोकांच्यात फुट कशी पाडता येईल, याच कामात हे सरकार व्यग्र आहे. आपल्या देशाचे धर्मनिरपेक्ष स्वरूप नष्ट करण्यासाठी रालोआ सरकारने नागरिकत्व दुरुस्ती कायदा मंजूर करून समाजातील एका घटकाला जातीच्या व धर्माच्या आधारे नागरिकत्व नाकारत आहे. सत्तेवरील जातीय एकाधिकारवादी शक्ती आपल्या घटनेच्या मूळ तत्त्वावर घाला घालत आहे.

भाजपवर अंकुश ठेवणाऱ्या रा.स्व.संघाला आपली घटना मान्य नाही. घटनेच्या मूलभूत तत्त्वाच्याविरोधी कृतीच्या मूळाशी ते आहेत. त्यांना हिंदुत्व लादायचे आहे.



सरकाच्या चुकीच्या धोरणाच्या विरोधात सर्वसामान्य जनता मोठ्या प्रमाणावर आहे. तरीही ते सत्तेवर आहेत. कारण, विरोधी पक्षांमध्ये एकी नाही. जातीयवादी शक्तीला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी सर्व बिगर भाजप पक्षांनी एकत्रित यावे, अशी या देशातील सर्व लोकांची इच्छा आहे.

सर्व बिगर भाजपपक्षांचे ऐक्य करण्यासाठी आपल्या पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी पुढाकार घ्यावा व बिगर भाजप पक्षांत समन्वय साधून देशातील धर्मनिरपेक्ष व लोकशाहीवादी शक्तींची महाआघाडी तयार करावी.

## सारांश

कोविड परिस्थितीमुळे तसेच, त्यापूर्वी नोटाबंदीमुळे लोकांना ज्या दु:खांशी, संकटाशी सामना करावा लागतोय, त्याकडे केंद्र सरकार लक्षपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. या परिस्थितीमुळे आलेली आर्थिक मंदी, त्यामुळे लाखो कामगारांना

बेकारीचे चटके सहन करावे लागले. अन्नधान्य व जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीत झालेली अभूतपूर्व वाढ, वाढती बेरोजगारी, पेट्रोल, डिझेल, गॅसच्या किंमतीत सातत्याने होणारी वाढ, यामुळे सर्वसामान्यांचे जगणे मुश्कील झालेले आहे.सरकारच्या या जनतेच्या विरोधातील धोरणांमुळे देशभरातील सर्व लोक हैराण झालेले आहेत.

त्यामुळे २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत जनतेच्या विरोधातील हे सरकार पदभ्रष्ट करण्याची त्यांची इच्छा आहे. २०१९ च्या निवडणुकीत एकत्रित येऊन बहुमत मिळवूनही रालोआ पुन्हा सत्तेवर आली. विरोधी पक्षांची मते आपापसात विभागली गेली. या परिस्थितीमुळे रालोआ पूर्वीपेक्षा अधिक बहुमतांनी पुन्हा सत्तेवर येऊ शकली.

ई.डी. सारख्या केंद्रीय तपास यंत्रणेचा विरोधी पक्षांतील नेत्यांविरुद्ध गैरवापर करून लोकशाहीच्या सर्वसाधारण कार्य पद्धतीच्या मुळावर घाला घातला जाऊ लागला.

सरकारच्या चुकीच्या धोरणाच्या विरोधात सर्वसामान्य जनता मोठ्या प्रमाणावर आहे. तरीही ते सत्तेवर आहेत. कारण, विरोधी पक्षांमध्ये एकी नाही. जातीयवादी शक्तीला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी सर्व बिगर भाजप पक्षांनी एकत्रित यावे, अशी या देशातील सर्व लोकांची इच्छा आहे.

सर्व बिगर भाजपपक्षांचे ऐक्य करण्यासाठी आपल्या पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी पुढाकार घ्यावा व बिगर भाजप पक्षांत समन्वय साधून देशातील धर्मनिरपेक्ष व लोकशाहीवादी शक्तींची महाआघाडी तयार करावी.

सर्वच विरोधी पक्ष नेत्यांशी श्री.शरद पवाार यांचे सलोख्याचे व अत्यंत घनिष्ट संबंध आहेत. त्यामुळे पवार यांनी या बाबतीत पुढाकार घेतल्याने त्याचे सर्वांनी स्वागत केले. श्री. शरद पवार यांनी एक गोष्ट आधीच स्पष्ट केली की, विरोधी पक्षांचे नेतृत्व करण्याची त्यांची मुळीच इच्छा नाही. विरोधी पक्षांच्या आघाडीच्या नेतृत्वाच्या प्रश्नावर विरोधी पक्षांच्या बैठकीतच सर्वानुमते निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी जाहीर करून टाकले. त्यामुळे या देशातील धर्मनिरपेक्ष व लोकशाहीवादी पक्षांमध्ये समन्वय साधून, त्यांच्यात ऐक्य निर्माण करण्याच्याबाबतीत श्री. शरद पवार यांनी पुढाकार घेतला. आता ७५ वा आपण स्वातंत्र्यदिन साजरा करीत आहोत. सुमारे २०० पेक्षा जास्त वर्षे संघर्ष करून आपण हे स्वातंत्र्य मिळवले आहे. आपली भावी पिढी आर्थिक किंवा सामाजिक सर्व प्रकारच्या पिळवणुकीपासून मुक्त व्हावी म्हणून स्वातंत्र्य संग्रामात हजारो लोकांनी त्याग केला, स्वत:चे बलिदान दिले. परंतु, आपण पाहतो की, या देशाची ९० टक्के संपत्ती ही फक्त १० टक्के लोकांच्या हातात आहे. समता व सामाजिक न्याय हा आपल्या घटनेचा पाया आहे की, जिथे लोकशाही, समाजवाद व धर्मनिरपेक्षता आहे. मात्र, गरीब व श्रीमंत यांच्यातील उत्पन्नाची दरी दिवसेंदिवस वाढत आहे.

अशा प्रकारची परिस्थिती पुन्हा निर्माण होऊ नये, अशी जनतेची इच्छा आहे. अनेक विरोधी पक्ष आपापल्या राज्यात मजबूत असून तेथे ते सत्तेवर आहेत आणि त्यांचा नेता म्हणून ते इतर कोणाचाही स्वीकार करू शकत नाहीत. तथापि, श्री. शरद पवार यांच्याशी त्यांचे चांगले संबंध आहेत आणि सर्व लोकांना ते स्वीकारार्ह आहेत. जनविरोधी सरकारच्या विरोधात संघर्ष करण्यासाठी विरोधी पक्षांमध्ये समन्वय साधून त्यांच्यात ऐक्य निर्माण करतील, या अपेक्षेने ते श्री. शरद पवार यांच्याकडे पाहात आहेत. २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत जनतेच्या विरोधातील सरकार पदभ्रष्ट करण्यासाठी डाव्या पक्षांसह सर्व विरोधी पक्षांशी समन्वय साधून त्यांच्यात ऐक्य निर्माण करण्यासाठी श्री. शरद पवार जे प्रयत्न करीत आहेत, त्याचे पक्षाचे हे राष्ट्रीय अधिवेशन त्यांचे स्वागत करीत आहे. जातीयवादी व एकाधिकारशाही वृत्तीच्या व जनतेवर हिंदुत्व लादण्याचा त्यांचा प्रयत्न हाणून पाडण्यासाठी या सरकारच्या विळख्यातून देशाला मुक्त करण्यासाठी त्यांचे हात बळकट करूया! आपल्या देशात जन्मलेल्या व वाढलेल्या प्रत्येकाला समता, स्वातंत्र्य व सामाजिक न्याय मिळाला पाहिजे, या तत्त्वाशी आपला पक्ष वचनबद्ध आहे, कटीबद्ध आहे. चला, आपले ध्येय गाठण्यासाठी आपण पक्ष कार्याला वाहून घेऊ या, पक्षाचा पाया विस्तारीत करूया! पक्ष अधिक मजबूत करूया! रालोआ सरकार पदभ्रष्ट करण्याच्या श्री. शरद पवार यांच्या प्रयत्नांना पाठिंबा देण्याचे आवाहन हे अधिवेशन देशातील सर्व लोकशाहीवादी व धर्मनिरपेक्ष शक्तींना करीत आहे.

पक्ष कार्यकर्त्यांनी तळागाळापर्यंत जाऊन पक्षाचे कार्य जोमाने करावे व जातीयवादी व एकाधिकारशाही शक्तीच्या विरोधात जास्तीत जास्त जनमत तयार करण्याचे आवाहन हे अधिवेशन करीत आहे. देशाच्या विविध भागात पक्ष अधिक बळकट करणाऱ्या आपल्या सर्व पक्ष कार्यकर्त्याचे हे अधिवेशन अभिनंदन करीत आहे. आपल्या कार्यालयातील सदस्य व कर्मचारी देत असलेली सेवा व त्यांना मार्गदर्शन करणारे पक्षाचे कायमस्वरूपी सचिव श्री. के. आर. कोहली यांच्या सेवेची दखल घेत हे अधिवेशन त्यांचे कौतुक करीत आहे.

**सरचिटणीस**
**टी. पी. पीताम्बरन मास्टर,**
**प्रफुल पटेल, खासदार,**
**सुनिल तटकरे, खासदार,**
**के. के. शर्मा**

■■■

# Nanded City, Pune

*The Maximum City*

Sinhagad Road, Pune

A 700 Acre Mega Township on Sinhagad Road, Pune.

## प्रत्येक घराला एक मन असतं.
## प्रत्येक शहराला एक व्यक्तिमत्व असतं.

आमच्या प्रत्येक घराचं मन आहे उत्साही, चैतन्यशील, आशावादी, जगण्याच्या ऊर्जेने पुरेपूर भरलेलं, आणि आमच्या शहराचं व्यक्तिमत्व आहे अभिरूचिसंपन्न, सुसंस्कृत, सर्वसमावेशक, निसर्गप्रेमी आणि भविष्यसन्मुख. कारण आम्ही आहोत नांदेड सिटी, ७०० एकर्सचं अतुलनीय जग, जिथे आहे संपूर्ण कुटुंबाच्या आणि कुटुंबातल्या प्रत्येकाच्या सुखाचा, सुरक्षिततेचा, आरोग्याचा आणि आनंदाचा सखोल विचार.

### आनंदी संकुल



**कुटुंबासाठी प्रफुल्लित, प्रदूषणमुक्त पर्यावरण**

- इको पार्क व ऑक्सिझोन
- १३,२०० पेक्षा जास्त झाडांची लागवड
- १२० एकर्सची हिरवाई

### CBSE व ICSE शाळा



**विद्यार्थ्यांसाठी प्रगतीशील वातावरण**

- CBSE व ICSE बोर्डाच्या शाळा
- दर्जेदार शिक्षण
- वॉक-टू-स्कूल मॉडेल

### जिमखाना



**तरूणाईसाठी अगदी आदर्श सिटी**

- सायकलिंग व जॉगिंग ट्रॅक्स
- २४,००० स्क्वे. फूट जिम्नॅशियम
- क्रीडांगण-द स्पोर्टस् कॉम्प्लेस (प्रस्तावित)
- विविध खेळांच्या स्पर्धा व कोचिंग

**नांदेड सिटी, उत्साही मन आणि उमदं व्यक्तिमत्व यांचा देखणा मिलाफ!**

A project by MAGARPATTA CITY ©
*The pride of Pune*

Call: **020-67275300 / 1 / 2**

CREDAI PUNE METRO

**www.nandedcitypune.com**
info@nandedcitypune.com
An ISO 9001:2008, ISO 14001:2004, OHSAS 18001:2007 certified company.

tempestadvertising.com

# अर्थव्यवस्था आणि रुपया घसरण थांबणार कशी?


अनंत बागाईतकर



एका डॉलरचा दर ८१ रुपये ८३ पैसे असल्याची स्थिती ३ ऑक्टोबर रोजी होती. जानेवारी ते सप्टेंबर-२०२२ या कॅलेंडर वर्षाच्या आठ महिन्यात देशाच्या परकी चलन साठ्यातून ९० अब्ज डॉलर्सना बाहेर पाय फुटले होते. म्हणजेच भारताच्या परकी चलन गंगाजळीतून दरमहा सरासरी ११ अब्ज डॉलर्स नाहीसे होत होते. रुपयाची घसरण विशिष्ट पातळीत राखण्यासाठी रिझर्व बँकेला परकी चलनाचा जो वापर करावा लागला होता त्यामुळे ही गळती लागली असे कारण सांगितले जाते. सप्टेंबर महिन्याच्या अखेरीपर्यंत परकी चलन साठा (फॉरिन एक्सचेंज रिझर्व्ह किंवा फॉरेक्स रिझर्व्ह)५४५.६५ अब्ज डॉलर्स इतका असल्याचे सांगण्यात आले. याठिकाणी एक जुनी आठवण आल्याखेरीज रहात नाही. सध्याचे पंतप्रधान, दिवंगत सुषमा स्वराज, दिवंगत अरुण जेटली यांनी मनमोहनसिंग पंतप्रधान असताना रुपया डॉलरच्या तुलनेत थोडासा घसरल्यावर नुसते काहूर माजवले होते. वर्तमान पंतप्रधान हे तेव्हा गुजरातचे मुख्यमंत्री होते. त्यांनी अत्यंत उपहास व उपरोधाने म्हटले की मनमोहनसिंग यांचे वय आणि (डॉलरच्या तुलनेत) रुपयाचा दर यांच्यात बहुधा स्पर्धा लागली असावी. सुषमा स्वराज यांनी तर जहरी टीका करताना रुपयाची घसरण म्हणजे देशाच्या प्रतिष्ठेची घसरण असे म्हणून मनमोहनसिंग यांना टोमणे मारले होते. सुषमा स्वराज हयात नाहीत. परंतु पंतप्रधान अजुनही खुर्चीत विराजमान आहेत. त्यांच्या या कारकिर्दीत रुपयाची जी घसरण होत आहे ती कुणाच्या वयाबरोबर स्पर्धा करीत आहे असा प्रश्न विचारावासा वाटतो आणि त्यांच्यात कुवत असेल तर त्यांनी उत्तर द्यावे. एवढे होऊनही भक्तमंडळींची अंधश्रध्दा परामवधीची म्हणजेचे कमालीची आहे. त्यांनी तत्काळ ब्रिटिश, जपानी व चिनी चलनाचे डॉलरबरोबरचे दर यांची तुलना करुन रुपया कसा त्या चलनांच्या तुलनेत मजबूत आहे असे दाखविण्याचा प्रकार

सुरु केला आहे. लोचटपणा, चाटुकारितेचा हा किळसवाणा आविष्कार आहे. काही भक्तांनी यामुळे निर्यातीला कसा लाभ होईल हे सांगण्याचे प्रयत्न केले.

या पार्श्वभूमीवर रिझर्व्ह बँकेने आपल्या तिमाही चलनविषयक धोरणातील निर्णयांचे आकलन करावे लागेल.




केलेला प्रमुख निर्णय म्हणजे त्यांनी 'रेपो रेट' मध्ये वाढ केली. 'रेपो रेट'ची सर्वसामान्य व्याख्या म्हणजे व्यापारी बँका रिझर्व बँकेकडून जी कर्जे घेतात त्यावरील व्याजदर. त्यात वाढ करण्याचा अर्थ हा की बँकांनी रिझर्व बँकेकडून जास्त कर्जे घेऊ नयेत. म्हणजेच अर्थशास्त्रातील शृंखला प्रणालीनुसार कर्जे न घेतल्याने या बँकांना त्यांच्या ग्राहकांना किंवा खातेदारांनाही कर्जे देण्यावर नियंत्रण ठेवावे लागणार. यासाठी म्हणजेच लोकांना कर्जे घेण्यापासून काहीसे रोखण्यासाठी बँका मग कर्जावरील व्याजदरात वाढ केल्याचे जाहीर करतात. त्यामुळे गृहकर्जे, वाहनकर्जे आणि तत्सम कर्जांवरील व्याजदर वाढविले जातात. परिणामी चढ्या व्याजदराची कर्जे घेण्यापासून लोक परावृत्त होऊ लागतात. याचा अंतिम परिणाम हा असतो की बाजारातील चलनपुरवठा रोखला जातो. म्हणजेच स्वस्त कर्जांमुळे लोकं धडाधड घर खरेदी किंवा वाहन खरेदी करीत असतात त्याला चाप लागतो. चलनवाढ किंवा चलनफुगवटा




**मोकाट व अनियंत्रित खासगीकरणाचा मार्ग सरकारने अनुसरला आहे. यामुळे सामाजिक न्याय आणि समाजकल्याणाच्या चिंधड्या उडत आहेत याचे भान सरकार हरपले आहे. रेल्वे देखील खासगी गुंतवणूकदारांच्या खरेदीसाठी विक्रीला काढण्यात आलेली असेल तर आर्थिक न्यायाचे राज्य कधीच अस्तित्वात येणार नाही. त्यामुळे होसबळे यांनी कितीही आदर्शवादी भाषणे दिली तरी त्याचा फारसा उपयोग होणार नाही. केवळ तोंडदेखली भाषणे करण्याने सरकारला या खासगीकरण, आर्थिक केंद्रीकरण या लागलेल्या सवयी रोखता येणार नाहीत. पंतप्रधान साहेब एवढी भाषणे करतात. परंतु त्यांनी कधीतरी एखादे भाषण महागाईवर केले आहे काय याची माहिती होसबळे यांनी घ्यावी. वर्तमान पंतप्रधानसाहेब फक्त देखावेबाजी, भपकेबाजी, बुलेटट्रेन सारखे अव्यावहारिक प्रकल्प यात गुंतून पडलेले आहेत. त्यांना गरीबांशी देणेघेणे राहिलेले नाही.**

रिझर्व बँकेचे हे निर्णय देशांतर्गत आर्थिक परिस्थिती ध्यानात ठेवून करण्यात आले आहेत. त्यामुळे वर्तमान चलनवाढ व महागाई, घसरता रुपया हे विषय ध्यानात घेऊन रिझर्व बँकेने पावले उचलली आहेत असे सांगण्यात आले. रिझर्व बँकेने

कमी करण्याचा हा सर्वमान्य उपाय आहे जो रिझर्व बँकेने आता ३० सप्टेंबरला जाहीर केला आहे.

रिझर्व बँकेने त्यांचे निर्णय जाहीर करुन टाकले आहेत. त्याचे परिणाम काय होतील याचाही शोध घ्यावा लागेल.





सर्वात महत्वाचे म्हणजे या निर्णयांमुळे बाजारात येणारा पैसा रोखला जाणार आहे काय ? तूर्तास त्याचे उत्तर नाही असेच द्यावे लागेल. कारण ऐन दिवाळीच्या तोंडावर हे निर्णय जाहीर झाले आहेत. करोनामुळे दोन वर्षे सलग लोकांना दिवाळी मनासारखी साजरी करता आली नव्हती. ज्याप्रमाणे यावर्षी गणपति, नवरात्रि हे सण महाप्रचंड उत्साहाने साजरे झाले तोच प्रकार यावेळच्या दिवाळीच्या वेळीही होणे अपेक्षित आहे. त्यामुळे लोकांनी दोन वर्षात फारसा खर्च न केलेला पैसा किंवा खर्च न केलेली पूंजी ते कदाचित या दिवाळीच्या निमित्ताने खर्चायला काढतील असा अंदाज व्यक्त होत आहे. त्यामुळे रिझर्व बँकेच्या निर्णयामुळे कर्जे महाग झालेली असली तरी त्याचा परिणाम दिवाळीच्या निमित्ताने होणाऱ्या खरेदीवर होणार नाही आणि बाजारात मागणी व खप जोरदार राहील असा यामागील आडाखा आहे. तो कितपत वास्तवात किंवा सत्यतेत उतरेल हे येणाऱ्या घडामोडींवरुनच लक्षात येईल. एकप्रकारे लोकांनी दोन वर्षे जमवून ठेवलेले धन आता या निमित्ताने बाहेर काढण्याची देखील ही योजना असावी असे म्हणायला हरकत नाही. बाजारात पैसा अधिक प्रमाणात येऊ नये आणि त्यातून आणखी चलनवाढ होऊ नये हा रिझर्व बँकेचा हेतु आहे आणि त्यामुळे बँका ठेवीवरील व्याजातही वाढ करु शकतात आणि त्यामुळे पुन्हा एकदा लोकांचा कल बँकांमध्ये पैसे ठेवींच्या स्वरुपात ठेवणे आणि त्यावरील वाढीव व्याजाचा लाभ घेणे याकडे राहू शकतो. यामुळे बँकांना रेपो रेट वाढण्याने रिझर्व बँकेकडे कर्जे घेण्याची गरजही भासणार नाही व कर्जासाठी त्यांच्याकडे खातेदारांच्या ठेवी वाढीव स्वरुपात येऊ शकतात असाही एक हेतु यामागे आहे. यातून बँका कर्जवितरण करु शकतील आणि त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या गतीला फारसा अडथळा निर्माण होणार नाही असा एकंदरीत अंदाज आहे. या सर्व उपाययोजनांचा संबंध चलनफुगवटा किंवा चलनवाढीशी आहे. म्हणजेच वाढत्या महागाईशी देखील आहे. त्यामुळेच चलनफुगवटा कमी करण्यासाठी रिझर्व बँकेने केलेल्या उपाययोजनांचा अंतिम हेतु महागाईचा दर कमी करणे हा आहे हे ओघाने आलेच. त्याचबरोबर रुपयाची घसरण थांबविणे हे उद्दिष्टही त्यामागे आहे.

अर्थात मौद्रिक किंवा मुद्राविषयक म्हणजेच चलनविषयक धोरणे व त्या अनुषंगाने निर्माण झालेल्या समस्यांवरील उपाययोजनांचे निर्णय हे अर्थव्यवस्थेच्या सर्वच घटकांना स्पर्श करणारे असतात. म्हणूनच त्याला शृंखला प्रणाली म्हणतात. अर्थात ही केवळ चलनाच्या आघाडीवरील स्थिती झाली. या आघाडीवरील अधिकार रिझर्व बँकेला

आहेत आणि रुपयाचे मूल्य स्थिर करण्यासाठी ते त्यांच्या उपाययोजना करीत राहतील हे निःसंशय. रुपयाच्या घसरणीची दोन प्रमुख कारणे आहेत. एक म्हणजे आवक-जावकीमधील वाढती किंवा रुंदावणारी दरी ज्याला इंग्रजीत करंट अकांऊट डेफिसिट - 'सीएडी' म्हणतात आणि दुसरे महत्वाचे कारण म्हणजे भारतातून बहिर्गमन करणारे भांडवल म्हणजेच परकी संस्थागत पूंजी किंवा भांडवल काढून घेण्याने देशाबाहेर चाललेला परकी चलनरुपी भांडवलाचा ओघ होय. या दोन कारणांमुळे रुपया मार खात आहे. युक्रेन-रशिया युध्दामुळे व त्यामुळे निर्माण झालेल्या अनिश्चिततेमुळे तेलासाठी जास्त पैसे मोजावे लागत आहेत. तर अमेरिकेने व्याजदरात मोठी वाढ केल्याने तेथे आकर्षक व बक्कळ मोबदला किंवा परतावा मिळण्याच्या अपेक्षेने भारतासारख्या अर्थव्यवस्थेत गुंतविण्यात आलेले संस्थागत भांडवल आता अमेरिकेला जाऊ लागले आहे. अमेरिकेने यापुढील काळात म्हणजे अमेरिकेत जोपर्यंत चलनवाढ व महागाई अटोक्यात येत नाही तोपर्यंत ते व्याजदरवाढ चालूच ठेवतील असे जाहीर केले आहे. त्यामुळेच रुपयाची घसरण नजीकच्या काळात रोखली जाईल याबद्दल शंका आहे असे मत रिझर्व बँकेचे माजी प्रमुख डी. सुब्बराव यांनी व्यक्त केले आहे. त्यामुळेच आगामी काळात लगेचच दिलासा मिळण्याची चिन्हे कमी आहेत.

अर्थव्यवस्थेच्या इतर पैलूंवर किंवा अर्थव्यवस्थेच्या इतर विभागांवर किंवा घटकांवरही नजर टाकावी लागेल. वर उल्लेख केलेल्या करंट अकांउंट डेफिसिट म्हणजे आवाक-जावकीमधील तफावतीच्या मुद्याची गंभीर दखल घ्यावी लागणार आहे. यावर्षी किंवा वर्तमान आर्थिक वर्षाच्या अखेरीपर्यंत ही तफावत किंवा तांत्रिक भाषेत बोलायचे झाल्यास चालू खात्यावरील तोटा हा तीन टक्क्यांपेक्षा पुढे जाण्याची शक्यता अर्थतज्ञ व्यक्त करीत आहेत. ही बाब गंभीर आहे. २०२२-२३च्या अर्थसंकल्पात अर्थमंत्र्यांनी ही तूट अडीच टक्क्यांपर्यंत रोखण्याचे आश्वासन दिलेले होते. परंतु त्यांचा अंदाज साफ चुकलेला आहे आणि आता ही तूट हाताबाहेर जाण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. वर म्हटल्याप्रमाणे अमेरिकेने व्याजदरवाढीची सुरु केलेली मालिका थांबण्याची चिन्हे नाहीत आणि रशिया-युक्रेन युध्द थांबण्याचीही चिन्हे नाहीत. त्यामुळेच ही तूट कमी तर होणार नाहीच आणि वाढण्याची शक्यता मात्र नाकारता येणार नाही. निर्यातीला फारसा वाव नसल्याची चिन्हे आहेत कारण आंतरराष्ट्रीय बाजारात मंदीची स्थिती आहे. त्यातुलनेत आयात मात्र कमी झालेली नाही व त्याचा परिणाम म्हणून परकी चलनाच्या गंगाजळीला गळती लागलेली आहे. याचाच आणखी एक पैलूही लक्षात घ्यावा लागेल व तो आहे वाणिज्यिक किंवा व्यापारी तुटीचा. चालू खात्यावरील तुटीतील हा सर्वात मोठा घटक असतो



आणि याद्वारे आयात व निर्यातीमधील तफावत लक्षात येते. ताज्या माहितीनुसार फेब्रुवारी-२०२१ नंतर प्रथमच व्यापारातील तूट ही १९ टक्क्यांपेक्षा अधिक नोंदली गेली आहे. सप्टेंबरमध्ये भारतीय मालाची निर्यात ३.५ टक्क्यांनी कमी झाली. आयातीमध्ये देखील घट झाली परंतु तिचे प्रमाण किंवा टक्केवारी ही निर्यातीपेक्षा अधिक म्हणजे ५.४४ टक्के नोंदले गेले. आंतरराष्ट्रीय बाजारात मागणी नसणे हे घटत्या निर्यातीचे प्रमुख कारण असले तरी देशांतर्गत अन्न सुरक्षा आणि महागाई कमी करण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनाही त्यास कारणीभूत असल्याचे सांगण्यात येत आहे. अभियांत्रिकी माल, रसायने व औषधे, तयार कपडे,





सुती धागा, हातमागाचे कपडे आणि तांदूळ या भारताच्या सहा आघाडीच्या निर्यातक्षम वस्तु आहेत आणि त्यामध्ये सार्वत्रिक घट आढळून आली आहे.

यातच भर म्हणून की काय देशाची वित्तीय किंवा राजकोषीय तूट देखील वाढत चाललेली आहे. केंद्र आणि राज्यांची एकत्रित वित्तीय किंवा राजकोषीय तूट ही दहा टक्क्यांपेक्षा अधिक आहे जी केलेल्या अंदाजापेक्षा खूपच अधिक आहे आणि गंभीर बाब अशी की ती तूट कमी होण्याऐवजी वाढण्याची चिन्हे अधिक आहेत. आणखी एक चिंतेची बाब समोर आहे. खरीपाचे क्षेत्र यंदा जवळपास चार टक्क्यांनी कमी झाले आहे. तांदळाच्या लागवडीच्या क्षेत्रात ४.७ टक्के घट आहे. याखेरीज डाळी, तेलबियांच्या लागवडक्षेत्रातही यावर्षी घट आहे. यामुळे खरीपाच्या तांदुळाच्या उत्पादनात सहा टक्क्यांनी घट होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. देशातील एकंदर तांदूळ उत्पादनापैकी ८५ टक्के तांदूळ हा खरीप हंगामात होतो. त्यामुळे त्यामध्ये घट होणे ही चिंताजनक व गंभीर बाब मानली जात आहे. याचे आणखी एक कारण म्हणजे उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, पंजाब, पश्चिम बंगाल या तांदूळ पिकविणाऱ्या राज्यांमध्ये पुरेशा पावसाअभावी लागवडीखालील क्षेत्र व विशेषतः तांदळाच्या लागवडीच्या क्षेत्रात लक्षणीय घट झालेली आहे. तमीळनाडू, तेलंगणा, ओडीशा व कर्नाटकात पाऊस उशीराने आल्याने तेथील लागवडीने पुन्हा जोर पकडल्याने काहीशी आशा निर्माण झाल्याचे सांगण्यात येत आहे. या सर्व गोष्टींचा खरीप हंगामातील धान्योत्पादनावर प्रतिकूल परिणाम अपेक्षित आहे. म्हणजेच एका बाजुला महागाई नियंत्रणात येत नसल्याची स्थिती असतानाच खरीपातील उत्पादन घटल्यास त्याचे

रुपांतरही देखील महागाई वाढण्यात होणार आहे. तेलबियांचे उत्पादन घटल्यास खाद्यतेलाचे उत्पादन घटून खाद्यतेलाची आयात वाढवावी लागेल व परिणामी परकी चलनाची गळती आणखी वाढू शकते. थोडक्यात आर्थिक आघाडीवर देश एका अनिश्चिततेकडे वाटचाल करीत आहे काय अशी शंका येऊ लागली आहे.

भारतातील आर्थिक हालाखीच्या स्थितीला जागतिक आर्थिक स्थिती कारणीभूत असल्याचे सांगितले जाते आणि दिलासा देण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु जागतिक आर्थिक स्थिती




डळमळीत, अनिश्चित किंवा अस्थिर असली तरी तिचे परिणाम देशांतर्गत अर्थव्यवस्थेवर होत आहेत हे वास्तव नाकारता येणार नाही. याचे मुख्य कारण आहे भारताच्या देशांतर्गत तिजोरीवर असलेला ताण हे आहे. देशातील वित्तीय तूट ही वाढती आहे. चलनवाढ किंवा महागाई देखील ठरविलेल्या निकषांपेक्षा किंवा उद्दिष्टापेक्षा अधिक प्रमाणात आहे. रिझर्व बँकेच्या शिफारशीनुसार आर्थिक सद्यःस्थिती लक्षात घेऊन ते सहा टक्के राखण्याचे उद्दिष्ट उचित मानण्यात येते. परंतु सरकारने ६.४ टक्के राखण्याचे ठरविले आणि तूर्तास ते ६.७ टक्के इतके आहे. एकंदर आर्थिक परिस्थिती व तिची दिशा लक्षात घेता त्यात वाढ होण्याची शक्यता अधिक आहे. रिझर्व बँकेने देखील ती शंका व्यक्त केलेली आहे. २०२४च्या आर्थिक वर्षात चलनवाढ चार टक्क्यांपर्यंत रोखण्याचे उद्दिष्ट रिझर्व बँकेने ठरवलेले आहे. या पार्श्वभूमीवर रिझर्व बँकेने भारताच्या यंदाच्या किंवा वर्तमान आर्थिक वर्षासाठीचा विकासदर सात टक्क्यांपर्यंत कमी केलेला आहे.

सरकारने मात्र ७.२ टक्के उद्दिष्ट ठेवले आहे.

अर्थव्यवस्थेच्या प्रमुख अशा घटकांचा आढावा घेतल्यानंतर समोर उभे राहणारे चित्र गंभीर आहे. असे म्हणतात की चांगल्या अर्थशास्त्रासाठी राजकारणही चांगले असणे आवश्यक असते. या दोन्ही आघाड्यांवर सद्यःस्थिती काय आहे हे सांगायला कुणा अतिविद्वान किंवा ज्योतिषाची गरज नाही. वर्तमान सरकारच्या अग्रक्रमाचे विषय कोणते आहेत हेच लक्षात येईनासे झाले आहे. याचा उत्तम नमूना म्हणजे बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी सुरु असलेला अवास्तव राजहट्ट ! त्यामुळेच रा.स्व.संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी वाढती बेकारी आणि महागाई याबद्दल चिंता व्यक्त करताना सरकारच्या एकंदर धोरणांबद्दलही प्रश्नचिन्ह लगावले आहे. टक्का) हातात देशाची वीस टक्के संपत्ती आहे तर पन्नास टक्के लोकांकडे राष्ट्रीय संपत्तीचा फक्त तेरा टक्के वाटा आहे अशी माहितीही त्यांनी दिली. होसबळे यांनी सरकारच्या डोळ्यात अंजन घालणारी माहिती दिली खरी. परंतु त्यांच्याच प्रेरणेतून सत्तेत आलेले सरकार प्रत्यक्षात वेगळ्याच आर्थिक धोरणांचा अवलंब करताना दिसते. होसबळे स्वदेशी जागरण मंचातर्फे आयोजित परिसंवादात बोलत होते. त्यांनी करोना काळातील अनुभव सांगताना या निमित्ताने देशाची ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करणे, त्यासाठी ग्रामीण भागात रोजगारनिर्मितीक्षम उद्योग-व्यवसाय निर्माण करण्याची बाब लक्षात आल्याचे म्हटले. संघाच्या मंडळींना त्यांच्या स्थापनेपासून ९७ वर्षांनंतर ग्रामीण भारताचे आकलन झाले असेल तर ते स्वागतार्हच




देशातील विषमता वाढत असल्याकडेही त्यांनी अंगुलीनिर्देश केला. उद्यमशीलतेसाठी प्रोत्साहन देणारे वातावरण निर्माण करुन नोकरीसाठी शोध घेणाऱ्यांचे रुपांतर नोकरी देणाऱ्यांमध्ये करण्याचे आदर्शवादी वक्तव्यही त्यांनी केले. त्यांच्या मते वीस कोटि लोक अद्याप गरीबी रेषेखाली आहेत. तर २३ कोटि लोकांचे दैनंदिन उत्पन्न ३७५ रुपयांपेक्षा कमी आहे असे त्यांनी म्हटले. बेकारांची संख्या चार कोटि असल्याचे त्यांनी सांगितले आणि बेकारीचा दर ७.६ टक्के असल्याचा दावा त्यांनी केला. याच्याच जोडीला मूठभरांच्या(एक म्हणावे लागेल. महात्मा गांधी यांनी याच विषयावर विशेष भर दिला होता. आर्थिक विकेंद्रीकरणाचा आग्रह धरला होता. परंतु संघ प्रेरणेतून स्थापन झालेल्या भारतीय जनसंघ नावाच्या पक्षाकडे आर्थिक नीती किंवा धोरणे याबद्दलची बैठकच नव्हती आणि त्यांनी सुरुवातीपासूनच अमेरिकेच्या धर्तीवरची मुक्त भांडवलशाहीच्या अर्थव्यवस्थेला प्राधान्य दिले होते. त्यामुळे आज अचानक त्यांना स्वदेशीचा किंवा महात्मा गांधी प्रणित आर्थिक विकेंद्रीकरणावर आधारित ग्रामीण अर्थव्यवस्थेचे महत्व कळायला लागले असेल तर चांगलेच

आहे. परंतु त्या विचारांवर मालकी सांगण्याचा प्रकार त्यांनी न केलेला बरा. याचे कारण सध्या विकेंद्रीकरण या संज्ञेची ॲलर्जी राज्यकर्त्यांमध्ये आहे.

केंद्रीकरण आणि अधिकाधिक केंद्रीकरण कसे करता येईल यावरच सर्व ध्येयधोरणे आखली जात आहेत. त्यामुळेच काही विशिष्ट उद्योगपतींना झुकते माप दिले जात आहे. त्यातून त्यांच्या हाती संपत्तीचे केंद्रीकरण होत आहे आणि सरकारला त्याचे सोयरसुतक राहिलेले नाही. याचे कारण या सरकारने सरकारी उद्योग मोडीत काढण्याचे धोरण अवलंबिले आहे. मोकाट व अनियंत्रित खासगीकरणाचा मार्ग सरकारने अनुसरला आहे. यामुळे सामाजिक न्याय आणि समाजकल्याणाच्या चिंधड्या उडत आहेत याचे भान सरकारकडून हरपले आहे.




रेल्वे देखील खासगी गुंतवणूकदारांच्या खरेदीसाठी विक्रीला काढण्यात आलेली असेल तर आर्थिक न्यायाचे राज्य कधीच अस्तित्वात येणार नाही. त्यामुळे होसबळे यांनी कितीही आदर्शवादी भाषणे दिली तरी त्याचा फारसा उपयोग होणार नाही. केवळ तोंडदेखली भाषणे करण्याने सरकारला या खासगीकरण, आर्थिक केंद्रीकरण या लागलेल्या सवयी रोखता येणार नाहीत. पंतप्रधान साहेब एवढी भाषणे करतात. परंतु त्यांनी कधीतरी एखादे भाषण महागाईवर केले आहे काय याची माहिती होसबळे यांनी घ्यावी. वर्तमान पंतप्रधानसाहेब फक्त देखावेबाजी, भपकेबाजी, बुलेटट्रेन सारखे अव्यावहारिक प्रकल्प यात गुंतून पडलेले आहेत. त्यांना गरीबांशी देणेघेणे राहिलेले नाही. महागाईसारख्या विषयावर संसदेत स्थगन प्रस्तावाच्या आधारे चर्चा नाकारणाऱ्या या नाकर्त्या सरकारकडून फारशा अपेक्षा नाहीत कारण या सरकारच्या प्राधान्याचे विषय आणि त्यांची धोरणे गरीब व सामान्यजन-केंद्रित नाहीत. गरीबांना आर्थिक न्याय मिळणारी ही धोरणे नाहीत. त्यामुळेच '५जी' उद्घाटन राष्ट्रीय पातळीवर होते. प्रत्यक्षात स्थिती काय आहे ? ही सेवा केवळ देशातल्या अकरा मोठ्या शहरातच उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. परंतु देखावा असा निर्माण करण्यात आला होता की आता देशात माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात क्रांतीच झाली आहे. सारांशाने एवढेच म्हणता येईल की देशाची आर्थिक स्थिती चांगली नसताना सरकारने ज्या धोरणांना प्राधान्य देणे आवश्यक आहे ते घडताना आढळत नाही आणि परिणामी आर्थिक अडचणी वाढताना दिसतात. या आर्थिक पेचप्रसंगावर मात करण्यासाठी जे उचित राजकारण आवश्यक आहे त्याचाही अभाव आहे. त्यामुळेच महागाई, बेकारी आणि विषमता ही वाढतच चालली आहे. यातून परिस्थिती दिवसेंदिवस स्फोटक होईल व त्याचा उद्रेक कसा होईल हे सांगणे अवघड आहे.

■■■




# बनवाबनवी करणाऱ्या सरकारचे

## राज्य विधानसभेतील विरोधी पक्ष नेते मा. अजितदादा पवार यांनी जळगाव दौऱ्यावर फटकेबाजी करत राज्य सरकारवर हल्लाबोल

ज्या उत्साहानी, ज्या प्रेमानी जळगाव जिल्ह्यामध्ये चाळीसगावच्या परिसरामध्ये मी प्रवेश केला माझ्या औरंगाबाद जिल्ह्यातनं, तेव्हापासून अनेक कार्यकर्त्यांनी, सहकाऱ्यांनी अतिशय आपलेपणानी, प्रेमानी आम्हा लोकांचं स्वागत केलं. त्याबद्दल सर्वांना मी मनापासून धन्यवाद देतो. सर्वांचे मनापासून आभार मानतो.

आज खरं दोन कार्यक्रम होते. एक पक्षाचाही कार्यक्रम आहे. हा कार्यक्रम संपल्यानंतर. जळगावला आपण मेळावा घेतलांय. परंतु, आपली पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेचा कार्यक्रम हे एक निमित्त होते. कुठल्या ना कुठल्या कार्यक्रमाच्यानिमित्तानं तिथं जाऊन आपण आपली भूमिका मांडण्याचा प्रयत्न करतो. तिथल्या अडीअडचणी समजून घेण्याचा प्रयत्न करतो. आणि त्याच उद्देशानं मी आणि बाकीचे सगळे मान्यवर या परिसरात आले आहेत. गेल्या काही दिवसांमध्ये कशा पद्धतीनं देश पातळीवर आणि राज्याच्या पातळीवर राजकारण चाललंय, हे आपण सगळेजण पाहताय. एकंदरितच इथं येण्यापूर्वी आम्ही ही जी काही उदघाटनं केली, हे सगळं पाहिल्यावर माझ्या मनामध्ये विचार आला, की केंद्रात आणि राज्यात सत्ता कुणाचीही असो, परंतु, आपण आपल्या पक्षाच्या माध्यमातनं काम करत असताना कुठल्याही परिस्थितीत विकासकामं थांबूच द्यायची नाहीत. त्याच्यामध्ये राजकारण त्याठिकाणी आणायचं नाही.





# ‘गद्दार’म्हटलं की धाबे दणाणतात

**असताना १५ सप्टेंबर रोजी दापोरा येथे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना तुफान चढविला. त्यांचे संपूर्ण भाषण...**

आज ही संस्था मोठ्या प्रमाणावर नावारूपाला आलेली आहे. दर्जेदार ज्ञान, दर्जेदार शिक्षण त्याठिकाणी देण्याचं काम सगळे मान्यवर करतायंत आणि तिथं बारकाईनं लक्ष दिलीपराव आणि त्यांची सगळी टीम त्याठिकाणी देतेय. आता महाराष्ट्रामध्ये आणि देशामध्ये सगळीकडं सिद्ध झालेलं आहे, की आता वशिल्याचे दिवस पूर्ण संपून गेलेले आहेत. आता गुणवत्तेला, ज्ञानाला महत्त्व प्राप्त झालेलं आहे. आणि म्हणून माझ्या विद्यार्थी, विद्यार्थीनींना सांगायचंय, की बाबांनो, जरी आपण कुणाच्याही पोटी जन्माला आलेलो असलो, गरीबाच्या यावं, मध्यमवर्गियाच्या यावं, श्रीमंताच्या यावं, ते तुमच्या माझ्या हातात नाहीये, पण आलो तर ज्ञान जर चांगल्या पद्धतीनं घेतलं, शिक्षण चांगल्या पद्धतीनं घेतलं, आपण मेरिटमध्ये पुढं गेलो, तर निश्चितपणे आपल्याला उत्तमप्रकारे व्यवसाय करता येतो. उत्तमप्रकारे नोकरी करता येते. उत्तमप्रकारे आपल्याला पुढं जाता येतं. आणि म्हणून त्या अनुषंगानं काम सर्वांनी केलं पाहिजे. वडिलधाऱ्यांनी काढलेल्या या संस्था ही पुढची पिढी चांगली चालवण्याचा आटोकाट प्रयत्न करतायंत. स्पर्धा जबरदस्त आहे. ती स्पर्धा कुणी थांबवू शकत नाही. या स्पर्धेमध्ये शेवटी पालक विचार करत असतात, की कुणाची गुणवत्ता चांगली आहे. कुठे अध्यापक वर्ग चांगला आहे. कुणाचा शिक्षणाचा दर्जा चांगला आहे. आणि तिथं विद्यार्थी-विद्यार्थीनींचा कल प्रवेश घेण्याचा राहतो. तिथं क्रीडांगणाला

पण महत्त्व दिलं पाहिजे. व्यवहार ज्ञानाला पण महत्त्व दिलं पाहिजे. नवीन नवीन जी आव्हानं शिक्षण क्षेत्रामध्ये येतायंत, त्या सगळ्या आव्हानांचा स्वीकार करून अतिशय उत्तम प्रकारचं ज्ञान त्याला कसं देता येईल, याहीकरता जीवाचं रान या संस्थाचालकांना करावं लागतं.

अडचणी खूप येतात. कारण मधी आम्ही सरकारमध्ये काम करत होतो. आम्ही पण अनेक शिक्षण संस्था चालवतो. शिक्षण संस्था चालवत असताना जे गरजेचं असेल ते देण्याचा राज्य सरकारचा जरूर प्रयत्न असतो. पण हा प्रयत्न करत असताना अलिकडं थोडंसं टिचिंग क्लासेसला नको एवढं महत्त्व आलेलं आहे. पूर्वी बारावीच्या मार्क्सला मेरिट बघून ॲडमिशन मिळायच्या. आता बऱ्याचशा ठिकाणी अकरावी, बारावीला, त्या ज्युनिअर कॉलेजला मुलं जायलाही तयार नसतात. ते सगळे टिचिंग क्लासमध्ये जातात आणि पुढचा विचार करतात. आणि म्हणून मी उपमुख्यमंत्री असताना म्हटलं होतं, की बाबा पन्नास टक्के मार्क्स हे बारावीच्या मार्क्सला दिले पाहिजेत आणि पन्नास टक्के मार्क्स हे नीटला त्याठिकाणी दिले पाहिजेत. त्याच्याशिवाय खऱ्या अर्थानी आज खूप तुम्ही बघा ज्युनिअर कॉलेजमध्ये शिक्षक शिकवायला आहेत. परंतु, विद्यार्थी-विद्यार्थीनीच तिथं येत नाहीत. आणि हे जे काय आहे, ते अतिशय घातक अशा पद्धतीचं आहे. त्याच्याकरता जे काही शिक्षण तज्ज्ञ आहेत, त्यांच्याशी विचारविनिमय करून पुढची धोरणं पण ठरवली गेली पाहिजेत. आणि यामध्ये आम्ही लोकं विरोधी पक्षामध्ये असलो तरी विरोधाला विरोध करण्याची भूमिका न ठेवता माझ्या महाराष्ट्रातला चांद्यापासून बांद्यापर्यंतचा कुठलाही विद्यार्थी-विद्यार्थीनीनं शिक्षण घेतल्यानंतर तो जगाच्या तसेच देशाच्या कुठल्याही भागामध्ये गेला तर तो कशामध्ये कमी आहे असं घडता कामा नये, याबद्दलचे बदल हे त्याच्यामध्ये असले पाहिजेत. कुठं चुकत असेल तर दुरूस्त केलं पाहिजे. कुठं जास्तीचं जात असेल तर त्याला आवर घातला पाहिजे. त्याला आर्थिक शिस्त लावली पाहिजे. याप्रकारेच आपल्याला पुढं जावं लागेल असं माझं स्पष्ट मत आहे हे मी आजच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमाच्यानिमित्तानं उपस्थित असणाऱ्या सर्व सहकारी मित्रांच्यासमोर त्याठिकाणी व्यक्त करतो.

मित्रांनो, आज यालाच अनुसरून आपण मेळावादेखील त्याठिकाणी घेतलेला आहे. शेतकऱ्यांचा आणि कार्यकर्त्यांचाही. मघाशी थोडं अरूणभाई गुजराथी बोलले, नाथाभाऊंनी त्याला थोडासा स्पर्श करण्याचा प्रयत्न केला. मित्रांनो, संविधान, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची घटना, त्यांनी दिलेले नियम हे सगळेच कुठं बाजूला ठेवायचं की काय अशा प्रकारचं चित्र सध्या आपल्याला देशातल्या वेगवेगळ्या राज्यांमध्ये बघायला मिळतंय. ठिक आहे, सत्ता आज असेल, उद्या नसेल. सत्तेला आम्ही हपापलेलो नाहीये. मलाही कळतंय, मी ताम्रपट घेऊन जन्माला आलेलो नाही. त्याच्यावर आणखी कुणी दुसरी लोकं येणार आहेत. जनता जनार्दनाच्या मनामध्ये ज्याला कुणाला निवडून द्यायचं असेल, जनता, मतदारराजा त्याला निवडून देईल. त्याहीबद्दल आमचं काही मत नाही. पण



अजित पवार दीपप्रज्वलनाने मेळाव्याचे उद्घाटन करताना, शेजारी रवींद्रभैय्या पाटील

ज्या पद्धतीनं फोडाफोडीचं राजकारण चाललंय, गोव्यात काल आपण काय बघितलं? अरे आलं ना तुमचं बहुमत. करा ना सरकार तिथं. समोर विरोधकच शिल्लक राहिला नाही पाहिजे, काँग्रेसमधले राहिलेले पण माझ्याकडंच आले पाहिजेत. अरे, किती घ्याल. किती पाहिजे. काय झालं तर तुमचं समाधान होणार आहे, याचा जरा तरी विचार करा. आत्मचिंतन करा. हे आपल्या खंडप्राय देशाला परवडणारं आहे?

अनेक राजकीय स्थित्यंतरं आपण सगळ्यांनी बघितली. आणीबाणीच्या काळातलं स्थित्यंतर बघितलं. त्याच्यानंतर पुन्हा इंदिराजी सत्तेवर आल्याचं बघितलं. त्याच्यानंतर काळामध्ये, मधल्या काळात जयप्रकाश नारायण साहेबांनी पुढाकार घेऊन जे काही राजकीय आंदोलन केलं ते आपण सगळ्यांनी बघितलं. अनेक प्रकारच्या घटना घडल्या. आपल्याही राज्यामध्ये घडल्या. मधी बाळासाहेब ठाकरेंनी पुढाकार घेऊन ९५ साली भाजप-शिवसेनेचं सरकार आलेलं बघितलं. ९९ ते २००० या काळात आघाडीचं सरकार आलेलं बघितलं. त्याच्यानंतर पुन्हा देवेंद्र फडणवीसांचं सरकार बघितलं. त्याच्यानंतरच्या काळामध्ये उद्धव ठाकरे साहेबांचं सरकार बघितलं. ठिक आहे. काय काय विचारधारा वेगवेगळ्या पक्षाची असू शकते. परंतु त्या पक्षाच्या प्रमुखानी एखादा निर्णय घेतल्यानंतर त्यांच्या आमदारांनी त्या निर्णयाला पाठबळ दिलं पाहिजे. नाहीतर कुणाचंही सरकार असलं तरी उद्याच्याला ग्रामपंचायतीमध्ये त्या सरपंचाला रोजच ग्रामपंचायतीचे सदस्य सांभाळायला लागले, तर तो गावचं काम काय करणार? पंचायत समितीच्या सदस्यांना सभापतीला सांभाळायला लागलं, हा फुटतोय की तो फुटतोय, तो जातोय का तो गद्दारी करतोय याच्यातच वेळ घालवला तर त्या पंचायत समितीचा विकास होणार आहे? जिल्हा परिषदेमध्ये जर हेच घडलं, तर जळगाव जिल्हा परिषदेचा सगळ्या भागाचा विकास होणार आहे? तीच गोष्ट राज्याची आहे आणि तीच गोष्ट देशाची आहे.

आज मात्र तुम्ही बघा, जनता कुणाला निवडून देते. तिथं पुन्हा फोडाफोडी केली जाते. मध्य प्रदेशसारख्या अनेक काही राज्यांत घडलं. हे लोकशाहीला अतिशय घातक आहे. तुम्ही जर असं म्हणत असाल, काय उद्या उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले काय, एकनाथ शिंदे झाले काय किंवा आणखी कुणी झाले काय, काय फरक पडणार आहे. कष्ट तर रोजच आपल्याला करावे लागणार. अरे पण केलेल्या कष्टाचं चीज होत नसेल, त्या शेतकऱ्यांनी पिकवलेल्या पिकाला योग्य पद्धतीचा दर मिळणार नसेल. आत्ताच मला सहकारी मित्रांनी एक चिठ्ठी पाठवली, की दादा डीएपीचे दर काय वाढलेत. यूरियाचे दर काय वाढलेत. डीएपीचे दर ४०० रूपयांनी वाढले. दहा सव्वीस सव्वीसचे दर तीनशे रूपयांनी वाढले आणि वीस वीस झिरोचे दर २०० रूपयांनी, तणनाशकाचेही दर वाढले आहेत. असा काय अचानक चमत्कार होतो. आत्ताच माझ्या कांदा उत्पादकाला दोन पैसे मिळणार होते. गेल्या वर्षी ५८ टक्के कांदा निर्यात झाला. आत्ता फक्त ८ टक्के झाला. परवा आम्ही




मुख्यमंत्र्यांना भेटलो, की मुख्यमंत्री महोदय तुम्ही पाठपुरावा करा. तुम्ही म्हणता ना आता, की केंद्रातलं सरकार आमच्या जवळचं आहे. मग जा तिथं, बसा, पाठपुरावा करा आणि तिथं निर्यात करायला परवानगी घ्या. मी महागाई वाढवा असं म्हणणार नाही. पण किमान त्या शेतकऱ्याला परवडेल एवढे तरी कांद्याचे दर त्याला मिळाले पाहिजेत. त्याने पुन्हा कांदाच लावता कामा नये अशाही प्रकारची वेळ त्याच्यावर येऊ नये. हीच गोष्ट सोयाबीनच्या बाबतीमध्ये, हीच गोष्ट मक्याच्या बाबतीमध्ये. हीच गोष्ट ऊसाच्या बाबतीमध्ये असेल किंवा माझ्या केळीच्या बाबतीमध्ये असेल. कुठलीही पिकं असू देत माझ्या शेतकऱ्याची.

तुम्ही सांगितलं होतं की नाही, की आम्ही उत्पन्नाच्या दीडपट भाव शेतकऱ्याला त्याठिकाणी मिळवून देऊ. कुठे गेले. पेट्रोल-डिझेलच्या किंमती कुठं गेल्या. आकाशाला भिडल्यात, तरी तुम्ही काहीच निर्णय घेत नाही. गॅस सिलिंडरच्या किंमती हजाराच्या पुढं गेल्यात. सरकार काय करतंय? मित्रांनो आज सगळीकडं महाराष्ट्रामध्ये त्याठिकाणी चर्चा आहे, की वेदांता आणि फॉक्सकॉन हा प्रकल्प उद्धव ठाकरे साहेब राज्याचे मुख्यमंत्री असताना, युवकांनो याच्यामध्ये महाराष्ट्रातला युवक पेटून उठला पाहिजे. युवती पेटून उठली पाहिजे. दोन

लाख कोटी रूपयांची गुंतवणूक होणार होती. दीड लाख कोटी रूपये वेदांता आणि फॉक्सकॉन याच्या माध्यमातून आणि पन्नास हजार कोटी रूपयांपैकी साधारण गुंतवणूक ही स्मॉलस्केल इंडस्ट्री, जी चीप तयार करतात, त्याला काही इतर पण काही गोष्टी लागतात त्याच्याकरता. कर्नाटक, गुजरात, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश या चार राज्यांची ती कंपनी माहिती घेत होती आणि ती माहिती घेत असताना अतिशय सर्व सोयीयुक्त अशा प्रकारची जागा तळेगावला, पुणे आणि मुंबईच्या जवळ त्यांना हजार एकराची, आपल्या एमआयडीसीची ऑफर केली. बऱ्याचशा गोष्टी आम्ही त्यांच्या मान्य केल्या. त्यांनी जवळपास सांगितलं, की आम्ही महाराष्ट्रामध्ये येतोय. तिथं पाणी होतं, तिथं रस्ते होते, तिथं रेल्वेची व्यवस्था होती, तिथून जेएनपीटी बंदर जवळ होतं, तिथून विमानाची व्यवस्था पण होती. याच्यातून जवळपास दीड लाख रोजगार आमच्या मुला-मुलींना मिळणार होता. मी असं म्हणणार नाही, ती मुलं माझ्या जळगावची असतील, चंद्रपूरची असतील, कुठल्याही मुलांना. तिथं रोजगार मिळणार होता. बाकीच्या पण डायरेक्ट, इनडायरेक्ट अशा पद्धतीनं पन्नास हजार मुलांना रोजगार मिळणार होता.

आज आम्ही त्याच्यात राजकारण न करता मुख्यमंत्र्यांना सांगितलं, की मुख्यमंत्री महोदय अजूनही लक्ष द्या. आत्ता जी जागा निवडलेली आहे, ती दबावाखाली निवडलेली आहे असं समजलं जातं. का तुम्ही बोलत नाही? का महाराष्ट्राचा आवाज काढत नाही? आता काय टूम काढली, तर हा प्रकल्प गेला तरी याच्यापेक्षा मोठा आणू. अरे तो मोठा तर आणाच. मोठा आणू काय आणू. परंतु, हा का जाऊन देताय. तुम्ही काय गाजर दाखवण्याचे धंदे करताय काय. आम्हाला कळत नाही का राजकारण. हे जे काय चाललेलं आहे, मित्रांनो मी तुम्हाला सांगतो, माझा याच्यामध्ये राजकीय स्वार्थ काही नाही. मला १९९१ सालापासून कार्यकर्त्यांनी, मतदारांनी भरभरून दिलं आहे. अनेक वर्षे सत्तेमध्ये महत्त्वाची पदं भूषविण्याची संधीदेखील पक्षानं मला दिली. नेत्यांनी दिली. त्याबद्दल मी समाधानी आहे. पण, आज राज्याचं जे नुकसान होतंय, राजकीय इच्छाशक्ती जिथं कमी पडतेय, त्याला जबाबदार कोण? उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखाली दोन वर्षे कोरोनाच्या काळामध्ये संपूर्ण जगामध्ये आर्थिक परिस्थिती काय होती? त्याला सामोरं जात असताना आम्ही राज्याची आर्थिक घडी विसकटू दिली नाही. कॅगनंदेखील कौतुक केलं, त्या दोन वर्षामध्ये अतिशय चांगल्या पद्धतीचं आर्थिक नियोजन झालं. मी सांगत नाही. कॅग सांगतंय. थोडीसी आमची वागणूक किंवा पद्धत कडक असेल, परंतु, आम्ही आर्थिक शिस्त लावतो.

आत्ताच एकानं मला पत्र दिलं, की दादा मैत्रेय प्लॉटर्स अँड स्ट्रक्चर्स प्रायव्हेट लिमिटेडमध्ये ठेवी परत मिळणेबाबत. आता बऱ्याचदा नको तिथं ठेवी ठेवायला जाता कशाला? आम्ही सांगितलं होतं? काय राष्ट्रीयकृत बँका बंद होत्या? जिल्हा बँका बंद होत्या? अरे, जिथं चांगल्या पद्धतीच्या बँका आहेत तिथं जावा. हे काय करतात. त्या बँकेमध्ये दहा टक्के व्याज असेल तर हे दाखवतात पंधरा टक्के. माणसाला वाटतं, जरा जास्त मिळतंय, जरा जास्त मिळतंय. मग सगळंच जातंय. मग द्या आमचे पैसे. कुठून द्या. माझी पुन्हा विनंती आहे. या जळगावच्या अनेक पतसंस्थांनी अनेकांना देशोधडीला लावलेलं आहे. राखरांगोळी केली. किती घोटाळे आहेत? माणसानी एकदा घोटाळा झाल्यावर आपण कसं ताक पण फुंकून पितो ना तोंड पोळल्यानंतर दुधानी. इथं काय नाही. कितीदा पोळलं तर तेच पितात. हे बंद झालं पाहिजे. जरूर राज्याचा विरोधी पक्ष नेता या नात्यानं मी असेन, खडसे साहेब असतील, इतर माझे सहकारी असतील, आम्ही याच्यामध्ये लक्ष घालू. पण आपण पण काय शिस्त पाळली पाहिजे. सगळंच कुणावर तरी सोपवून चालणार नाही. आपण जे करतोय ते योग्य करतोय का अयोग्य करतोय एवढं कुठं तरी समजण्याची आपल्याला त्याठिकाणी डोकं पाहिजे ना. मित्रांनो हे बरोबर नाही.

आणि म्हणून माझं तुम्हाला म्हणणं आहे, की अर्थसंकल्पामध्ये आम्ही रायगडमध्येदेखील होणारा तीन हजार कोटींचा बल्क ड्रग पार्क हासुद्धा इतर राज्यामध्ये जाणार असल्याचं माझ्या कानावर आलेलं आहे. त्यातूनदेखील ८० हजार तरूणांना, तरूणींना काम मिळणार होतं. आणि आता काय सांगतायंत? की याच्यापेक्षा दुसरा मोठा याला जोडून दुसरा प्रकल्प देणार. अरे हा द्या. दुसरा जोडून द्यायचा तिकडं द्या. आम्हाला काय म्हणायचं नाही. पण ही जी काय बनवाबनवी चाललेली आहे, लोकं शांत बसतात, परंतु वेळ आल्यानंतर कुठं बटन दाबायचं, कुणाची बनवाबनवी करायची ते जनतेला चांगलं समजतं. त्याच्यामुळं कुणीही, काहीही, कुणाच्या नादाला लागण्याचा प्रयत्न त्याठिकाणी करू नये. माझं एवढंच म्हणणं आहे, की शिंदे साहेब तुम्ही सरकारमध्ये आलाय, तुम्ही एकीकडे सांगताय, की सर्वसामान्यांचं सरकार. आमचं सरकार होतं तेव्हा काय सर्वसामान्यांचं सरकार नव्हतं काय. आम्ही काय वरनं पडलो होतो की काय. का आम्हाला शेतीची माहिती नव्हती. तुम्हीही आमच्या मांडीला मांडी लाऊन बसत होता ना. आता उगीचच आपली झालेली चूक दुरूस्त करण्याच्याकरता, काय झालंय, की गद्दार म्हटलं की यांचे धाबे दणाणतात. तुम्ही गद्दार नाही तर तुम्हाला लागायचं काय कारण आहे. ज्यानी कोणी गद्दारी केली असेल त्यालाच लागेल ना. आम्ही कुणाचं नाव घेतलंय का. छत्रपती शिवाजी

महाराजांच्या महाराष्ट्रामध्ये गद्दारी चालणार नाही. हे झालं पाहिजे. हा शाहू-फुले-आंबेडकरांचा महाराष्ट्र आहे. आणि त्याच्या संदर्भामध्ये हे त्याच्यात काही ना काही सांगण्याचा प्रयत्न करतायंत.

अहो, तुमचं सरकार आलंय. सरकार आलंय तर हे प्रकल्पसुद्धा आपल्या राज्यात कसे येतील हे पाहा. एवढी अतिवृष्टी झाली. एवढं पिकांचं नुकसान झालं. आमची जनावरं वाहून गेली. आता त्याच्यातनं दुष्काळात तेरावा महिना म्हणजे लम्पी आजार आलाय. जनावरं मरतायंत. त्याच्याहीकरता सांगितलं, की सगळीकडं आपल्या जळगावमध्येही काही

एनडीआरएफ, एसडीआरएफमध्ये कुठल्याही प्रकारचं धोरण नाही. राज्य सरकारनी निर्णय घ्यावा. दुधाचा धंदा अडचणीत आल्यानंतर शेतकऱ्यांनी कुठं जावं? याकरता आम्ही स्वत: मुख्यमंत्र्यांना जाऊन भेटलो आणि त्यांना सांगितलं, की सीएम साहेब आम्हाला जे लक्षात आणून द्यायचं ते आम्ही जाऊन, आम्ही नुसतं इथं येऊन जाहीर सभेत सांगत नाही. लोकशाही मार्गानं तिथं जाऊन त्यांच्या हातामध्ये त्याठिकाणी पत्र देतोय. त्यांच्या लक्षात आणून देतोय, की कांदा निर्यात चालू करा. त्यांना सांगतोय लम्पीची लस मोठ्या प्रमाणावर द्या.

महाराष्ट्रातल्या सगळ्या जनावरांना, तो आजार म्हशीला



जळगावच्या सभेत अजित पवार यांचे भाषण चालू असताना तीनदा वीज गेली. तेव्हा सभागृहातील उपस्थितांनी मोबाईलची बॅटरी लावून उजेड दाखविला.

भागामध्ये आलेलं आहे. ती लस त्याठिकाणी टोचली पाहिजे. जसं कोरोनाच्या काळामध्ये दोन व्हॅक्सिन केल्यानंतर कोरोना बऱ्याचअंशी बरा झाला, तसं हे लसीकरण केल्याशिवाय तो लम्पी आजार जाणार नाही. कारखाने दोनच आहेत. एक महाराष्ट्रामध्ये आहे आणि एक हैदराबादमध्ये आहे. मग त्या लसी करणाऱ्या कारखान्यांना सांगा, की सगळी लस आम्हाला द्यायची आहे. ते म्हणाले, की नाही केंद्र सरकारने सांगितलंय, की देशात सगळीकडे द्यायची आहे. अरे द्या ना. कमी पडत असेल तर परदेशातनं आयात करा. जनावरं मेल्यानंतर शेतकऱ्यांनी कुणाकडं जावं? एकतर त्याला विमा नाहीये. कारण विम्यामध्ये लम्पी आजार धरलेलाच नाहीये. दुसरं जनावर गेल्यानंतर त्या जनावराला मदत करण्याच्याकरता

येत नाही, पण खोंडांना, बैलांना, कालवडीला, गायांना होतोय. आणि चार महिन्याच्याच पुढं वासरू किंवा खोंड असेल तरच ती लस देता येते. आपल्या चाळीसगावला पण खिलारचा बाजार मोठा भरतो. सगळीकडंच भरतो. आज त्याच्यामध्ये वेगळे काही निर्णय घ्यायचे असतील तर ते घ्या. जे माझ्या शेतकऱ्यांच्या हिताचे असतील. शेतकऱ्यांनो, माझ्या माहितीप्रमाणं राजस्थानमध्ये पन्नास हजारापेक्षा जास्त जनावरं दगावली. तीच गोष्ट पंजाब आणि हरियानामध्ये घडली. मग ती घडण्याच्याकरता आम्ही वाट बघायचीय. सरकारचं काम नाही. सरकारनी लक्ष घालायला नको? आज पण मी त्यांना मागणी करतो, याच्यासंदर्भात पुढची कारवाई केली पाहिजे.

अडीच महिने झाले, एकतर ही दोघंच सरकार चालवित

होते कितीतरी दिवस. अरं म्हटलं काय झालं? आम्ही दोघंच बरे आहोत. दोघं बरी आहेत तर मग कशाला अठरा घेतले. काय आहे, त्यांना भीती वाटतेय, की एकदा सगळे ४३ भरले, की दुसऱ्याला जे गाजर दाखवले होते ना, की तुला घेतो, तुला घेतो, ते उघडा पडल्यावर परत यांच्यापाशी राहील का परत जाईल उद्धव ठाकरेंपाशी याची खात्री नाही यांना. त्याच्यामुळं सारखं आजचा दिवस पुढं ढकलायचं काम चाललंय. मित्रांनो, जून २०ला हे गेले मला आठवतंय. जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर आता उद्याच्याला तीन महिने होतील. तीन महिन्यांत पालकमंत्री नेमले नाहीत. ते म्हणतील, अजित पवार पालकमंत्री नेमले नाहीत तर काय बिघडलं? अहो, पालकमंत्र्यांना डीपीडीसीच्याबद्दलचे निर्णय घ्यावे लागतात. २५ ते ३० कमिट्या जिल्ह्याच्या असतात, त्याचे अध्यक्ष पालकमंत्री असतात. आढावा कधी घेणार? उद्याच्याला कधी स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका लागतील तेव्हा आचारसंहिता येईल, आचारसंहिता आल्यानंतर पुन्हा ती कामं थांबतील. आत्ता ज्यावेळेस मी कलेक्टरना विचारतो. कलेक्टर म्हणतात, की ते सरकारमध्ये आल्यावर आम्हाला आदेश आलेत की जोपर्यंत नवीन पालकमंत्री येत नाही, तोपर्यंत पुढची कुठली कामं करायची नाहीत. आमच्याही काळातील कामांना स्थगिती दिली.

अरे, सरकार बदलत असतात. आमच्या काळातल्या कामांना स्थगिती कशाला देता? आमच्या काळातली पण कामं होऊ द्या आणि तुमच्या काळातली पण नवीन कामं करा ना. ती कामं काय अजित पवारच्या स्वत:च्या वैयक्तिक शेतावर केलेली नव्हती. राज्याच्या कुठल्या तरी भागातच केली होती ना. त्या भागामध्ये काय लोकं राहत नाहीत? त्या भागामध्ये काय विकास करायचा नाही. तुम्ही काय फक्त तुमच्याबरोबर आलेल्या चाळीस आणि ते अपक्ष अशा पन्नासचेच मुख्यमंत्री आहात काय? तुम्ही महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहात. तुम्ही महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आहात. तुम्ही राज्याचा विचार करा. महाराष्ट्राची संस्कृती चव्हाण साहेबांनी काय सांगितली आपल्याला. ठिक आहे राजकारण असेल. अरे पण ते निवडणुकीपुरतं ठेवा ना. मंत्र्याला भेटायला गेल्यानंतर तु कुणाचा. तु शिंदे गटाचा आहे तर दे कागद. तु दुसरा आहे तर जा बाजूला. असं चालेल का? ही पद्धत महाराष्ट्रानं कधी पाहिली नव्हती. आज पण पालकमंत्री नेमत नाहीत. कशात नडलंय कुणाला माहिती. मध्ये म्हटले, की तो गणेशोत्सव चालू आहे म्हणून. त्याच्याआधी म्हटले, की दहीहंडी आहे. आता म्हणतायंत, पितृपक्ष पंधरवडा चालू आहे. अरं सारखं आपल्याकडं काही ना काही चालूच असतं. आता हे झाल्यावर नवरात्र येईल. ते झाल्यावर दसरा येईल, दिवाळी येईल. मग किती दिवस आम्ही वाट बघायची? अठरा आणि दोन अशी वीस जणं आहेत. एकेकाला दोन-दोन जिल्ह्यांचं पालकमंत्रिपद द्या आणि करा कामं सुरू.

मित्रांनो आतापर्यंत बारा ते पंधरा मंत्र्यांनी चार्जच घेतला नाही असं म्हणतात. कारण त्यांना दिलेलं खातंच मान्य नाही. आता करायचं काय. ज्याच्याकडं कृषी खातं होतं, त्याला दिलंय खनिज खातं. आता खनिजाचा आणि त्याचा काय संबंध? आणि त्याला दुसरं काय दिलंय तर बंदरे. त्याच्याकडं एक पण बंदर नाही. आमच्या दादाजी भुसेची तर फार वाईट अवस्था आणि त्यांना विषय काढला, की नाही दादा, मीच सांगितलं होतं, की मला साधं खातं द्या. आयला म्हटलं, लयंच मोठा झाला. असला माणूसच बघायला मिळायचा नाही. कर्णाचा दुसरा अवतारच म्हटलं हे आता. काहीही पटवतात. काहीही करतात. काहीही चाललेलं आहे. कुणाला कुणाचा पायपोस नाही. काही नाही.

एखादा आमदार उठतो आणि हवेतच गोळीबार करतोय. त्यांच्या पक्षाचा आणि राजधानी मुंबईत. ही काय पद्धत झाली? गोळीबार करायचा असेल तर पोलिसांनी करावा. एकतर गोळीबार करायचं काय कारण नाही. आम्ही सरकारमध्ये असताना कधीही अशा प्रकारच्या गोष्टी केल्या नाहीत. कायदा-सुव्यवस्था चांगली असली पाहिजे, त्याबद्दल दुमत नाही. पण, तुम्ही गोळीबार काय करताय, कोण म्हणतंय, अरेला कारे करा. अमकं करा, फोडून काढा, झोडून काढा. पोटात लाथा घाला. काय मोगलाई लागली का काय. ही कुठली पद्धत झाली. हे महाराष्ट्रानं पाहिलं नव्हतं. कसं भाजपलाही पटतंय, मला तर कळलेलं नाही. आणि एकनाथराव शिंदे पण का गप्प बसतायंत, हेही आम्हाला कळलेलं नाही. त्यांना आम्ही सभागृहात पण या सगळ्या गोष्टी सांगण्याचा प्रयत्न केला. या सगळ्या गोष्टीचा विचार या महाराष्ट्रातल्या जनतेनी केला पाहिजे. जळगावकरांनी तुम्ही केला पाहिजे. पाचोराकरांनी केला पाहिजे अशी माझी आग्रहाची विनंती आहे. मित्रांनो, महाराष्ट्राला मागे नेण्याचं काम चाललेलं आहे.

मध्यंतरी सांगितलं, की कालच्या सोमवारपासून ज्यांचं नुकसान झालं, त्या शेतकऱ्यांना चेक मिळणार. इथं हात वर करा, कुणाला चेक मिळाला. एकालाही चेक मिळालेला नाही. चार दिवस उलटून गेले. एकदम ओक्के झालंय. काही त्यांना पडलेलं नाहीये. आम्ही त्यांना सांगतोय, की मदत करा. शेतकरी मोडला तर राज्य मोडेल. तरीदेखील यांना याचं काही देणं घेणं नाही. आणि यांनी म्हणायचं, की सर्वसामान्यांचं सरकार. सर्वांचं राज्य. कशाचं सर्वांचं राज्य. सर्वसामान्यांकडं दुर्लक्ष चाललंय आणि कशाचं रं सर्वसामान्यांचं राज्य.

यासंदर्भामध्येदेखील निश्चितपणे विचार करण्याची गरज आहे.

कायदा सुव्यवस्था तर काय. सतत काही ना काही घटना कुठं ना कुठं त्याठिकाणी घडतायंत. कुठं खासदारच पोलिस खात्याला काय म्हणतायंत. हेही सगळं पुढं आलेलं आहे. कुणी कुणाला आवरायलाच तयार नाही हो. जसं आम्ही सरकारमध्ये असताना उद्या काँग्रेसचं कुणी चुकलं तर तिथनं सोनिया गांधींचा निरोप आला, की सगळं व्यवस्थित व्हायचं. आम्ही असं म्हणत नाही, की आम्ही बिनचूकच आहोत, आमच्याकडून चूकच होत नाही. जो काम करतो, तोच कुठंतरी चुकतो. पण राष्ट्रवादीचं पण कुठं चुकलं तर साहेबांच्याकडून आहे, त्याला लाज, लज्जा, शरम आहे का नाही. आमच्या महाराष्ट्रातल्या एकाही समाजाच्याबद्दल कुणाला बोलण्याचं काय कारण नाही. आम्ही काय अशी तशी माणसं नाही हे लक्षात ठेवा. त्या बकालेच्या बाबतीतमध्ये ज्या पद्धतीनं त्यानं मराठा समाजाच्याबद्दल आक्षेपार्ह बोललेलं आहे. त्याला ताबडतोब बडतर्फ केलं पाहिजे. दहा पिढ्या त्याला आठवण झाली पाहिजे, की असं कधी करता कामा नये. पोलिस ऑफिसर असला म्हणजे काय झालं. त्याला काय शिंगं आलीत काय. का त्याला मस्ती आलीय. हे नाही खपवून घेणार. हा महाराष्ट्र आहे आणि आम्ही पण बघणार आहे, की एकनाथराव



निरोप आला, की लगेच ती चूक दुरूस्त व्हायची. शिवसेनेमध्ये जर कुणी चुकलं तर उद्धव साहेबांनी सांगितलं की चूक दुरूस्त व्हायची. आता या दोघांच्या काळात कुणी कुणाला सांगायचं, कुणी कुणाचं ऐकायलाच तयार नाही. ते चाळीस म्हणतात, की आम्ही सगळे मुख्यमंत्री. अरे, सगळे मुख्यमंत्री मग अधिकाऱ्यांनी ऐकायचं कुणाचं. चाळीस लोकांचं ऐकायचं, का एकाचं ऐकायचं. अधिकाऱ्यांना तर दमच देतात, की बदली करू. अरे काय तुझ्या घरचा घरगडी वाटला काय. काही नियम बियम आहे का नाही. का उचलली जीभ लावली टाळ्याला.

मित्रांनो, तुम्हाला हे आत्ता इतकं लक्षात येत नाही. परंतु, याच्यातनं राज्याला जबरदस्त किंमत त्याठिकाणी मोजावी लागणार आहे. या गोष्टीचा विचार आपण सगळ्यांनी निश्चितपणे त्याठिकाणी केला पाहिजे. आणि आता तर आपल्या जळगाव जिल्ह्यामध्ये कोण बकाले नावाचा माणूस शिंदे काय भूमिका घेणार आहेत. इतरवेळी नेहमी, मी आहे ना, मी आहे ना, आता बघतो ना काय करताय. याच्यामध्ये बडतर्फ तर झालाच पाहिजे आणि सगळ्यांना आदेश निघाले पाहिजेत, की अशा पद्धतीनं कुणी जर वागलं तर त्याला परत कुठल्याही प्रकारची मोकळीक त्याठिकाणी मिळणार नाही. अरे, तुम्हाला पगार मिळतोय, सातवं वेतन आयोग मिळतंय, तुम्हाला बाकीचा सगळा मान सन्मान आहे. तुमच्या तोंडामध्ये अशा प्रकारचं आक्षेपार्ह विधान येतंच कसं. कुणाची तुम्हाला फूस आहे. कुणाचे आशिर्वाद आहेत.

काही काही अधिकारी असतात, एखाद्याचा वरदहस्त असला, की तो म्हणतो, मी कुणाला घाबरत नाही. माझं कोण वाकडं करू शकत नाही. आता याचं वाकडंच झालं पाहिजे. हे नुसतं आंदोलन वगैरे करून काय चालणार नाही. शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रामध्ये आंदोलन करण्याची गरजच नाही.

मराठा समाजाच्याबद्दल अशा प्रकारचं विधान करण्याचं कारण काय? त्याला तर बडतर्फ कराच करा, परंतु, याच्यामागं आणखी कुणाची फूस होती का हेही महाराष्ट्राला कळलं पाहिजे. अशा कितीतरी घटना होतायंत. त्यावर बोलायला तयार नाहीत.

तुम्ही बघा, विषय तिसरीकडंच घेऊन जातात. आता परवा पैठणचं भाषण. मी पण ऐकत होतो, की आता काय सांगतील मुख्यमंत्री. तर सुप्रिया सुळे, अजित पवार, जयंत पाटील, मी सहा वाजेपर्यंत काम करतो. अरे म्हटलं, सकाळी सहा वाजेपर्यंत काम केलं तर हा बाबा उठतो कधी? माझी बहीण कुठं तर म्हटली, की माझा दादा सकाळी सहा वाजता उठून कामाला लागतो. आता आहे मला सवय. चुलत्याची



सवय लागलीय, काय करू. वाईट तर नाही ना, की सकाळी सहा वाजता उठून कामाला लागणं. तर हे म्हटले, की सहापर्यंत काम करतो. तर मग झोपतात कधी? तेही कळलं पाहिजे ना. २४ तास तर माणूस एक-दोन दिवस काम करू शकेल. किंवा सुरतला गेल्यावर दोन-तीन दिवस आता पद मिळणार म्हणून जागू शकेल. पण नंतर कधी तरी तो मेंदू म्हणेल, की अरे झोप, झोप, झोप. सहा तास तरी झोप पाहिजेच ना राव. कितीही केलं तरी. आम्ही साहेबांचं पण काम बघितलंय. ते दोनला जरी झोपले तरी सकाळी सातला तयार असायचे. पण दोन ते सात अशी पाच-सहा तास झोप घ्यायचेच ना. पटेल असं तरी बोला राव. लईच पुढचं बोलायला लागलांय.

ठिक आहे, तुम्ही राज्याचे मुख्यमंत्री आहात. आम्हाला तुमच्याबद्दल जरूर आदर आहे. प्रेम आहे. पण तुम्ही काहीही न पटण्यासारखं बोलायला लागल्यावर मग आम्हालाही बोलावं लागेल. त्याला इलाज नाही. आणि महागाईच्याबद्दल काही बोलत नाहीत. बेरोजगारीच्याबद्दल काही बोलत नाहीत. दुसरेच कुठले तरी मुद्दे काढायचे. मग चॅनेलवाले पण हे अमकं अमकं म्हटले, त्याच्याबद्दल तुमचं काय म्हणणं आहे. अरे म्हटलं, बेरोजगारी आणि महागाईच्याबद्दल विचारा त्यांना. मग सांगतो आमचं काय म्हणणं आहे. तुम्ही नीट बघा, नेहमीची यांची पद्धत आहे. लोकांचं लक्ष दुसरीकडं डायव्हर्ट करण्याच्याकरता असंच काहीतरी करण्याचा प्रयत्न ते करतात. आम्ही घोषणा द्यायचो ना अधिवेशन चालू असताना. पन्नास खोके, एकदम ओके वगैरे वगैरे. तर ते इतकं त्यांच्या जिव्हारी लागलं, की त्याच्यानंतरच्या काळामध्ये त्यांनी पण तिथं वादच घालायला सुरूवात केली. मी शेवटी आमचे आघाडीचे सगळे आतमध्ये घेऊन गेलो. म्हटलं, नको बाबा यांच्या नादी लागयला. उगीच काहीतरी तिथं हाणामारी व्हायची आणि मग म्हणतील, की बघा आमदार लोकं हाणामारी करतायंत. यांची पायाखालची वाळू घसरली म्हणून हाणामारी करतायंत. आम्ही सभागृहात कुठंही गोंधळ होऊ दिला नाही. सगळी कामं त्याच्यामध्ये रितसर बिलं वगैरे सगळी काही चर्चा त्याठिकाणी करून मंजूर केली.

आता आपल्याकडे ते डायरेक्ट सरपंच. म्हटलं, डायरेक्ट सरपंच करताय चांगलं आहे. मग डायरेक्ट मुख्यमंत्री करा की. डायरेक्ट पंचायत समितीचा सभापती, करा. डायरेक्ट जिल्हा परिषदेचा अध्यक्ष, करा. स्वत:ला जे सोयीचं असेल ते करायचं. आता नगराध्यक्ष, कुठं नगराध्यक्ष एका पक्षाचा तर

बॉडी दुसऱ्या पक्षाची. आता म्हणजे इंजिन झालं एका पक्षाचं आणि मागची बॉडी दुसऱ्या पक्षाची. इंजिन कुठंही नेईल बॉडीला. असं नाही चालत. बॉडी आणि इंजिन एकाच पक्षाचे पाहिजेत. आणि म्हणून लोकशाहीला ते योग्य होतं. देशाचे पंतप्रधान पण पार्लमेंटमध्ये ५४३ खासदार बहुमतानं ठरवतात. आम्ही २८८ आमदार बहुमतानी मुख्यमंत्री ठरवतो.

मित्रांनो, खरोखरीच अतिशय चांगल्या प्रकारचं काम कोरोनाच्या काळामध्ये उद्धव ठाकरे साहेब करत होते. सगळ्यांनी कौतुक केलं. परंतु, हे काय काही लोकांना बघवत नव्हतं. कुठं ना कुठं यांना ते अडचणीचं येत होतं आणि म्हणून हे सगळं राजकारण आपल्या महाराष्ट्रामध्ये भासवण्याचा प्रकार झाला आहे. काही कारण नाही. मघाशी जे काही दिलीपरावांनी, खडसे साहेबांनी, अरूणभाईंनी, सतीश पाटलांनी सांगितलं. मला तर काय जळगावचं मीठ अळणी आहे का काय कळतच नाही. जळगावला लागून औरंगाबाद. जास्तीत जास्त इथलीच गेली. तुम्ही सरसेनापती बाळासाहेब ठाकरेंकडं बघून इथले आमदार निवडून दिले होते. आमदाराकडं बघून निवडून दिलं नव्हतं. मी यांना सांगितलं सभागृहात, म्हटलं, आतापर्यंत इतके नेते पक्षातून बाहेर पडले, परंतु बाहेर पडल्यानंतर पुन्हा ते निवडून पण आले नाहीत. ९२ साली असंच एक घटना झाली होती. त्यावेळी भुजबळ साहेब आणि १८-१९ आमदार फुटले होते. तुम्हाला आठवत असेल. एक आमदार निवडून आला नाही परत. साहेबांनी नंतर भुजबळ साहेबांना विधानपरिषदेवर आणलं आणि मग येवल्यामध्ये नेलं आणि तिथनं निवडून आणलं. कारण लोकं म्हणाली, की आम्ही शिवसेनेकडं बघून तुम्हाला मतदान केलं होतं. राणे साहेबांच्याबरोबर एक गट फुटला. राणे साहेब पण पराभूत झाले. त्यांचे चिरंजीव खासदारकीला पराभूत झाले. माझ्या माहितीप्रमाणं राणे साहेब ते बाय इलेक्शन होतं मध्यंतरी एका ठिकाणी, तिथंही पराभूत झाले. लोकांना आवडत नाही. आता मी बघणार आहे. पुढच्या निवडणुकीला पाचोऱ्याला काय होतंय. असा तसा गप्प बसणार नाही.

एकदम व्यवस्थित सरकार चाललेलं असताना त्याला मुद्दामहून आडकाठी निर्माण करण्याचं काम या सगळ्या लोकांनी केलेलं आहे. त्यांना त्यांची जागा दाखवलीच गेली पाहिजे. तो अधिकार तुमचा आहे आणि त्याप्रकारे काम करा. आम्ही त्याच्या संदर्भामध्ये निश्चितपणे राज्याचं हित डोळ्यासमोर ठेऊनच पुढं काम करत राहणार आहे. त्याच्यामध्ये दुसरा कुठलाही वैयक्तिक स्वार्थ आमच्या मनामध्ये नाही. ही पण गोष्ट माझ्या बंधू-भगिनींनी लक्षामध्ये घेतली पाहिजे, अशी माझी आपल्या सगळ्यांना आग्रहाची विनंती आहे.

इतर पण बरेचशे प्रश्न आहेत. ओबीसीच्यासंदर्भात, एससी/एसटीला जसं आरक्षण आहे तसं ओबीसीला मिळालं पाहिजे म्हणून आम्ही शेवटपर्यंत प्रयत्न केला. त्याच्यासंदर्भातला जो काही डेटा गोळा करायचा होता, तो गोळा केला. त्यालाही आता काही प्रमाणात न्याय व्यवस्थेनं मान्यता दिलेली आहे. आता या निवडणुका पण, आता चारचा प्रभाग का तीनचा प्रभाग असंही काही चाललेलं आहे. काही ना काही निमित्त करून त्या मार्केट कमिटीच्या निवडणुका शेवटी कोर्टामध्ये जाऊन काहींनी लावल्या. आता सतत कोर्टामध्ये जावं लागतं आणि न्याय मागावा लागतो. आत्ता ही स्थगिती दिली, त्याच्याहीकरता मुंबई हायकोर्टापुढं वेगवेगळ्या तक्रारी गेलेल्या आहेत. न्यायव्यवस्था त्याच्याबद्दलचा निर्णय घेईल. पण हे महाराष्ट्रामध्ये बाबांनो, कधी घडत नव्हतं. हे त्या ठिकाणी घडतंय. असं जर झालं तर महाराष्ट्र मागं जाईल आणि म्हणून माझी तुम्हाला सगळ्यांना आग्रहाची, नम्रतेची, कळकळीची विनंती आहे, की ज्याप्रकारे आपल्यावर अन्याय करण्याचं काम चाललेलं आहे, ओला दुष्काळाची मागणी तर आम्ही मागून दमलो. त्यांनी सरळ सांगितलं, की आम्ही ओला दुष्काळ जाहीर करणार नाही. आता त्यांच्याच हातात आहे. आम्ही त्यांना सांगतो. पण ते काहीतरी उत्तरं देतात आणि त्याच्यातून वेळ मारून नेतात. मागण्या करायचं काम आपण त्याबाबतीमध्ये करतोय. पण ते त्याला प्रतिसाद देत नाहीत, ही पण गोष्ट तेवढीच खरी आहे.

आपल्याला आता महागाई, बेरोजगारीच्या विरोधात संघर्ष हा करावा लागेल. देशाच्या एकतेला आणि अखंडतेला उद्याच्या काळामध्ये धोका निर्माण झालेला आहे. सरकारचे निर्णय हे ज्याप्रकारे चाललेले आहेत, ते निर्णय राज्याला पुढे नेणारे नाहीयेत, याही गोष्टीचा विचार आपण सर्व सहकारी मित्रांनी त्यानिमित्तानं केला पाहिजे अशा प्रकारची माझी आपल्या सगळ्यांना आग्रहाची विनंती आहे आणि तशा पद्धतीनं आपण सगळेजण मिळून त्याबाबतीत काम करूया. गाफील राहून चालणार नाही. आता सगळ्यांना उद्याच्या काळामध्ये, माझं वैयक्तिक मत आहे, की त्यांचा पराभव करण्याच्याकरता उद्धव ठाकरे साहेबांची मूळ शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस, तिघांनी एकत्र मिळून यांना विरोध त्याठिकाणी करायचा. बघू, शिंदे गटाचं आणि भाजपाची लोक कशा पद्धतीनं त्याठिकाणी निवडून येतात. आपल्या तिघांची ताकद एक केली, तर निश्चितपणे महाराष्ट्रामध्ये पुन्हा महाविकास आघाडीचं सरकार यायला कुठलीही अडचण येणार नाही. तशा पद्धतीचा निश्चय आपण करूया आणि कामाला लागूया, हीच आग्रहाची, नम्रतेची, कळकळीची विनंती करतो. आपल्या सगळ्यांनी रजा घेतो. जय हिंद! जय महाराष्ट्र!!

■■■

**व्यंकटेश केसरी**

# भाजपचे स्वप्नरंजन आणि कटूवास्तव




येत्या १८-१९ महिन्यात लोकसभेच्या निवडणुका येऊ घातल्या आहेत. ही केवळ सत्तेची लढाई नाही तर अस्तित्वाची लढाई आहे याची जाणीव गैर भाजप पक्षांना आहे. या मधल्या काळात दक्षिणेतील कर्नाटक, तेलंगणा तर हिंदी भाषीक प्रदेशातील मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, हिमाचल प्रदेश व पश्चिमेतील गुजरात या राज्यांच्या विधान सभा निवडणुका होतील. तर चित्र काय दिसते ? भाजपचा मद, उन्माद, आक्रमकता याचा आलेख वाढता आहे. याच्या जोडीला शासन, प्रशासन, व्यवस्था चालविणाऱ्या सर्व संस्था यांची प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष साथ आहे फक्त लोक या पक्षाबरोबर आहेत की नाहीत ते निवडणुकीत दिसेल. एवढे सर्व असूनही सक्त वसुली संचालनालय, केंद्रीय गुप्तचर विभाग यांचा वरवंटा भाजपच्या राजकीय विरोधकांवर फिरविला जात आहे. तो का ? जिंकून येण्याची शाश्वती नाही की त्यांना जरबेत ठेवायचे, माहौल बनवायचा ? द इंडियन एक्सप्रेसने काही दिवसांपूर्वी दोन रिपोर्ट प्रकाशित केले. त्यात ईडीने २०१४ पासून आतापर्यंत केलेल्या कारवाईत चार पटीने वाढ झाली असून यातील ९५ टक्के केसेस भाजपच्या राजकीय विरोधकांवर आहेत, असे म्हटले आहे. . याचा अर्थ भारतातील विरोधी पक्ष एकजात भ्रष्ट आहे असा होतो व त्यात भाजप नेत्यांचे नाव नसल्याने हा पक्ष साधूंचा, स्वच्छ, चारित्र्यवानांचा असा काढला जाऊ शकतो. पण प्रश्न असा आहे की अश्या शुद्ध पक्षात बाहेरची घाण वाजत गाजत का घेतली जाते ? त्यांना पदे का दिली जातात? यावर खरे तर संघाच्या लोकांनीच बोलले पाहिजे पण त्यांचीही हिम्मत होत नाही.

पण मग २०२४ च्या लोकसभा निवडणुका एकतर्फी होणार काय ? असे कधी होत नसते. जे म्हणतात भाजप पुन्हा तिसऱ्यांदा सत्तेत येणार ते लोकांना गृहीत धरण्याची चूक करीत आहेत. भाजपला राष्ट्रीय स्तरावर आपणच पर्याय आहोत, १९० लोकसभेच्या जागांवर काँग्रेस विरुद्ध भाजप अशीच लढत आहे, आमच्याकडे अजूनही १६ ते १८ टक्के मते आहेत असे म्हणणारी काँग्रेस आज मैदानात दिसत नाही. तर प्रादेशिक पक्षांनी हालचाली सुरु केल्या आहेत. हे पक्ष लोकांच्या जास्त जवळ असतात, त्यांचे प्रश्न, त्याच्या अडचणी त्यांना माहिती असतात. " पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या समोर तुमचा चेहरा कोण ? ", "तुम्ही देश चालवू शकणार काय ? " यावर मतदान होत नाही. १९७७, १९८९,१९९६ , २००४ या लोक सभा निवडणुकात गैरभाजप पक्षांकडे चेहरा नव्हता,२०१९च्या

महाराष्ट्र विधान सभेची निवडणूक एकतर्फी होत आहे, आम्ही आखाड्यात आहोत पण पैलवानच दिसत नाही अशी दर्पाची भाषा भाजप नेत्यांच्या तोंडी होती. पण अडीच वर्ष हा पक्ष सत्तेच्या बाहेर राहिला हे वास्तव ते विसरू शकत नाहीत. गुजरातला "मोदी लॅण्ड " म्हणतात. याचा अर्थ तिथे भाजप, संघ यापेक्षा मोदींची जादू चालते ,असा होतो. त्या गुजरात मध्ये २०१७ च्या विधानसभा निवणुकीत भाजपला फक्त ९९ जागा मिळाल्या होत्या आणि कशीबशी सत्ता राखली. ज्या लालू प्रसाद यादव व त्याच्या राष्ट्रीय जनता दलाच्या बिहार मधील राजवटीला भाजप त्वेषाने "जंगल राज, जंगल राज" म्हणते त्या बिहार विधान सभेच्या निवडणुकीत राष्ट्रीय जनता दलाने भाजपपेक्षा अधिक जागा जिंकल्या.


२०२४ च्या लढाईत गैर भाजप पक्षांनी आपापली खिंड इमाने इतबारे लढविली, राज्य राखले तर राष्ट्रीय पातळीवर चित्र वेगळे दिसेल. भाजपचा प्राण हिंदी भाषी प्रदेशात आहे. तेथे समाजवादी पार्टी (उत्तर प्रदेश), राष्टीय जनता दल –जनता दल –युनाइटेड (बिहार) झारखंड मुक्ती मोर्चा (झारखंड) व काँग्रेसने (राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड,पंजाब, हरियाणा ,उत्तराखंड , हिमाचल प्रदेश,) चांगली लढत दिली तर भाजपच्या तोंडचे पाणी पळू शकते. पण काँग्रेस मध्ये नेता, धोरण, आघाड्या या बाबत स्पष्टता नाही. राहुल गांधी हे जर या पक्षाचे पंतप्रधानपदाचे उमेदवार , दावेदार असतील त्यांनीच पक्षाचे अध्यक्षपद स्वीकारावे, इतर कोणी होयबाला त्याजागी बसविण्यापेक्षा त्यांनीच नेतृत्व करावे असे सांगितले जाते. सोनिया गांधी अध्यक्ष असल्यातरी पक्ष राहुल गांधींचा चालवितात हे वास्तव आहे.

पण काँग्रेसला वेळ लागत असला तरी त्यामुळे इतर भाजप विरोधी पक्ष शांत बसू शकत नाहीत. पंजाब मध्ये आम आदमी पार्टी आली, गुजरात मध्ये ती लढण्याच्या तयारीत आहे. हा पक्ष छत्तीसगढ , हरियाणा, राजस्थान मध्ये जाईल, तृणमूल काँग्रेस (पश्चिम बंगाल), द्रमुक (तामिळनाडू), तेलंगणा राष्ट्र समिती (तेलंगणा), इंडियन नॅशनल लोक दल (हरियाणा),

## ...तेव्हाच कायद्याचा मृत्यू झाला!

**दहशतवाद, हिंदुत्व, पाकिस्तान, ५६ इंच छाती, ना खाऊंगा ना खाने दूंगा, मोदी है तो मुमकीन है, शमशान विरूढ कब्रस्तान, दिवाळी विरद्ध ईद ––याची जादू किती काळ चालणार ? ती चालली असती तर त्यांना इतर पक्ष का फोडावे लागले असते, ईडी, सी.बी.आय , प्रिव्हेंशन ऑफ मनी लौंड्रीन्ग याचा वापर राजकीय विरोधकांवर का करावा लागला असता ? भाजपचा जोर आर्थिक प्रश्नावर कमी पण ध्रुवीकरणावर जास्त असतो. कोव्हिडच्या काळात मंदिरे का उघडली नाहीत , सण का साजरे करू दिले नाहीत या आवडत्या थीमवर ते " खोटे बोल पण रेटून बोल " ची लाईन पकडतात. कोव्हिडच्या काळात गुजरात, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, कर्नाटक, हिमाचल प्रदेश या राज्यात किती सण दणक्यात साजरे झाले, किती मंदिरे उघडी होती यावर त्यांनी श्वेत पत्र काढावे, हरिद्वारच्या कुंभ मेळाव्यात किती जण स्वर्गलोकात गेले , ते ही एकदा जाहीर करून टाकावे म्हणजे उत्तम. भाजप हा केवळ भारतातला नाही तर जगातला सर्वात मोठा पक्ष आहे , याचे नेते विश्व गुरु आहेत असा दावा केला जातो. हे खरे असेल तर महाराष्ट्रात शिंदे गट, राज ठाकरे यांचा टेकू का ? मोदी यांच्या राजवटीत अटल बिहारी वाजपेयी यांच्या काळातला नॅशनल डेमोक्रॅटिक अलायन्स बरखास्त करून टाकला पाहिजे पण तो कागदोपत्री जिवंत ठेवला आहे हे कशासाठी ? तसेच पक्षांतर बंदी कायदा मोडीत काढला पाहिजे कारण त्याचे सत्व कधीच संपले आहे. जेंव्हा केंद्रीय मंत्री , राज्यातले मंत्री विरोधी पक्षांना " तुमच्यातले इतके खासदार, आमदार आमच्या संपर्कात आहेत " असे जाहीरपणे म्हणतात , त्यांना सन्मानाने भाजपत घेतात त्याच वेळी या कायद्याचा मृत्यू झालेला असतो.**






## भाजप ही मोदींची जाहिरात कंपनी

सालाना दोन कोटी नोकऱ्या देणार, १५ लाख रुपये प्रत्येकाच्या बँकेच्या खात्यात जमा करणार या घोषणा अंगलट आल्यानंतर भाजपधुरीण सावध झाले आहेत. वाढती महागाई,बेकारी, भ्रष्टाचार या बाबत लोक कुरकुर करतात पण मतदान मात्र यावर करीत नाहीत. तेथे ध्रुवीकरणाचेच कार्ड चालते हा अनुभव लक्षात ठेऊन भाजपचे नेते –प्रवक्ते बातम्यांच्या बाजारात तेजी आणत असतात. वक्ते कमी पण प्रवक्ते जास्त असलेला हा एकमेव पक्ष आहे. मुद्दे संपले की ही मंडळी शिवीगाळ ही करतात. "भाजप ही मोदींची जाहिरात कम्पनी म्हणून काम करते ,"अशी शेलकी टिप्पणी भाजपच्या एका तरुण खासदाराने अर्थात खाजगीपणे केली. आता भाजपचे लोक आगामी लोकसभा निवडुकीत चारशे जागा जिंकण्याचा दावा करू लागले आहेत.




शिरोमणी अकाली दल (पंजाब), महाराष्टात भाजप-शिंदे गट, राज ठाकरे यांची मनसे यांचा मुकाबला महागटबंधनशी आहे. बिजू जनता दल (ओरिसा), वाय एस आर काँग्रेस पार्टी (आंध्र प्रदेश ) हे कायमचे भाजप सोबत राहतील असे गृहीत धरणे चुकीचे आहे. कारण भाजप जेंव्हा त्यांना धक्का देईल त्यावेळी त्यांनाही मुकाबला करावा लागेल.

विरोधी पक्षांचे ऐक्य आज धूसर असले आणि त्यांची अवस्था " कळते पण वळत नाही" अशी असली तरी भाजप मध्ये आलबेल नाही. बाहेरचे आत मध्ये आले , आतले कुठे जाणार ? त्यांना दाबले तर ते उफाळणार नाहीत तर गनिमी काव्याने लढतील. या आतल्यांमुळे भाजप दिल्लीत मार खात आहे. वसुंधरा राजे,शिवराजसिंग चौव्हान, गुजरात,महाराष्ट्रात दाबलेले, दबलेले शांत कसे बसतील ? उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यातील शीतयुद्ध लपलेले नाही. त्यामुळे नरेंद्र मोदी पुन्हा दोन जागांवर लोकसभेची निवडणूक लढवतील अशी चर्चा आहे. केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचे भाजपमधील निर्णय प्रक्रियेत स्थान (महाराष्ट्रात ) काय ? याची चर्चा राजकीय वर्तुळात ऐकायला मिळते.

राजधानी दिल्लीत राजकारणापेक्षा नाटकाला सध्या बाहेर आला आहे. या नाटकात आम आदमी पार्टी, भाजप नेहमी आघाडीवर असली तरी सध्या काँग्रेसने बाजी मारली आहे. काँग्रेस अध्यक्षाचा निवडणुकीत मल्लिकार्जुन खर्गे

व शशी थरूर यांनी आखाड्यात उडी मारली आहे . वरवर पाहता ही कुस्ती "तरुण तुर्क विरुद्ध म्हातारे अर्क "अशी वाटत असली तरी प्रत्यक्षात त्याला अनेक कंगोरे आहेत. दोघेही दक्षिणेतले असले तरी एक खाटी (मुरलेला) काँग्रेसवाला आहे तर दुसरा आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख असलेला, डिप्लोमॅट, साहित्यिक ,जगाचा इतिहास, भूगोल, राजकारण जाणणारा. तो काँग्रेस मध्ये नाव, पैसे, प्रतिष्ठा मिळाल्यानंतर आला. या दोघांनी आपले नामांकन दाखल केल्यानंतर थरूर यांनी आपली उमेदवारी मागे घ्यावी असे अशोक गेहलोत , कु. शैलजा सुचवीत आहेत. या पदाची निवडणूक होईल की खर्गे बिनविरोध निवडले जातील हे येणाऱ्या दिवसात कळेल पण पक्षाला नवा अध्यक्ष मिळणार असल्याने काँग्रेस नेत्यांचे चेहरे मात्र खुलले आहेत. याचे कारण ज्यांना सोनिया गांधी, राहुल गांधी, प्रियांका गांधी यांच्या वर्तुळात प्रवेश मिळाला नाही त्यांना खर्गे जवळ जाण्याची संधी मिळणार. खर्गे आता काँग्रेसच्या मुख्यालयात येणार, बसणार आणि आपली कुठे ना कुठे वर्णी लागणार याची खात्री या लोकांना झाली आहे. कारण येणारा काळ निवडुकीचा आहे. खर्गे यांच्या येण्याने कर्नाटकातले काँग्रेस अंतर्गत समीकरण बदलू शकते तर माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांचे गणित ही बिघडू शकते. काँग्रेसची ताकद हिंदी भाषी प्रदेशातील राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड, उत्तराखंड, हिमाचल प्रदेशात असली तरी येणारा अध्यक्ष हा दक्षिणेतला असेल ,यामुळे काही नाराज असले तरी ही संख्या जास्त नाही. १९६९ नंतर झालेल्या पक्षाच्या फुटी नंतर जगजीवनराम, सीताराम केसरी हे मागासवर्गातून आलेले काँग्रेसचे अध्यक्ष झाले . त्यांच्या नंतर खर्गे हे तिसरे अध्यक्ष असतील. परंतु अश्या प्रकारचे वातावरण भाजप, आम आदमी पार्टीच्या नेता निवडीच्या वेळी दिसत नाही. त्यांच्याकडे शिस्तीच्या बडग्यात लोकशाहीची प्रक्रिया उरकून टाकली जाते. खरे तर ताम झाम ,नौटंकी या पक्षांचा हात कोणी धरू शकत नाही पण या बाबत मात्र जरा गडबड आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांचे सारे लक्ष्य येत्या गुजरात विधानसभा निवडणुकीकडे लागले आहे. त्यांचे दौरे वाढले आहेत. नोव्हेंबर मध्ये निवडणूक होण्याचे अंदाज भाजपवाले व्यक्त करू लागले आहेत. आणि गुजरात हे भारतातले कदाचित एकमेव राज्य असेल जिथे विधानसभेच्या निवडणुकीत पाकिस्तान हा भाजपचा प्रचारातील मुद्दा असतो. किमान २००२ पासून तर हा मुद्दा निवणुकीत सातत्याने उचलला जातो. भाजपने प्रचार सुरु केला आहे, आम आदमी पार्टी जोर लावत आहे, काँग्रेस "भारत जोडो " मध्ये गुंतली आहे. उत्तर प्रदेश प्रभू रामाची जन्मभूमी आहेत तर गुजरात कृष्णाची कर्मभूमी ! तिथे उत्तर प्रदेशचे मुखमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या पेक्षा बिहारचे उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव प्रचारात बहार आणू शकतात अशी चर्चा ऐकायला मिळते. गुजरात ही हिंदुत्वाची "प्रयोगशाळा" आहे, विकासाचे डबल इंजिन आहे, ही " मोदी ल्यांड " आहे. तसे असेल तर निवडणूका एकतर्फी व्हायला पाहिजेत, पण तश्या त्या होतील काय ?

■■■

## फेकू मागे लोक धावतात!

**" नरेंद्र मोदी हे १५ वर्षे सी एम (मुख्यमंत्री ), १५ वर्षे पी एम (पंतप्रधान) व एक टर्म राष्ट्रपती राहणार . राजधानी दिल्लीतला सेंट्रल विस्टा त्यांच्यासाठी तयार करण्यात आला आहे. नवीन संसदेत त्यांचे तैलचित्र लावले पाहिजे, " असे भाकीत व इच्छा त्यांची भक्त मंडळी व्यक्त करीत आहेत. . तांत्रिक दृष्ट्या नरेंद्र मोदी यांना १५ वर्षे सलग गुजरातच्या मुख्यामंत्रीपदी राहता आले नसले तरी २००१ पासून आज पर्यंत ते सत्तेत आहेत. आणि हा एक विक्रम आहे. मुख्यमंत्री होण्यापूर्वी त्यांनी एकही निवडणूक लढली नव्हती आणि आज ते सर्वांना धूळ चारत आहेत. काही जण त्यांना अवतारी पुरुष मानतात तर काहींना त्यांच्यात दैवी शक्ती दिसते. असे दैवी गुण महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, नेताजी सुभाषचंद्र बोस, महाराणा प्रताप, सम्राट अशोक आदी महापुरुषात दिसत नाहीत. याचे कारण आजचा जमाना हा "बोंबलणाऱ्यांची बोरे विकली जातात , गप्प बसणाऱ्याची सफरचंदे नाहीत, "--यांचा आहे. जो फेकतो त्याच्या मागे लोक धावतात.**



# गुजरातचे ६३१ मच्छीमार पाकिस्तानच्या



गुजरातच्या सौराष्ट्र आणि केंद्रशासित दीवच्या समुद्रकिनारी असलेल्या गावातील लोकांमध्ये तणाव जाणवतो. या भागातल्या मच्छीमारांवर एका मागून एक संकट येत आहेत. 'गुजरात मॉडेल' ची येथे चर्चा नाही. त्यांच्यासमोर प्रश्न आहे जगण्याचा आणि पाकिस्तानच्या तुरुंगात असलेल्या त्यांच्या नातेवाईकांना सोडवण्याचा. एकूण भारताचे ६३१ मच्छीमार पाकिस्तानच्या तुरुंगात आहेत आणि त्यातले बहुसंख्य सौराष्ट्र व दीवचे आहेत. दोन मच्छीमारांचा मृतदेह कराचीच्या शवगृहात आहे. आतापर्यंत पाकिस्तानच्या मेरीटाईम सेक्युरिटी एजन्सीने (एमएसए) भारताच्या जवळपास १३०० मच्छीमार बोटी पकडल्या आहेत. या सगळ्याचा एकूण परिणाम मत्स्यव्यवसायावर आणि स्थानिक अर्थव्यवस्थेवर झाला आहे. याचा सर्वात जास्त परिणाम सहाजिकच महिलांवर होत आहे.

गेल्या काही वर्षाचे आकडे पाहिले तर आपल्या लक्षात येईल की एमएसएकडून भारतीय मच्छीमारांना पकडण्याची संख्या सातत्याने वाढत आहे. १ जुलैला ६३३ भारतीय मच्छीमार पाकिस्तानच्या तुरुंगात होते. त्यानंतर दोघांचा मृत्यू झाला. १ जानेवारीला ५७७ भारतीय मच्छीमार पाकिस्तानच्या तुरुंगात होते. गेल्या वर्षी १ जुलैला ५५८ तर १ जानेवारीला २७० भारतीय मच्छीमार पाकिस्तानच्या ताब्यात होते. यावर्षी १ जुलैला पाकिस्तानचे ९५ मच्छीमार भारताच्या तुरुंगात होते. मासे जवळपास मिळत नसल्याने भारतीय मच्छीमारांना आंतरराष्ट्रीय सागरी सीमारेषेच्या जवळ जाणं भाग पडत आहे. अनेकदा तुफानी वारा किंवा पाण्याच्या प्रचंड प्रवाहामुळे मच्छीमार बोट सीमारेषेच्या पलीकडेही जाते, त्याला थांबवता येत नाही. एमएसए त्यांना पाकिस्तानच्या पाण्यातून किंवा काही वेळा तर आपल्या सागरी सीमेतून पकडतात, असे यापूर्वी पकडल्या गेलेल्या अनेक मच्छीमारांनी मला सांगितलं आहे. एकदा पकडला गेल्यानंतर दोन–अडीच वर्ष पाकिस्तानच्या



# तुरुंगात, सत्ताधाऱ्यांचं दुर्लक्ष

जतिन देसाई



कराची येथील लांडी जेलमध्ये त्यांना राहावं लागतं. पूर्वी तुरुंगातून मच्छीमार आपल्या नातेवाईकांना पत्र पाठवत असे आणि त्यांना नातेवाईकांची पत्र येत होती. कोरोनामुळे २०२० पासून ते संपूर्णपणे बंद आहे.

एकमेकांशी कुठल्याही स्वरूपाचा संपर्क नसल्याने साहजिकच चिंता वाढते. त्यातही एखाद्याचा मृत्यू झाल्यावर तर चिंता अधिक वाढते. मृत्यू झालेल्या मच्छीमाराचा मृतदेह यायला साधारण दीड महिना लागतो. काही वेळा तर तीन महिन्याहून अधिक वेळ देखील लागला आहे. ३ सप्टेंबरला जतिन जीवा, २८ ऑगस्टला वेरावळ जवळील गावाच्या उकाभाईचं कराचीत मृत्यू झालं. त्यांचे नातेवाईक मृतदेहाची वाट पाहत आहेत. ६ जुलैला काळू वीरा याच मृत्यू झालेलं. त्याचा मृतदेह २३ ऑगस्टला भारतात आला. ३ फेब्रुवारीला नानू राम यांच निधन झालं. त्याचा मृतदेह एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात आला. महत्त्वाचे म्हणजे या सगळ्यांची शिक्षा पूर्ण झालेली आणि भारत सरकारने ते भारतीय असल्याचं पाकिस्तानला कळवलं देखील होतं. शिक्षा पूर्ण झाल्यावर जर लगेच त्यांना सोडलं असतं तर कदाचित आज ते जिवंत असते.



भारत आणि पाकिस्तानात २००८ मध्ये झालेल्या एग्रीमेंट ऑन कॉन्सुलर एक्सेसमध्ये त्या स्वरूपाची तरतूद पण आहे. पण त्याचा अंमल होत नाही. दोन्ही देशाचा विचार केल्यास आतापर्यंत मात्र मुंबईचा उच्चशिक्षित हमीद अन्सारीलाच ज्या दिवशी त्याची शिक्षा पूर्ण झाली त्या दिवशी सोडण्यात आलं आहे. एखादा भारतीय पाकिस्तानात किंवा पाकिस्तानी भारतात पकडला गेल्यास संबंधित देशाच्या उच्चायुक्तालयातील अधिकाऱ्यांना त्याला तीन महिन्याच्या आत भेटण्याची परवानगी देण्याची तरतूद या एग्रीमेंट मध्ये आहे. पण बऱ्याचदा त्याचा अंमल होत नाही.

काही केस अशा देखील आहेत की ज्यात आपण संबंधित कैद्याची राष्ट्रीयता नक्की करण्यात काही वर्ष घेतले

आहेत. माहिती आणि तंत्रज्ञानाच्या काळात, खरंतर, ते काम काही दिवसात होऊ शकतं. काही जणांची शिक्षा संपते पण राष्ट्रीयता नक्की झाली नसल्याने त्याला सोडता येत नाही. या मुद्द्याचा गंभीरतेने विचार करण्याची आवश्यकता आहे. दुर्दैवाने तसं होत असताना दिसत नाही.

या मच्छीमार गरीब आणि अशिक्षित किंवा कमी शिकलेले आहेत. त्यांचा राजकीय आवाज नसल्याने गुजरात सरकार आणि केंद्र सरकार त्यांच्या प्रश्नांना अधिक महत्त्व देत असताना आढळत नाही. ऑगस्ट महिन्यात सौराष्ट्र आणि दीवच्या महिलांनी दिल्लीत जाऊन आपलं म्हणणं मांडण्याच ठरवलं. त्यांच्यासोबत मी होतो. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांना आम्ही भेटलो. त्यांनी प्रश्न समजून घेतला. प्रत्येक महिलांना त्यांनीं "तुमचं कोण पाकिस्तानच्या तुरुंगात आहे," असं विचारलं. त्यातल्या दोघांची पती आणि मुलगा पाकिस्तानच्या तुरुंगात होत्या. पहिल्यांदा एखादा मंत्री आपल्याशी व्यवस्थित बोलले, असं महिलांनी नंतर सांगितलं. जयशंकर यांनी देखील लवकरच तुमच्याशी परत संपर्क करू, असं म्हटलं. पण परिस्थितीत काही फरक पडलेला नाही.

गुजरातच्या मच्छीमारांचा हा मोठा प्रश्न आहे. २०१४ मध्ये नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले तेव्हा या मच्छीमारांना वाटत होतं की आता आपला प्रश्न मार्गी लागेल कारण मोदींना या बाबीची माहिती आहे. मात्र तसं झालं नाही. किंबहुना, प्रश्न अधिक चिघळला. गुजरातचे खासदार या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर संसदेत आक्रमक भूमिका घेऊन सरकारला अडचणीत आणत असताना देखील दिसत नाही. गुजरातचे लोकसभेतील सर्व खासदार भाजपाचे आहेत. राज्यसभेत काँग्रेसचे शक्तीसिंग गोहिल बऱ्याचदा या प्रश्नावर बोलतात. पण राजकीय मतभेद बाजूला ठेवून या प्रश्नावर एकत्रितपणे स्वतःच्या राज्याच्या मच्छीमारांबद्दल बोलताना गुजरातचे खासदार दिसत नाही. हा प्रश्न पक्षीय राजकारणाच्या पलीकडचा आहे. त्याचा संकुचित विचार न करता व्यापक म्हणजे माणुसकीच्या दृष्टीने विचार केला पाहिजे. पण तसं होत नाही. केंद्र सरकारने पुढाकार घेऊन भारतीय मच्छीमारांना सोडवण्यासाठी विशेष प्रयत्न केले पाहिजे. आझादी का अमृत महोत्सवच्या निमित्ताने दोन्ही देशाने आपापल्या ताब्यात असलेल्या मच्छीमार, महिला कैदी आणि वयस्कर नागरिकांना सोडलं तर एक चांगला संदेश जाईल, अशी मागणी करूनही त्यावर काही विचार झाला नाही.

महात्मा गांधी यांच पोरबंदर असो किंवा इतर शहर, गाव असो या सर्व ठिकाणी मच्छीमार समाजातील महिलांच जगणं कठीण झालं आहे. आपला नवरा, मुलगा किंवा जावई कधी पाकिस्तानच्या तुरुंगातून, सहीसलामत, परत येणार याचा विचार ते सतत करत असतात. मलाही फोन करून या बाबतीत त्या सतत विचारतात. त्यांच्या प्रश्नाचे आपल्याकडे उत्तर नसतात पण कोणाशी बोलल्यामुळे त्यांना समाधान वाटतं. अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

अनेक जण मच्छीमारांना सल्ला देतात की, त्याने मासे पकडण्यासाठी आंतरराष्ट्रीय सागरी सीमारेषा जवळ किंवा त्या पलीकडे जाऊ नये. पण मच्छीमार समुद्रात एवढे लांब का जातात, याचा विचार असं सांगणारे कधी करत नाही. पोरबंदर, मांगरोळ, ओखा बंदरातून निघालेली बोट साधारण २१ ते २५ दिवसात परत येते. औद्योगिक प्रदूषणामुळे सौराष्ट्रच्या समुद्रात फारसे मासे मिळत नाही. औद्योगिकरणाचं दुष्परिणाम म्हणजे आपल्याकडे औद्योगिक कचऱ्यावर व्यवस्थित ट्रीटमेंट केल्याशिवाय त्याला समुद्रात टाकण्यात येतं. त्यामुळे समुद्राचं तापमान वाढतं आणि वाढलेल्या तापमानात मासे राहत नाही.



या सगळ्याच परिणाम म्हणून मच्छीमारांना समुद्रात आंतरराष्ट्रीय सागरी सीमारेषा जवळ जावं लागतं. दुसरं, पाकिस्तानात फारसं औद्योगीकरण झाले नसल्यामुळे प्रदूषण कमी आहे आणि म्हणून त्या बाजूला मासेही जास्त मिळतात. एक गोष्ट आपण लक्षात ठेवली पाहिजे की मासे ज्या दिशेत मिळतील त्या दिशेत मच्छीमार जाणार.

भारताच्या मच्छीमारांची बोट मोठी असते आणि एका बोटीची अंदाजे किंमत ६० लाख रुपये असते. पाकिस्तानची बोट तुलनेने लहान असते. पाकिस्तानचे मच्छीमार बऱ्याचदा सर क्रीक जवळ हरामी नाल्याकडे पकडले जातात. पाकिस्तानने २०१५ मध्ये ५७ भारतीय मच्छीमार बोटी सोडल्या होत्या. बहुतेक भारतीय बोटी सडून गेल्या आहेत किंवा त्याचा लिलाव झाला आहे. थोडी दुरुस्ती करून जवळपास २०० बोटी परत येऊ शकतात. त्यादृष्टीने सरकारने प्रयत्न केले पाहिजेत. दोन्ही देशात संवाद बंद असल्यामुळे मच्छीमारांचे प्रश्न अधिक

चिघळत आहेत.

भारत आणि पाकिस्तानने मच्छीमारांचे प्रश्न मानवतेच्या दृष्टिकोनातून सोडवला पाहिजे. एकमेकांच्या तुरुंगात अडकून पडलेले मच्छीमार, महिला कैदी, वयस्कर नागरिक गरीब घरातले आहेत आणि त्यामुळे त्यांच्या प्रश्नाबद्दल फारशी चर्चा होत नाही. भारत आणि पाकिस्तानने मच्छीमार, महिला व इतर निर्दोष लोकांना तुरुंगातून तत्काळ मुक्त करण्याचा निर्णय घेतला पाहिजे.

दोन्ही देशांनी खालील पावलं उचलली पाहिजे.

१, कराची येथील तुरुंगात अनेक भारतीय मच्छीमारांची प्रकृती चांगली नाही. आपण मायदेशी जिवंत परतणार की नाही, अशी त्यांना भीती आहे. कराची तुरुंगात किंवा जेलच्या होस्पीटलमध्ये औषधोपचार व्यवस्थित होत नसल्याचं सुटून आलेल्या अनेकांचे म्हणणे आहे. अशा परिस्थितीत भारताने डॉक्टरांचं एक पथक आपल्या नागरिकांची तपासणी करण्यासाठी तिथे पाठवलं पाहिजे. पाकिस्तानने त्यासाठी व्हिसा दिला पाहिजे. भारताने पण पाकिस्तानच्या डॉक्टरांना येथील पाकिस्तानी कैद्यांना तपासण्यासाठी व्हिसा दिला पाहिजे.




असं झाल्यास अटकेत असलेल्यांच्या, दोन्हीकडच्या, नातेवाईकांना समाधान वाटेल. यामुळे कैद्यांची नेमकी परिस्थिती काय हे देखील लक्षात येईल.

२, ज्या कैद्यांची शिक्षा पूर्ण झाली आहे आणि ज्यांची राष्ट्रीयता ठरली आहे, अश्या कैद्यांना दोन्ही देशाने तत्काळ सोडले पाहिजेत. अशा कैद्याला न सोडणं हे मानवता विरुद्ध कृत्य आहे. खरं तर सगळ्या मच्छीमारांना तत्काळ मुक्त केलं पाहिजे.

३, बोट हे मच्छीमारांच्या जगण्याचं एकमात्र साधन आहे. ताब्यात असलेल्या ज्या बोटी दुरुस्ती करून समुद्रात जाऊ शकतील त्या बोटी परत केल्या पाहिजेत.

४, मनमोहनसिंग पंतप्रधान असताना २००७ मध्ये दोन्ही राष्ट्राने मिळून कैद्यांसाठी संयुक्त न्यायालयीन समिती बनवली होती. त्यात दोन्ही देशाच्या सर्वोच्च किंवा उच्च न्यायालयाच्या ४-४ निवृत्त न्यायाधीशांचा समावेश होता. ही समिती दर सहा महिन्याला एकदा भारताच्या तुरुंगातील पाकिस्तानी कैद्यांना आणि एकदा पाकिस्तानच्या तुरुंगातील भारतीय कैद्यांना भेटायची. आपल्या देशातील न्यायाधीशांना भेटल्यामुळे कैद्यांना बरं वाटायचं आणि त्यांच्या सुटण्यास का विलंब होत आहे पासून आजारपणा सारख्या मुद्द्यांवर त्यांना न्यायाधीशांशी बोलण्याची संधी उपलब्ध होत होती. त्या समितीने खूप चांगलं काम केलं होत. मच्छीमार, महिलांना मुक्त करण्याचं संयुक्त समिती सातत्याने सर्वानुमते त्यांच्या ठरावातून दोन्ही सरकारला सांगायची. या समितीची शेवटची बैठक २०१३ च्या ऑक्टोबर मध्ये भारतात झाली होती. त्यानंतर २०१८ मध्ये ही समिती पुनर्गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला. भारताने त्याप्रमाणे नवीन चार निवृत्त न्यायाधीशांची नियुक्ती केली पण पाकिस्तानने अद्याप त्यांचे न्यायाधीश नियुक्त केले नाही. पाकिस्तानने त्यांच्या न्यायाधीशांची तत्काळ नियुक्ती करून पाकिस्तानात बैठक बोलावली पाहिजे कारण शेवटची बैठक भारतात झाली होती.

५, एग्रीमेंट ऑन कॉन्सुलर एक्सेसचा व्यवस्थित अंमल व्हायला पाहिजे. पकडण्यात आलेल्या कैद्यांना तीन महिन्याच्या आत त्या देशाच्या उच्चायुक्तालयातील अधिकारी भेटतील हे पाहिलं पाहिजे. संबंधित कैदी भारतीय किंवा पाकिस्तानी आहे ते निश्चित करण्यासाठी ही भेट आवश्यक असते. त्यासोबत शिक्षा पूर्ण झाली आणि राष्ट्रीयता नक्की झाली असेल तर एका महिन्यात त्याला तुरुंगातून सोडून त्याच्या देशात परत पाठवलं पाहिजे.

६, पकडण्यात आलेल्या कैद्यांना तीन महिन्याच्या आत उच्चयुक्तालयातील अधिकाऱ्यांना भेटायला दिलं पाहिजे, अशी एग्रीमेंटमध्ये तरतूद आहे. पण तो कैदी भारतीय किंवा पाकिस्तानी आहे ते किती महिन्यात ठरवून दुसऱ्या देशाला कळवलं पाहिजे त्याची काही मुदत नाही. बऱ्याचदा शिक्षा पूर्ण होते पण राष्ट्रीयता निश्चित झाली नसल्याने त्याला सोडता येत नाही. तीन महिन्याची त्यासाठी मुदत निश्चित केली पाहिजे आणि तशी एग्रीमेंटमध्ये तरतूद केली पाहिजे.

७, खरं तर दोन्ही देशाने एकमेकांच्या मच्छीमारांना अटक न करण्याचं धोरण स्वीकारलं पाहिजे. पाकिस्तानच्या एमएसएला जर वाटलं की, भारतीय मच्छीमारांची बोट पाकिस्तानच्या पाण्यात प्रवेश करत आहेत तर त्याला पकडण्या ऐवजी त्या बोटीला भारताच्या पाण्यात परत जाण्यासाठी ते सांगू शकतात आणि तसंच भारतीय कोस्ट गार्डचे अधिकारी पाकिस्तानच्या मच्छीमारांच्या बाबतीत करू शकतात.


मच्छीमारांच्या या प्रश्नाकडे संवेदनशीलतेने आणि माणुसकीच्या दृष्टीने पाहिलं पाहिजे. राजकारण एका बाजूला ठेवून सर्वांनी त्यासाठी एकत्रित प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

■■■

# न्याय आणि निकाल

– सुरज चव्हाण
कार्याध्यक्ष, राष्ट्रवादी युवक काँग्रेस
महाराष्ट्र प्रदेश, प्रदेश प्रवक्ता

आपला देश हा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानाच्या आधारावर चालणारा जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला देश आहे. स्वातंत्र्यानंतर देशाची लोकशाही अबाधित रहावी यासाठी घटनाकारांनी संसद, प्रशासन, न्यायपालिका अशा सार्वभौम संस्थांना स्वतःचे अधिकार दिले. आजवर देशात सार्वभौम संस्थांनी एकमेकांवर अंकुश नक्कीच ठेवला मात्र कुणाच्याही कामात ढवळाढवळ केली नाही. त्यामुळेच आजवर लोकशाहीची कार्यप्रणाली सुरळीतपणे सुरू धूर आणि दुधाच्या नद्याच वाहतात, असा भ्रम तयार केला गेला. अहो संगणकाच्या मदरबोर्डाचा जवळून फोटो काढून त्याला गुजरातमधील हायटेक सिटी म्हणून व्हायरल केले गेले, बोला. एका वेगळ्याच नशेत त्यावेळी मतदारांना जाणीवपूर्वक ढकलण्यात आले. ही नशा पहिल्यांदा २०१६ साली उतरायला सुरुवात झाली, जेव्हा मोदींनी रातोरात नोटबंदी करुन १२० कोटी जनतेला झटका दिला. असे अनेक शेख चिल्लीला लाजवणारे निर्णय केंद्रीय सत्तेने घेतलेत. त्याची गिनती कोरोना आणि लॉकडाऊन पर्यंत येऊन ठेपते. इथपर्यंत ठिक होतं, पण जेव्हा




होती. परंतु २०१४ साली गोबेल्स नीती आणि नव माध्यमांचा यथेच्छ वापर करुन केंद्रात अजस्त्र शक्तीचं सरकार विराजमान झालं आणि तेव्हापासून लोकशाही मूल्यांची पायमल्ली व्हायला सुरुवात झाली.

२०१४ साली देशात जणू एक नवी क्रांतीच झालीये, असा भास निर्माण करण्यात आला होता. अच्छे दिनाच्या गोंडस शब्दाखाली या देशातील बहुसंख्य कष्टकरी, शेतकरी, महिला, युवा वर्ग पिचला जाणार आहे, हे तेव्हा कुणाला माहीत होतं? संघाच्या विचारांचे अधिष्ठान असेलल्या भाजप पक्षाला मुळात लोकशाही हवी की नको? असा प्रश्न पडतो. गुजरात राज्याचे मुख्यमंत्री असलेले नरेंद्र मोदी यांना प्रचंड पैसा वापरुन देशपातळीवरील नेता म्हणून प्रोजेक्ट केलं गेलं. गुजरातमध्ये जणू काही सोन्याचा लोकशाहीची पाळंमुळं असणाऱ्या सार्वभौम संस्थाचे खच्चीकरण नव्हे तर त्या ताब्यात घ्यायला सुरुवात झाल्यापासून लोकशाहीला सुरुंग लागला.

न्यायव्यवस्थेवरील दबाव असो की केंद्रीय यंत्रणांचा देशातील सर्व विरोधकांना संपविण्यासाठी केलेला वापर असो याबाबतीत अनेकदा लोक खासगीत बोलू लागले. यामध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचाही समावेश झाला. देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच सर्वोच्च न्यायालयाच्या चार न्यायाधीशांनी आमच्यावरच अन्याय होतोय, आम्ही इतरांना काय न्याय देणार अशी खंत पत्रकार परिषद घेऊन व्यक्त केली. जो न्याय देतो तिच व्यक्ति न्याय मागत असेल तर त्याला लोकशाही म्हणायचे का? गेली अनेक वर्षे निरपेक्षपणे कार्यरत असणाऱ्या सरकारी यंत्रणांना एका

हुकूमशाहीप्रमाणे ताब्यात घेऊन त्याचा वापर आपल्या राजकीय विरोधकांना संपविण्यासाठी सर्रास सुरू झाला. राजकारणात स्पर्धा असावी, विरोध असावा पण द्वेष नसावा. परंतु केंद्रीय सत्ताधारी विरोधकांना व्यक्तिगत शत्रू समजून यंत्रणेच्या माध्यमातून त्यांना शरणागती पत्करायला भाग पाडत आहेत. "सामील व्हा नाहीतर तुरुंगात जा", असा एक पॅटर्नच देशभरात जन्माला आलाय. जे शरण येत नाहीत त्यांच्यावर खोटे आरोप करून, त्यांची राजकीय बदनामी करायची आणि राजकीय-सामाजिक जीवनातूनच त्यांना संपवायचे. अशाप्रकारची षडयंत्रे देशभरात शिजताना दिसतायत. त्यात महाराष्ट्रही आला.

२०१९ साली केंद्रात पुन्हा एकदा पाशवी बहुमताच्या जोरावर केंद्रात भाजपची एकहाती सत्ता आली. पुढे विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात राजकीय गणित बदलली. २५ वर्षे एकत्र



नांदणाऱ्या शिवसेना-भाजपचा काडीमोड झाला. शरद पवार यांच्या करिष्म्यामुळे राज्यात महाविकास आघाडी सारखा प्रयोग झाला. देशात आम्हाला कोणीही नडू शकत नाही, अशा अविर्भावात वावरणाऱ्या केंद्रीय नेतृत्वाचा अहंकार यामुळे दुखावला गेला. २५ वर्षे सोबत असणाऱ्या मित्र पक्षांनी साथ सोडली ही सल 'हम करेसो कायदा' समजणाऱ्या नेतृत्वाला फारच झोंबली. राज्यात क्रमांक एकचा पक्ष असूनही विरोधात बसणे कठीण होते. मग अडीच वर्षाच्या कार्यकाळात यंत्रणेतील आपल्या विचारांच्या लोकांच्या माध्यमातून मदत घेऊन आपल्या विरोधकांच्या हालचालींवर लक्ष ठेवू लागले. यंत्रणेतील काही लोक भाजपचा स्लिपर सेल म्हणून काम करू लागले. या यंत्रणा फोन टॅप करून विरोधकांच्या हालचाली त्यांच्यापर्यंत पोहोचवू लागल्या. सर्व प्रकारच्या यंत्रणेचा वर्षाच्या कार्यकाळात विविध रूपात वापर करण्यात आला. यादरम्यान अनेकांनी रात्रीला शांत झोप लागावी म्हणून भितीपोटी भाजपमध्ये प्रवेश केला. परंतु महाराष्ट्राला लढणाऱ्या महापुरुषांची परंपरा आहे. त्यात काहीजण मुद्देसूर लढले, भाजपचे पितळ सर्वसामान्य जनेतसमोर पुरव्यांसहित आणू लागले, मग काय जे लढले त्यांच्यावर कथित आरोप करून जेलमध्ये टाकण्यात आले. ज्यांनी भाजपसमोर शरणागती पत्करली ते पवित्र झाले, त्यांच्यावरील कारवाई प्रक्रिया लगेच थंडावू लागल्या. या लढाईमध्ये यंत्रणेमधील साथ देणाऱ्या लोकांच्या पाठीशी भाजपा खंबीरपणे उभे राहू लागली. मग तर भाजपच्या कार्यकर्त्यांकडून दररोज भ्रष्टाचाराचे पाढे वाचण्याची रणनीती सुरू झाली. कारवाईची तारीख व वेळ देखील आधीच ठरविण्यात येऊ लागली. ज्यामध्ये काहीच पुरावे मिळत नाही त्यांना कायद्याच्या कचाट्यात अडकविण्याकरिता विशिष्ठ कलमांचा वापर करून ही प्रकरणे जाणीवपूर्वक न्यायालयात नेण्यात आली. जनतेत संभ्रम निर्माण करण्यासाठी न्यायालयानेच निकाल दिला हे सांगण्यासाठी ही खेळी करण्यात आली. परंतु अजूनही पदांचा गैरवापर प्रकरणी भाजप निगडीत व्यक्ति लक्षात घेतल्या तर न्यायालय सुध्दा त्यासाठी कार्य करतायत की काय असा समज अनेक निकालानंतर लोकांच्या मनात कायम आहे. कारण फोन टॅपींगसारख्या गंभीर प्रकरणात देखील चटकन दिलासा मिळू लागला. किरीट सोमय्याचे विक्रांत जहाज प्रकरण असो की त्याचा मुलगा निल सोमय्या याने बँकेची केलेली आर्थिक फसवणुकीचा गुन्हा असो, बोगस मजूर बनून प्रवीण दरेकर यांनी केलेली बँकेची फसवणूक व घेतलेला लाभ असो, अवैध बांधकाम करणारे राणे कुटुंबीय असो, मोहित कंबोज यांनी कर्ज घेऊन बँकेची केलेली फसवणूक असो, मग कंगणा राणावत यांचे अवैध बांधकाम असो, अर्णब गोस्वामी याच्यामुळे एका व्यावसायिकाला केलेल्या कामाचे पैसे न दिल्यामुळे आत्महत्या करावी लागली होती असा गंभीर स्वरूपाचा गुन्हा असो, लग्नाची आमिष दाखवून महिलेचे शोषण करणारा सोलापूरचा भाजपचा जिल्हाध्यक्ष असो अशा अनेक प्रकरणात भाजपा पक्षाशी निगडीत असणाऱ्या लोकांना न्यायालयीन दिलासे मिळतात हा संदेश भाजपकडून जाणीवपूर्वक देण्यात येऊ लागला. आमच्या सोबत नाही आलात तर तुमचा संजय राऊत करू. अशा धमक्या ते उघडपणे देऊ लागले. हे सर्व पाहता मनात अनेक प्रश्न उभे राहतात. खरंच भाजप पक्षाशी निगडीत झाल्यावर कसलाही गुन्हा करून आपल्याला पाहिजे तो निकाल आपण मिळवू शकतो ही भावना बळावत चालली आहे का ? न्याय व्यवस्थेवरचा विश्वास कमी होत चालला आहे ? न्यायव्यवस्थेलाच न्याय मागायचे दिवस आले आहेत का ?

सदृढ लोकशाहीच्या दृष्टिकोनातून अशा असंख्य निर्माण झालेल्या प्रश्नांची उत्तर 'नाही' असायला पाहिजेत तरच लोकशाही मजबूत आणि शाबूत राहील. परंतु बहुसंख्य लोकांना या प्रश्नाचे उत्तर काही केल्या 'माहीत नाही' असच येतय हे आपल्या सर्वांच दुर्दैव आहे. 'नाही' आणि 'माहीत नाही' या दोन शब्दांमधील अंतर स्वतःच्या मनाला बरंच काही सांगून जातं. हेच खरं सत्य.

■■■

**फ. मुं. शिंदे मित्रमंडळ व परिवार आयोजित ज्येष्ठ कवी व ८७व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष फ. मुं. शिंदे यांचा अमृतमहोत्सव समारंभ २८ ऑगस्ट रोजी पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवन, घोले रोड, पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात फ. मुं. शिंदे-खंड २ रा या पुस्तकाचे प्रकाशन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते आणि माजी केंद्रीय गृहमंत्री सुशिलकुमार शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या कार्यक्रमातील मान्यवरांची भाषणे....**



# फ. मुं. यांनी अस्वस्थता टिपण्याचे काम सुरू ठेवावे

**शरद पवार**

आजचा छोटेखानी कार्यक्रम हा एक अत्यंत महत्त्वाचा कार्यक्रम आहे. याला काही फारशी पार्श्वभूमी नाही. साहित्याच्या संदर्भात, लेखनाच्या संदर्भात, मराठवाड्यातल्या परभणी जिल्ह्यातल्या एका लहानशा परिसरामध्ये जे वाढले असे फ. मुं. शिंदे. आज या देशाच्या मराठी साहित्याच्या क्षेत्रातले एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांचा परिचय हा सर्वत्र झालेला आहे. फ. मुं. आणि माझा परिचय हा अनेक वर्षांचा आहे. औरंगाबादला जाऊन जी काही कामं असतील ती संपवल्याच्यानंतर संध्याकाळी तिथं एक गेस्ट हाऊस होतं, गेस्ट हाऊसवर मराठवाडा विद्यापीठात शिकणारे आणि शिकवणारे जे कुणी तरूण असतील त्यांना एकत्रित घेऊन त्यांच्याशी गप्पा गोष्टी मारणं हा माझा छंद होता. आणि त्याच्यामध्ये सगळ्यात गंमत असायची किंवा वैशिष्ट्य हे होतं, की अतिशय उत्तम काव्य त्याठिकाणी ऐकायला मिळायचं. आणि हे काव्य ऐकवणारे जे सगळेजण होते, त्यांचं नाव, गाव महाराष्ट्रामध्ये प्रसिद्ध नव्हतं. पण कवितेच्या संदर्भातली आस्था होती. आणि परिसरातलं जे चित्र आहे, ते चित्र काव्याच्या माध्यमातून व्यक्त करण्याची जबरदस्त शक्ती या सगळ्या तरूण लोकांच्यामध्ये होती आणि ती ऐकायची संधी मी कधी सोडत नव्हतो.

मी त्या काळात बघितलं, महाराष्ट्रामध्ये औरंगाबाद आणि नागपूर ही दोन ठिकाणं अशी आहेत, की समाजातल्या लहान थरातल्या, लहान घटकातल्या, लहान कुटुंबातल्या उत्तम साहित्य आणि कवींची भेट त्याठिकाणी निश्चित होईल. याचं कारण, जी सभोवतालची परिस्थिती होती, त्या परिस्थितीचा परिणाम या सगळ्या तरूणांच्या मनावर होत असे आणि ते काव्याच्या माध्यमातून, त्यांच्या लेखणीच्या

माध्यमातून ध्वनीत होत असे. फ. मुं. शिंदे हे त्यापैकीच एक. म्हणून मला स्वत:ला परिचित आहेत. नंतरच्या काळामध्ये त्यांच्या कर्तृत्वानं, साहित्यातल्या त्यांच्या स्थानामुळं ते संबंध मराठी भाषेमध्ये एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जायला लागले. पण हे सगळं होत असलं तरी त्यांचा साधेपणा हा कधी त्यांनी सोडलेला नव्हता.

फ. मुं. साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले. मराठवाडा साहित्य संमेलनाची संधी त्यांना मिळाली. पण त्याबरोबरच साहित्य संमेलनाचं अध्यक्षपद सासवडला त्यांना प्राप्त झालं. तो सगळा परिसर आचार्य अत्रेंचा जन्म झालेला परिसर. आचार्य अत्रेंचं गाव, त्याचं नाव कोडित. हे सासवडच्या जवळ वसलेलं आहे. त्या कोडित गावामध्ये एका लहान कुटुंबामध्ये प्रल्हाद केशव

माणसं जोडण्याची कला त्यांच्यामध्ये आहे. त्यामुळं वेगवेगळ्या ठिकाणची, वेगवेगळ्या क्षेत्रातले लोक हे जोडून ठेवणं, त्यांच्याशी सुसंवाद ठेवणं, त्यांच्याशी कायमचा सलोखा राहील याची काळजी घेणं हे काम फ. मुं.नी अखंडपणानं केलं. आज ते ७५ वर्षांचे झाले हे खरंतर मला या कार्यक्रमाचं निमंत्रण देण्यात आलं तेव्हाच कळलं. कारण त्यांच्या प्रकृतीवरून तसं काय वाटत नाही. अजूनही चाळीशी-पन्नाशीच्या आसपास असावेत हे एकंदर त्यांची तब्येतच नाही, तर आणखीन अनेक गोष्टी आहेत. पण सगळ्या सांगायच्या नसतात. त्यादृष्टीनं आज मला आनंद आहे, की त्यांचा हा अमृत महोत्सव या ठिकाणी होतोय.

साहित्यिक, कवी आणि सामान्य माणूस आणि विशेषत: खेड्यापाड्यातला माणूस याचं एक वेगळं नातं असतं. ते खूपदा



**कवी फ.मुं. शिंदे यांचा शाल, पगडी व सन्मानचिन्ह देऊन शरद पवार यांनी अमृतमहोत्सवानिमित्त सत्कार केला, तेव्हा शेजारी सचिन ईटकर, सुशीलकुमार शिंदे, सौ. लिलाताई शिंदे, कवी रामदास फुटाणे, मिलिंद जोशी आणि ऋचा शिंदे.**

अत्रेंचा जन्म झाला आणि अखंड साहित्याच्या संदर्भातलं आपलं स्थान त्यांच्या उंचीसाठी त्यांनी उंच ठेवण्याचं काम त्यांनी केलं. कर्तृत्त्व दाखवलं. हा सगळा सासवडचा परिसर आहे. कऱ्हा नदीचा उगम तिथनं होतो. त्यामुळं आचार्यांनी लिहिलेलं कऱ्हेचं पाणी, ते कऱ्हा नजरेसमोर ठेऊन त्यांनी केलेलं लिखाण हे अत्यंत उच्च दर्जाचं लिखाण आहे हे सांगायची गरज नाही. आणि म्हणून अशा या नदीच्या परिसरामध्ये साहित्यिकांचा मेळा भरतोय आणि त्या मेळ्याचं नेतृत्व, अध्यक्षपद हे कुणी करावं याची चर्चासुद्धा न करता एकमतानं फ. मुं.ची निवड त्याठिकाणी होते, याच्यामध्येच त्यांचा या क्षेत्रातला स्थानाची उंची कितपत होती याचा सार्थ अभिमान हा तुम्हाला आणि मला सगळ्यांना आहे.

फ. मुं.च्या लिखाणाच्या संदर्भात अधिक सांगण्याची आवश्यकता नाही. पण व्यक्ती म्हणून सुद्धा अतिशय गंमतशीर अशा पद्धतीची व्यक्ती. कुणाची टिंगल सहजपणानं कर, सभेचा माईक त्यांच्या हातामध्ये असल्याच्यानंतर व्यासपीठावर बसलेल्यांची फिरकी कशी घेतली जाईल याची चिंता अनेकजणांना वाटत असे आणि त्याचा अनुभव अनेकजणांनी घेतलेला असतो. पण,

बघायला मिळत असतं. अनेक खेड्यापाड्यातल्या लोकांना कवी, लेखक यांच्याबद्दलची मर्यादित माहिती असते आणि त्या मर्यादित माहितीच्यामुळं काही प्रश्नातूनसुद्धा विनोद सहजपणानं त्यांच्याबद्दलचे होत असतात. मला आठवतंय, एक दिवशी बारामतीला साने गुरूजी कथामालेचा कार्यक्रम होता आणि त्या कार्यक्रमाला दोन साहित्यिकांना आमंत्रित केलं होतं. एक ग. दि. माडगूळकर आणि दुसरे पु. ल. देशपांडे. त्यावेळेला मी महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये नुकताच निवडून आलो होतो. ही एक ५५ वर्षापूर्वीची गोष्ट आहे. त्या कथामालेच्या कार्यक्रमाची सगळी आखणी त्याची जबाबदारी माझ्यावर होती. ही दोन मोठी पाहुणे येणार. त्या काळामध्ये साधने काही नव्हती. आमचे एक बागायतदार मित्र होते आणि त्यांच्याकडे एक गाडी होती. त्यांना सांगितलं, की पाहुणे येणार आहेत. त्यांना आणायला आणि पुण्याला सोडायला तुमच्या गाडीची आवश्यकता आहे. त्यांनी सांगितलं, की गाडी घेऊन जा. मला सकाळी काम आहे. ड्रायव्हर येईल. पण तुमचा कार्यक्रम संपल्याच्यानंतर मी गाडी चालवायला येईन आणि या अटीवर मी गाडी देतो. काय हरकत नाही. त्यांची




फ. मुं. शिंदे यांच्या समग्र कवितांच्या दुसऱ्या खंडाचे शरद पवार प्रकाशन करताना, शेजारी सुशीलकुमार शिंदे, फ.मुं. शिंदे, सौ. लिलाताई शिंदे व रामदास फुटाणे

फियाट होती. ती फियाट गाडी घेऊन ते आले. कथामालेचा कार्यक्रम संपला. जेवणं झाली आणि नंतर त्यांच्या गाडीत गदिमा, पुलं, मी आणि त्या गाडीचे मालक असे निघालो परत यायला. निम्म्या अर्ध्या रस्त्यावर आमच्या गप्पा चालू होत्या. त्या बागायतदारांनी मला विचारलं, की शरदराव, पाहुणे कुठले आहेत. मी सांगितलं, की आहेत आमचे महाराष्ट्रातली फार मोठी माणसं आहेत. असं आहे व्हय म्हणाले. त्यांनी गदिमांना आणि पुलंना विचारलं, की तुम्ही करता काय? पुलं म्हणाले, की मी लिहितो. म्हणाले, कुठं लिहितो. मामलेदार कचेरीत लिहितो का पोस्टाच्या बाहेर लिहितो. गदिमांनी सांगितलं, की मी पोस्टाच्या बाहेर बसतो. कागद लिहून द्यायचं काम मी करतो आणि पुलंनी सांगितलं, की मामलेदार कचेरीच्या बाहेर अर्ज देण्याच्यासाठी जे लोक येतात त्यांचा अर्ज लिहिण्याचं काम मी करतो. ही गंमत आम्हाला त्याठिकाणी ऐकायला मिळाली.

ही सगळी माणसं अतिशय मोठ्या प्रकारची अशी माणसं आहेत. या सगळ्यांशी कधी ना कधी संपर्क येणं ही व्यक्तिगत जीवनातली अत्यंत भाग्याची गोष्ट आहे आणि ती कमी अधिक प्रमाणात मला कुठे ना कुठे मिळते. माझ्यापेक्षा शिंदे साहेबांचा संपर्क या सगळ्या क्षेत्रात अधिक आहे. आज याठिकाणी अनेक गोष्टी सांगण्यासारख्या आहेत. पण त्याच्यावर मी अधिक बोलून आपल्या सगळ्यांचा वेळ घेणार नाही. फ. मुं.नी जे काय योगदान दिलं साहित्याच्या माध्यमातून त्याच्यामध्ये मला एका गोष्टीचं अतिशय आनंद होतोच, समाधान वाटतं, की त्यांचं काव्य, त्यांचं लिखाण याच्यातून समाजाची अस्वस्थता हीसुद्धा अनेकवेळेला व्यक्त होत असते. ते ज्या काय कविता लिहित असतात त्याच्यातून काहीतरी एक वेगळं आम्हाला आहे असं जाणवतं. त्यांच्या काव्यामध्ये, त्यांच्या लिखाणामध्ये कधी शेत दिसतं, कधी पाण्याचे झरे दिसतात, ग्रामीण भागातले शब्द पदोपदी दिसतात. एखाद्या



ऋचा शिंदे या शरद पवारांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना, शेजारी सुशीलकुमार शिंदे, फ.मुं. शिंदे व रामदास फुटाणे.

धरणाच्या प्रकल्पावर त्यांना किती आस्था आहे हे पाहायला मिळते. त्यामुळंच त्यांचं लिखाण किती प्रभावीपणानं, सहजतेनं ते लिहितात हे वाचण्याची संधी आपल्या सगळ्यांना मिळाली.

मराठवाड्यामध्ये पाण्याचा प्रश्न हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे आणि त्यामुळं जलाशय याच्याबद्दलची त्यांच्या मनातली कल्पना, त्यांच्या मनात असलेली आस्था ही सुसंवाद साधतो त्यावेळी बघायला मिळते. कधी कधी मला लक्षात येत नाही, त्यांना जायकवाडीबद्दल प्रेम अधिक आहे, का कडूलिंबाच्या झाडाबद्दल अधिक आहे. पण या सगळ्या जलाशयाचं आणि शिवाराचा आणि विशेषत: मराठवाड्यातल्या पाण्याच्यासाठी तहानलेल्या शेतीचा जो संबंध आहे, त्या संबंधाच्या संदर्भातच त्याचं महत्त्व हे फ. मुं.ना पटलंय हे सांगायची आवश्यकता नाही. आणि त्यामुळं त्यासंदर्भातलं त्यांचं लिखाण हे सहजपणानं आपल्या सगळ्यांना बघायला मिळतं.

आज आपल्या सगळ्यांच्या उपस्थितीमध्ये त्यांचा सत्कार याठिकाणी होतोय. पण कधी कधी मला वाटतं, अलिकडं त्यांच्या मनामध्ये अस्वस्थता फार आहे. जे काय देशातलं, राज्यातलं चित्र दिसतं, त्या चित्रामुळं त्यांच्या मनामध्ये अस्वस्थता असावी. कुठं अन्याय असेल, अत्याचार असेल, दुर्लक्ष करत असेल, समाजातला मोठा वर्ग वंचित राहात असेल तर त्यासंबंधी ते बोलणार नाहीत, पण ते अस्वस्थ असतात. कधी लेखणी हातामध्ये घेतली तर सहजपणानं त्यांची ही अस्वस्थता ही आपल्या सगळ्यांना बघायला मिळते. त्यांनी मध्यंतरी लिहिलं होतं, की इथून पुढं रान पेरायचंच नाही, उगवत नसेल तर कशासाठी मशागत करायची, कशासाठी फसगत करायची त्या बियाण्याची. या तीन-चार ओळी त्यांच्या वाचल्याच्यानंतर मला स्वत:ला वाटतं, की ते शेती, शेतकरी, बियाणं, पेरणी याच्यासंबंधीचा विचार त्यांच्या मनात असेल. पण तो तेवढा सीमित असेल असं वाटत नाही. त्याच्यामुळं कदाचित त्यांच्या मनामध्ये हे असायची शक्यता आहे, की आजचं समाजाचं चित्रच इतकं अस्वस्थ आहे, ते अस्वस्थ चित्र पाहिल्याच्यानंतर त्याच्यासाठी मग कशासाठी पेरणी करायची विचाराची किंवा अन्य कुठली शब्दांची याबद्दलचा विचार त्यांच्या मनामध्ये कदाचित येत असेल. पण विचार पेरून जर बदल होत असेल, क्रांती होत नसेल तर त्याची आवश्यकता किती आहे, उपयुक्तता किती आहे हे सहजपणानं ते सांगून जातात.





सौ. लिलाताई शिंदे यांचा सत्कार करताना अनिता घोसल व सौ. पतंगे.

अशा अनेक गोष्टी आहेत. समाजात दैनंदिन जीवनात दिसणाऱ्या गोष्टी, त्यांना अस्वस्थ करणाऱ्या बाबी या त्यांच्या लिखाणाच्या माध्यमातून आपल्या सगळ्यांच्यासमोर सहजपणानं मांडण्याची शक्ती ही त्यांच्यामध्ये आहे आणि त्यामुळं आज गेली अनेक वर्षे मराठी सारस्वतांच्यामध्ये त्यांचं एक आगळंवेगळं स्थान आहे. ते कायम राहील याच्याबद्दल माझ्या मनामध्ये कुठल्याही प्रकारची शंका नाही. ते अखंड लिहित राहतील. त्यासाठी त्यांची तब्येत उत्तम राहील आणि माझी खात्री आहे, की हे जे काम त्यांनी सुरू केलंय, ते काम लिखाणाचं गेली अनेक वर्षे ते करतायंत. ते त्यांनी करत राहावं. मराठी साहित्यामध्ये एक जबरदस्त शक्ती त्यांनी उभी केलेली आहे. ती आणखी मजबुतीनं राहील कशी याची काळजी त्यांनी घ्यावी हीच आपण सगळेजणं त्यांच्याबद्दल आस्था असलेले आणि त्यांच्या काव्याच्यासंबंधी रस असलेले आपल्या सगळ्यांची ही अपेक्षा त्यांच्याकडून आहे. एवढंच याठिकाणी सांगतो. त्यांना अंत:करणापासून मी शुभेच्छा देतो आणि आपल्या सगळ्यांची रजा घेतो. जय हिंद! जय महाराष्ट्र!!

■■■



# जातीपातीच्या पलिकडे विचार करणारा कवी फ.मुं. शिंदे

प्रा. विश्वास वसेकर

१९६८पासून कवीवर्य फ. मुं. शिंदे यांच्याजवळचा मी माणूस आहे. ते मला त्यांचा मित्र मानत असले तरी माझ्यासाठी ते गुरू आणि परमेश्वर आहेत. दुसरं नातं, मी त्यांच्या कवितांचा समीक्षकही आहे. या दोन्ही नात्यांना स्मरून मी थोडंसंच बोलणार आहे.

मित्रहो, आम्ही कविता लिहियाला लागलो, तो १९६८च्या सुमाराचा काळ. वाङ्मयाच्या क्षेत्रात उदंड उत्साहाचा आणि सकस साहित्यनिर्मितीचा काळ होता. दलित साहित्याच्या उदयाचा, नारायण सुर्वेंची कविता स्थिरावण्याचा आणि आमच्या कविता प्रसिद्ध करणाऱ्या अस्मिता आदर्श हे त्रैमासिक सुरू होण्याचा तो काळ होता. फ. मुं.चा जुलूस हा संग्रह १९७२ साली प्रसिद्ध झाला. हा त्यांचा पहिला कवितासंग्रह. म्हणजे यावर्षी फ. मुं.च्या वयाचा जसा अमृतमहोत्सव आहे, तसा त्यांच्या कवितेचा सुवर्णमहोत्सव आहे या दोन्हीबद्दल कवीवर्य फ. मुं. शिंदे यांचे मी अभिनंदन करतो.

मित्रहो, महाविद्यालयांच्या स्नेहसंमेलनाच्या भाषणांमधून समाजात वावरताना आणि मित्रांच्या सहवासात फ. मुं.ची प्रतिमा हसरा आणि हसवणारा, विनोदात्मकतेचे अंग असणारा, प्रसंगी कोट्या करत हजारोंच्या गर्दीला हसवणारा अशी असली तरी हा माणूस आतून आपल्या कवितेतून किती गंभीर आणि दु:खी असू शकतो हे मी पन्नास वर्षे जवळून पाहात आलोय. उस आदमी के दर्द का आलम न पूछिए, हर हाल मे जो आदमी हसता दिखाई दे। नारायण सुर्वेंच्या भाषेत बोलायचे तर विचार करावा आणि उदास व्हावे अशा सामाजिक वास्तवाचा हा काळ आहे. अशा कालखंडात फ. मुं.नी आपल्या कवितेतून शोषित, पीडित, दलितांच्या दु:खांची मांडणी केली. त्यांचा माझ्यावर झालेला सगळ्यात मोठा संस्कार जातीपातीच्या पलिकडं जाऊन विचार करणे हा आहे.

जन्मजात राजकीयदृष्ट्या स्वार्थाची आणि फायद्याचे असूनही म्हणजे एक लाख अमूक लाख वगैरे असली तरी फ. मुं.नी कधी ती जात मिरवली नाही. मी जन्मानं कुणीही असो, कर्मानं दलित आहे असं ते म्हणत. काहींना आपले पुरोगामित्व सिद्ध करण्यासाठी ब्राह्मणांवर टीका करणे अगत्याचे वाटते. फ. मुं.नी असल्या घाणीत कधी हात घातले नाहीत. ब्राह्मण समाजाबद्दल असे एकदा ते म्हणाले होते, की शिवाजी हे आपल्या मुलांचं नाव ठेवण्यात ब्राह्मण अग्रेसर आहेत. शिवाजी हे नाव ब्राह्मणांइतकं कुणीच आपल्या मुलांना दिलं नाही. आमच्यासारख्या धाकट्यांवर फ. मुं.नी हा मोठा संस्कार केला. पाच-पाच वर्षे एका खोलीत राहून आम्हाला एकमेकांची जात काय आहे याची कधी उत्सुकता वाटली नाही.

जातीपातीच्या पलिकडं विचार करणाऱ्या फ. मुं.चं फकीर हे नाव ठेवणारा मोठा द्रष्टा पुरुष किंवा स्त्री असली पाहिजे. फकीर हा अरबीतून उर्दुत आलेला शब्द आहे. जफर गोरखपुरींचा शेर आहे, जिंदगी है फकीर की झोली, दर्द की भीक डालते जाओ. दु:ख, दुष्काळी मराठवाडा आणि फकिरी यांचा संवेदनशीलतेत झालेला विलाप म्हणजे फ.मुं. कवी ग्रेस स्वत:च स्वत:ला दु:खाचा महाकवी संबोधतात. दु:खाच्या खऱ्या महाकवीचं नाव आहे, फ. मुं. शिंदे. दु:खाच्या इतक्या परी मी क्वचितच कुणा समकालिन कवींमध्ये अनुभवलेल्या आहेत. १९९३मध्ये किल्लारीला भूकंप झाला. फ. मुं.च्या मडकं गेलं फुटून या कवितेत ते दु:ख उमटलं. मडकं गेलं फुटूनमध्ये मृत झालेला कावळा आणि उद्‌ध्वस्त झालेली चिमणी कोण विसरू शकेल. आज वृद्ध आई-वडिलांबद्दल कृतघ्नतेचे प्रमाण समाजात वाढत आहे. वृद्धाश्रमांची आणि तिथल्या बेघरांची

बेसुमार वाढ होत असताना एकट्या फ. मुं.नी वृद्धत्व ही कविता लिहून समस्त वृद्धांचं दु:ख मुखोद्गत केलं. त्यांच्या या ओळी पाहा, चंदनानं नित्यनेमानं फक्त झिजायचं हे कसं, पाळायचं, पोसायचं, पोक्त करायचं आणि त्यांनीच पुन्हा निराधार झुरायचं हे कसं. या कवितेतल हे कसं हा भेदक प्रश्न म्हाताऱ्या आई-वडिलांना घराबाहेर काढणाऱ्या हरामखोर कार्ट्यांना शरमेनं मान खाली घालायला लावणारा आहे. वृद्धत्त्वाच्या दु:खानं गदगदलेली जराजर्जर झाडं, अवतार, बागबान यासारख्या चित्रपटांत किंवा नटसम्राट, संध्याछाया यासारख्या नाटकात पाहायची आणि एखाद्या कीर्तनकाराच्या नि:श्वासात काळाचा महिमा आहे महाराज असं म्हणून फ. मुं. थांबले नाहीत. तर त्यांनी वृद्धत्व या कवितेतून दु:ख मांडलं. याला जोडूनच मी फ. मुं.च्या आई या कवितेचा उल्लेख करीन. राजकवी यशवंत आणि माधव ज्युलियन यांच्यानंतरच्या कवींनी आईवर प्रेम करणं थांबवलं की काय याला फ. मुं.ची आई ही कविता सुंदर उत्तर आहे. फ. मुं.नी ही एक जरी कविता लिहिली असती तरी आपण सासवडला त्यांना संमेलनाध्यक्ष केलं असतं.

फ. मुं. मराठवाड्यातील असणं हा आम्हा मित्रांसाठी अभिमानाचा विषय आहे. शक्य असून एकुलता मुलगा कपिल आणि एकुलती मुलगी ऋचा पुण्यात असून, त्यांनी औरंगाबाद सोडलं नाही. नुसते एवढेच नाही, तर फ. मुं.च्या कवितेतूनही मराठवाड्याच्या मातीचा गंध दरवळत असतो. मराठवाडी बोलीतले तसेच तिथली राजभाषा असलेल्या उर्दुतले अनेक सुंदर शब्द सहजपणे त्यांच्या कवितेत येतात. उदाहरणार्थ, संग्रहाचे नाव आहे जुलूस, याशिवाय तुझे या अर्थाने तुप्रे हा शब्द, बेशरम, लंपट या अर्थाने लाचर हा शब्द, पळसाच्या तागासारखा भाग या अर्थाने वाख हा शब्द किंवा शेणांच्या गोवऱ्यांचं पिरॅमिड या अर्थाचा हुडवा हा शब्द, असे कितीतरी शब्द फ. मुं.च्या कवितेत भेटतील.

मी मराठवाड्याचा, फ. मुं.च्या छत्रछायेत वाढलेला कवी. आता चांगल्या अर्थानं पुणेकर झालो आहे. माझ्या या पुण्यात, मराठवाड्याच्या आधी फ. मुं.चा अमृतमहोत्सव होतोय, याचा पुणेकर म्हणून मला अभिमान वाटतो. त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा द्यायला मला महाकवी मिर्झा गालिबच्या शब्दांची मदत आवडेल. फ. मुं. तुम जियो हजारो बरस, हर बरस के दिन हो पचास हजार. संयोजकांनी इथं बोलण्यासाठी मला पाचारण केलं आणि तुम्ही श्रोत्यांनी माझे दोन शब्द ऐकून घेतल्याबद्दल आभार मानून थांबतो. धन्यवाद!



# लोकांशी संवाद साधत राहणं मला आवडतं

## फ. मुं. शिंदे

मित्रहो, या कार्यक्रमाचं आयोजन उत्तम केलं, त्याबद्दल मी माझ्या मनातली कृतज्ञता व्यक्त करतो. मला खरोखर मनापासून आनंद झालांय. खरं म्हणजे पुढच्या वर्षाला मागचं वर्ष ढकलून असं चालतं करतं या अर्थानं ७४ वर्षे पूर्ण झाली. बाकी माणूस जिथं असतो तिथंच असतो. तो तरूणही असतो, म्हाताराही असतो. त्याला काही फरक पडत नाही. मला या गोष्टीचा आनंद आहे, की ही सगळी उत्तम वाटचाल करताना घरातलं वातावरण खूप छान असावं लागतं. त्याच्या आमच्या सुविद्य पत्नी लिला शिंदे इथे उपस्थित आहेत. खरं म्हणजे तिचं नाव घेऊनसुद्धा लोक माझ्याविषयी अभिप्राय करतात, की फ. मुं.च्या लिला काय सांगाव्या म्हणे. म्हणजे हेही साधतात आणि तेही साधतात. त्या स्वत: समाजशास्त्राच्या प्राध्यापिका राहिलेल्या आहेत आणि बालसाहित्यालं ते मोठं नाव आहे. असा हा एकाचवेळी घरातली दोन माणसं एकत्रित राहणं म्हणजे साधी गोष्ट नाही.

मित्रहो, मी सांगायला बसलो तर खूप मोठा इतिहास मी सांगू शकतो. पण, तो वेळ घेणार नाही. एक-दोन कविता फक्त म्हणतो आणि माझं मनोगत मी संपवतो. एका लहान अशा खेड्यातून, कळमनुरी तालुका, त्याच्यात एक छोटंसं गाव रूपूर, पुन्हा पोस्ट नांदापूर, नांदापूर म्हणजे नरहर कुरूंदकर यांचं आजोळ, कुरूंदकर गुरूजी होते, तोपर्यंत मला म्हणायचे, की जास्त गमजा करू नको फ. मुं. माझ्या आजोळशिवाय तर तुला पत्रच मिळायचं नाही. कारण, आमचं पोस्ट नांदापूर होतं. तर अशा एका खेड्यातून मी

आलो. साहेबांनाही माहित आहे, एकदा मी निवडणूक लढवली होती कळमनुरीला आमदारकीसाठी. तर लोकांनी सांगितलं मला, की अहो तुम्ही इतके लोकप्रिय कवी आहात, निवडणूक का लढवली. मी म्हटलं, की तुम्ही फार चांगला प्रश्न विचारला. त्यासाठीच लढवली. आपण किती लोकप्रिय आहोत हे उभं राहिल्याशिवाय कळत नाही आणि ती लोकप्रियता किती खरी होती हे पडल्याशिवाय अनुभवता येत नाही. तर हे अनुभव घेण्यासाठी आहे. कारण आम्ही खूप राजकारणावरसुद्धा, मी रामदासजी वगैरे आम्ही लिहितो. जरा वेगळ्या अंगानं. लोकशाहीने हक्क दिले. ते ज्यांनी घेतले, त्यांनीच थक्क केले. इतरांना अंधारात ठेऊन स्वत:चे घर लख्ख केले. हे किती लोकशाहीची व्याख्या वेगवेगळ्या पद्धतीनं करता येते.

कविता हा शब्द आम्ही रामदासजी फुटाणे यांच्या कवितेसाठी तेही वापरतात. आम्हीही वापरतो. तेव्हा प्रतिकात्मक बोलत राहणं, सतत संवाद साधत राहणं हे मला स्वत:ला आवडत आलं.

मी लोकमतमध्ये एक सदर चालवत असे. लोक प्रश्न विचारायचे आणि मी उत्तर देत असे. आता काय उत्तर येईल. मला एकजणानं प्रश्न विचारला, काय डोकं लावतात प्रश्न विचारायला, की काल बाईचा पदर डोक्यावर होता, आजच्या स्त्रीचा पदर खांद्यावर आला, तर उद्याच्या स्त्रीचा पदर कुठं जाईल? आता त्यांना वाटलं, की हे काहीतरी विनोदी उत्तर देणार. पण मी त्याला एवढंच सांगितलं, की स्त्रीचा पदर कुठून कुठंही गेला, तरी अंतिमत: पुरूषाला पदरात घेणारी स्त्रीच असते. त्याच्यामुळं तो प्रश्न कसा समजून घ्यायचा हा तो खरा प्रश्न असतो. काय कुणाच्या डोक्यात



फ.मुं. आणि लिलाताई शिंदे यांना एका हारात गुंफून उपस्थितांनी त्यांचा सत्कार केला.

आता खरं म्हणजे मी एक दृष्टांत दिला. लोकांना वाटलं, की ही चावट टीकाच आहे. तिच्या एका स्पर्शानं म्हातारा तरूण झाला. काठाकाठानं का होईना समुद्र फिरून आला. अहो, ही म्हटलं सत्येवर लिहिलेली कविता आहे. मोरारजी देसाई त्याही वयामध्ये पंतप्रधान झाल्यानंतर तरूणांना लाजवतील अशा वेगाने चालायचे. कारण हा सत्तेचा स्पर्श असतो. हे तारूण्य त्याच्यामुळं प्राप्त होत असतं. अशा वेगवेगळ्या दृष्टीनं आपण ते पाहात असतो आणि त्या राजकारणावरही कविता लिहित असतो. नखावर शाई, तेवढीच फक्त तुमची माझी लोकशाही. निवडणूक आली की मतदान करायचं, तो एक ठिपका लावतो, परत यायचं नाही. बाकी तुमचा लोकशाहीशी काय कवडीचाही संबंध राहत नाही. म्हणून नखावर शाई, तेवढीच फक्त तुमची माझी लोकशाही, असं काही भाष्य येईल सांगता येत नाही. असाच एक प्रश्न, की आपण कुठंही प्रवेश घेताना कॉलेजमध्ये वगैरे, असा एक फॉर्म असतो छापील, तिथं लिहिलेलं असतं, की वडिलांचे नाव ऑब्लिक पालकाचे नाव. त्याच्या डोक्यात ते पक्कं घुसलं. त्यानं प्रश्न विचारला, आपण वडिलांना जसं पालक म्हणतो, त्याप्रमाणं आईला शेपू का म्हणत नाही. आता पालक–शेपू, कुठं बाजार, तर ते त्यांना आणून ठेवलं. त्यानेही फार भ्रमात राहू नये. म्हणून मी त्याला उत्तर दिलं होतं, की जी मुलं आपल्याच जन्मदात्यांना भाजीपाल्यासारखं मोजतात, त्या मुलांचा कडीपत्ता व्हायला वेळ लागत नाही. का, तर कडीपत्त्याचं प्राक्तन सगळ्यांना माहित आहे, की फोडणीच्या कढत्या तेलामध्ये तडफडत राहायचं आणि माणसं जेवायला बसल्यानंतर कडीपत्ता बाजूला काढतात. घासाचं भाग्यसुद्धा त्याच्या नशिबात नसतं.

असा हा प्रवास किती वेगवेगळ्या पद्धतीनं, म्हणजे आम्ही गॅदरिंगला जातो, तिथं व्याख्यानाचे विषय वेगळे. ही प्रश्नोत्तराची सदरे आम्ही चालवली, ते विषय वेगळे. थोरामोठ्यांच्यावर कविता लिहिली, ते विषय वेगळे. मी साहेबांच्यावर सुद्धा एक सुंदर लेख लिहिला होता. मला आवडणारा आहे तो. कुठून कवीला प्रेरणेचा स्रोत प्राप्त होईल हे काय सांगता येत नाही. अनेक कवींच्या प्रेरणांचा स्रोत म्हणून सुद्धा पवार साहेबांच्याकडं आम्ही पाहतो. हे साहित्यावरचं त्यांचं नुसतं प्रेम नाही, ते आकलनही आहे, आणि साहित्यालासुद्धा त्यांच्या आश्रयाला जावं हे वाटणंसुद्धा त्या व्यक्तिमत्त्वाचं एक मोठेपण आहे. आणि त्या व्यक्तिमत्त्वाचं प्रेम मला लाभणं, आमचे मोठे बंधू सुशिलकुमारजी शिंदे यांच्याही रसिकतेनं आमच्या कवितांवर प्रेम केलेलं आहे. ही सगळी माणसं माझ्यादृष्टीनं राजकारणातली नाहीत. ती फक्त माझ्या जीवनातली माणसं आहेत असं मला खूप आनंदानं सांगावसं वाटतं.

आई या कवितेनं मी माझ्या मनोगताचा समारोप करतो. ही खरी म्हणजे माझी आई गेल्यानंतर मी लिहिलेली ही कविता आहे आणि कवी कुठं बसून लिहितो, कसा लिहित असेल, याची लिहिण्याची टेबल आहे का. काय नाही. मी प्राध्यापक होतो मराठीचा आणि शिकवणारा प्राध्यापक होतो. म्हणजे मुलं येवो न येवो, पण मी वर्गात नेहमी जात असे. आपण न गेलो तरी सर वर्गात येतात म्हणून मग लाजंकाजं विद्यार्थी यायचे. त्यांना वाईट वाटायचं. तेव्हा स्टाफरूममध्ये बसून लिहिलेली ही कविता आहे. कुणाला काय मी पत्ता लागू देत नसे. तर आई ही कविता मी आपल्यासमोर ठेवतो आणि समारोप करतो. माझे एक सहकारी होते. ते म्हणाले, की आई या शब्दाचं आकलन मला जरा वेगळं झालेलं आहे. आई या शब्दामध्ये दोन शब्द आहेत. दोन शब्दांचा हा एक आई शब्द तयार झालेला आहे. कोणते, तर आ म्हणजे आत्मा आणि ई म्हणजे ईश्वर. आत्मा आणि ईश्वर यांच्या संगमाचं दर्शन ज्या व्यक्तीत घडतं ती आई. काय सुंदर विवेचन त्यांनी केलं.

या कवितेनं मी समरोप करतो. आई हे एक नाव असतं, घरातल्या घरात गजबजलेलं गाव असतं. सर्वात असते तेव्हा जाणवत नाही, आता नसली कुठंच तरीही नाही म्हणवत नाही, जत्रा पांगते, पालं उठतात, पोरक्या जमिनीत उमाळे दाटतात, आई मनामनात तशीच ठेऊन जाते काही, जीवाचं जीवालाच कळावं असं देऊन जाते काही, आई असतो एक धागा, वातीला उजेड दावणारी समईतली जागा, घर उजळतं तेव्हा तिचं नसतं भान, विझून गेली अंधारात, की सैरावरा धावायलाही कमी पडतं रान, पिकं येतात जातात, माती मात्र व्याकूळच, तिची कधीच भागत नाही तहान, दिसत काहीच नसलं डोळ्यांना तरी खोदत गेलो खोल खोल, की सापडतेच अंत:करणाची खाण, याहून का निराळी असते आई, ती घरात नाही तर कुणाशी बोलतात गोठ्यात हंबरणाऱ्या गाई, आई खरंच काय असते, लेकराची माय असते, वासराची गाय असते, दुधाची साय असते, लंगड्याचा पाय असते, धरणीची ठाय असते, आई असते जन्माची शिदोरी, सरतही नाही, उरतही नाही, आई हे एक नाव असतं, आता ती नसते तेव्हा घरातल्या घरात गलबललेलं गाव असतं, आई एक नाव असतं.

धन्यवाद!

■■■



अमृतमहोत्सवानिमित्त फ. मुं. शिंदे यांचा पुस्तक भेट देऊन सत्कार करताना सासवडचे रावसाहेब पवार व इतर मान्यवर.

# भाषा तुमच्या मातीतून येते

**भालचंद्र नेमाडे**


**ज्येष्ठ कवीवर्य ना. धों. महानोर यांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्त जळगावच्या जैन हिल्सवर एक छोटेखानी समारंभ आयोजित करण्यात आला होता. ज्येष्ठ मराठी साहित्यिक व ज्ञानपीठ पुरस्कार विजेते डॉ. भालचंद्र नेमाडे यांच्या शुभहस्ते आणि जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक भवरलाल जैन यांच्या अध्यक्षतेखाली हा समारंभ झाला. त्याप्रसंगी झालेली ही भाषणे...**

कवीवर्य ना. धों. महानोर, मी फार लोकांना कवीवर्य म्हणत नाही, पण हे कवीवर्य आहेत आपल्यात आणि खानदेशाच्या परंपरेत ते शोभून आहेत. खानदेशात आधीपासून मोठमोठे कवी झाले आहेत आणि शांतपणे त्यांनी आपापली कामे केली. पेपरबाजी नाही, भानगडी नाहीत, असे जे काही आपण जाणतो, कवीवर्य बालकवी आहेत, केशवसूत आहेत, विनायक आहेत. अगदी मुक्ताबाईपासून आपल्याकडे बहिणाबाईंपर्यंत मोठ्या परंपरा आहेत. पण शांत आहेत. गोंधळ नाही केला कुणी आणि शांतपणे कविता त्यांनी मोठमोठ्या केल्या आणि ज्याला आम्ही इंग्रजीमध्ये म्हणजे ऐटशाही वर्ग झेनिथ म्हणतात, त्याच्या पलिकडे काही कोणाला जाणे शक्य होत नाही. ताटी उघडा ज्ञानेश्वरापासून ते या भुईने या भुमीला इथपर्यंत जे हे झेनिथ मराठीत आहे ते आपल्याला दिसेल. याच्यावर अजून एक्सप्रेशन जाऊ शकत नाही.

आम्ही भाषेचा अभ्यास करतो, तेव्हा आम्ही नेहमी पाहतो की जेव्हा एखादा शब्द येतो तो कुठून येतो. म्हणजे खूप आता जगभर त्याचे रिसर्च चालले आहेत, की एक भाषा बोललेली चांगली का दोन भाषा बोललेल्या चांगल्या का जास्त भाषा बोलल्यामुळे काय काय होतं वगैरे वगैरे. त्या सगळ्याचा एक सारांश असा आहे, की जी काही भाषा तुम्ही बोलता ती तुमच्या मातीतून येते. म्हणजे तुम्ही लहानपणापासून म्हणजे जन्मत: तिथे दूध पिता आईचं, नंतर खेळता, पशू-पक्षी, काऊ-चिऊ-माऊ हे काय इंग्लंडमध्ये तुम्हाला दिसत नाहीत. पण ते आपल्या मातीत असतात. त्यामुळे मग आपण काऊ-चिऊ-माऊच्या कविता गाऊन, किंवा ये गं येगं सरी वगैरे असं, म्हणजे रेन रेन गो अवे हे आपल्यात नाहीये, आपल्याकडे उलट ये रे ये रे पावसा आहे. हे मातीतून येतं. आणि जेव्हा मातीच्या विरूद्ध आपण शिकवायला जातो रेन रेन गो अवे तेव्हा मग तुमचं डोकं आऊट झालेलं असतं. अशी आज आपली परिस्थिती इंग्लिश मीडियममुळे झालेली आहे.

पण, आमची जी काही पिढी आली सगळी, म्हणजे आमची ५५-५६ वर्षांची दोस्ती आहे अतिशय जवळची. म्हणजे एकमेकांना शिव्या देण्यापर्यंतही ती गेलेली आहे आणि असं का लिहिलं, तसं का लिहिलं इथपर्यंत आम्ही एकमेकांना बोलू शकतो ही फार थोड्यांना हिम्मत अशी आहे, तशी त्यांच्यातही ती आहे. आणि त्यांना जे काय सांगितलं, ते आम्ही कविता म्हटलं तर कविता लिहियाची. आम्ही त्यावेळी शेतकऱ्यांची मुलं, मातीतली आणि त्यावेळचं जे काही मराठी होतं ते मुंबई, पुणे ते अगदी सेंटर ज्याला म्हणतात तिथलंच फक्त साहित्य, बाकी मग काही खरं नाही. हे अशुद्ध आहे, याच्यात काही जान नाही वगैरे. तर आम्ही ते सगळं पलटून मग मातीच्या कविता ज्या वर आणल्या ते एक तुम्हाला उदाहरण याच्यात दिसतं. तशा त्या साठीत सगळीकडं अशी क्रांती झाली आणि मातीतून मग कविता येत गेली आणि त्याच्यातून मग आपल्याला हे जे काही वैभव असतं ते दिसतं.

नामदेवरावांचा आणखी एक मला महत्त्वाचं उदाहरण असं वाटतं, की त्यांनी म्हणजे मी फक्त त्यांच्या साहित्यावरच बोलू शकतो. मला माहित नसलेल्या त्यांच्या अनेक गोष्टी आहेत. म्हणजे मी त्याला भानगडीच म्हणतो बऱ्याचदा, की ते असेंब्लीत काय होते, कुठे पार्लमेंटमध्येही असतील की काय, मला माहिती नाही. पण बऱ्याच गोष्टी त्यांनी केल्या. शेती, कृषी क्रांती, मग





**कविवर्य ना. धों. महानोर यांचा ८० व्या वाढदिवसानिमित्त सुताचा हार व महात्मा गांधींचा पुतळा भेट देऊन डॉ. भालचंद्र नेमाडे आणि अशोक जैन यांनी सत्कार केला तेव्हा शेजारी किरण बच्छाव, नारायण बाविस्कर आणि नाट्यकर्मी शंभू पाटील.**

शेतीच्या ज्या आर्थिक व्यवस्था आहेत, त्या खानदेशाला शोभूनच आहेत. परंतु, त्या मला फार काय माहित नाहीत. कारण मी फक्त साहित्यातला माणूस आहे. पण त्यांनी या अशा अनेक गोष्टी, अगदी साहित्यातसुद्धा त्यांना अगदी लोककथा, गावातली जी लोकं बोलतात, त्या लिहियाला सांगितलं तर दहा-पंधरा लिहून दिल्या त्या. इतकं त्यांच्या डोक्यात काही काही चाललेलं असतं आणि इतकंच नाही, ते आमच्याकडे म्हणजे मी औरंगाबादला पंधरा-सोळा वर्षे होतो, जास्तीत जास्त काळ अठरा वर्षे, तर ते आले की त्यांच्याकडे डोक्यात त्या तलाठ्याला अमूक न, मग ते तमक्याला सांगून ते करून घेऊन ते सातबारा आणि ते या गोष्टी त्यांच्या डोक्यात असायच्या. आणि आम्ही साहित्याचे लोक त्यांच्याशी साहित्यावर बोलणारे असायचो.













अशा अनेक लेवलवर त्यांचं काम चाललेलं असतं. त्यांचा मेंदू अनेक लेवलवर काम करतो. आम्हाला फक्त थोडंसंच त्यातलं माहिती आहे. आणि ते त्यांनी अतिशय अप्रतिमपणे आपल्या सगळ्यांना, काय म्हणायचं, अभिमानाच्याही पलिकडं जी आस्था असते, प्रेम असतं आणि अशा माणसांच्या बरोबर असणं हे केवढं ऐतिहासिक एक संकल्पना आहे, जी फार थोड्या लोकांच्या लक्षात असते, की अशा माणसांच्याबरोबर आपण आहोत, अजून आहोत आणि अजूनही अनेक वर्षे आम्ही राहणार आहोत हे आत्ता मी त्यांना सांगतो. ही महत्त्वाची गोष्ट आहे. आणि मी त्यांना असंच अजून खूप लिहा असं सांगतो. आता ते बऱ्याच गोष्टीतून मोकळे वगैरे होत चाललेत. राजकारणातूनही मोकळे झालेले दिसतायंत. सांगता येत नाही ते अजून काय करतील तर. पण ते त्यांनी न करता फक्त मातीतल्या कविता लिहाव्या आणि भूमीला काय दान असेल ते फक्त द्यावं असंच मी त्यांना सुचवेन आणि मी या संस्थेतर्फे आणि जैन इरिगेशनतर्फे त्यांना शुभेच्छा देतो आणि त्यांनी असंच आमच्याबरोबर राहावं आणि आम्हाला आधार द्यावा. मोठे भाऊ नेहमीच मला म्हणायचे, की माझ्यामुळे तुम्हाला आधार आहे. कारण ते माझ्यापेक्षा चार-पाच महिनेच मोठे होते. पण ते मला फार मोठे आधार वाटायचे. चार-पाच महिने मोठा माणूस आहे आपल्यात. तसं आम्ही त्यांना आहोत आणि अजून असं लिहित राहावं, वाचत राहावं आणि खूप काही मातीशी जुळलेलं असं करावं एवढीच मी आपल्यासमोर शुभेच्छा त्यांना देतो आणि मनोगत संपवतो.

■■■

# महानोर दादांमुळे जळगावला कवितेचं शिल्प मिळाले

अशोक जैन



महानोर दादांच्याबद्दलची माहिती, त्यांच्या कविता, त्यांचं लेखन, शेतकऱ्यांना शेतीमधलं काम, पाण्यातलं काम, राजकारण्यांना विधिमंडळातलं काम आणि विधिमंडळात दादांची जी काही भाषणं झाली त्या काळात, दोनवेळा दादा विधिमंडळात, विधानपरिषदेचे सदस्य राहिले आहेत, आणि राज्यपाल नियुक्त सदस्य राहिले आहेत. इलेक्टिव्ह राजकारणात ते गेले नाहीत. कारण ते काही त्यांचं क्षेत्र नव्हतं. त्यावेळची विधिमंडळात गाजलेली भाषणं आणि त्याच्यातून महाराष्ट्रात ज्या काही शेतीमधली आणि पाण्यातली क्रांती झाली ते त्यांच्या भाषणामुळे आणि त्यावेळेला आदरणीय पवार साहेबांनी नामदेवरावांना ते सगळं व्यासपीठ उपलब्ध करून दिलं आणि त्याच्यातून पाणलोट किंवा हे पाझर तलाव ज्याला आपण म्हणतो, पाणी अडवा पाणी जिरवा हे नामदेवरावांचं महाराष्ट्राला देणं आणि त्याच्यानंतर फळबागा आहेत. म्हणजे महाराष्ट्रात फळांच्या बागा लागल्या त्याचं जे धोरण ठरवण्यासाठी बेसिक काम ज्याला आपण म्हणतो ते नामदेवरावांनी त्यावेळेला केलं आणि पवार साहेबांनी त्याला एका उंचीवर नेऊन ठेवलं. त्याला नंतर आपल्या ठिबक सिंचनानं जोड दिली आणि महाराष्ट्रभर आपण तो विषय पुढं नेला.

हे झालं पाण्यातलं काम, शेतीतलं काम. लिखाण आपल्यासमोर आहे. कविता आपल्यासमोर आहे. पण या सगळ्यांपेक्षा दादांनी जळगावकरांना काय दिलं हा महत्त्वाचा प्रश्न आहे. दादा जळगाव जिल्ह्याचे नाहीत. दादा औरंगाबाद जिल्ह्याचे आहेत. परंतु, त्या गावात जाण्यासाठी जळगाव जिल्ह्यातूनच जावं लागतं. आपल्या जळगाव जिल्ह्यातलं वाकोद जे माझ्या वडिलांचं जन्मगाव आहे, आपलं शेवटचं गाव जळगाव जिल्ह्यातलं त्या गावात येण्याच्याआधी पळसखेड्यासाठी रस्ता निघतो. म्हणजे जर असं बघितलं, म्हणजे जेव्हा आपण नकाशा बघतो तेव्हा ते मराठवाड्यात आहे असं वाटतं, पण जर जातो तर ते जळगाव जिल्ह्यातच आहे आणि ती मैत्री वडिलांची आणि दादांची तेव्हापासून आहे.

तर दादांनी जळगावला काय दिलं? जगाच्या पाठीवर कुठेही नसेल अशी गोष्ट दादांमुळे जळगावला मिळाली आणि ते म्हणजे आपलं काव्यरत्नावली चौक. आज जे आपण स्वरूप बघतोय, ते २०१०ला आपल्या भारताच्या प्रथम महिला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील ज्यावेळी झाल्या आणि त्यांचा माहेरचा सत्कार हा आपण जळगावला ठेवला होता आणि त्यानिमित्ताने हा चौक सुशोभित करावा असं ठरलं. आणि चौक करताना त्या चौकामध्ये आधीच त्याच्या आठ-दहा वर्षापूर्वी किंवा दहा वर्षापूर्वी, ९०मध्ये म्हणजे तीस वर्षापूर्वी जवळजवळ नामदेवरावांनी बालकवींची कविता, भाऊंच्या उद्यानाचा जो भाग आहे, त्या कॉर्नरला जिथे आत्ता मला वाटतं, की बहिणाबाईंची कविता आहे, मला नीटसं आठवत नाही, पण तिथे आहे, तर तिथे बालकवींची एक कविता लावलेली होती काळ्या ग्रॅनाईटवरती आणि त्या कवितेचं त्यावेळी विमोचन किंवा उद्घाटन करायला नाशिकवरून कुसुमाग्रज स्वत: इथे आले होते आणि त्यांच्या हातून ते झालं होतं. आणि ते एक स्मारक म्हणून तिथे होतं. जाता येता लोकं बघायचे. ज्यांना इंटरेस्ट होता ते वाचायचे. ते दादांमुळे झालं.

परंतु, हे जेव्हा करायचं ठरलं, आणि तो सगळा चौक आपण जो बघतो तो दहा दिवसांत बनवलेला आहे. त्यावेळी दिवस-रात्र काम करून आणि त्यावेळेला मग हा विषय आला, की मग ती एकच कविता का? आपल्या जळगाव जिल्ह्याचे आपण चार कवी याच्यात घेऊ. म्हणून त्या चार कॉर्नरला चार कविता आणि ते सगळं डिझाईन दादांनी चर्चा करून त्यावेळेला आपण बनवलं. आणि ते शिल्प सगळं हे जगाच्या पाठीवर कवितेसाठी वाहिलेलं माझ्या तरी पाहण्यात, ऐकण्यात आणि वाचण्यातही नाही. ते आपल्या जळगाव शहरामध्ये दादांमुळे मिळालं अणि त्याच्यानंतर तीन वर्षांपूर्वी भाऊंच्या उद्यानात कवितांचं दालनसुद्धा आपण तिथे केलं आणि महाराष्ट्रातील जे काही जगमान्य कवी होऊन गेले त्या सगळ्या कविता दादांनी स्वत: निवडल्या आणि त्या आपण तिथे डिस्प्ले केलेल्या आहेत. खूप काही लोकांना खूप काही दादांकडून मिळालं. पण, आपल्या जळगावला काय मिळालं, तर हे जगाच्या पाठीवर कुठेही नसलेलं हे शिल्प कवितेचं आपल्याला दादांच्याकडून मिळालं आणि आपण सगळे त्याबद्दल दादांचं अभिनंदन करू.

मी काही कविता वाचक नाही. कविता कधी लिहिलेली नाही. बोललेलो नाही. एखाद्यावेळी शंभूनच सांगितलं म्हणून मायादेवीनगरच्या रोटरी हॉलला दादांच्याच वाढदिवसानिमित्तच्या कार्यक्रमात मी म्हटली होती. आज परत एकदा आजच्या या आपल्या कार्यक्रमाच्या सांगतेला...

**सूर्यनारायणा नित् नेमानं उगवा ।**
**अंधाराच्या दारी थोडा उजेड पाठवा ॥**
**मोडक्या घराच्या बिंद्रवनाशी सांजेला ।**
**दिव्याचा आधार जडो त्यांच्या संसाराला ॥**
**ओंजळीने भरू दे गा पाखरांच्या चोची ।**
**दु:खात पंखांना असो सावली मायेची ॥**
**आबादाणी होवो शेत भरू दे दाण्याचे ।**
**तुझ्या पालखीला शब्द बांधू तुकोबाचे ॥**

■■■

# 'महाराष्ट्राचे समाजशिक्षक' प्रा.गं.बा.सरदार



प्रा.डॉ.गणेश राऊत

महाराष्ट्राचे समाजशिक्षक प्रा. गंगाधर बाळकृष्ण सरदार यांचा जन्म २ ऑक्टोबर १९०८ रोजी झाला. ठाणे जिल्ह्यातील जव्हार या छोट्या संस्थानात, विपुल निसर्ग असणाऱ्या भागात गं.बा.सरदार यांचा जन्म झाला. आजूबाजूला प्रचंड मोठा आदिवासी समूह,निसर्ग या सगळ्यांचा प्रभाव त्यांच्या लेखनावर पडला. याच भागात बाल वर्गापासून ते मराठी सातवीपर्यंतचे शिक्षण (कृष्ण विद्यालय) सरदार यांनी पूर्ण केले. १९२४ मध्ये मुंबईतील छबीलदास हायस्कूल मधून त्यांनी मुंबई विद्यापीठातून मॅट्रिक्युलेशन परीक्षा उत्तीर्ण केली. याच कालखंडात आजूबाजूला स्वातंत्र्यलढ्याचे वातावरण होते. त्याचा प्रभाव गं.बा.सरदार यांच्यावर पडला. १९३० च्या लढ्यात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. 'एकच तारा समोर अनेक पायतळी अंगार' अशीच त्यांची त्या काळात परिस्थिती होती. अशातच १९३२ मध्ये ते पुणे शहरातील ख्यातनाम अशा सर परशुरामभाऊ (एस.पी.) महाविद्यालयातून बी.ए. पदवी परीक्षा उत्तीर्ण झाले. त्याकाळी हे महाविद्यालय मुंबई विद्यापीठाशी जोडलेले होते. त्यामुळे ते मुंबई विद्यापीठाचे पदवीधर झाले.





या काळात त्यांच्यावर वडिलांचा मोठा प्रभाव होता. श्री. बाळकृष्ण सरदार हे व्यापार करायचे. ते सचोटीने व्यवसाय करायचे. ते करारी,साहसी आणि महत्वाकांक्षी होते. आदिवासींना व्यसनातून मुक्त करणे, जव्हारला विद्यार्थी वस्तीगृह उभारणे, आदिवासी विद्यार्थ्यांसाठी धर्मशाळा उभारणे यासाठी आर्थिक मदत करणे यात त्यांनी पुढाकार घेतला होता. आई रुक्मिणी देवी सौम्य स्वभावाची या दोघांना एकूण सहा अपत्य झाली. त्यात गंगाधर एकटाच मुलगा आणि पाच बहिणी. त्यामुळे गंगाधर थोडा जास्त लाडका होता. घरात गंगाधरला प्रेमाने अण्णा म्हणायचे. गंगाधरवर जास्त प्रेम असल्यामुळे बहिणी आईला म्हणायच्या, 'आम्ही तुझ्या पाच मुली, पण दुधावरची साय मात्र तू एकट्या अण्णांनाच देतेस !'

अण्णांनी शिक्षणासाठी घर सोडले. ते पदवीधर झाले. गांधीजींच्या मिठाच्या सत्याग्रहात सहभागी झाले. या काळात त्यांचा पोशाख पंचा आणि कुडता होता. काटकसर, देशप्रेम या साऱ्याच विचारांची डोक्यात गर्दी आणि आजूबाजूच्या वातावरणाचा परिणाम, गरीब आदिवासींची जीवनशैली यामुळे ते अनवाणी फिरायचे. याचवेळी पुण्यातील प्रसिद्ध अशा 'केसरी' वर्तमानपत्रात त्यांची रणशिंग फुंकिले

कुणी' ही कविता प्रसिद्ध झाली. अण्णा उर्फ गं.बा.सरदार यांची ही लेखक - कवी या नात्याने ही पहिलीच कामगिरी होय. आई-वडिलांची इच्छा मुलाने वकील होऊन घराण्याचे नाव काढावे तर मुलगा राष्ट्रप्रेमाची वकिली करत होता. यामुळे घरगुती संघर्षाला सुरुवात झाली. आई-वडिलांची भूमिका समजून घेऊन अण्णांनी आत्मपरीक्षण केले. आपल्याला आयुष्यात नक्की काय जमणार आहे आणि काय जमणार नाही हे समजल्यावर वकिली ऐवजी चिंतन - मनन करणे आपणास जमणार यामुळे शिक्षकी पेशा स्वीकारण्याचा निर्णय झाला. अण्णांच्या भगिनी सुलोचना आनंद नाडकर्णी यांनी 'आमचे अण्णा' या लेखात या संदर्भात भाष्य केले आहे. ते पुढील प्रमाणे - प्रत्यक्ष कृतीपेक्षा मनन - चिंतन हेच आपल्या मन:प्रकृतीला मानवणार आहे असे त्यांना (गं.बा.सरदार) जाणवलं. म्हणूनच सक्रिय राजकारणात सहभागी न होता समाजाच्या कृतीशीलतेला वैचारिक बैठक देण्याचं काम त्यांनी अंगीकारलं आणि समाजप्रबोधनाचं व्रत मनोमन मानलं.



अण्णांचा मार्ग निश्चित झाला. त्यांनी एम.ए. पूर्ण केले. आई-वडिलांना पुढची काळजी होतीच. आपण ब्रह्मचारी राहून देशसेवा करावी असे अण्णांना वाटत होते तर पालकांना अण्णांच्या लग्नाची काळजी पडली होती. यातून मार्ग कसा निघणार. नियती नावाची एक अजब गोष्ट पालकांच्या मदतीस धावून आली. थोरल्या बहिणीच्या लग्नात पाहुणे आले होते. लग्न सोहळा संपताना सारेजण निघण्याच्या गडबडीत असतानाच श्री. बाळकृष्णबुवांना लग्नात आलेली एक मुलगी गंगाधररावांसाठी योग्य वाटली. सगळ्यांचा आग्रह पाहून दोघेही लग्नासाठी तयार झाले आणि अण्णांचे लग्न लागले.(१९३३)


लग्नानंतर कु. गुलाब शंकर लोटलीकर हिचे नाव सौ. सुमती गंगाधर सरदार झाले. लग्नानंतर सुखाचा संसार सुरू झाला. आतली अस्वस्थता अण्णांना स्वस्थ बसू देत नव्हती. याच काळात त्यांनी अफाट वाचन केले. संत साहित्य, कार्ल मार्क्स यांचे लेखन, गांधीजींचे लेखन आणि गांधीवादी विचारधारा या सगळ्याचा त्यांनी कसून अभ्यास केला. हा सगळा अभ्यास त्यांना आयुष्यभर उपयोगी पडला. अखेर सगळे सरदार घराणे ज्या दिवसाची वाट पाहत होते तो क्षण आला आणि अण्णा प्राध्यापक झाले.

१९४१ मध्ये पुणे शहरातील एस. एन. डी. टी. महाविद्यालयात (श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी) अण्णा मराठी विषयाचे व्याख्याते झाले. या महाविद्यालयात मराठी शिकवताना त्यांच्या आजूबाजूला तेवढीच दिग्गज माणसे होती. या दिग्गज लोकांबरोबर राहून सरदार यांनी आपला प्रभाव पाडला. यावेळी महाविद्यालयात शिकविण्यासाठी संस्थेचे संस्थापक दस्तुरखुद्द महर्षी कर्वे, ख्यातनाम लेखक प्राचार्य वामन मल्हार जोशी, रा.कृ.लागू, कमलाबाई देशपांडे इत्यादी होते. याच्याच जोडीला मित्रवर्य प्रा.ह.श्री.शेणोलीकर, कै.मु.ग.पानसे, श्री.द.रा.कानेगावकर यांचीही साथ लाभली. १९४१ते १९६८ असा प्रदीर्घ काळ त्यांनी येथे व्यतित केला. शिकविण्याची भरपूर तयारी करणे आणि वर्गात कितीही विद्यार्थी असोत शिकविण्यात काटकसर न करणे या गोष्टी त्यांनी कायमच सांभाळल्या. महर्षी कर्वे यांचा सहवास आणि महात्मा गांधीजींचा प्रभाव यामुळे घर आणि महाविद्यालय, समाज या पातळीवर अण्णांनी कायमच स्त्रीयांस सहाय्य होईल अशीच भूमिका घेतली. स्वतःच्याच घरात बहिणीच्या विवाहास प्राधान्य द्यावे की तिच्या उच्च शिक्षणास प्राधान्य द्यावे असा प्रश्न निर्माण झाल्यावर अण्णांनी वडिलांच्या विरोधात जाऊन बहिणीच्या उच्च शिक्षणासाठी वडिलांचे मन वळविले. यामुळे तिचेही आयुष्य मार्गी लागले. एक स्त्री शिकली की कित्येक पिढ्यांचा फायदा होतो यावर त्यांचा ठाम विश्वास होता.

शिकवत असतानाच सरदार यांना आकाशवाणीवर भाषणे देण्याची संधी मिळाली. संपूर्ण महाराष्ट्राचा श्रोतृवर्ग त्यांच्यासाठी उपलब्ध झाला. पुणे आकाशवाणीच्या कै. पुं. म. लाड स्मारक व्याख्यान मालेत संत वाङमयावर अण्णांनी व्याख्याने दिली. पुढे १९७७ मध्ये ते स्वतःच याच व्याख्यानमालेचे अध्यक्ष झाले. पुढे अधिक एक संधी चालून आली आणि ते 'महाराष्ट्र राज्य भाषा सल्लागार मंडळाचे' सदस्य झाले. १९६८ मध्ये अण्णांच्या वयाला साठ वर्षे पूर्ण झाली म्हणून नामदार यशवंतराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली पुणे शहरात अण्णांचा षष्ट्यब्दीपूर्ती समारंभ झाला. याप्रसंगी प्रा. भा. शं. भणगे संपादित 'साहित्यविचार आणि समाजचिंतन'

हा प्रा. सरदार गौरव ग्रंथ प्रकाशित झाला

याच दरम्यान सरदार यांना एक थैली आपण अर्पण करावी असे त्यांच्या मित्रांना वाटू लागले. सरदार यांच्या आजवरच्या कार्याची कृतज्ञ नोंद आणि शुभेच्छा म्हणून मित्रमंडळी या थैलीकडे बघत होती. अण्णांकडे हा प्रस्ताव घेऊन मित्रमंडळी गेली असता ते म्हणाले, "अहो! मी समाजासाठी फारसं काही करू शकलो नाही. जी थोडीफार धडपड केली त्यात कृतार्थतेचं समाधान आहे. मी थैली स्वीकारली तर हे समाधान मी गमावून बसेन. मला संकटात टाकू नका. माझं समाधान मला जपू द्या!" या संदर्भात त्यांच्या भगिनींनी भाष्य केले ते महत्त्वाचे आहे. त्या लिहितात "संत वाङमयाने दिलेला आणि अण्णांनी आचरणात आणलेला हा निरपेक्ष सेवाभावाचा संदेश लाखमोलाचा आहे!" (पूर्वोक्त)




१९६८ ते १९८० या काळात सरदारांनी आपल्या व्याख्यानांनी महाराष्ट्र गाजविला. पुणे शहरातील कौशिक व्याख्यानमाला, पुणे विद्यापीठ ('आताचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ') मधील सेनापती बापट स्मारक व्याख्यानमाला, व्हीनस व्याख्यानमाला, लालजी पेंडसे व्याख्यानमाला, मुंबई मराठी साहित्य संघ, दामोदर धर्मानंद कोसंबी व्याख्यानमाला, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय यांच्या व्याख्यान मालांमधून सरदार यांनी ज्ञानगंगा घरोघरी अशी भूमिका घेतली. सुदैवाची गोष्ट म्हणजे यातील व्याख्यानांची पुढे पुस्तके झाली. १९७५ मध्ये अण्णा मुंबई व उपनगर मराठी साहित्य संमेलनाच्या २१ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष झाले. १९७८ मध्ये मुंबई मधील दलित साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. १९८० मध्ये साहित्य संमेलनाचे सर्वोच्च व्यासपीठ म्हणजे 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन' बार्शी येथे ते अध्यक्ष झाले. ५४ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले.१९८१ मध्ये प्रवरानगर येथे ग्रामीण साहित्य संमेलन आणि १९८२ मध्ये पिंपरी येथे भरलेल्या भटक्या व विमुक्त जाती संघटनेच्या अधिवेशनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले.

संस्थात्मक पातळीवर आजीव सदस्य म्हणून महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे आणि भारत इतिहास संशोधन मंडळ येथे त्यांनी काम पाहिले. गोखले एज्युकेशन सोसायटी, नाशिक येथे फेलो, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे येथे अध्यक्ष, समाज प्रबोधन संस्था, पुणे आणि लोकायत प्रतिष्ठान, पुणे येथे विश्वस्त म्हणून त्यांनी काम पाहिले. १ डिसेंबर १९८८ रोजी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. येथवर आपण त्यांच्या जीवन क्रमाचा आढावा घेतला. आता आपण त्यांच्या साहित्यिक कर्तुत्वाचा आढावा घेऊयात. त्यांच्या काही महत्त्वाच्या ग्रंथांचा निर्देश पुढीलप्रमाणे


अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठीका (इ. स. १८०० ते १८७४), महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी, ज्योतिराव फुले, संत वाङमयाची सामाजिक फलश्रुती, संत साहित्याची सामाजिक आणि राष्ट्रीय कामगिरी, ज्ञानेश्वरांची जीवननिष्ठा, न्या. रानडेप्रणित सामाजिक सुधारणेची तत्व मीमांसा, आगरकरांचा सामाजिक तत्वविचार, अध्यक्षीय भाषण पुस्तिका (२) प्रबोधनातील पाऊलखुणा हे होत.

संपादित ग्रंथांमध्ये महाराष्ट्र जीवन: परंपरा, प्रगती आणि समस्या (खंड १-२), मराठी पद्य-गद्य वेचे, संक्रमणकाळाचे आव्हान, तुकाराम-दर्शन अर्थात अभंग वाणी प्रसिद्ध तुकयाची, रामदास-दर्शन, एकनाथ-दर्शन अर्थात एकनाथांच्या समग्र वाङ्मयाचे सार-तत्व इ. या व्यतिरीक्त इंग्रजी ग्रंथ, कविता, विपुल लेख संभार अशी शब्दसंपत्ती त्यांच्या नावावर जमा आहे. 'अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका' या ग्रंथाचे महत्त्व सांगताना समीक्षक माधव आचार्य लिहितात- "इ. स. १८०० ते १८७४ या कालखंडातील मराठी वांङमयाचा अभ्यास करणाऱ्याला भरपूर माहिती प्रामाणिकपणे एकत्र करून देणारा महत्त्वाचा ग्रंथ तसा प्राय: संकलनात्मक आहे. इंग्रजीमधील दुर्मिळ पुस्तके व लेखक यांची माहिती देण्यावर या ग्रंथाचा भर आहे. या कालखंडातील कथात्मक वाङमय, नाटके, इत्यादींबरोबरच निबंध, चरित्रे, कोशव्याकरण, धर्मनीतीपर ग्रंथ, शास्त्रकलाव्यवसायविषयक ग्रंथ व नियतकालिके यांची सूचीसह दिलेली माहिती अभ्यासकांना संदर्भासाठी उपयोगी पडणारी आहे."

'महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी' या पुस्तकाविषयी स्वतः लेखकच असे म्हणतो की "या पुस्तकात मी जे पाच लोक निवडले ते सगळे उपेक्षित तर होतेच; पण परंपरेला धक्का देणारे होते. ते सर्वजण बहुजनसमाज, दलित यांच्याबद्दल सहानुभूती बाळगणारे आहेत आणि रूढीविरुद्ध थोडंफार बंड करणारे आहेत." या प्रक्रियेतून सरदारांची विचारधारा समजून घेता येते. खरं म्हणजे भाऊ महाजन, लोकहितवादी विष्णुबुवा ब्रह्मचारी, जोतीराव फुले आणि विष्णुशास्त्री पंडित यांच्या कामगिरीचा वरील ग्रंथ म्हणजे शोध आहे. तुम्ही त्यांना टाळून

महाराष्ट्राचा विचार करू शकत नाही.

'संत वाङमयाची सामाजिक फलश्रुती' हा सरदारांच्या सर्वाधिक गाजलेल्या ग्रंथांपैकी एक आहे. फेब्रुवारी २०१९ पर्यंत या ग्रंथाच्या दहा आवृत्त्या निघाल्या आहेत.१९५० मध्ये पहिली आवृत्ती आली. पहिल्या तीन आवृत्त्या महाराष्ट्र साहित्य परिषदेने छापल्या होत्या. चौथी आवृत्ती श्रीविद्या प्रकाशन आणि पुढील आवृत्या लोकवाङमय गृहाने छापलेल्या आहेत. वांङमयगृहाच्या आवृत्तीत दिगंबर पाध्ये यांची प्रस्तावना समाविष्ट करण्यात आली आहे. हा ग्रंथ मराठीत खूप गाजला आहे. या ग्रंथानेच सरदारांना मराठी वाङमयाच्या आणि संत साहित्य अभ्यास क्षेत्रात स्वतंत्र व श्रेष्ठ असे स्थान (सरदारकी) मिळवून दिले. मराठीतील ख्यातनाम अभ्यासक प्रा. रा. श्री. जोग यांनी पुस्तकाचे वर्णन 'भक्तीसंप्रदायाच्या सामाजिक फलश्रुतीचे हे दर्शन संतवाङमयाच्या अभ्यासकांस उद्बोधक वाटल्यावाचून राहणार नाही' अशा शब्दात केले आहे.




वरील ग्रंथाचे सार आपणास 'संतसाहित्याची सामाजिक आणि राष्ट्रीय कामगिरी' या सरदारांच्या पुस्तिकेत वाचायला मिळते. ते लिहितात– "मराठी संत हेच मध्ययुगीन महाराष्ट्राच्या सामाजिक अस्मितेचे व सांस्कृतिक ऐक्यभावाचे खरे शिल्पकार होत. ख्रिस्तोत्तर तेराव्या सामाजिक अस्मितेचे व सांस्कृतिक ऐक्यभावाचे खरे शिल्पकार होत. ख्रिस्तोत्तर शतकाच्या उत्तरार्धात चक्रधरांनी महानुभाव पंथाची स्थापना करून आणि ज्ञानेश्वरांनी वारकरी पंथाचा कायापालट घडून आणून, महाराष्ट्रात धार्मिक व सामाजिक प्रबोधनाची मुहूर्तमेढ रोवली. नामदेवांनी आपल्या भावोत्कटतेने श्रद्धाबळाने व समर्पणशीलतेने निरनिराळ्या जातींतील विठ्ठलभक्तांची मने वेधून घेतली; आणि तत्कालीन धार्मिक आंदोलनात सामील होण्यास त्यांना प्रवृत्त केले... पुढे एकनाथांनी एकंदर कालमान लक्षात घेऊन दूरदर्शीपणाने, निर्धाराने, कल्पकतेने पण सावधानतेने भागवत धर्माच्या चळवळीस चालना दिली. तुकाराम–रामदासांनी एकनाथांच्या जीवननिष्ठेतील एकेका प्रवृत्तीचा स्वतंत्रपणे व साकल्याने पाठपुरावा करून तिचा उत्कर्षबिंदू गाठला, आणि धर्मसुधारणेचे व लोक जागृतीचे कार्य त्या काळापुरते पूर्णतेस नेले."

संतचळवळ या परंपरेचे मोठेपण सांगताना सरदार लिहितात – " मराठी संतांचे कार्य हे केवळ संप्रदायिक स्वरूपाचे नसून, ती एक व्यापक चळवळ होती. वारकरी संप्रदाय साधासुधा भक्तीपांथ नव्हता. शैव, नाथ, दत्त, चैतन्य, आनंद, सुफी इत्यादी पंथातील संस्कारक्षम भक्तजनांना सामावून घेणारे ते एक सर्वसंग्राहक उपसानापीठ होते; प्रभावी सांस्कृतिक केंद्र होते. संत मंडळाच्या कार्याची प्रेरणा धार्मिक प्रबोधनाची होती. कनिष्ठ जातीत जन्मलेला आणि विद्येला वंचित झालेला सामान्य माणूस हाच संतांच्या चळवळीचा केंद्रबिंदू होता. या संप्रदायाचे प्रवेशद्वार सर्व जातींच्या व पंथाच्या स्त्रीपुरुषांना खुले होते. त्यात जन्मसिद्ध अधिकारभेद व उच्चनीच भाव यांना थारा नव्हता."

सरदार यांचा दृष्टिकोन अखिल भारतीय पोहोचावा म्हणून कुमुद मेहता यांनी या ग्रंथाचा इंग्रजीत अनुवाद केला. संत वाङमयाची सामाजिक फलश्रुतीचा इंग्रजी अनुवाद 'दी सेन्ट– पोएटस ऑफ महाराष्ट्र: देअर इम्पॅक्ट ऑन सोसायटी' या नावाने प्रसिद्ध झाला आहे. दिल्लीच्या ओरिएंट लाँगमनचे हे मराठी – अमराठी भाषकांवर ऋण आहे. मेहता ग्रंथाला न्याय देण्यात यशस्वी झाल्या आहेत.

आपल्या लेखनासंदर्भात सरदार म्हणतात – "आयुष्याबद्दल माझी कसलीही तक्रार नाही. मी संतुष्ट आहे. माझ्या हातून विपुल प्रमाणात लेखन झाले नाही; पण जेवढे लेखन मी केले, तेवढे मनापासून केले. समाजप्रबोधनाचे ' उद्दीष्ट' डोळ्यांसमोर ठेवूनच मी हे लेखन केले याचे मला समाधान आहे.

या छोटेखानी लेखात सरदारांच्या सगळ्या लेखनाचा आढावा घेणे अवघड आहे. महात्मा फुले, गो.ग.आगरकर यांच्यावरील सरदारांचे चिंतन मूलगामी आहे. या लेखात एखाद दुसऱ्या ग्रंथाचाच आढावा घेतला आहे. या निमित्ताने सरदारांच्या लेखनाविषयी वाचकांच्या मनात उत्सुकता जागी करणे हाच या लेखाचा मुख्य हेतू आहे.

## परिशिष्ट (साहित्यसूची)

०१. स्वतंत्र ग्रंथ अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठीका (इ. स. १८००–१८७४) प्रकाशक : गं. बा. सरदार, पुणे आवृत्ती पहिली १९३७ आवृती दुसरी पुनर्मुद्रण, १९५६ (मॉडर्न बुक डेपो प्रकाशन, पुणे), आवृत्ती तिसरी १९७१ (मॉडर्न बुक डेपो, प्रकाशन, पुणे.)


०२. महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी, प्रकाशक: गं. बा. सरदार, पुणे आवृत्ती पहिली, १९४१, आवृत्ती दुसरी, पुनर्मुद्रण, १९६१, सुनंदा प्रकाशन, पुणे.

०३. जोतीराव फुले, स्वाध्यायमाला ४७, अ. वी. गृह प्रकाशन, पुणे १९४५,

०४. संतवाङ्मयाची सामाजिक फलश्रुती महाराष्ट्र साहित्य परिषद प्रकाशन, पुणे आवृत्ती पहिली १९५० आवृत्ती दुसरी, १९६२ (दोन लेखाची भर) म. सा. प. प्रकाशन, पुणे, आवृत्ती तिसरी, १९७० (एका लेखाची भर) म. सा. प. प्रकाशन, पुणे आवृत्ती चौथी १९७८ (एका लेखाची भर) श्री विद्या प्रकाशन, पुणे..

०५. Saint-Poets of Maharashtra Their impact on

Society: Translated by Dr. Smt. Kumud Menta, Orient Longmans Ltd, Delhi, १९६९. (वरील क्रमांक चारच्या पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद)




०६. संत साहित्याची सामाजिक आणि राष्ट्रीय कामगिरी (पु. भं, लाड स्मारक व्याख्यानमाला, १९६२ व १९६३, प्रकाशन विभाग, भारत सरकार, दिल्ली, १९६५) पृष्ठे पस्तीस ते पंच्याऍंशी.

०७. ज्ञानेश्वरांची जीवननिष्ठा. ( कौशिक व्याख्यानमाला, स. प. महाविद्यालय, पुणे १९७१)

०८. न्या. रानडेप्रणीत सामाजिक सुधारणेची तत्त्वमीमांसा, सेनापती बापट स्मारक व्याख्यानमाला, पुणे विद्यापीठ, पुणे १९७३.

०९. आगरकरांचा सामाजिक तत्त्वविचार व्हीनस प्रकाशन, पुणे १९७५.

१०. अध्यक्षीय भाषण (पुस्तिका) मुंबई व उपनगर मराठी साहित्य संमेलन, अधिवेशन २१ वे.. २५ ऑक्टोबर १९७५.

११. अध्यक्षीय भाषण (पुस्तिका), अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, अधिवेशन ५४ वे बार्शी, जिल्हा सोलापूर, दि. १ फेब्रुवारी १९८०

१२. महात्मा फुले : विचार आणि कार्य ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, १९८१

१३. धर्म आणि समाज परिवर्तन, सुधीर बेडेकर यांचे मागोवा प्रकाशन, पुणे १९८२.

१४. महाराष्ट्रातील सामाजिक प्रबोधनाची वाटचाल नवनिर्माण प्रकाशन, पारगाव, जिल्हा पुणे, १९८६.

१५. गांधी आणि आंबेडकर सुगावा प्रकाशन, पुणे, १९८७..

**प्रा. सरदारांच्या स्फुट लेखांची संपादने**

१६. प्रबोधनातील पाउलखुणा, संपादक: डॉ. निर्मलकुमार फडकुले, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७८

१७. नव्या युगाची स्पंदने, संपादक: डॉ. प्र. चिं. शेजवलकर, संजय प्रकाशन, पुणे, १९८२.

१८.. नव्या उर्मी, नवी क्षितिजे, संपादक: डॉ. ल. रा. नसिराबादकर, संजय प्रकाशन, पुणे, १९८७.

१९. परंपरा आणि परिवर्तन, संपादक: डॉ. मो. स. गोसावी, प्रा. वि. शं. चौघुले, गोखले एज्युकेशन सोसायटी, नाशिक, १९८८.

**परिशिष्ट : २**

**प्रा. सरदार यांनी संपादित केलेले ग्रंथ**

०१ ते ०२ महाराष्ट्र जीवन परंपरा, प्रगति आणि समस्या खंड १ व खंड २, मे. जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणे, १९६०.०

०३. संक्रमणकालाचे आव्हान मे. जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणे, १९६६.

०४. Journal of SNDT Women's University, vol. I, १९६६.

०५.Golden Jubilee Commemmoration Volume (१९१६--१९६६) SNDT Women's University, Bombay, १९६८.

०६. तुकारामदर्शन अर्थात अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची, मॉडर्न बुक डेपो प्रकाशन, पुणे, १९६८.

०७. रामदासदर्शन, मॉडर्न बुक डेपो प्रकाशन, पुणे, १९७२.

०८. एकनाथ दर्शन, अर्थात् एकनाथांच्या समग्र वाङ्मयाचे सारतत्त्व, मॉडर्न बुक डेपो, प्रकाशन, पुणे १९७८.

**संदर्भ :–**
**गंगाधर बाळकृष्ण सरदार व्यक्ती आणि कार्य**
**लेखक – हे.वि.इनामदार**
**राज्य मराठी विकास संस्था**

■■■

## घंटाकर्ण






# सबकुछ गुजरात

गुजरात विधानसभेची निवडणूक आता नजीक येऊन ठेपली आहे. गुजरात व हिमाचल प्रदेशातील विधानसभा निवडणुका डिसेंबरमध्ये अपेक्षित आहेत. म्हणजेच आता केवळ तीन महिन्यांचा अवधी उरला आहे. यामुळे गुजरातमध्ये चमकदार कार्यक्रम करण्यासाठी सत्तापक्षातर्फे कंबर कसली जाणेही ओघाने आलेच.




खरे तर गुजरातमधील सत्तापक्षाला तशी चिंता बाळगण्याचे कारण नाही. काँग्रेस पक्ष पूर्णपणे विस्कळित आहे.

आम आदमी पार्टीने तिसरी शक्ति म्हणून जोर लावण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. असे असले तरी भाजपने सर्व शक्तिनिशी जोर लावायचे ठरवलेले दिसते. आता महाराष्ट्रातून वेदांता-फॉक्सकॉन प्रकल्प कोणतीही शरम न बाळगता बिनधास्तपणे गुजरातला हलविणे हे या विधानसभा निवडणुकीसाठीच्या ‘सबकुछ गुजरात’ योजनेचाच भाग आहे.

आता मुंबई ते अहमदाबाद अशी तेजस एक्सप्रेस सुरु करण्यात आली आहे. ती मुंबईहून सकाळी सुटून अहमदाबादला सहा तासात पोहोचणार आणि तेथून दुपारी निघून मुंबईला रात्री पोहोचणार आहे.

अहमदाबाद ते मुंबई अशा भरपूर रेल्वे गाड्या आहेत. रोज धावणाऱ्या पंधरा गाड्या आहेत तर आठवड्याच्या निरनिराळ्या वारांना धावणाऱ्या गाड्यांची संख्या साठ आहे. याखेरीज मुंबई ते अहमदाबाद बसगाड्या तर असंख्य आहेत. थोडक्यात सांगायचे झाल्यास या सर्वांमध्ये आणखी एका रेल्वेची भर घालून काय मिळविण्यात आले हे अनाकलनीय आहे. मुंबई-अहमदाबाद दरम्यान शताब्दी एक्सप्रेस ही अतिजलदगाडी गेली अनेक वर्षे नियमितपणे धावत आहेच.

पण, म्हणतात ना............ कुणापुढे वाचली गीता नव्हे तर राजहट्टापुढे कुणाचा ब्र काढायची हिंमत नाही.

साक्षात पंतप्रधानांनी या अतिजलद व अत्याधुनिक रेल्वेगाडीचे उद्घाटन केले. याखेरीज त्यांनी मेट्रोचे उद्घाटनही केले.

गुजरात विधानसभेचे वेळापत्रक डोक्यात ठेवूनच वार्षिक राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे आयोजनही गुजरातमध्येच करण्यात आले. त्याचे उद्घाटनही

पंतप्रधान साहेबांनी केले.

आता काही लोकांच्या सुपीक डोक्यातून आणखी एका गोष्टीचा उलगडा करण्यात आला.

प्रसिध्द अभिनेत्री आशा पारेख यांना यंदाचा प्रतिष्ठेचा असा दादासाहेब फाळके पुरस्कर देण्यात आला.

खरे तर आशा पारेख यांच्या बरोबरीने वहिदा रेहमान यांचाही त्या पदावर दावा होता. पण एकतर त्या मुस्लिम आणि दुसरे म्हणजे गुजराती नसल्याने अडचण झाली असती.

करण्यात आली होती परंतु त्यांनी ती मानलेली नव्हती.

अचानक गुजरातच्या विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने सत्तापक्षाला आशा पारेख यांची आठवण व्हावी याला योगायोग म्हणायचा की आणखी काही ? एक खरे...............गुजरातमध्ये गेल्या विधानसभा निवडणुकीत निसटत्या बहुमतावर भाजपला समाधान मानावे लागले होतेय जिवावरचे शेपटावर निभावले होते.

त्याची पुनरावृत्ती नको म्हणून




बहुधा हा आटापिटा असावा !

जाताजाता एक गंमत सांगितलीच

भाजपचेच एकेकाळी खासदार असलेले धर्मेंद्र यांना देणे देखील समयोचित झाले असते. पण आशा पारेख या मुंबईतल्या आणि गुजराती असल्याने त्यांना फाळके पुरस्कार देण्याचे ठरविण्यात आले. आणि गुजराती हा निकष कसा अंतिम ठरला ?

खरे तर आशा पारेख या सुरुवातीपासून काँग्रेसच्या जवळच्या मानल्या जातात. काँग्रेसच्या अनेक जुन्या राष्ट्रीय नेत्यांबरोबर त्यांचे उत्तम संबंध होते आणि त्यांनी मुंबईतही अनेक चांगली सामाजिक कामे केलेली आहेत. त्यांना पूर्वी पद्मश्रीही मिळाली आहे. त्यांची अभिनयाची सकस कारकिर्द लक्षात घेऊन त्यांना पद्मभूषण किंवा पद्मविभूषण देण्याची शिफारस वर्तमान सरकारला

पाहिजे. ज्या साबरमती नदीच्या काठाचे सुशोभीकरण करुन शि जिनपिंग, डोनाल्ड ट्रंप व तत्सम जागतिक नेत्यांसमोर बढाया फुशारक्या मारण्यात आल्या होत्या ती नदी आता इतकी अस्वच्छ व प्रदूषित झाली आहे की तेथे नौकानयनाच्या स्पर्धा होणार होत्या त्या रद्द कराव्या लागल्या.

जय गरवी गुजरात..........सबकुछ गुजरात !

## पेटीएम.....पेसीएम

पेटीएम हे नाव आता अगदी सामान्यातल्या सामान्य माणसालाही माहिती आहे.

हो, अगदी भाजीविक्रेते, भेळ-पाणीपुरी विक्रेते लहानसहान दुकानदार व अगदी पदपथावरील पथारीवाल्यांकडेही पेटीएमद्वारे पैसे चुकते करण्यासाठीचे क्युआर कोडचे बोर्ड लावलेले असतात.

याला डिजिटल पेमेंटही म्हटले जाते. नोटाबंदीनंतर सामान्य नागरिकांवर डिजिटल पध्दतीने पेमेंट करण्यासाठी जी सक्ती करण्यात आली त्यामध्ये पेटीएमची भूमिका मोठी होती.

त्यावेळी नोटाबंदीच्या निर्णयानंतर






दुसऱ्याच दिवशी सकाळी देशातल्या सर्व वृत्तपत्रातील पहिल्या पानावर पूर्ण पान अशी पेटीएमची जाहिरात होती आणि आता लोकांनी पेटीएमद्वारे आपापले पैसे चुकते करण्याची पध्दत अवलंबावी असे आवाहन करण्यात आले होते. या जाहिरातीत पेटीएमचे प्रमुख आणि देशाचे पंतप्रधान यांचे फोटो होते. ही जाहिरात वादग्रस्त झाली होती.

आता हे नवे 'पेसीएम' प्रकरण काय आहे असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. ही कुणाच्या तरी सुपीक मेंदूतून निघालेली जबरदस्त आयडिया आहे.

कर्नाटकात भाजपचे सरकार आहे. मुख्यमंत्री बसवराज बोम्मई आहेत. हे सरकार आणि एकुणातच कर्नाटकातील भाजप





भ्रष्टाचाराच्या विविध प्रकरणांनी व आरोपींनी त्रस्त व ग्रस्त आहे. आख्खे सरकारच भ्रष्टाचाराने ग्रासलेले आहे आणि मुख्य म्हणजे तेथील भाजप चक्क बचावाच्या पवित्र्यात म्हणजे बॅकफुटवर गेला आहे. खुद्द मुख्यमंत्र्यांवर देखील गैरव्यवहाराचे आरोप होत आहेत.

त्यामुळेच काँग्रेसच्या एका युवक कार्यकर्त्याने 'पेटीएम'च्या चालीवर 'पेसीएम' म्हणजेच 'सीएम'(चीफ मिनिस्टर – मुख्यमंत्री)ना 'पे' करा म्हणजेच मुख्यमंत्र्यांना पैसे चारा अशी पोस्टर्स बंगलुरुमध्ये ठिकठिकाणी लावून एकच धमाल उडवून दिली आहे.

या पोस्टर्सनी पब्लिकमध्ये चांगलीच धमाल उडवून दिली आहे.

मुख्य म्हणजे भाजपच्या मंडळींच्या अंगाची अक्षरशः लाहीलाही झाली आहे. भाजपच्या कुप्रसिध्द आयटी सेल किंवा भाजप व संघ परिवाराच्या ट्रोल गँगला देखील याचा प्रतिवाद कसा करायचा हे सुचेनासे झाले आहे. या प्रत्युत्तर म्हणून त्यांनी माजी मुख्यमंत्री सिद्रामय्या आणि सध्याचे प्रदेश काँग्रेस अध्यक्ष शिवकुमार यांच्याविरुध्दच्या भ्रष्टाचाराच्या काही आरोपांवरुन ट्वीट वगैरे करण्याचा प्रयत्न केला. पण 'पे-सीएम' या पोस्टर्सनी जी धमाल केली आहे त्याला तोडीस तोड प्रत्युत्तर देण्यात भाजपची मंडळी अपयशी ठरली हे वास्तव आहे.

त्यांचा तिळपापड होण्याचे आणखी कारण हे की आता कर्नाटकातील विधानसभा निवडणुका काही महिन्यांवरच येऊन ठेपलेल्या आहेत आणि काँग्रेसने जर असा काही चलाख प्रचार सुरु केला तर त्याला तोंड द्यायचे कसे या चिंतेत भाजपची आयटी सेलवाली मंडळी आहेत.

# वरचढपणाची स्पर्धा ???

एखाद्या उद्घाटन समारंभात फीत कापण्याचा कार्यक्रम असतो.

अशा कार्यक्रमात सर्वसाधारणपणे एकच फीत असते आणि जो मुख्य–सन्माननीय पाहुणा असतो तो ती कापून उद्घाटनाचा किंवा अनावरणाचा कार्यक्रम सुरु करीत असतो.

पण, दोन फिती असणे आणि दोन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते त्या कापण्याचा कार्यक्रम तुम्ही कधी पाहिला किंवा ऐकला आहे काय ?

नाही ना ?

तर मग ऐका !

बिहारमधील कोईलवार नावाच्या गावात एका नव्याने बांधलेल्या २७२ खाटांच्या रुग्णालयाच्या उद्घाटनाचा समारंभ होता.

समारंभाला गेलेल्या लोकांना तेथे जे दृष्य दिसले त्यामुळे अनेकजण आश्चर्यचकित झाले. याठिकाणी एकावर एक अशा दोन फिती लावलेल्या होत्या. या दोन फितींचा उलगडा थोड्या वेळाने आपोआपच झाला.

या समारंभाला मुख्यमंत्री नीतीशकुमार आणि उपमुख्यमंत्री व आरोग्यमंत्री तेजस्वी यादव दोघेही उपस्थित होते.

नीतीशकुमार यांना खालची फीत कापण्यास सांगण्यात आले. त्यांनी ती कापली. यानंतर तेजस्वी यादव यांची पाळी होती. त्यांना वरची फीत कापण्याचा मान देण्यात आला.





हे काहीसे विचित्र दृष्य होते.

काही मंडळींनी त्याचे लगेचच वेगवेगळे अर्थ लावण्यास सुरुवात केली.

तेजस्वी यादव यांचा पक्ष(राष्ट्रीय जनता दल) नीतीशकुमार यांच्या पक्षापेक्षा मोठा आहे आणि राष्ट्रीय जनता दलाच्या जिवावरच नीतीशकुमार मुख्यमंत्री असल्याने त्याची जाणीव देण्यासाठी दोन फिती लावणे आणि त्यातही वरची फीत कापण्याचा मान तेजस्वी यादव यांना देणे ही आयडिया किंवा डोके कुणाचे हे कुणाच्याच लक्षात येईना. नीतीशकुमार आणि तेजस्वी यादव यांच्या चेहऱ्यावर ही गोष्ट खटकणारी आहे असले कोणतेच भाव नव्हते. परंतु बघ्यांमध्ये कुजबूज होणे अपरिहार्य होते. त्या कुजबुजीचा सूर, 'परस्परांवर कुरघोडीचे प्रकार आता या दोघांमध्येही सुरु झाले बरं का ?' असाच होता. पण हा प्रकार काही फाजील उत्साही सरकारी बाबूंनी केल्याची माहिती काहींनी दिली.

येथपर्यंत सर्व ठीक होते.

परंतु राष्ट्रीय जनता दलाचे एक बोलघेवडे नेते शिवानंद तिवारी यांनी पक्षाच्या बैठकीत नीतीशकुमार यांनी आता हिमालयात आश्रम काढून निवृत्ती घ्यावी आणि राजकीय कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करावे असे सुचविले. काही वर्षांपूर्वी नीतीशकुमार यांनीच आपल्याजवळ बोलताना अशी इच्छा व्यक्त केल्याचा दावाही त्यांनी हे बोलताना केला. आता हे असले प्रकार घडल्यानंतर साहजिकच या नव्या महागठबंधनात काहीतरी कुरबुरी सुरु झाल्या असाव्यात अशी शंका येणारच !

आणि अशा गावगप्पांना कोण रोखू शकणार आहे ?

शिवानंद तिवारी यांना राज्यसभेत जाण्याची इच्छा आहे. पण त्यांच्या या अनियंत्रित वाचाळपणामुळे तसेच मनाला येईळ तसे पक्ष बदलण्यामुळे त्यांची विश्‍वासार्हता नाही. राष्ट्रीय जनता दलाने त्यांना पूर्वी एकदा राज्यसभेवर पाठविले पण नंतर न पाठविल्याने ते असंतुष्ट आहेत आणि त्यामुळे त्यांच्या वाचाळपणाला नवी धार येणे स्वाभाविक आहे. त्यामुळे हे प्रकार चालू असले तरी तूर्तास तरी फारशी गडबड दिसून येत नाही!

## थरुर यांना पाठिंबा कुणाचा?

शशि थरुर यांनी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदाच्या रिंगणात सुरुवातीलाच उडी घेतली. थरुर यांना आंतरराष्ट्रीय प्रतिमा आहे. संयुक्त राष्ट्रसंघात होते आणि उपमहासचिव पदावर होते. त्यांनी महासचिवपदाची निवडणूकही लढवली होती पण त्यात ते हरले होते.

ते एक निखळ अभ्यासू व्यक्तिमत्व आहेत. जागतिक घडामोडींच्या प्रवाह व अंतःप्रवाहांचे त्यांचे आकलन निश्‍चितच जास्त आहे.

एका उदार लोकशाहीवादी व प्रागतिक विचारांचे ते आहेत.

त्यांचा अभ्यास, अध्ययन व लेखन यांना स्वाभाविक वैश्‍विकतेची डूब असणारच. त्यामुळे त्यांचे असे व्यक्तिमत्व एका भारतीयत्वाच्या चौकटीत कसे मावणार असा प्रश्‍न पडतोच. तरीही त्यांनी संसदसदस्य म्हणून आपला ठसा उमटविला आहे. त्यांचे विविध विषयांवरील भाषणे अभ्यासपूर्ण असतात. त्यांच्या व्यापक व विशाल दृष्टिकोनामुळेच कधीकधी ते पक्षीय चौकटीबाहेर जाऊनही विचार करीत असतात आणि अनेक वेळेस अडचणीतही आलेले आहेत.

या त्यांच्या उदार व व्यापक दृष्टिकोनामुळेच एकदा त्यांनी केरळमधील मार्क्सवाद्यांच्या नेतृत्वाखालील डाव्या लोकशाही आघाडी सरकारच्या काही विकास कामांबद्दल प्रशंसेचे उद्‌गार काढले होते.



केरळमध्ये काँग्रेस व मार्क्सवादी कम्युनिस्ट हे थेट एकमेकाचे प्रतिस्पर्धी आहेत. त्यामुळे त्यांच्या या प्रशंसेचा गैरउपयोग मार्क्सवाद्यांनी करुन घेतला आणि काँग्रेसची मंडळी त्यांच्याविरुध्द चवताळून उठली.

थरुर यांच्या उदार व व्यापक भूमिकांमुळेच त्यांना केरळमधील प्रतिष्ठित अशा थिरुअनंतपुरम(त्रिवेंद्रम) लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी मिळू नये यासाठी केरळ प्रदेश काँग्रेसने सातत्याने प्रयत्न केले परंतु सोनिया गांधी यांच्या पाठबळामुळे थरुर यांना उमेदवारी मिळत गेली आणि ते सतत निवडूनही येत राहिल्याने स्थानिक काँग्रेस नेत्यांचा नाईलाज झाला.



याचा अर्थ काय ?

थरुर त्यांच्या मतदारसंघात लोकप्रिय आहेत. ते आधुनिक व प्रागतिक विचाराचे आहेत, इंग्रजीवर त्यांचे प्रभुत्व आहे आणि त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. हिंदीही ते उत्तम बोलतात. त्यांच्या ट्वीटर अनुयायांची संख्या एकेकाळी पंतप्रधानांपेक्षा अधिक होती. युवकांमध्ये ते विशेष लोकप्रिय आहेत.

थोडक्यात सांगायचे झाल्यास थरुर हे पक्षापेक्षा पक्षाबाहेरच्या लोकांमध्ये जास्त लोकप्रिय आहेत.

त्यांनी अध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज भरु नये यासाठीही केरळ प्रदेश काँग्रेसमधील मुखंडांनी प्रयत्न केल्याचे सांगण्यात येते. पण थरुर यांनी त्यांना न जुमानताच अर्ज भरला.

त्यामुळे केरळ प्रदेश काँग्रेसला पेच पडणे स्वाभाविक होते. केरळची अस्मिता म्हणून थरुर यांना मते द्यायची

की हायकमांडचा आदेश मानून त्यांच्या उमेदवाराल मते द्यायची अशी दुविधा निर्माण झालीच होती.

परंतु आता बहुधा त्यांची ही दुविधा दूर झाली असावी.

मल्लिकार्जुन खर्गे हे आता हायकमांडचे उमेदवार असल्याचे जवळपास स्पष्ट झालेले असल्याने केरळसकट सर्व प्रदेशातील काँग्रेसजन त्यांना मते देणार हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे.

थोडक्यात थरुर हे खुल्या व उदार भूमिकेचे असल्याने त्यांना पक्षाच्या हायकमांडचा शब्द प्रमाण मानणाऱ्या पक्षात अध्यक्षपद मिळणे अवघड आहे. किंबहुना त्यांची ही भूमिका पचविण्याची क्षमताच काँग्रेस पक्षाकडे नाही असे

म्हटल्यास वावगे ठरणार नाही !

## दुष्कर्म केले जाते ती जागा उद्ध्वस्त केली जाते !

एखाद्या जागेत किंवा वास्तूमध्ये काही पाप झाले असेल तर ते उद्ध्वस्त करण्यात येते असे मानले जाते.

भोपाळमध्ये स्थित प्रदेश भाजप मुख्यालयात काही पाप घडले आहे काय व म्हणून ते आता पाडण्यात येत आहे काय असा प्रश्न मध्य प्रदेश भाजपचे एक ज्येष्ठ व वयोवृध्द नेते रघुनंदन शर्मा यांनी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जगतप्रकाश नड्डा यांना एक पत्र लिहून केला आहे.

या वास्तूत पाप – दुष्कर्म घडले असेल तर तसे स्पष्ट करा असे जवळपास आव्हानच त्यांनी दिले आहे.

भोपाळमधील प्रदेश भाजपचे विशाल मुख्यालय आहे. त्या परिसराला दीनदयाळ संकुल म्हटले जाते.

अचानक दिल्लीतून म्हणजे भाजप हायकमांडकडून म्हणे असा आदेश आला की हे संकुल पाडून त्याच्या जागी नवेकोरे मुख्यालय बांधावे व परिसराचे सुशोभीकरणही केले जावे.

खरेतर हे संकुल फार जुने किंवा जुनाट व पडझडीला आलेले नाही. परंतु नावीन्याचा अतिरेकी अट्टाहास व देखावेबाजी आणि प्रदर्शनाची हौस असलेले नेतृत्व पक्षाला लाभते तेव्हा अशा गोष्टी घडतात. खुद्द दिल्लीतच पहाना ! गरज नसताना नव्या संसदगृहाची निर्मिती केली जात आहे. सेंट्र व्हिस्टा नूतनीकरणाच्या नावाखाली तोडफोड सुरु आहे. तोच प्रकार बहुधा भोपाळमध्ये सुरु झाला असावा.

शर्मा यांनी त्यांच्या पत्रात फारच मजेशीर उपमा व दाखले दिले आहेत.

चांगले सुस्थितीत असलेले कार्यालय तोडणे कसे आहे यासाठी त्यांनी पिसाळलेल्या हत्तीचे उदाहरण दिले आहे.

एखाद्या युध्दात सेनापतीचा हत्ती बिथरुन पिसाळतो आणि स्वतःच्या सेनेतील सैनिकांना पायदळी तुडवू लागतो असा हा कार्यलय तोडण्याचा निर्णय आहे. आपणच आपल्या हातांनी आपलेच कार्यालय तोडणे हा असाच प्रकार आहे. यामुळे हजारो कार्यकर्त्यांच्या दयावर घाव घातल्यासारखे झाले आहे.

प्रदेश भाजप अध्यक्षांना याबाबत विचारणा केली असता त्यांनी 'दिल्लीहून आदेश' आल्याचे सांगितले. ज्या दिल्लीच्या नेत्यांना येथील परिस्थितीची तपशीलाने माहिती नाही ते असा अविचारी निर्णय व आदेश कसा करु शकतात असा प्रश्नही त्यांनी केला आहे. त्यांचा आणखी एक शेरा भाजप



हायकमांडला चांगलाच झोंबणारा आहे.

उत्तर प्रदेशाचे थेट नाव न घेता त्यांनी म्हटले आहे की अपराधी व दहशतवाद्यांच्या मालमत्तांवर बुलडोझर चालवून ते उद्‌ध्वस्त केले जात आहेत. मग भोपाळमधील भाजप मुख्यालय कोणत्या श्रेणीत किंवा वर्गात समाविष्ट होते ? म्हणजे भोपाळचे भाजप मुख्यालय हा अपराधी व दहशतवाद्यांचा अड्डा आहे काय असेच त्यांनी आडूनआडून विचारले आहे.

दिल्लीहून दौलताबादला राजधानी हलविण्यासारखाच हा प्रकार आहे अशी टीकाही त्यांनी करुन हा निर्णय करण्यापूर्वी मध्य प्रदेशातील कोणाही वरिष्ठ स्थानिक नेत्याशी साधी सल्लामसलत देखील करण्यात आली नाही ही अत्यंत दुर्दैवी गोष्ट आहे.

शेवटचा शेरा तर जिव्हारी लागणारा आहे.

ते म्हणतात, 'दिल्लीला एवढे महाभव्य महाकाय मुख्य राष्ट्रीय कार्यालय उभारले आहे पण दिल्लीत भाजप मात्र आक्रसत चालला आहे'.

हे वाचल्यानंतर आता 'समझनेवालों को इशारा काफी है !'

## जुमलापतींची फजिती !

प्रति-सरदार पटेल उर्फ द्वितीय पोलादी पुरुष उर्फ केंद्रीय गृहमंत्री अमितभाई शहा यांनी नुकताच बिहारचा दौरा केला.

बिहारमध्ये सत्ता गेल्याने चवताळलेल्या भाजप हायकमांडने आता बिहारला टार्गेट करणे अगदी अपेक्षितच आहे. त्यामुळेच द्वितीय पोलादी पुरुषांनी बिहारच्या चकरा वाढवलेल्या आहेत. अलीकडेच ईशान्य बिहारमध्ये पूर्णिया येथे त्यांनी सभा घेतली. त्यासाठी ते विमानाने गेले. त्यांचे विमान चुनापूर या हवाईदलाच्या विमानतळावर उतरले.






अमितभाई विमानतळ आणि तेथील चकाचक पाहून खूष झाले.

त्यांनी जाहीर सभेत त्या विमानतळाचा उल्लेख केला आणि भाजपच्या केंद्रातील सरकारने कसा अद्ययावत आणि आधुनिक विमानतळ बांधून नागरिकांना सुविधा पुरवली आहे. मग त्यांनी पंतप्रधानसाहेबांचा 'कनेक्टिव्हिटि'चा मंत्र आळवला. केंद्रातले भाजपचे सरकार लोकांच्या सोयीसाठी कसे कटिबध्द असल्याचे पालुपदही गायले. पण झाले उलटेच !

त्यांच्या या भाषणावर अशी काही टीका झाली की बस्स !

लोकांनी ते ट्रोल करुन



त्यांचे यथेच्छ चेष्टा करण्यास सुरुवात केली.

कारण ????

कारण पूर्णिया येथे विमानतळच नाही. त्यांचे विमान उतरलेला विमानतळ हा हवाईदलाचा होता आणि तेथीन चीन सीमेवर लक्ष ठेवण्यासाठी युपीए सरकारने तो बांधलेला आहे. त्याला चुनापूर एअर बेस म्हणतात. पूर्णियामध्ये नागरी विमानतळाचे बांधकाम सुरु आहे. परंतु श्रेय घेण्याची लालसा व हव्यास इतका टोकाचा आहे की दिसेल त्या गोष्टीचे श्रेय घेण्याची आता चटक लागली आहे आणि मग अशी फजिती झाल्याखेरीज रहात नाही.

यानंतर बिहारचे उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांनी ट्वीट करुन 'केंद्रीय गृहमंत्र्यांसाठी ते दिल्ली-पूर्णिया हवाई तिकिट काढू इच्छितात' असा टोला लगावला. काँग्रेसने चुनापूर युपीए सरकारने बांधल्याचे सांगितले. मग नीतीशकुमार यांच्या संयुक्त जनता दलाने हे द्वितीय पोलादी पुरुष 'ज्येष्ठ जुमलेबाज' म्हणून ओळखलेच जातात. आता लोकांनीच भाजप काय प्रकारचा पक्ष आहे ते ठरवावे असे म्हटले.

या फजितीवर भाजपच्या गोटात चांगलीच चिडीचूप होती.

## नड्डांना मुदतवाढ ?

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जगतप्रकाश नड्डा यांच्या अध्यक्षपदाची मुदत जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात संपत आहे.

एकंदरीत लक्षणे पाहता त्यांनाच मुदतवाढ दिली जाईल असे अंदाज वर्तविण्यात येत आहेत. म्हणजेच लागोपाठ दुसऱ्यांदा ते अध्यक्ष होतील.

नड्डा यांना त्यांच्या राजकीय आणि इतरही प्रकारच्या मर्यादा माहिती आहेत. त्यामुळे ते कधीच लक्ष्मणरेषा ओलांडत नाहीत.

भाजपवर ज्या जोडगोळीचा कब्जा आहे त्यांच्या शब्दाबाहेर ते नसतात. विशेष म्हणजे ते अध्यक्ष असले तरी पक्षाचे कामकाज हे अमितभाई शहांच्या मार्गदर्शनानेच चालते किंवा केले जाते. पक्षाच्या विविध रणनीती ठरविण्याच्या बैठकांना अमितभाईंची उपस्थिती अनिवार्यपणे असते. एऽढेच नव्हे तर पक्षातील नेमणुकाही त्यांच्याच सूचना व सल्ल्याने होत असतात.

असे आज्ञाधारक (नामधारीला पर्यायी गोंडस शब्द) अध्यक्ष असल्यावर त्यांना आणखी एक मुदतवाढ देण्यात काहीच अडचण नाही.

नड्डा पण जोडगोळीच्या तालावरच आणि चालीतच गांधी-नेहरू परिवारावर टीका करुन भाजपचे मोठेपण सांगत असतात ही त्यांच्या जमेची आणखी एक बाजू.






याला आणखीही एक कोन आहे.

नड्डा आहेत हिमाचल प्रदेशाचे आणि त्यांच्या मनात तेथील मुख्यमंत्री होण्याची सुप्त महत्वाकांक्षा आहे. परंतु तेथील ठाकूर लॉबी त्यांना मुख्यमंत्री होऊ देत नाही. पण ते त्यांच्या पध्दतीने हिमाचलमध्ये गोष्टी करीत असतात.

हिमाचलमध्ये डिसेंबरमध्ये विधानसभा निवडणुका आहेत. नड्डांची मुख्यमंत्रीपदाची महत्वाकांक्षा जागृत होऊ नये यासाठी त्यांना अध्यक्षपदासाठी मुदतवाढ देणे अधिक सोयीचे ठरेल. हे कारणही त्यांच्या मुदतवाढीमागे असावे. अऱ्थात अधिकृत निर्णय होईपर्यंत प्रतीक्षा करावी लागेल. कारण काहीतरी धक्कादायक करण्याची बालसुलभ वृत्ती अद्याप जोडगोळीमध्ये कायम आहे !

■■■

## शेवटचे पान



# मौन राखणं एवढंच हाती!



राष्ट्रपिता महात्मा गांधीजींची जयंती काल आपण सगळ्यांनी साजरी (?) केली. ३ ऑक्टोबरची वर्तमान पत्र बघितली तर त्यामध्ये ह्या जयंतीला काय काय घडल ते उत्सुकतेने बघितल. तशा या सगळ्या बातम्याच आहेत. त्यातले काही नमुने मी आता पेश करतोय

बातमी क्र. १ : देशाच्या राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांनी गुजरातमध्ये साबरमतीच्या आश्रमात गांधीजी सारखंच चरख्यावर सुत काढल. कदाचित संबंध राष्ट्राच्यावतीने राष्ट्रपतींनी चरख्याला केलेल हे वंदन होत. पण स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सव साजरा करताना चरख्यामधून दिलेला संदेश खेडी समृद्ध करण्यासाठी कुणी अंमलात आणतय का ? हाही विचार डोकावला.

बातमी क्र. २ : जम्मू येथे डि. जी. रँक चे पोलिस अधिकारी श्री. एच. के. लोहिया यांची त्यांच्याच निवासस्थानात त्यांच्याच सेवकाने बंदुकीच्या गोळ्या झाडून हत्या केली. अहिंसेचे प्रतीक म्हणून संबंध जगाची मान्यता मिळालेल्या गांधीजींच्या अहिंसेच्या तत्वाचा जणू काही सगळ्यांना विसर पडला आहे का ? अस क्षणभर वाटून गेल.

बातमी क्र. ३ : उत्तर प्रदेशातील एका आय. टी. आय. इंस्टीट्यूट मध्ये शिक्षण घेत असलेली कोवळ्या वयातील ८ तरुण मुले काही महिन्यांपूर्वी सहज फिरायला बाहेर गेली होती. अचानक त्यांचे लक्ष एका अल्पवयीन कुमारिकेकडे गेले. सगळ्यांनी तिला बस स्टँडवर सोडतो असे आमिष दाखवून सामूहिक बलात्कार केला. तिथून जाणाऱ्या एका पोलिस अधिकाऱ्याने त्या मुलीची सुटका केली. न्यायालयात खटला उभा राहिल्यावर न्यायाधीशांनी त्यांना अखेरच्या श्वासापर्यंत जन्मठेपेची आणि सक्तमजुरी शिक्षा ठोठावली आहे व प्रत्येकाला रु. ३०,०००/– दंड केला आणि त्यातली निम्मी रक्कम त्या पिडीत मुलीला देण्याचे आदेश दिले यातून आशेचा एका छोटासा किरण दिसतो की देशातील न्यायव्यवस्था अजूनही आपले काम चोखपणे करण्याचा प्रयत्न करीत आहे. पण गेल्या काही दिवसातील सर्वोच्च न्यायालय ते उच्च न्यायालयातील खटल्यांचे निकाल पहिले तर कुणीच खात्री देऊ शकणार नाही, तुम्हाला न्याय मिळेल याची.

बातमी क्र. ४ : मुंबईच्या छत्रपती शिवाजी विमातळाजवळ सहारा ग्रुपचे एक प्रचंड मोठे सहारा स्टार हॉटेल आहे. त्याची मालकी सहारा ग्रुपचे सुब्रोतो रॉय यांच्याकडे आहे. ते स्वतःला सेवक असे म्हणतात. देशात सरकारी नियमाप्रमाणे २ ऑक्टोबर या दिवशी दारू विक्रीला बंदी असते. परंतु या सहारा ग्रुपमध्ये १ ऑक्टोबरचीच बिले फाडून सर्रास मोठ्या प्रमाणात मदयविक्री चालू होती. गांधीजींची शिकवण होती समाज व्यसन मुक्त व्हावा, निदान एका दिवसासाठी तरी गांधीजींचे स्मरण करताना आपली दारूसाठी असलेली अगतिकता थांबवता येईल का ?

बातमी क्र. ५ : यंदासाठी गांधी जयंतीच्या सुमारास नवरात्री उत्सव सगळीकडे दणक्यात सुरू आहे. दुर्गा पूजेचे महत्व बंगाली लोकांना खूप आहे. तिथे अनेक देखावे तयार केले जातात. देवीने महिषासुराचा वध केला, हाही प्रसंग मोठ्या दिमाखदार पध्दतीने दाखविला जातो. कलाकार म्हणून अशाच एका समारंभासाठी ज्यांनी महिषासुर म्हणून निवड केली होती. तो डीक्टो महात्मा गांधी यांच्या सारखा दिसणारा होता. ज्या देशात गांधी जन्मतात तिथेच गोडसेही जन्म घेतात आणि एका गोडसेने महात्माजींची हत्या केली त्याप्रमाणे समाजातील गांधी हत्या करणारी प्रवृत्ती आजही सक्रिय आहे हे खेदाने लक्षात आले. पण अशा असंख्य हत्या घडवून आणल्या तरीही महात्मा गांधींचा विचार निरंतर विश्वामध्ये राहील एवढीच आशा आपण बाळगूया.

हे सर्व अस्वस्थ वर्तमान सामोरे येत असताना मनामध्ये प्रचंड कल्लोळ माजला होता. अखेरीला गांधीजींच्या शिकवणीतल आपण काय अंमलात आणू शकतो असा विचार केला तर मौन राखणे हे एवढेच आपल्या हाती आहे. हे विदारक सत्य आपल्या समोर येते.

बापूजींच्या पवित्र स्मृतीस मनोमन प्रणाम.